सत्यमेव जयते

१४ वी महाराष्ट्र विधानसभा
२०१९
सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२२

सत्यमेव जयते

१४ वी महाराष्ट्र विधानसभा
२०१९
सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
२०२२

प्रकाशक
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२०२२

मुद्रक
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
मुंबई.

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील तेराव्या महाराष्ट्र विधानसभेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर चौदाव्या महाराष्ट्र विधानसभेसाठीच्या सार्वत्रिक निवडणूका ऑक्टोबर, २०१९ मध्ये घेण्यात आल्या. २५ ऑक्टोबर २०१९ रोजी चौदावी महाराष्ट्र विधानसभा घटित झाली.

"१४ वी महाराष्ट्र विधानसभा २०१९ सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय" हे विधानसभा सदस्यांची वैयक्तिक माहिती समाविष्ट असणारे स्वतंत्र स्वरुपाचे सातवे प्रकाशन आहे. ह्या उपक्रमांतर्गत अगदी सुरुवातीची चार प्रकाशने (१९६७ ते १९७२, १९७२ ते १९७८, १९७८ ते १९८०, १९८० ते १९८५) प्रसिद्ध झाली, त्यामध्ये महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांचा परिचय एकत्रितपणे प्रकाशित करण्यात आला होता. परंतु १९८५-१९९० या प्रकाशनापासून मात्र विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्य यांच्या संक्षिप्त जीवन परिचयाची प्रकाशने स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहेत.

या प्रकाशनामध्ये चौदाव्या महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झालेल्या सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय समाविष्ट करण्यात आलेला आहे. सदर माहिती सदस्यांनी स्वतः भरुन दिलेल्या माहितीवर आधारित आहे. ज्या सदस्यांची माहिती मिळालेली नाही त्यांची आधीच्या प्रकाशनामध्ये माहिती उपलब्ध असल्यास ती समाविष्ट करण्यात आली आहे. याशिवाय काही सदस्यांकडून माहितीचा काही भाग उपलब्ध होऊ शकला नसल्याने उपलब्ध तितकीच माहिती या प्रकाशनामध्ये देण्यात आलेली आहे. त्याशिवाय राज्य निवडणूक विभागाकडून प्राप्त झालेली, मतदारसंघनिहाय, मिळालेल्या मताधिक्यानुक्रमे प्रत्येक मतदारसंघातील प्रथम ५ उमेदवारांच्या विधानसभा निवडणूक निकालासंबंधिची माहितीही समाविष्ट करण्यात आलेली आहे. हे प्रकाशन अधिक अद्ययावत व उपयुक्तकरण्याच्या दृष्टीने सदस्यांशी संपर्क साधण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करुन शक्य तितकी अधिक माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या प्रकाशनामध्ये या आधीच्या प्रकाशनांप्रमाणे राज्य मंत्रिमंडळाची यादी, जिल्हावार मतदारसंघक्रमनिहाय सदस्यांची यादी, सदस्यांची आडनावानुक्रमे यादी, मतदारसंघनिहाय निवडणूक निकाल माहिती, त्यामध्ये मतदारसंघनिहाय एकूण मतदार, झालेले वैध मतदान व मताधिक्यानुक्रमे पहिल्या पाच उमेदवारांची नावे, पक्ष व मिळालेली मते, तसेच महिला सदस्यांची स्वतंत्र यादी, पक्षनिहाय सदस्य संख्या, अपत्यांसंबंधिची माहिती, वयोगटानुसार, व्यवसायानुसार तसेच शैक्षणिक पात्रतेनुसार सांख्यिकीय माहितीही उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेली आहे.

१४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

चौदाव्या महाराष्ट्र विधानसभा सदस्यांसंबंधी विविध प्रकारची माहिती देणारे हे प्रकाशन केवळ विधानमंडळ सदस्यांनाच नव्हे तर पत्रकार, संशोधक, विशेष अभ्यासक व संसदीय लोकशाही कार्यपध्दतीमध्ये रस असणाऱ्या प्रत्येकाला उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

हे प्रकाशन तयार करण्याच्या कामी श्री.बा.बा.वाघमारे, सेवानिवृत्त ग्रंथपाल व सर्व सहकाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले असल्याने त्यांचा विशेष उल्लेखकरणे मी माझे कर्तव्य समजतो. तसेच, या प्रकाशनाच्या सुबक व नेटक्या छपाईच्याबाबतीत व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई व त्यांचे सहकारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या प्रकाशनाची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने काही सूचना आल्यास त्यांचे स्वागतच होईल.

विधान भवन,
मुंबई ४०० ०३२.
जानेवारी २०२२.

राजेंद्र भागवत,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ.

अनुक्रमणिका

प्रस्तावना		..	
महाराष्ट्र विधानसभा पदाधिकारी.		..	(७)
महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ.		..	(१२)
महाराष्ट्र विधानसभा अधिकाऱ्यांचा संक्षिप्त जीवन परिचय.		..	१
	माननीय उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.	..	३
	प्रधान सचिव.	..	५
महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय.		..	७
महाराष्ट्र विधानसभा सदस्यांची सांख्यिकीय माहिती.		..	६८७
जोडपत्र	(१) वयोगटानुसार विभागणी.	..	६८८
	(२) शैक्षणिक पात्रतेनुसार विभागणी.	..	६८९
	(३) व्यवसायानुसार विभागणी.	..	६९१
	(४) अपत्यांबाबत आकडेवारी.	..	६९२
	(५) महाराष्ट्र विधानसभा महिला सदस्यांची यादी.	..	६९३
	(६) महाराष्ट्र विधानसभा पक्षनिहाय सदस्य संख्या	..	६९५
	(७) अनुसूचित जाती राखीव मतदारसंघातून निर्वाचित झालेल्या सदस्यांची यादी.	..	६९७
	(८) अनुसूचित जमाती राखीव मतदारसंघातून निर्वाचित झालेल्या सदस्यांची यादी.	..	६९९
	(९) जिल्हावार मतदारसंघ निहाय सदस्यांची यादी.	..	७०१
	(१०) सदस्यांची आडनावानुक्रमे सूची.	..	७१५
	(११) जिल्हा, विभाग व एकूण पक्षस्थितीविषयक सांख्यिकीय माहिती.	..	७३३

महाराष्ट्र विधानसभेचे मा. पीठासीन अधिकारी, मा. विरोधी पक्षनेता आणि विधानमंडळातील अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्या निवासस्थानांचे पत्ते.

अध्यक्ष : रिक्त

उपाध्यक्ष : **श्री. नरहरी सिताराम झिरवाळ**
सुरुचि - ९, सचिवालय जिमखान्याच्या बाजूला,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०३२.

विरोधी पक्षनेता : **श्री.देवेंद्र गंगाधरराव फडणवीस,** (एलएल.बी., मॅनेजमेंट डिप्लोमा इन मेथडस् ॲण्ड टेक्निक ऑफ प्रोजेक्ट मॅनेजमेंट.)
सागर बंगला, शासकीय कुटीर,
नारायण दाभोळकर रोड, मलबार हिल,
मुंबई ४०० ०३२.

प्रधान सचिव : **श्री.राजेंद्र ग. भागवत,**
७०१, निलंबरी बिल्डिंग, महर्षि कर्वे रोड,
नरिमन पॉईंटच्या फायर ब्रिगेड ऑफिस शेजारी,
मुंबई- ४०० ०२१.

विशेष कार्य अधिकारी : **डॉ. अ. शं. महाजन,**
१००२/१० मजला, तुषार बिल्डिंग, सिताराम देवरा मार्ग, ए रोड,
चर्चगेट रेल्वे स्टेशन, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

उप सचिव : **श्री. वि. गो. आठवले**
एच-१९/५०१, प्रेस इन क्लेव को-ऑप. हौ. सोसायटी,
प्रतिक्षा नगर, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

श्रीमती मे.दि.तळेकर (एलएल.बी.)
सी-१८, भानुदर्शन सोसायटी,
अरुणोदय नगर, मुलुंड (पूर्व), मुंबई.

श्री. शि.श्री.साठ्ये
फ्लॅट नं. ३०४, तिसरा मजला, बिल्डींग नं. २,
हरिओम को. ऑप. हौसिंग सोसायटी, मिलेनियम पार्क,
हरिओमनगर, मुलुंड (पूर्व), मुंबई.

श्री.जि.म.भोळे, (मा.विरोधी पक्षनेता, म.वि.स. यांच्या आस्थपनेवार प्रतिनियुक्तीने कार्यरत)
एच-१९/५०३, प्रेस एनक्लेव्ह सोसायटी,
प्रतिक्षा नगर, सायन, मुंबई - ४०० ०२२.

श्री.रा.म.तारवी
३०२, भूषण प्लाझा, पं. मल्हारराव कुलकर्णी मार्ग,
डॉन बॉस्को हायस्कूल समोर, वजीरा नाका,
बोरिवली (प), मुंबई - ४०० ०९१.

श्री. ना. रा. थिटे (मा.मुख्यमंत्री यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत)
३०२, लक्ष्मी-मधू को.ऑप. हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.२३, सेक्टर-४, रोड नंबर-४ नवीन पनवेल,
जिल्हा रायगड - ४१० २०६.

श्री.ऋतुराज ज. कुडतरकर (बी.कॉम., एलएल.बी)
अे-३०१, मुलुंड अमित को-ऑप.हौ. सोसायटी लि.,
म्हाडा कॉलनी, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.

उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी : **श्रीमती स्वाती स. ताडफळे,**
बी-३०४, निंबेश्वर संस्कृती, को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं. ८अ/१, जरीमरी माता मंदिराजवळ, सुकापुर,
पनवेल, जिल्हा रायगड, पिनकोड - ४१० २०६

कार्यवाही संपादक : **श्री. अ.र. अग्रवाल**
३, गोमती, अब्दुल गफार खान रोड, मुंबई - ४०० ०३०

ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी : **निलेश ब. वडनेरकर,**
७०२, पन्हाळगड, आय.आय.टी. स्टाफ को.ऑ.हौ.सोसा.,
जल वायू विहारच्या मागे, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई - ७६.

अवर सचिव : **श्री. सं. ना. पराडकर**
०७, कृष्णा महाल, संत जनाबाई पथ,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.

श्रीमती सा.सु.कांबळी
१२-अ-१, शासकीय वसाहत, हाजीअली, मुंबई.

श्री. सु. श्री. नलावडे
बी-२, श्री सिध्दी को-ऑप. हौ. सोसायटी, सुनिल नगर, डोंबिवली (पूर्व), जिल्हा ठाणे.

श्री. नि. शि. दळवी,
श्री.साई उषा कॉम्प्लेक्स को-ऑप.हौ.सोसायटी लि.,
व्हिलेज रोड, खंडेलवाल मार्ग, उषा नगर,
भांडुप (प.), मुंबई - ४०० ०७८.

श्री. सो. न. सानप
अल्केश को-ऑप.हौ.सो.लि., फ्लॅट क्र.५०३, ५ वा मजला,
हॉराईझन फ्लोरा, कस्तुरबा रोड, व्ही.पी.रोड कॉसलेन,
टी.जी.एस.बी. बँकेजवळ, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०.

श्री.र. ग.जगदाळे (बी.कॉम., एलएलबी)
३/१०४, अक्षयानंद, शैलेंद्र नगर, एस.व्ही.रोड, दहिसर (पू),
मुंबई - ४०० ०६८.

श्रीमती पुनम हे. ढगे
वाय-१२/१८३, शासकीय अधिकारी वसाहत,
वांद्रे (पू.), मुंबई - ४०० ०५१.

श्री.उ.श.शिंदे
प्लॉट नं.५०४, बिल्डिंग नं.३, पाचवा मजला,
विजय पार्क, घोडबंदर रोड, कासारवडवली, ठाणे (प.)

श्री. प्र.श्री.खोंदले
य-५/७९, शासकीय कर्मचारी वसाहत, खेरवाडी, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.

श्री. वि. शं. कोमटवार,
ब-६०४, तुलसी आंगण, कात्रप,
बदलापूर (पू.), ठाणे - ४२१ ५०३.

श्री.मो.स.काकड
साकेत हार्मोनी बिल्डिंग नं.२, सी विंग, रुम. नं. २०३,
म्हात्रे नाका, चिंचपाडा रिक्षा स्टँडजवळ, कल्याण (पूर्व),
जिल्हा ठाणे - ४२१ ३०६.

अवर सचिव (समिती) : **श्री. सु.शं.झोरे**
सी-६०२, कुसुमभारती को. ऑप. हौ. सोसायटी,
दत्तपाडा रोड, बोरिवली (पू.), मुंबई - ४०० ०६६.

श्रीमती सि.स.तांबे
आय-५०२, उषा कॉम्प्लेक्स, भांडूप (प.), मुंबई - ४०० ०७८.

श्री. अ. श. पाटील (मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत-प्रपत्र बढती)
प्लॉट बी ३/१, ३०१, सेक्टर २०, नेरुळ (प.),
नवी मुंबई - ४०० ७०६.

श्री. आ. ने. जावळे
१०३, गंधपद्मीनी हौसिंग सोसायटी, चिंचोरी पाडा,
सुभाष रोड, डोंबिवली (प.), ठाणे - ४२१ २०२.

कु. पु. र. दळवी
१६/१, फ्रुटवाला बिल्डिंग, दादोजी कोंडदेव मार्ग, मुंबई - २७.

श्री. घ. ज्ञा. देबडवार
२०५, अर्चना अपार्टमेंट, चिखनघर कल्याण (प.),
ठाणे - ४२१ ३०१.

मा. पिठासीन/उप पिठासीन अधिकारी व मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव/ खाजगी सचिव

अ.क्र. नाव व पदनाम

१. **श्री. म. मु. काज**, मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
७१/५२, कलकत्तावाला बिल्डिंग, चवथा मजला, डॉ. भडकमकर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई.

२. **श्री. रविंद्र खेबुडकर**, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

३. **श्री. मुकेश भोगे**, मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
प्लॉट नं. १३०६ ऐवॉन, हिरानंदानी ईस्टेट, घोडबंदर रोड, ठाणे.

४. **श्री. जि. म. भोळे**, मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
एच १९/५०३, प्रेस एनक्लेव्ह सोसायटी, प्रतिक्षा नगर, सायन, मुंबई ४०० ०२२.

५. **श्री. विद्याधर महाले**, मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
१/३, बॅडमन्स क्वार्टर्स, वाळकेश्वर रोड, वाळकेश्वर, मलबार हिल,
मुंबई ४००००६

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ
(दिनांक १२ डिसेंबर २०१९ रोजीच्या शासन राजपत्राप्रमाणे)

मुख्यमंत्री

१	**श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे**	कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा त्यांचे भाग.

मंत्री

२	**श्री.एकनाथ संभाजी शिंदे**	गृह, नगर विकास, वने, पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, मृद व जलसंधारण, पर्यटन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण.
३	**श्री. छगन चंद्रकांत भुजबळ**	ग्रामविकास, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास आणि उद्योजकता, अन्न व औषध प्रशासन.
४	**श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात**	महसूल, उर्जा व अपारंपारिक उर्जा, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय.
५	**श्री. सुभाष राजाराम देसाई**	उद्योग आणि खनिकर्म, उच्च व तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, कृषि, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, परिवहन, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्ये, राजशिष्टाचार, भूकंप पुनर्वसन, बंदरे आणि खार भूमी विकास.
६	**श्री. जयंत राजाराम पाटील**	वित्त आणि नियोजन, गृहनिर्माण, सार्वजनिक आरोग्य, सहकार व पणन, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, कामगार, अल्पसंख्यांक विकास.
७	**डॉ.नितीन काशिनाथ राऊत**	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास, महिला व बाल विकास, वस्त्रोद्योग, मदत व पुनर्वसन, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण.

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ
(दिनांक ५ जानेवारी २०२० रोजीच्या शासन राजपत्राप्रमाणे)

मुख्यमंत्री

*	**श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे**	सामान्य प्रशासन, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय.

उप मुख्यमंत्री

**	**श्री. अजित अनंतराव पवार**	वित्त, नियोजन.

मंत्री

*	**श्री. सुभाष राजाराम देसाई**	उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा.
**	**श्री. अशोक शंकरराव चव्हाण**	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून).
*	**श्री. छगन चंद्रकांत भुजबळ**	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.
**	**श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील**	कामगार, राज्य उत्पादन शुल्क.
*	**श्री. जयंत राजाराम पाटील**	जलसंपदा व लाभक्षेत्र विकास.
****	**श्री. अनिल वसंतराव देशमुख**	गृह.
*	**श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात**	महसूल.
**	**डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे**	अन्न व औषध प्रशासन.

**	**श्री. राजेश अंकुशराव टोपे**	सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण.
**	**श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक**	अल्पसंख्यांक विकास व विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता.
**	**श्री. हसन मियालाल मुश्रीफ**	ग्राम विकास.
*	**डॉ. नितीन काशिनाथ राऊत**	ऊर्जा.
**	**श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड**	शालेय शिक्षण.
**	**डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड**	गृहनिर्माण.
*	**श्री. एकनाथ संभाजी शिंदे**	नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम).
**	**श्री. सुनिल छत्रपाल केदार**	पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण.
**	**श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार**	इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, खार जमिनी विकास, भूकंप पुनर्वसन.
**	**श्री. अमित विलासराव देशमुख**	वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य.
**	**श्री. उदय रविंद्र सामंत**	उच्च व तंत्रशिक्षण.
**	**श्री. दादाजी दगडू भुसे**	कृषि, माजी सैनिक कल्याण.
***	**श्री. संजय दुलीचंद राठोड़**	वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन.
**	**श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील**	पाणीपुरवठा व स्वच्छता.

**	**ॲड. के.सी. पाडवी**	आदिवासी विकास.
**	**श्री. संदिपानराव आसाराम भुमरे**	रोजगार हमी, फलोत्पादन.
**	**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील**	सहकार, पणन.
**	**ॲड. अनिल दत्तात्रय परब**	परिवहन, संसदीय कार्य.
**	**श्री. अस्लम रमजान अली शेख**	वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे.
**	**ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे)**	महिला व बालविकास.
**	**श्री. शंकरराव यशवंतराव गडाख**	मृद व जलसंधारण.
**	**श्री. धनंजय पंडितराव मुंडे**	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य.
**	**श्री. आदित्य उध्दव ठाकरे**	पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार.

राज्यमंत्री

**	**श्री. अब्दुल नबी सत्तार**	महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास,विशेष सहाय्य.
**	**श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील**	गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण.
**	**श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई**	गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क,कौशल्य विकास व उद्योजकता, पणन.
**	**श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू**	जलसंपदा लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार.

**	**श्री. दत्तात्रय विठोबा भरणे.**	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन.
**	**डॉ. विश्वजीत पतंगराव कदम**	सहकार, कृषि, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा.
**	**श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर**	सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य.
**	**श्री. संजय बाबुराव बनसोडे**	पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्य.
**	**श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे**	नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन.
**	**श्रीमती आदिती सुनिल तटकरे**	उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क.

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ
(दिनांक १२ एप्रिल २०२१ रोजीच्या शासन राजपत्राप्रमाणे)

मुख्यमंत्री

*	**श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे**	सामान्य प्रशासन, विधी व न्याय, वने व भूकंप पुनर्वसन, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

उप मुख्यमंत्री

**	**श्री. अजित अनंतराव पवार**	वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क.

मंत्री

*	**श्री. सुभाष राजाराम देसाई**	उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा.
**	**श्री. अशोक शंकरराव चव्हाण**	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून).
*	**श्री. छगन चंद्रकांत भुजबळ**	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.
**	**श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील**	गृह.
*	**श्री. जयंत राजाराम पाटील**	जलसंपदा व लाभक्षेत्र विकास.
*	**श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात**	महसूल.
**	**डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे**	अन्न व औषध प्रशासन.
**	**श्री. राजेश अंकुशराव टोपे**	सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण.

**	**श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक**	अल्पसंख्यांक विकास व विकास व औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता.
**	**श्री. हसन मियालाल मुश्रीफ**	ग्रामविकास, कामगार.
*	**डॉ. नितीन काशिनाथ राऊत**	ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय उर्जा.
**	**श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड**	शालेय शिक्षण.
**	**डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड**	गृहनिर्माण.
*	**श्री. एकनाथ संभाजी शिंदे**	नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम).
**	**श्री. सुनिल छत्रपाल केदार**	पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण.
**	**श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार**	इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन.
**	**श्री. अमित विलासराव देशमुख**	वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य.
**	**श्री. उदय रविंद्र सामंत**	उच्च व तंत्रशिक्षण.
**	**श्री. दादाजी दगडू भुसे**	कृषि, माजी सैनिक कल्याण.
**	**श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील**	पाणीपुरवठा व स्वच्छता.
**	**ॲड. के.सी. पाडवी**	आदिवासी विकास.
**	**श्री. संदिपानराव आसाराम भुमरे**	रोजगार हमी, फलोत्पादन.
**	**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील**	सहकार, पणन.

**	**ॲड. अनिल दत्तात्रय परब**	परिवहन, संसदीय कार्य.
**	**श्री. अस्लम रमजान अली शेख**	वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे.
**	**अँड. यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे)**	महिला व बालविकास.
**	**श्री. शंकरराव यशवंतराव गडाख**	मृद व जलसंधारण.
**	**श्री. धनंजय पंडितराव मुंडे**	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य.
**	**श्री. आदित्य उध्दव ठाकरे**	पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार.

राज्यमंत्री

**	**श्री. अब्दुल नबी सत्तार**	महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास,विशेष सहाय्य.
**	**श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील**	गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण.
**	**श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई**	गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क,कौशल्य विकास व उद्योजकता, पणन.
**	**श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू**	जलसंपदा लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार.
**	**श्री. दत्तात्रय विठोबा भरणे**	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन.
**	**डॉ. विश्वजीत पतंगराव कदम**	सहकार, कृषि, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा.

**	**श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर**	सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य.
**	**श्री. संजय बाबुराव बनसोडे**	पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्य.
**	**श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे**	नगरविकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन.
**	**श्रीमती आदिती सुनिल तटकरे**	उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक. कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय.

टीप : * **दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी मुख्यमंत्री व मंत्री यांनी शपथ घेतली.**

** **दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी उपमुख्य मंत्री, मंत्री व राज्यमंत्री यांनी शपथ घेतली.**

*** **दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी राजीनामा.**

**** **दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी राजीनामा.**

महाराष्ट्र विधानसभा अधिकाऱ्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

मा. श्री. नरहरी सिताराम झिरवाळ
माननीय उपाध्यक्ष,
महाराष्ट्र विधानसभा

झिरवाळ, श्री. नरहरी सिताराम

माननीय उपाध्यक्ष

महाराष्ट्र विधानसभा

जन्म : १ जून, १९५९.

जन्म ठिकाण : वनारे, तालुका-दिंडोरी, जिल्हा-नाशिक.

शिक्षण : बी.ए. (पर्यंत).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती चंद्रभागा.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १२२-दिंडोरी, (अनुसूचित जमाती), जिल्हा-नाशिक.

इतर माहिती : सन २००१-२०१४ अध्यक्ष, सह्याद्री शिक्षण, मंडळ, दिंडोरी; अनेक शैक्षणिक संस्थांना मदत व शैक्षणिक सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न; आदिवासी समाजातील अनिष्ट प्रथांबाबत जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन, आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न; गोरगरीबांना मदत; १९८७ बिनविरोध चेअरमन, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था. १९९२ संस्थापक-चेअरमन, श्री संत सावता माळी दुध उत्पादक सहकारी संस्था; काही काळ जनता पक्षाच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न; १९९४-१९९९ काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; अध्यक्ष, दिंडोरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९८७ पासून सदस्य व १५ वर्षे सरपंच, ग्रामपंचायत, वनारे; १० वर्षे सदस्य व तीन वर्षे उप सभापती, पंचायत समिती, दिंडोरी; २००१ सदस्य, जिल्हा परिषद, नाशिक; २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; १४ मार्च, २०२० रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षपदी एकमताने निवड.

छंद : वाचन, गायन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु. वनारे, पो. वारे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक.

दूरध्वनी : कार्यालय - (०२५५७) २२१२१२.
मोबाईल - ९४२२७६९४४४.
ई-मेल - zirwal.n.s@gmail.com
(२) उपाध्यक्ष कार्यालय, दालन क्रमांक ०१८/०१९,
विधानभवन, मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी कार्यालय : (०२२) - २२०२३६४६ / २२०२६४७०.
ई-मेल : dyspeakermh@gmail.com.
(३) सुरूची ९, सचिवालय जिमखान्याच्या बाजुला, नरिमन पॉईंट,
मुंबई ४०००३२

निवडणूक निकाल

(१२२ - दिंडोरी, (अनुसूचित जमाती)

एकूण मतदार	३,००,२६०
एकूण वैध मतदान	२,०९,१७०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) श्री. नरहरी सिताराम झिरवाळ	१,२४,५२० [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. भास्कर गावित	६३,७०७ (शिवसेना)
(३) श्री. अरुण गायकवाड	१३,४७६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) ॲड. टीकाराम बागुल	३,१४८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	२,२९८

भागवत, श्री. राजेंद्र गजानन
प्रधान सचिव

जन्म : १० एप्रिल, १९६३.

जन्म ठिकाण : सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग.

शिक्षण : बी.कॉम., एलएल. एम. (मुंबई विद्यापीठ)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कोकणी व गुजराती.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती गायत्री.

अपत्ये : एकुण १ (एक मुलगा)

इतर माहिती : सन १९८८-१९८९ मध्ये शैक्षणिक गुणवत्तेमुळे मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) नामनियुक्ती; सन १९८७-१९९६ या कालावधीत मुंबई उच्च न्यायालयात वकिली व तीन महत्त्वपूर्ण न्यायनिर्णयामध्ये महत्त्वाची भूमिका; सन १९९६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या विधिविधान शाखेचे सहायक प्रारूपकार तथा अवर सचिव या पदावर सेवाप्रवेश; सन २००३-२००४ उप प्रारूपकार नि-उप सचिव पदावर आणि तदनंतर प्रारुपकार-नि-सहसचिव पदावर पदोन्नती; सन २०१७ मध्ये सचिव (विधिविधान) पदावर नियुक्ती तसेच संसदीय कामकाज विभागाच्या सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार; दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ ते ३ सप्टेंबर, २०२० महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (अतिरिक्त कार्यभार); दिनांक ३ सप्टेंबर, २०२० पासून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे प्रधान सचिव;

छंद : वाचन, लेखन, संगीत, संसदीय प्रथा व परंपरा आणि सांविधानिक विधी व्यासंग..

पत्ता : ३७०१, नीलांबरी, महर्षी कर्वे मार्ग, नरिमन पॉईंट,
अग्निशमन केंद्रासमोर, मुंबई ४०० ०२१.
मोबाईल ९३२३९५३९२९.
ई.मेल : rajendra.bhagwat@nic.in.

महाराष्ट्र विधानसभा
सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

अग्रवाल, श्री. विनोद संतोष

जन्म : ११ मे, १९६९.

जन्म ठिकाण : गोंदिया.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सविता.

अपत्ये : एकूण- २ (दोन मुलगे).

व्यवसाय : समाजसेवा .

पक्ष : अपक्ष .

मतदारसंघ : ६५ - गोंदिया, जिल्हा गोंदिया.

इतर माहिती : सन १९९४ पासून सचिव , श्री. सुर्योदय माँ मांडोदेवी देवस्थान समिती, बडोदा; शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आमची शाळा उपक्रम सुरू केला; संचालक, सेवा सहकारी संस्था, ब्राम्हणी, तालुका गोरेगाव, जिल्हा गोंदिया; २५ वर्षे सदस्य, रेल्वे झोनल कमिटी; (ZRUCC); सचिव, भारतीय जनता युवा मोर्चा, गोरेगाव; १९८७ ते १९९२ अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, गोरेगाव; १९९२ ते १९९८ महामंत्री, भारतीय जनता युवा मोर्चा, गोरेगाव; १९९८-२००० जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा,गोरेगाव; २०००-२००३ महामंत्री, भारतीय जनता युवा मोर्चा,

गोंदिया; २००३-२०१० जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; गोंदिया; २०१०-२०१३ सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००० - २००५ व २०१० - २०१५ सदस्य, शिक्षण सभापती व उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : साहित्य वाचन.

परदेश प्रवास : इस्त्राईल देशाचा अभ्यास दौरा.

पत्ता : गौरक्षण मार्केट समोर, जुना बस, स्टँड रोड, गोंदिया.
दूरध्वनी :- निवास- ९४२२१३०७४२.
कार्यालय :- ९३२५३२६५०५.
मोबाईल :- ९४२२१३०७४२/९६७३९२२०००.
ई-मेल :- mla65@vinodagrawal.in.

निवडणूक निकाल

(६५ - गोंदिया)

एकूण मतदार	३,२२,२४८
एकूण वैध मतदान	२,०९,३८४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) श्री. विनोद संतोष अग्रवाल	१,०२,९९६ [अपक्ष]
(२) श्री. गोपालदास अग्रवाल	७५,८२७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. अमर वराडे	८,९३८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. कमलेश उईके	५,२४६ (अपक्ष)
(५) श्री. ध्रुवाज भोयर	४,७०४ (बहुजन समाज पार्टी)

अडसड, श्री. प्रताप अरुणभाऊ

जन्म : ६ जानेवारी, १९७८.

जन्म ठिकाण : धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती.

शिक्षण : बी. ई. (मेकॅनिकल).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती कृष्णा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ३६-धामणगाव रेल्वे, जिल्हा-अमरावती.

इतर माहिती : सदस्य, वंदे मातरम ग्रुप, धामणगाव रेल्वे; अध्यक्ष, नवदुर्गा नागरी सहकारी पतसंस्था; अध्यक्ष, श्री. गजानन सहकारी सुतगिरणी; संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, धामणगाव; सन २०१८ अशासकीय सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था नियामक मंडळ; २००३-२००५ सदस्य, भाजपा युवा मोर्चा, अमरावती; २००५-२००९ प्रदेश सचिव व २००९-२०१९ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवामोर्चा, भारतीय जनता पक्ष; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : गायन, वाचन, गझल व गाणे ऐकणे.

पत्ता : (१) दत्तप्रसाद शास्त्री चौक, धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती.
(२) अरुणोदय गाबेदिवाल ले-आऊट, भाग्यनगर कॅम्प, अमरावती, जिल्हा अमरावती.
दूरध्वनी :- ८६६८३११६११.
मोबाईल :- ९५१८५९४६९९,९४२२९५५८६९.
ई-मेल :- mlapratapadsad@gmail.com

निवडणूक निकाल

(३६ - धामणगाव रेल्वे)

एकूण मतदार	३,१४,६९८
एकूण वैध मतदान	२,०९,८२०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. प्रताप अरुणभाऊ अडसड**	९०,८३२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. विरेंद्र वाल्मीकराव जगताप	८१,३१३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. निलेश विश्वकर्मा	२३,७७९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. प्रविण घुइखेडकर	२,६६८ (अपक्ष)
(५) श्री. अभिजीत ढेपे	२,५५३ (अपक्ष)

अंतापूरकर, श्री. जितेश रावसाहेब

जन्म : ३० डिसेंबर १९८९.

जन्म ठिकाण : अंतापूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड.

शिक्षण : बी. टेक. (सिव्हिल इंजिनिअर).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : अविवाहित.

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ९०-देगलूर (अनुसूचित जाती) जिल्हा-नांदेड.

इतर माहिती : अध्यक्ष, बालक आश्रम, बोरिवली; सदस्य, आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ; नोव्हेंबर, २०२१ मध्ये (पो.नि.) महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : मु.पो. अंतापूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड.

मोबाईल : ८३२९०९७४२ / ९६३७३२०७६८.

निवडणूक निकाल

(९० - देगलूर (अनुसूचित जाती), पोटनिवडणूक)

एकूण मतदार	२,९८,५४०
एकूण वैध मतदान	१,८९,७५७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. जितेश रावसाहेब अंतापूरकर**	१,०८,८४० [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस(आय)]
(२) श्री. सुभाष पिराजीराव साबणे	६६,९०७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. उत्तम रामराव इंगोले	११,३४८ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	११०३
(५) कॉम्रेड प्रो. सदाशिव राजाराम भुयारे	४८६ (अपक्ष)

अळवणी, ॲड. पराग मधुसूदन

जन्म : ११ फेब्रुवारी, १९६७.

जन्म ठिकाण : विलेपार्ले, मुंबई.

शिक्षण : बी.एस्सी., एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती ज्योती.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १६७-विलेपार्ले, जिल्हा- मुंबई उपनगर.

इतर माहिती : अध्यक्ष, विलेपार्ले कल्चरल सेंटर, या संस्थेच्या माध्यमातून कला व क्रिडा स्पर्धेचे आयोजन; विलेपार्ले महोत्सवाचे आयोजन; महिला बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे कार्य; विकास प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन; भारतीय जनता पक्षामध्ये युवक चळवळीपासून सक्रीय; सन १९९३-१९९५ अध्यक्ष, विलेपार्ले विभाग; सन १९९८-२००२ जिल्हा अध्यक्ष, उत्तर मध्य मुंबई; सन २००३-२०१२ मुंबई प्रदेश सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष; सन २०१६ सदस्य, मुंबई उपनगर जिल्हा नियोजन मंडळ; सन १९९७-२००७

नगरसेवक, मुंबई महानगरपालिका; सन २००१-२००२ अध्यक्ष के (पूर्व) प्रभाग समिती; सन २००२-२००३ सुधार समिती अध्यक्ष; सन २००३-२००७ गट नेता भा.ज.पा. , मुंबई महानगर पालिका; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

पत्ता : श्रीविद्याविहार, हॅप्पी होम सोसायटी, ९ वा मजला,
नेहरू रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७.
दूरध्वनी : कार्यालय - (०२२)२६१७७१२५.
निवास – (०२२)२६१००१७१.
मोबाईल – ९८२०३५०५४४.
ई-मेल - parag.alavani@gmail.com

निवडणूक निकाल (१६७-विलेपार्ले)	
एकूण मतदार	२,६२,३४६
एकूण वैध मतदान	१,३९,२७२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. पराग मधुसुदन अळवणी**	८४,९९१ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्रीमती जयंती सिरोया	२६,५६४ (शिवसेना)
(३) श्रीमती जुईली शेंडे	१८,४०६ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) नोटा	४,२८६
(५) श्री. सुंदरराव पडमुख	३,८६७ (वंचित बहुजन आघाडी)

आजबे, श्री. बाळासाहेब भाऊसाहेब

जन्म : २८ ऑगस्ट, १९६९.

जन्म ठिकाण : शिराळ, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

शिक्षण : बी.एस्सी, (ॲग्री.)(द्वितीय वर्ष)

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सविता.

अपत्ये : एकूण- १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष .

मतदारसंघ : २३१ - आष्टी, जिल्हा बीड.

इतर माहिती : सन २००३ पासून अध्यक्ष, सेवा भावी संस्था, शिराळ, तालुका आष्टी, जिल्हा बीड; १९९७ -१९९९ तालुका अध्यक्ष, भारतीय युवक काँग्रेस कमिटी, आष्टी; १९९९ - २००४ अध्यक्ष, आष्टी तालुका रोजगार हमी योजना समिती; २०००- २००४ जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस कमिटी, बीड; २०१०-२०१४ जिल्हा उपाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; २००७-२०१२ सदस्य, पंचायत समिती, आष्टी; २०१७-२०१९ सदस्य, जिल्हा परिषद, बीड; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : वाचन,आधुनिक पद्धतीने शेती करणे व खेळ.

पत्ता : मु.पो. शिराळ, तालुका आष्टी, जिल्हा बीड-४१४२०८.
दूरध्वनी :- निवास- ९४२२७३३०७३.
कार्यालय :- ७८४३०१३३३३.
मोबाईल : ९८६०३८७५५५.
ई-मेल : balasahebajabe0073@gmail.com

निवडणूक निकाल

(२३१-आष्टी)

एकूण मतदार	३,७२,३२१
एकूण वैध मतदान	२,४०,८३८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री.बाळासाहेब भाऊसाहेब आजबे**	१,२६,७५६ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. भिमराव धोंडे	१,००,९३१ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. नामदेव सानप	४,७२९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	२,६३१
(५) श्री. राजाभाऊ देशमुख	१,४२३ (लोकतांत्रिक जनता दल)

आजमी, अबू आसिम हाजी नियाज अहमद

जन्म : ८ ऑगस्ट, १९५५.

जन्म ठिकाण : मंजीरपट्टी, तालुका आजमगढ, जिल्हा आजमगढ (उत्तर प्रदेश).

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : उर्दू, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती जाहेदा.

अपत्ये : एकूण ६ (एक मुलगा व पाच मुली).

व्यवसाय : उद्योग व व्यापार.

पक्ष : समाजवादी पक्ष.

मतदारसंघ : १७१- मानखुर्द- शिवाजी नगर, जिल्हा- मुंबई उपनगर.

इतर माहिती : अध्यक्ष, नियाज अहमद मायनॉरिटी एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट; अध्यक्ष, मिल्ली तहेरिक फौंडेशन, मुंबई; सदस्य, रेडिओ क्लब, कुलाबा, मुंबई; अध्यक्ष, हाजी नियाज अहमद आजमी मेमोरियल ट्रस्ट; अध्यक्ष, संकल्प, मुंबई; चेअरमन, कौमी मजलिस ए-शुरा, मुंबई; शेतकरी, कामगार, शोषित, दलित, पिडीत तसेच अल्पसंख्याक समाजावरील अन्याय व अत्याचाराविरोधी विविध आंदोलनांचे नेतृत्व; समाजवादी पक्षाच्या माध्यमातून जनहितार्थ मोर्चा, धरणे, आंदोलने, निदर्शने तसेच

रस्तारोकोचे आयोजन; १९९५-२००० अध्यक्ष, मुंबई शहर व २००० पासून कार्याध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश समाजवादी पक्ष, गुजरात व गोवा राज्याचे हंगामी केंद्रीय पक्ष निरीक्षक; २००२-२००८ सदस्य, राज्यसभा व राज्यसभेच्या अर्बन अँड रूरल डेव्हलमेंट कमिटी, कॉमर्स कमिटी, रुल्स कमिटी, विदेश मंत्रालय अंतर्गत कन्सलटेटिव्ह कमिटी, डिफेन्स कमिटीचे सदस्य म्हणून कार्य केले; २००९ मधील निवडणूकीत महाराष्ट्र विधानसभेवर मानखुर्द-शिवाजीनगर (जिल्हा मुंबई) व भिवंडी पूर्व (जिल्हा ठाणे) या दोन मतदारसंघातून निर्वाचित; दिनांक २ नोव्हेंबर, २००९ रोजी भिवंडी (पूर्व), जिल्हा ठाणे मतदारसंघ सदस्यत्वाचा राजीनामा; २००९- २०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अंदाज समिती; सदस्य, अल्पसंख्याक समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड

छंद : वाचन, खेळ व समाजकार्य.

परदेश प्रवास : यु.ए.ई., सौदी अरेबिया, इंग्लंड, मलेशिया, ओमान, दुबई आणि सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) सेंटीनल हाऊस, चौथा मजला, हाजी नियाज अहमद आजमी मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००५.
(२) ४/५८, कमाल मॅन्शन, चौथा मजला, हाजी नियाज अहमद आजमी मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००५.
दूरध्वनी :- निवास (०२२)२२८३१७६६.
कार्यालय (०२२)२२८५६६७२.
मोबाईल : ९८२१६६७७५५, ९८२०८९१६८९.
ई-मेल : abuasimazmi@hotmail.com

निवडणूक निकाल

(१७१- मानखुर्द-शिवाजीनगर)

एकूण मतदार		३,०४,५२६
एकूण वैध मतदान		१,४३,३९१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. अबू आसिम हाजी नियाज आजमी**	६९,०८२ [समाजवादी पार्टी]
(२)	श्री. विठ्ठल लोकरे	४३,४८१ (शिवसेना)
(३)	श्रीमती सुरैय्या शेख	१०,४६५ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	श्री. मोहमंद शेख	९,७८९ (अपक्ष)
(५)	श्री. रविंद्र खोत	३,२८८ (अपक्ष)

आत्राम, श्री. धर्मरावबाबा भगवंतराव

जन्म : २० ऑक्टोबर, १९५३.

जन्म ठिकाण : अहेरी, जिल्हा गडचिरोली.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी , इंग्रजी, गोंडी, माडिया व तेलगु.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती स्नेहादेवी.

अपत्ये : एकूण- ३(एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष .

मतदारसंघ : ६९ - अहेरी (अनुसूचित जमाती), जिल्हा -गडचिरोली.

इतर माहिती : सन १९९१ सचिव, भगवंतराव मेमोरियल शिक्षण संस्था, अहेरी; उपाध्यक्ष; पुष्पप्रिया देवी शिक्षण मंडळ, अहेरी; १९८६ उपाध्यक्ष, वन वैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली, या संस्थेमार्फत १०० शाळा व महाविद्यालये, आश्रमशाळा, सैनिकी शाळा, पोस्ट बेसिक आश्रम शाळा, डी.एड.कॉलेज, ज्युनिअर कॉलेज सुरू करून गडचिरोली जिल्ह्यातील अतिदूर्गम भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय केली; २००१-२००४ मध्ये नेत्रचिकित्सा शिबीरांत १०,५०० जणांवर नेत्र चिकित्सा केली; वेस्टर्न झोन सुटींग स्पर्धेत प्रथम क्रमांक, बाफना पुरस्कार प्राप्त. २००४-२००६ सिकलसेल

तपासणी शिबीराचे आयोजन; कुपोषण कमी करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न; १९८२-८५ अध्यक्ष, गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी; १९७८ सदस्य, ग्रामपंचायत, अहेरी; १९८०-१९८२ सभापती, पंचायत समिती, अहेरी; १९९५ सदस्य, जिल्हा परिषद, गडचिरोली; १९९०-९५,१९९९-२००४, २००४-२००९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; जून, १९९१ ते मार्च, १९९३ आदिवासी विकास, वने आणि सामाजिक वनीकरण खात्याचे राज्यमंत्री; जुलै, २००२ ते जुलै, २००४ आदिवासी विकास खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००४ ते ऑक्टोबर, २००९ परिवहन, सामाजिक न्याय, विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण व खनिकर्म खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

छंद : बुध्दिबळ खेळणे.

परदेश प्रवास : चीन, तैवान, बँकॉक, मलेशिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : राजवाडा, अहेरी, जिल्हा गडचिरोली.
दूरध्वनी : (०७१३३)२७२०३०/२७२०३६.
मोबाईल : ९४२२१०१३६८.
ई-मेलः abtram@hotmail.com.

निवडणूक निकाल [६९-अहेरी (अनुसूचित जमाती)]	
एकूण मतदार	२,३६,४७८
एकूण वैध मतदान	१,६६,३५८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम**	६०,०१३ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. अंबरिशराव आत्राम	४४,५५५ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. दिपकदादा आत्राम	४३,०२२ (अपक्ष)
(४) नोटा	५,७६५
(५) श्री. मधुकर सडमेक	३,६२३ (बहुजन समाज पार्टी)

आबिटकर, श्री. प्रकाश आनंदराव

जन्म : ३० जून, १९७४.

जन्म ठिकाण : गारगोटी, तालुका- भुदरगड, जिल्हा-कोल्हापूर.

शिक्षण : बी.ए. (ऑनर्स).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती विजयालक्ष्मी.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २७२-राधानगरी, जिल्हा- कोल्हापूर.

इतर माहिती : संस्थापक, श्री.आनंदराव आबिटकर इंग्लिश मीडियम स्कूल, गारगोटी; संस्थापक, युवा ग्रामीण विकास संस्था व युवा वाचनालय, गारगोटी; युवा संघर्ष या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनातून करियर गाईडन्स; महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शिबीरे व अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रमाचे आयोजन; संस्थापक-चेअरमन, युवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, गारगोटी; सदस्य, कोल्हापूर जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती, कोल्हापूर; उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेस; सन २०१४ पासून शिवसेना पक्षाचे कार्य; १९९७-२००२ सदस्य, पंचायत समिती, भुदरगड; १९९८-१९९९ उप सभापती, पंचायत समिती, भुदरगड; २००२-२००७

सदस्य, जिल्हा परिषद, कोल्हापूर; सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर; उल्लेखनीय कार्याबद्दल कोल्हापूर जिल्हा परिषदेच्यावतीने सन २००५-२००६ च्या "राजर्षी शाहू महाराज" पुरस्काराने सन्मानीत; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : १६६६, आनंद निवास, गारगोटी,
तालुका भुदरगड, जिल्हा कोल्हापूर.
दूरध्वनी :- निवास :- (०२३२४) २२१४००.
कार्यालय :- (०२३२४) २२१२०७.
मोबाईल :- ९४२२४२१६००,९४०३४४१६००.
ई-मेल :- mlaprakashabitkar@gmail.com

निवडणूक निकाल
(२७२-राधानगरी)

एकूण मतदार	३,२६,७५६
एकूण वैध मतदान	२,४७,०३४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. प्रकाश आनंदराव आबिटकर**	१,०५,८८१ [शिवसेना]
(२) श्री. के. पी. पाटील	८७,४५१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. अरूण डोंगळे	१५,४१४ (अपक्ष)
(४) श्री. राहूल देसाई	१२,८९५ (अपक्ष)
(५) श्री. चंद्रकांतदादा पाटील	८,०९३ (अपक्ष)

आयलानी, श्री. कुमार उत्तमचंद

जन्म : १६ डिसेंबर, १९५७.

जन्म ठिकाण : उल्हासनगर, जिल्हा-ठाणे .

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व सिंधी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मीनाकुमार

अपत्ये : एकूण- २ (एक मुलगा व एक मुलगी)

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १४१ - उल्हासनगर, जिल्हा ठाणे.

इतर माहिती : संस्थापक-संचालक, कुमार रिसोर्ट व अन्युमेंट पार्क, लोणावळा, जिल्हा पुणे; सन २०१६ पासून सदस्य, महाराष्ट्र सिंधी साहित्य अॅकेडमी; अध्यक्ष, उल्हासनगर, भारतीय जनता पक्ष; सन २००७ - २०१२ व २०१२ ते २०१९ नगरसेवक, १९९७ -९८ व १९९८-९९ उपमहापौर व २० एप्रिल, १९९९ ते ३ मे, १९९९ महापौर, महानगर पालिका, उल्हासनगर; सन २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, सदस्य, आहार व्यवस्था समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : युरोप , थायलंड , ऑस्ट्रेलिया , अमेरिका , स्वीर्त्झलँड व रशिया. इत्यादी देशाचा अभ्यास दौरा

छंद : सामाजिक कार्य

पत्ता : (१) २०१-२०२ लक्ष्मी पॅलेस, दुसरा मजला , सपना गार्डन समोर , उल्हासनगर, जिल्हा ठाणे ४२१००३.

(२) सचदेव कॉम्पलेक्स , नवीन टेलिफोन एक्सचेंजजवळ
उल्हासनगर, जिल्हा ठाणे ४२१००३.
दूरध्वनी :- ०२५१-२५६३८३८/ २५६४८४८.
मोबाईल :- ९८२२५०२२००/९३२४०१११११.
ई-मेल :- mlakumarailani141@gmail.com

निवडणूक निकाल

(१४१ - उल्हासनगर)

एकूण मतदार	२,३३,३२४
एकूण वैध मतदान	१,०९,६०१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. कुमार उत्तमचंद आयलानी**	४३,६६६ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्रीमती ज्योती कलानी	४१,६६२ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. भगवान भालेराव	८,२६० (अपक्ष)
(४) श्री. साजन लबाना	५,६८९ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	४,९७८

आवताडे, श्री. समाधान महादेव

जन्म : २१ नोव्हेंबर, १९७६.

जन्म ठिकाण : रहाटेवाडी, तालुका मंगळवेढा, जिल्हा सोलापूर.

शिक्षण : डिप्लोमा इन सिव्हिल.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती अंजली.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २५२-पंढरपूर - मंगळवेढा, जिल्हा सोलापूर.

इतर माहिती : संचालक, स्वामी विवेकानंद इंजिनिअरिंग कॉलेज; संचालक, लोटस इंग्लिश मिडियम स्कुल; २०१६ पासून संचालक, संत दामाजी सहकारी साखर कारखाना, लि., मंगळवेढा, जिल्हा सोलापूर; जून, २०२१ (पो.नि.) मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : चीन, जर्मनी व इटलीचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, कुस्ती, सांस्कृतिक कार्य व समाजसेवा.

पत्ता : (१) १२६ खंडोबा गल्ली; मंगळवेढा, जिल्हा सोलापूर ४१२ ३०५.
(२) खोली क्र. ३०९ आकाशवाणी, आमदार निवास, मुंबई .
मोबाईल :- ८८०५५५५५५१ / ९८२२०७२३९१
ई - मेलः- samadhan.autade252@gmail.com

निवडणूक निकाल	
[२५२-पंढरपूर-मंगळवेढा (पो.नि.)]	
एकूण मतदार	३,३४,१२०
एकूण वैध मतदान	२,२७,३०६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री.समाधान महादेव आवताडे**	१,०९,४५० [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री.भगिरथ भारत भालके	१,०५,७१७ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री.सिद्धेश्वर बबन औताडे	२,९५५ (अपक्ष)
(४) श्रीमती शैला धनंजय गोडसे	१,६०७ (बहुजन विकास आघाडी)
(५) श्री.बिरप्पा मधुकर मोटे	१,१९६ (वंचित बहुजन आघाडी)

आवळे, श्री. राजू (बाबा) जयवंतराव

जन्म : २६ जून, १९७५.

जन्म ठिकाण : इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती प्रियांका.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व उद्योग.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २७८-हातकणंगले (अनुसूचित जाती), जिल्हा कोल्हापूर.

इतर माहिती : उपाध्यक्ष, जयवंतरावजी आवळे शिक्षण प्रसारक मंडळ, शहापुर; मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; २००९ पासून संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; सन २००९ पासून चेअरमन, महात्मा फुले मागासवर्गीय सहकारी सुतगिरणी; मर्या. वाठार, जिल्हा कोल्हापूर; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन, फिरणे व गाणी ऐकणे.

परदेश प्रवास : इस्त्राईल, थायलँड, दुबई व मॉरिशअस इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : १)२१/२३९ स्टेशन रोड, गंगानगर, इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर- ४१६११५.

२) काँग्रेस पक्ष कार्यालय, सांगली-कोल्हापूर हायवे, हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर ४१६११५.
दुरध्वनी :- निवास- (०२३०) २४४०५०१.
कार्यालय - (०२३०) २४४०५२९.
मोबाईल :- ९८२३०६९९३०/७०३०००९०९९.
ई-मेल :- rajuawale9099@gmail.com.

निवडणूक निकाल

[२७८-हातकणंगले-(अनुसूचित जाती)]

एकूण मतदार	३,१८,१८९
एकूण वैध मतदान	२,३३,५०२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजू (बाबा) जयवंतराव आवळे**	७३,७२० [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) डॉ. सुजीत मिणचेकर	६६,९५० (शिवसेना)
(३) डॉ. अशोक माने (बापू)	४४,५६२ (जनसुराज्य शक्ती)
(४) श्री.किरण कांबळे	१९,७३६ (तारारणी पक्ष)
(५) श्री. एस.पी.कांबळे	११,२७३ (वंचित बहुजन आघाडी)

आवाडे, श्री. प्रकाश कल्लाप्पा

जन्म : १५ मार्च, १९५३.

जन्म ठिकाण : इचलकंरजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर.

शिक्षण : एफ.वाय.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती किशोरी.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व उद्योग.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : २७९- इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर.

इतर माहिती : अनेक शिक्षण संस्था, सहकारी संस्था व औद्यागीक सहकारी संस्था स्थापन करून सर्व संस्थांच्या व्यवस्थापनात सक्रीय सहभाग; संस्थापक, स्नेहबंध सेवाभावी संस्था; या संस्थेतर्फे स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र, सुरू केले; व्हाईस चेअरमन, दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटी या संस्थेतर्फे टेक्सटाईल ऑफ इंजिनिअरिंग इन्स्टिट्युट, तेरा अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालये सुरू केली; तसेच मराठी व इंग्रजी माध्यमाची बालवाडी ते कनिष्ठ महाविद्यालये सुरु केली अनेक

ठिकाणी पतसंस्था दुग्धसंस्था तसेच कुक्कुटपालन सहकारी संस्था स्थापन केल्या; २० वर्षापेक्षा अधिक काळ इचलकरंजी फेस्टिव्हल सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन; राज्य शासनाच्या देवदासी समस्या सोडविण्यासाठी नेमलेल्या अभ्यास गटाचे अध्यक्ष या समितीच्या माध्यमातून देवदासींना पेन्शन योजना सुरू केली; चेअरमन, कल्लाप्पा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक (लि.) (शेड्युलड), इचलकरंजी; संचालक, नॅशनल फेडरेशन ऑफ को. आप. शुगर फॅक्टरीज, लि. नवी दिल्ली; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई; माजी चेअरमन, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, मुंबई; माजी चेअरमन, जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना, लि. हुपरी; जिल्हा, कोल्हापुर; माजी चेअरमन, इचलकरंजी पॉवरलुम. मेगा कलस्टर लि. इचलकरंजी; माजी चेअरमन, कल्लाप्पाण्णा आवाडे को.ऑप इंडस्ट्रियल इस्टेट अँड इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क, तारदाळ तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापुर; चेअरमन, श्री लक्ष्मी सहकारी औद्योगिक वसाहत, हातकणंगले; माजी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई; माजी संचालक, कोल्हापुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापुर; माजी संचालक, दि इचलकरंजी को-ऑप स्पिनिंग मिल्स लि.; माजी अध्यक्ष, कोल्हापुर जिल्हा काँग्रेस कमिटी; शैक्षणिक, सहकार व औद्योगिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन २०१९ मध्ये कोलकत्ता येथे दि शुगर टेक्नॉलॉजिस्ट्स आसोशिएशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली. तर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित. १९८५-१९९०, १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य,महाराष्ट्र विधानसभा; जून, १९८८ ते मार्च, १९९० सहकार खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर, १९९९ ते जुलै, २००२ वस्त्रोद्योग, आदिवासी विकास व विशेष सहाय्य खात्याचे राज्यमंत्री, जुलै, २००२ ते जुलै, २००४ वस्त्रोद्योग खात्याचे राज्यमंत्री; जुलै, २००४ ते ऑक्टोबर, २००४ वस्त्रोद्योग व माजी सैनिकांचे कल्याण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व खेळ.

पत्ता : (१)१३/३४ "इंदूकला" आवाडे नगर, इचलकरंजी, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर- ४१६११५.
दूरध्वनी :- (०२३०)२४२२३६७,२४२४४९३.
मोबाईल :- ९८२०२२०७७९, ९८५०८३६६८८.
ई-मेल :- awadejsk@gmail.com

निवडणूक निकाल (२७९-इचलकरंजी)	
एकूण मतदार	२,९३,४३१
एकूण वैध मतदान	२,१२,०७१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. प्रकाश कल्लाप्पा आवाडे**	१,१६,८८६ [अपक्ष]
(२) श्री. सुरेश हळवणकर	६७,०७६ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. राहूल खंजिरे	७,२६२ (भारतीय काँग्रेस पक्ष)
(४) श्री. शशिकांत आमने	३,६९३ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,५१३

आव्हाड, डॉ. जितेंद्र सतिश

जन्म : ५ ऑगस्ट, १९६३.

जन्म ठिकाण : नाशिक.

शिक्षण : बी.ए., मास्टर ऑफ लेबर स्टडीज, (एम्.एल.एस्.), पी.एचडी. (मुंबई विद्यापीठ.)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती ऋता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १४९- मुंब्रा - कळवा, जिल्हा- ठाणे.

इतर माहिती : शालेय जीवनापासून सामाजिक कार्यात सक्रीय सहभाग, १९७९ मध्ये ठाणे येथील सेंट जॉन या शाळेतील स्कुल पार्लमेंटमध्ये पंतप्रधान म्हणून निवड; १९८० - ८१ जिमखाना सचिव, बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे; १९८१ सरचिटणीस, ऑल इंडीया स्टुडंट ऑर्गनायझेशन; १९८२ फी वाढ विरोधी आंदोलनाचे नेतृत्व; १९८७-८८ वर्ग प्रतिनिधी व विद्यापीठ प्रतिनिधी, महाराष्ट्र इन्स्टीट्युट ऑफ लेबर स्टडीज; ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक चळवळी

या विषयावरील शोध प्रबंधास मुंबई विद्यापीठाकडुन डॉक्टरेट पदवी प्राप्त; २००२-२००६,२००६-२००९ व २०१०-२०१५ सिनेट सदस्य, मुंबई विद्यापीठ; संस्थापक, संघर्ष सेवाभवी संस्था, ठाणे; कै. लिलावती सतीश आव्हाड एज्युकेशन या संस्थेमार्फत औरंगाबाद येथे एरोनॉटिकल महाविद्यालय तसेच मुखेड, जिल्हा नांदेड येथे डी. एड.कॉलेज सुरू केले; अध्यक्ष, अखिल भारतीय वंजारी युवक संघ ; अध्यक्ष, ठाणे जिल्हा योगा असोसिएशन; प्रमुख सल्लागार, कास्ट्राईब जीवन प्रधिकरण, आरोग्य सेवा कर्मचारी व महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार संघटना; अध्यक्ष, महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशन; अध्यक्ष, इंडियन, पायलट गिल्ड कर्मचारी संघटना; ठाणे येथील नवा-ए-फन संस्थेतर्फे सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल "जीवन गौरव" पुरस्काराने सन्मानित; मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या घटना उप समितीवर निवड; अध्यक्ष, ठाणे जिल्हा खो-खो संघटना; प्रदेश उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन; मुंबई क्रिकेट असोसिएशन संलग्न मंडवी मुस्लिम क्रिकेट क्लब क्रीडा संस्था सुरू केली. सदस्य, ठाणे जिल्हा राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना समिती; १९८०-१९८७ सरचिटणीस, ठाणे जिल्हा युवक काँग्रेस; १९८८-९१ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश एन.यु.एस.आय विद्यार्थी संघटना; १९९१-१९९३ सरचिटणीस, अखिल भारतीय एन.यु. एस.आय. संघटना; १९९३-१९९८ अध्यक्ष, ठाणे महानगर पालिका शिक्षण मंडळ; १९९३-१९९६ सरचिटणीस व १९९६-१९९७ अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटी; १९९९-२००६ अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष; २००८ पासुन अध्यक्ष , ठाणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१३-२०१४ कार्याध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००२-२००८ व २००८-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; सदस्य, आश्वासन समिती, आमदार निवास व्यवस्था समिती व आहार व्यवस्था समिती; २००८ मुख्य प्रतोद, विधान परिषद राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००९-२०१४ प्रतोद, विधान सभा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१० सदस्य, नवीन युवा धोरण शासकीय समिती; सदस्य, विधीमंडळ एड्स फोरम समिती ; २०११ सदस्य, धर्मादाय रूग्णालय तदर्थ समिती; २००८ सदस्य, मुस्लिम समाजाच्या विकासासाठी राज्यात मदरसा बोर्ड तदर्थ

समिती; २०११ महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण परिषदेवर प्रतिनिधी; २०१२ समिती प्रमुख, उपविधान समिती; २००९ तालिका सभापती, विधान परिषद; २०१५-२०१६ सदस्य, विधानसभा विशेष हक्कभंग समिती; २०१५ राज्यातील दहिहंडी सांस्कृतिक कार्यक्रमाचा सहासी क्रीडा प्रकारात समावेश करण्यासाठी नेमलेल्या शासकीय समितीचे सदस्य; मे, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ वैद्यकीय शिक्षण व फलोत्पादन खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० पासून गृहनिर्माण मंत्री.

छंद : वाचन.

परदेश प्रवास : सन २००५ मध्ये इस्त्रायलमधील संसदीय तसेच राजकीय कामकाजाची माहिती घेण्यासाठी भारत सरकारच्या केंद्र शासकीय समितीमध्ये निवड. सन २००७ मध्ये भारतातील विशेषतः महाराष्ट्राचा दहिहंडी उत्सव आणि स्पेन येथील मानवी मनोरा महोत्सवाची सांस्कृतिक देवाण-घेवाण व्हावी या उद्देशाने स्पेन देशाचा अभ्यास दौरा. त्याचप्रमाणे सिंगापूर, मलेशिया, दुबई, स्वित्झर्लँड, फिलिपाइन्स, बँकॉक, फ्रान्स व इटली इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) सी -११ विश्वजीत सोसायटी, वीर सावरकर मार्ग, नौपाडा , ठाणे - ४००६०२.

कार्यालय (०२२) २५३४८२८२, २५३८६४६४, २५३८६५६५.
(२) अ- ३, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
निवास (०२२) २२८८२९०२, २२८८२१९०.
कार्यालय (०२२) २२०२२५३००, २२०२४६८८.
मोबाईल : ९९३०००००० २ / ९८२००५५३००.
ई - मेल : jsa707@gmail.Com
jeetendraawhad@gmail.com

निवडणूक निकाल

(१४९- मुंब्रा - कळवा)

एकूण मतदार	३,५७,५७८
एकूण वैध मतदान	१,७९,०५०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. जितेंद्र सतीश आव्हाड**	१,०९,२८३ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्रीमती दिपाली सय्यद	३३,६४४ (शिवसेना)
(३) अबु फैयाझी	३०,५२० (आम आदमी पार्टी)
(४) नोटा	२,५९१
(५) श्रीमती फरहत अमीन शेख	७१७ (इंडियन युनियन मुस्लीम लिग)

आहिरे, श्रीमती सरोज बाबुलाल

जन्म : ११ मार्च, १९८२.

जन्म ठिकाण : नाशिक रोड, जिल्हा नाशिक.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती डॉ. प्रवीण रामदास वाघ.

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १२६- देवळाली (अनुसूचित जाती), जिल्हा नाशिक.

इतर माहिती : सन २०१७-२०१९ नगरसेवक, २०१७-२०१८ सभापती, महिला बालकल्याण समिती, महानगरपालिका, नाशिक; समिती प्रमुख, महिला व बालकांचे हक्क कल्याण समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : पर्यटन व संगीत.

पत्ता : प्लॅट नं.१४, रघुपती हाऊसिंग सोसायटी, दत्तमंदिर, विद्युत भवन शेजारी, नाशिक रोड, जिल्हा नाशिक.
दूरध्वनीः कार्यालय (०२५३)२४७३१११.
मोबाईल : ८४०८८९९११३,७८२०८५४७७२.
ई-मेल : sarojahire113@gmail.com.

निवडणूक निकाल

(१२६ - देवळाली (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,६४,८७३
एकूण वैध मतदान	१,४५,१६५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती सरोज बाबुलाल आहिरे**	८४,३२६ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. योगेश घोलप	४२,६२४ (शिवसेना)
(३) श्री. गौतम वाघ	९,२२३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. सिध्दांत मंडाले	३,१९८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) श्री. अमोल पठाडे	१,४७६ (बहुजन समाज पार्टी)

आहेर, डॉ. राहुल दौलतराव

जन्म : १६ ऑगस्ट, १९७३.

जन्म ठिकाण : नाशिक.

शिक्षण : एम.बी.बी.एस.,एम.एस.(ऑर्थो).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अनुजा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : वैद्यकीय.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ११८-चांदवड, जिल्हा-नाशिक.

इतर माहिती : २०१२-२०१४अध्यक्ष, कसमादे परिसर विकास मंडळ, देवळा; २०१३-२०१४ अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन नाशिक; २०१३-२०१४ सदस्य, जिल्हा नियोजन समिती, नाशिक; २००८-२०१४ संचालक, शताब्दी हॉस्पीटल नाशिक; २०१३-२०१४ संचालक, सुमन हॉस्पीटल, नाशिक; २०११-२०१४ कार्याध्यक्ष, शिवसत्य क्रीडा मंडळ, नाशिक; २०१२-२०१४ कार्यकारी सदस्य, जे.सी.आय. नाशिक; २०११-२०१४ चेअरमन, राजलक्ष्मी अर्बन को.ऑप. बँक, नाशिक; २०११-२०१४ संचालक, नाशिक बँक्स असोसिएशन; २०१०-२०१२ उपाध्यक्ष, नाशिक शहर भारतीय जनता पक्ष; २०१३ पासून सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; आरोग्य शिबिरांचे आयोजन; समाज प्रबोधन कार्यक्रम व

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन; विद्यार्थ्यांना शाळापयोगी वस्तुंचे वाटप; २०१२ पासून नगरसेवक, नाशिक महानगरपालिका व २०१३-२०१४ सभापती, पश्चिम विभाग प्रभाग; समिती महानगर पालिका, नाशिक; सदस्य, धर्मादाय रुग्णालय तदर्थ समिती; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, क्रिकेट व व्हॉलीबॉल.

परदेश प्रवास : सिंगापूर, मलेशिया, दुबई, हाँगकाँग, युरोप, इंग्लड, अबुधावी, जर्मनी इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : २०,गार्डन होम्स सोसायटी, लोकमान्य नगर, गंगापूर रोड, नाशिक ४२२२०२.
दूरध्वनी :- (०२५३) २३१८९९९.
मोबाईल : ९४०३४०८८८८.
ई-मेल : rahuldaher@gmail.com

निवडणूक निकाल

(११८-चांदवड)

एकूण मतदार	२,७९,०४७
एकूण वैध मतदान	१,९२,६२८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. राहुल दौलतराव आहेर**	१,०३,४५४ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. शिरीषकुमार कोतवाल	७५,७१० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. संजय केदारे	५,७८० (अपक्ष)
(४) श्री.सुनिल आहेर	२,४४० (अपक्ष)
(५) ॲड दत्तात्रय गांगुर्डे	२,४१८ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया)

उईके, डॉ. अशोक रामाजी

जन्म : १ जानेवारी, १९६४.

जन्म ठिकाण : (प्रिंप्रि)कायर, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ.

शिक्षण : एम्.एस्सी.(प्राणीशास्त्र), पी.एच.डी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती बिना.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : अध्यापन.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ७७-राळेगाव, (अनुसूचित जमाती), जिल्हा-यवतमाळ.

इतर माहिती : १९९१-२००८ अधिव्याख्याता, जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा; २००८-२०१२ प्राचार्य, श्री. आर. आर. लोहोटी विज्ञान महाविद्यालय, मोशी, जिल्हा अमरावती; २०१२-२०१३ प्राचार्य, वाय.डी.व्ही.डी. महाविद्यालय, तिवसा, जिल्हा अमरावती; अध्यक्ष, विरसामुंडा आदिवासी सहकारी सोसायटी; नगरसेवक व काही काळ उपाध्यक्ष, नगरपालिका, बुलढाणा; सचिव व प्रदेश उपाध्यक्ष; आदिवासी आघाडी; भारतीय जनता पक्ष; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; जून, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ आदिवासी विकास खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, टेबल टेनिस व बॅडमिंटन.

पत्ता : एक-२, राजाराणी अपार्टमेंट, राणा प्रताप नगर, आर्णी रोड, वडगाव, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.
मोबाईल : ९७६३४५६७८८ / ९६३७३२८११९
ई-मेल : ashok.wooike@nic.in

निवडणूक निकाल

(७७-राळेगाव (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	२,८३,५१४
एकूण वैध मतदान	१,९७,६७६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. अशोक रामाजी उईके**	९०,८२३ [भारतीय जनता पक्ष]
(२) प्रा. वसंत चिंधुजी पुरके	८०,९४८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. माधव कोहळे	१०,७०५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. शैलेश गाडेकर	३,३७० (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री. गुलाब पांढरे	३,३४७ (प्रहार जनशक्ती पार्टी)

एकडे , श्री. राजेश पंडितराव

जन्म : १४ जुलै, १९६५.

जन्म ठिकाण : नांदुरा, जिल्हा- बुलढाणा.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सविता.

अपत्ये : एकूण- २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य .

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) .

मतदारसंघ : २१ - मलकापुर, जिल्हा- बुलढाणा .

इतर माहिती : अध्यक्ष, श्री संत जंगली महाराज गोरक्षण संस्था, नांदुरा; अध्यक्ष, श्री संत जंगली महाराज एज्युकेशन सोसायटी, नांदुरा; संचालक, प्रियदर्शनी नागरी सहकारी पतसंस्था, नांदुरा; सन १९९१ - २०१८ नगरसेवक , १९९६ - २००१ नगराध्यक्ष ,नगरपरिषद, नांदुरा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : एकडे ले. आऊट, नांदुरा जिल्हा - बुलढाणा ४४३४०४.
मोबाईल : ८८०५३९७७०७.
ई-मेल : mlaekde21@gmail.com

निवडणूक निकाल (२१-मलकापूर)	
एकूण मतदार	२,६८,७१८
एकूण वैध मतदान	१,८६,२५२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजेश पंडितराव एकडे**	८६,२७६ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. चैनसुख संचेती	७१,८९२ (भारतीय जनता पक्ष)
(३) डॉ. नितीन नंदुरकर	१२,५४९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. विजय गव्हाड	९,८७६ (अपक्ष)
(५) नोटा	१,८५४

कदम, श्री. योगेश रामदास

जन्म : १८ फेब्रुवारी, १९८६.

जन्म ठिकाण : बोरिवली, मुंबई.

शिक्षण : बी. कॉम.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी , इंग्रजी व गुजराथी .

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती श्रेया.

अपत्ये : एकूण- १ (एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना .

मतदारसंघ : २६३ - दापोली, जिल्हा रत्नागिरी.

इतर माहिती : अध्यक्ष, साई सावली शिक्षण संस्था, खेड या संस्थेमार्फत न्यु इंग्लिश स्कुल, बोरज, तुंबाड व कोरेगाव येथे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या; अध्यक्ष, शिवतेज आरोग्य सेवा संस्था, खेड संचालित सैनिकी स्कुल, जामगे, योगिता डेंटल कॉलेज, खेड, सिध्दयोग लॉ कॉलेज व ओपन स्कुल सुरू केले; राज्य कार्यकारणी सदस्य, युवासेना; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, पर्यटन व क्रिकेट.

पत्ता : (१) १०२, कदमवाडी, पो. जामगे, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी.

(२) पालखी बंगला, गोकुळ विहार, एच विंग, ठाकूर कॉम्पलेक्स, कांदिवली (पुर्व), मुंबई ४०० १०१.

दूरध्वनी :- निवास- (०२२) २८७०४५९८/ (०२३५६) २६६५१७.

मोबाईल : ७७२०९४८५५५/ ९८६७९९६२५२.

ई-मेल : yogesh_kadam1986@outlook.com

निवडणूक निकाल

(२६३ - दापोली)

एकूण मतदार	२,८०,७८५
एकूण वैध मतदान	१,८५,८६१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. योगेश रामदास कदम**	९५,३६४ [शिवसेना]
(२) श्री.संजयराव कदम	८१,७८६ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) नोटा	२,७११
(४) श्री.प्रविण मर्चंडे	२,०१५ (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री.संतोष खोपकर	१,३३६ (वंचित बहुजन आघाडी)

कदम, श्री. राम शिवाजी

जन्म : २४ जानेवारी, १९७२.

जन्म ठिकाण : हाडोळी, तालुका-अहमदपूर, जिल्हा-लातूर.

शिक्षण : इलेक्ट्रीक पॉवर सिस्टीम डिप्लोमा (प्रथम वर्ष).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वर्षा.

अपत्ये : एकूण १(एक मुलगा).

व्यवसाय : बांधकाम व्यावसायिक.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १६९-घाटकोपर-पश्चिम, जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : अनेक वर्षांपासून २७०० पेक्षा अधिक वयस्कर निराधार आई-वडिलांना दरमहा संपूर्ण धान्य पुरविले; शासनाप्रमाणे समांतर रेशनिंग व्यवस्था घाटकोपरमध्ये सुरु केली; सन २०१० मध्ये कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदीराच्या गाभाऱ्यात महिलांना प्रवेश मिळवून दिला; १ लाख ७५ हजार पेक्षा अधिक लोकांना काशी, शिर्डी, अजमेर, पालिताना, कुंभमेळा यात्रा घडविली; हजारो गरीबांच्या मुलांना हेलिकॉप्टर, ताजमहल फाईव्ह स्टार हॉटेल, दिल्ली संसद भवन, राष्ट्रपती भवन, विधान भवन यात्रा घडविल्यामुळे "गिनीज बुक ऑफ रेकॉर्डस्" मध्ये नोंद; भारतातील सर्वात मोठी दहिहंडी व दांडीया उत्सव कार्यक्रमाचे आयोजन तसेच सर्वात मोठ्या गुढीचे आयोजन; २०१५ पासून महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे

प्रवक्ते; सामान्य जनतेसाठी २४ तास उघडे असणारे दरवाजा नसलेले आमदारांचे कार्यालय, घाटकोपर येथे सुरू केले; तरूण मुला-मुलींसाठी मोफत ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण केंद्र सुरू केले. गरीब व गरजू लोकांना मुंबईतील १२ ठिकाणी मोफत जेवण सुरू केले; २०१७ मध्ये युनायटेड नॅशनल हेडक्वार्टर युनो अमेरिका येथे " भारत गौरव" पुरस्काराने सन्मानित; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, अध्यात्मिक विषयाचा व्यासंग, किर्तनकार व भागवत कथाकार.

परदेश प्रवास : इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, युरोप, दुबई, सिंगापूर, चीन व जपान इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : श्रावण निवास, तळ मजला, ऑर्चेड रेसिडेन्सी बिल्डिंग क्र ८, एल.बी. एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम). मुंबई - ४०० ०८६.
दूरध्वनी :- कार्यालय :- ९७०२०१११११४.
मोबाईल :- ९८३३१५१९१२.
ई-मेल :- bjpmlaramkadam@gmail.com

निवडणूक निकाल

(१६९-घाटकोपर-पश्चिम)

एकूण मतदार	२,७१,३४५
एकूण वैध मतदान	१,४९,४५३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राम शिवाजी कदम**	७०,२५३ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. संजय भालेराव	४१,४७४ (अपक्ष)
(३) श्री गणेश चुक्कल	१५,०१९ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. आनंद शुक्ला	९,३१३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(५) श्री. गणेश ओव्हाळ	८,०८८ (वंचित बहुजन आघाडी)

कदम, डॉ. विश्वजित पतंगराव

जन्म : १३ जानेवारी, १९८१.

जन्म ठिकाण : पुणे.

शिक्षण : बी.ई. (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), एम.बी.ए. (फायनान्स अँड मार्केटिंग), पी.एचडी. (Critical Analysis of managerial Challenges to Urban Co-operative Banks with Special reference to Pune city.)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती स्वप्नाली.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २८५-पलुस-कडेगाव, जिल्हा-सांगली.

इतर माहिती : सन २००५ पासून कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे; सन २०१८ पासून सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; सन २००८ पासून प्रकुलगुरू, भारती विद्यापीठ विश्व महाविद्यालय, पुणे, या विद्यापीठामार्फत ६५ महाविद्यालये ८० प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, वैद्यकीय दंत महाविद्यालये अभियांत्रिकी महाविद्यालये, व्यवस्थापन महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालये, विधी

महाविद्यालय तसेच व्यावसायिक महाविद्यालये, नवी दिल्ली, नवी मुंबई, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापुर येथे चालविली जातात; भारतीय विद्यापीठात सात हजाराहून अधिक कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. महिलांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कडेगाव येथे सुरू केली. संचालक, सोनाहीरा सहकारी साखर कारखाना लि. वांगी; संचालक, सागरेश्वर सहकारी सुतगिरणी, लि. कडेगाव, जिल्हा सांगली; उपाध्यक्ष, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोशिएशन; अध्यक्ष, पुणे जिल्हा फुटबॉल असोशिएशन; २०११-२०१४ व २०१४-२०१८ अध्यक्ष, भारती सहकारी बँक (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक) पुणे; या बँकेच्या २७ शाखा आहेत; सदस्य, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद; सदस्य, इंडियन ग्रेप तंत्रविज्ञान अभ्यासगट, भारत सरकार; व्यवस्थापकीय संचालक, अभिजित कदम मेमोरियल फौंडेशन; अध्यक्ष, पतंगराव कदम फौंडेशन, पिंपरी चिंचवड, पुणे; संचालक, सहकार ग्राहक भांडार पुणे; सदस्य, खानापुर तालुका महिला औद्योगिक सहकारी संस्था, कडेगाव; संचालक, सोनहिरा दुध उत्पादक सहकारी संस्था; संचालक, शेती उद्योग सहकारी फेडरेशन लि.,कडेगाव; संचालक, सोनहिरा कुकुटपालन सहकारी संस्था, कडेगाव; संचालक, भारती विद्यापीठ मेडिकल फौंडेशन, पुणे; संचालक, भारतीय क्रीडा प्रतिष्ठान, पुणे; सदस्य, भारती कला अकादमी, पुणे; सदस्य, सोनहीरा फौंडेशन फॉर रुरल डेव्हल्पमेंट, कडेगाव; संचालक, पतंगराव प्रतिष्ठान, पुणे; संचालक, यशवंतराव मोहिते प्रतिष्ठान, कराड.; अध्यक्ष, पंतगराव कदम स्पोर्टस क्लब, सांगली; २०११ ते २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; २०१९ पासून कार्याध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; मे, २०१८ ते ऑक्टोबर, २०१९ (पो.नि.बिनविरोध) सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० पासून सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, मराठी भाषा खात्याचे राज्य मंत्री.

छंद : वाचन, फुटबॉल व क्रिकेट.

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड, स्पेन, फ्रान्स, मॉरिशस, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, मलेशिया, चीन, सिंगापूर, दुबई इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) "सिंहगड" बृहन महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजसमोर, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००४.

दूरध्वनी :- (०२०) २५६५५१८८/२५६५६७९७.
फॅक्स :- (०२०) २५६५४८७५.
ई-मेल :- rofficebv@yahoo.com.
(२) १३, भारती विद्यापीठ, सदाशिव पेठ, लाल बहादुर शास्त्री मार्ग, पुणे- ४११ ०३०.
दुरध्वनी :- (०२०) २४३२५७०१/ २४३२५५०९.
फॅक्स :- (०२०) २४३३९१२१.

निवडणूक निकाल

(२८५-पलुस-कडेगाव)

एकूण मतदार	२,७८,६२९
एकूण वैध मतदान	२,०६,५१७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. विश्वजीत पतंगराव कदम**	१,७१,४९७ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) नोटा	२०,६३१
(३) श्री. संजय विभूते	८,९७६ (शिवसेना)
(४) ॲड. प्रमोद पाटील	२,१३२ (अपक्ष)
(५) श्री. राहूल पाटील	९४१ (बहुजन समाज पार्टी)

कथोरे, श्री. किसन शंकर

जन्म : १९ सप्टेंबर, १९५५.

जन्म ठिकाण : म्हसागांव, तालुका-मुरबाड, जिल्हा-ठाणे.

शिक्षण : बारावी (सायन्स).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कमल.

व्यवसाय : शेती .

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १३९-मुरबाड, जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : अध्यक्ष, उज्वल प्रबोधिनी शिक्षण संस्था, रहाटोली; अध्यक्ष, दुय्यम शिक्षण संस्था, मुरबाड; चेअरमन, ठाणे जिल्हा साक्षरता अभियान; चेअरमन, सागाव विविध कार्यकारी सेवा सोसायटी; उपाध्यक्ष, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ; अध्यक्ष, ठाणे जिल्हा कुणबी समाज संघटना; उपाध्यक्ष, अंबरनाथ शिक्षण प्रसारक मंडळ; अध्यक्ष, राजा शिवाजी व्यायाम शाळा, रहाटोली; खजिनदार, कुणबी समाज संघ; १९८२ पासून चेअरमन, संजय गांधी निराधार योजना; विशेष कार्यकारी अधिकारी; अध्यक्ष, मातृभूमी बिगर शेती सहकारी पतसंस्था व बारवी प्रकल्प कडधान्य प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित; संचालक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; सदस्य, दक्षता समिती, कायदेविषयक सहाय व सल्लागार समिती, जिल्हा ग्रामीण

व विकास मंडळ, जिल्हा नियोजन व विकास मंडळ; वस्ती तेथे रस्ता, तेथे बस सेवा हा प्रकल्प राबविला; गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; अनेक सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांत सक्रिय सहभाग; १९७८-९२ सरपंच, ग्रामपंचायत सागांव; १९८२-१९९२ सरपंच संघटनेचे अध्यक्ष, उल्लेखनीय कार्य करुन विविध योजना यशस्वीरित्या राबविल्यामुळे महाराष्ट्र शासनाचा प्रथम पुरस्कार प्राप्त; १९८२ अध्यक्ष, संजय गांधी, निराधार मोजल समिती, उल्हासनगर.१९९२ सदस्य, जिल्हा नियोजन समिती; १९९२-९७ सभापती, पंचायत समिती, अंबरनाथ; १९९८ सभापती, आरोग्य व बांधकाम समिती, २००२- २००४ अध्यक्ष, ठाणे जिल्हा परिषद; २००१ मध्ये जिल्ह्यात "पाटी दप्तर विना शाळा" हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला, याची केरळ राज्याने दखल घेऊन हा उपक्रम सुरु केला; जिल्ह्यात विविध पाणी पुरवठा योजना पूर्ण करुन जिल्हा टँकर मुक्त केला; १९९५ मध्ये जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिली पासून इंग्रजी विषय सक्तीचा केला, याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन २००१ पासून राज्यभर हा उपक्रम सुरु केला; नवी मुंबई ते बदलापूर बससेवा सुरु केली; डी.एड. व बी.एड. शिक्षकांसाठी जिल्हा प्रशिक्षण केंद्र बांधण्यास केंद्र शासनाची मंजुरी मिळविली; "प्रगती २००४" हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शाळा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्राम-पंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व विभागांत स्वच्छता मोहिम यशस्वीरित्या राबविली; ग्रामीण आदिवासी कारागिरांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ठाणे शहरात जिजाऊ विक्री केंद्र सुरु केले; जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारातील विस्थापित दुकान गाळेधारकांना पक्की दुकाने बांधून भाडे तत्त्वावर दिली; दरवर्षी दहा दिवस नामवंत किर्तनकारांच्या किर्तन महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन; गेली पंचवीस वर्षे वारकरी संप्रदायात कार्य; गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या कार्यक्रमांचे आयोजन; क्रिकेट, हॉलीबॉल व कबड्डी स्पर्धांचे आयोजन; कुशिवली व पाडाळे धरणांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न; पक्ष संघटनेसाठी सभा, मेळावे, व शिबिरांचे आयोजन, ग्रामस्वच्छता अभियान, बंधारे, वनराई यासारखे उपक्रम यशस्वीपणे राबविले; दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींसाठी घरकुल योजना राबविली; शाळांमध्ये संगणकीकरण, एस.एस.सी.मधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता शाळांमध्ये स्वतंत्र वर्ग निर्माण करुन त्यांच्यासाठी

शिकवणी वर्गांचे आयोजन; एकात्मिक आदिवासी प्रकल्प, वीज, पाणी पुरवठा, पीक कर्ज, खते, बी-बीयाणे, शेती अवजारे, विहिरी, बंधारे यासारख्या अनेक शासकीय योजना जिल्ह्यात यशस्वीपणे राबविल्यामुळे १९९५ मध्ये वसंतराव नाईक स्मृती राज्य पुरस्कार प्राप्त; १९९२ ठाणे जिल्हा परिषदेस महाराष्ट्र शासनाचा ग्राम अभियान कार्यक्रमांतर्गत प्रथम पुरस्कार प्राप्त; "शिक्षक मित्र", "समाज भूषण" व "आदिवासी मित्र" पुरस्काराने सन्मानीत; महात्मा फुले भूमी व जलसंधारण अभियानांतर्गत कोकण विभागाचा प्रथम पुरस्कार प्राप्त; २००२ मध्ये सर्वोत्तम राजकीय कार्यकर्ता म्हणून "ठाणे जिल्हा भूषण" पुरस्काराने सन्मानीत; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २००७-२००८ समिती प्रमुख, विधानसभा आश्वासन समिती; सदस्य, पंचायत राज समिती; उपाध्यक्ष, कोकण पाटबंधारे विकास मंडळ; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, काव्य, प्रवास करणे व सामाजिक कार्य.

परदेश प्रवास : नेपाळ, स्वित्झर्लँड, युरोप, सिंगापूर, थायलँड, मलेशिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) मु. सागांव-पाटीलपाडा, पो. पिंपळोली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे .

(२) दत्त निवास, बोराडपाडा रोड, चिचेंश्वरीपाडा, बदलापूरगाव, तालुका-अंबरनाथ, जिल्हा-ठाणे.
दूरध्वनी :- निवास- (०२५१) २६६५९७६.
कार्यालय :- (०२५१) २६७४२७१.
मोबाईल : ९४२२०७३५५१.
ई-मेल : kathoremlaoffice@rediffmail.com

निवडणूक निकाल (१३९-मुरबाड)	
एकूण मतदार	३,९७,९४०
एकूण वैध मतदान	२,३२,८६१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. किसन शंकर कथोरे**	१,७४,०६८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. प्रमोद हिंदूराव	३८,०७५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. दिपक खांबेकर	८,५०४ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	६,७८३
(५) ॲड रत्ना गायकवाड	२,००३ (बहुजन समाज पार्टी)

कल्याणकर, श्री. बालाजी देविदासराव

जन्म : १ जून, १९८०.

जन्म ठिकाण : नांदेड.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती संध्या.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : ८६-नांदेड-उत्तर, जिल्हा-नांदेड.

इतर माहिती : नगरसेवक व विरोधी पक्ष नेता, महानगर पालिका, नांदेड; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : "गोविंद निवास" तरोडा (खु.), मालेगाव रोड, नांदेड, जिल्हा-नांदेड-४३१६०५.
मोबाईलः ९८५०९७५६४१/ ८९७५७५७०००.
ई-मेलः bd.kalyankar100@gmail.com.

निवडणूक निकाल

(८६-नांदेड - उत्तर)

एकूण मतदार		३,१३,५२३
एकूण वैध मतदान		१,८९,५०१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. बालाजी देविदासराव कल्याणकर**	६२,८८४ [शिवसेना]
(२)	श्री. डी.पी.सावंत	५०,७७८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३)	श्री. फीरोज लाला	४१,८९२ (ऑल इंडिया मजलिस ए –इत्तेहादुल मुस्लिमीन)
(४)	श्री. मुकुंदराव चावरे	२६,५६९ (वंचित बहुजन आघाडी)
(५)	श्री. प्रकाश बागटे	१,१०५ (बहुजन समाज पार्टी)

कल्याणशेट्टी, श्री.सचिन पंचप्पा

जन्म : ५ नोव्हेंबर, १९८०.

जन्म ठिकाण : हन्नुर, तालुका अक्कलकोट, जिल्हा सोलापूर.

शिक्षण : बी.ए., बी.एड.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व कन्नड.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शांभवी.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २५०-अक्कलकोट, जिल्हा सोलापूर.

इतर माहिती : चेअरमन, महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्था; चेअरमन, विवेकानंद शिक्षण संस्था; अध्यक्ष, समाजसेवा प्रतिष्ठान; सन २०१०-२०१५ सरपंच, ग्रामपंचायत, हन्नुर; सन २०१४-२०१६ सरचिटणीस, सोलापूर जिल्हा, २०१६-२०२० अक्कलकोट तालुका अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन, क्रिकेट व पोहणे.

पत्ता : पद्मालय, विवेकानंद पार्क, सोलापूर रोड, अक्कलकोट, जिल्हा सोलापूर.
दूरध्वनी :- कार्यालय (०२१८१) २२१७८९.
मोबाईल :- ९९२३५४६७८९.
ई-मेल :- sachinkalyanshetti.sk@gmail.com.

निवडणूक निकाल

(२५०-अक्कलकोट)

एकूण मतदार	३,४६,४९८
एकूण वैध मतदान	२,१३,४९०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सचिन पंचप्पा कल्याणशेट्टी**	१,१९,४३७ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. सिध्दराम म्हेत्रे	८२,६६८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री.धर्माजी राठोड	६,६३० (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री.नागमूर्ती भांटे	१,२३९ (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	१,१६८

कडू, श्री. बच्चू ऊर्फ ओमप्रकाश बाबाराव

जन्म : ५ जुलै, १९७०.

जन्म ठिकाण : बेलोरा, तालुका-चांदूरबाजार, जिल्हा-अमरावती.

शिक्षण : बी.कॉम., बी.पी.एड.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नयना.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय शेती.

पक्ष : प्रहार जनशक्ती पक्ष.

मतदारसंघ : ४२-अचलपूर, जिल्हा अमरावती.

इतर माहिती : शालेय शिक्षण घेत असताना गावातील तमाशा बंदी करिता आंदोलन; १९९४ शालेय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरिता आंदोलन; कापूस व वीज प्रश्नाकरिता डेरा आंदोलन, आदिवासींच्या जमिनीकरिता अर्धदफन आंदोलन; स्वतःच्या लग्नाच्या खर्चातून बचत करुन २५० अपंगांना लग्न समारंभात ३ चाकी सायकली व कृत्रिम अवयवांचे वाटप; विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना सुरू केली; पुर्णा उत्सवांतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; विदर्भस्तरीय कुस्ती व कबड्डी स्पर्धांचे आयोजन; १५०० हृदयरोग रुग्णांना दत्तक घेऊन उपचार व शस्त्रक्रिया

करण्यासाठी सर्वोतोपरी मदत; २०० ब्रेन ट्युमरच्या रुग्णांवर मुंबई येथे सर्वतोपरी उपचार; १०० कर्करोग रुग्णांना वैद्यकीय सहाय्य व सर्वतोपरी मदत, २००० रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया, १००० रक्तदान शिबीरांचे आयोजन करुन १५००० बाटल्या रक्त के.ई.एम. रुग्णालय, मुंबई, जनरल हॉस्पिटल, अमरावती व मेडिकल कॉलेज, नागपूर येथील रक्तपेढयांना पुरवठा केला; स्वतः ७० वेळा रक्तदान केले; अपंगाना सायकलीचे वाटप; १९८९-९२ भारतीय विद्यार्थी सेनेचे प्रमुख; १९९२-९८ शिवसेना तालुका प्रमुख; संस्थापक-अध्यक्ष, प्रहार विद्यार्थी संघटना; सदस्य, सत्यशोधक बहुउद्देशीय संघटना, टोंगलापूर, तालुका चांदूरबाजार, जिल्हा अमरावती; संस्थापक, प्रहार कामगार संघटना, संस्थापक, अध्यक्ष, प्रहार महिला दुध उत्पादक संघ, संस्थापक, प्रहार कृषी प्रक्रीया निर्यातदार संस्था; संस्थापक, प्रहार औद्योगिक विकास संस्था, बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती; संस्थापक, प्रहार युवा शक्ती संघटना; १९९९ प्रहार संघटना पक्षातर्फे उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल २०१३-१४ चा सह्याद्री वाहिनीचा "आर्य चाणक्य" पुरस्कार; एम्.आय.टी.चा "उत्कृष्ट लोकप्रतिनिधी" पुरस्कार; महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०११-१२ चा "रक्त मित्र" पुरस्काराने सन्मानीत; ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगर परिषदेमध्ये ९६ सदस्य, निवडून आणण्यात यश; १९९३-९८ सदस्य, ग्रामपंचायत; १९९७ - २००२ सदस्य व १९९७ - ९८ सभापती, पंचायत समिती, चांदूर बाजार; १९९७ - ९८ सदस्य, जिल्हा परिषद, अमरावती; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, विधीमंडळ पंचायत राज समिती; सदस्य, अनुसूचित जमाती कल्याण समिती, सदस्य, ग्रंथालय समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० मध्ये जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्य जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण व कामगार खात्याचे राज्यमंत्री.

छंद : शहिदांच्या गावांना भेटी देणे, चित्रपट पहाणे, गडकिल्ल्यांवर गिर्यारोहण करणे, कबड्डी खेळणे.

पत्ता : (१) मु.पो.बेलोरा, तालुका-चांदुर बाजार, जिल्हा-अमरावती.
दूरध्वनी : निवास - (०७२२३) २५२२३३.

मोबाईल - ९८९०१५३४९१.
(२) फिनले-विदर्भ मिल कॉलनी , तालुका अचलपूर, जिल्हा अमरावती.
(३) राँकहिल, १२०२, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३६.
दुरध्वनी - निवास (०२२) २३६३२४८३ / २३६२०७९६.
कार्यालय - (०२२) २२०२०३५२ / २२०२०३५५.
ई-मेल - praharonline@gmail.com

निवडणूक निकाल

(४२-अचलपूर)

एकूण मतदार		२,७५,२५५
एकूण वैध मतदान		१,८५,१६१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. बच्चू ऊर्फ ओमप्रकाश बाबाराव कडू**	८१,२५२ [प्रहार जनशक्ती पक्ष]
(२)	श्री. अनिरुद्ध ऊर्फ बबलुभाऊ सु. देशमुख	७२,८५६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३)	श्रीमती सुनिता फिसके	१५,०६४ (शिवसेना)
(४)	श्री.अब्दुल नजीम अब्दुल रऊफ	६,३२९ (ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन)
(५)	श्री. नंदेश अंबडकर	३,३५५ (वंचित बहुजन आघाडी)

कांदे , श्री. सुहास (अण्णा) द्वारकानाथ

जन्म : ६ सप्टेंबर, १९७५.

जन्म ठिकाण : ताडदेव , मुंबई.

शिक्षण : एम.ए (राज्य शास्त्र).

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अंजली व शोभा .

अपत्ये : एकूण- २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व व्यापार .

पक्ष : शिवसेना .

मतदारसंघ : ११३ - नांदगाव, जिल्हा नाशिक.

इतर माहिती : संस्थापक, गुरूकुल एज्युकेशन सोसायटी, नांदगाव, या संस्थेमार्फत पॉलिटेकनिक व आय.टी. आय. कॉलेज सुरू केले; संस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक कामगार विकास सेना; संस्थापक, देवराज हेल्थ अँड डेव्हलमेंट फाऊंडेशन; (समता ब्लड बँक) संचालक व जून २०१५ पासून उपाध्यक्ष, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., २०१५ पासून संचालक, नाशिक जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघ; शिवसेना जिल्हा प्रमुख, नाशिक; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड .

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

परदेश प्रवास : दुबई व थायलंड चा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) पार्श्व मधुर स्वीट समोर , पाईपलाईन, गंगापूर रोड , नाशिक ,

(२) ७,८,९, सिल्वर प्लाजा , शरणपूर रोड, कॅनडा कॉर्नर , नाशिक.

दूरध्वनी :- निवास-(०२५३) २३३८५९९/ (०२५३) २३३९६९९

कार्यालय :- (०२५३) २३१५४९९ / (०२५३) २५७६८९९

मोबाईल :- ९८८११९९७८६/ ८३०८३९९७८६

ई-मेल :- suhasanna.kande@gmail.com

निवडणूक निकाल

(११३ - नांदगाव)

एकूण मतदार		३,१७,३८८
एकूण वैध मतदान		१,९०,१४२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. सुहास (अण्णा) व्दारकानाथ कांदे**	८५,२७५ [शिवसेना]
(२)	श्री. पंकज भुजबळ	७१,३८६ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३)	श्री. राजेंद्र पगारे	१३,६३७ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	श्री. रत्नाकर पवार	१२,२५७ (अपक्ष)
(५)	नोटा	१,२६४

कानडे, श्री. लहू नाथा

जन्म : १ जानेवारी, १९५५.

जन्म ठिकाण : अंतरवाली, तालुका नेवासे, जिल्हा अहमदनगर.

शिक्षण : एम.ए.(इंग्रजी), बी.एड.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी .

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कविता.

अपत्ये : एकूण- ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : सेवानिवृत्त अधिकारी.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २२० - श्रीरामपुर, (अनुसूचित जाती), जिल्हा अहमदनगर .

इतर माहिती : राज्य सरकारच्या महाराष्ट्र विकास सेवेतील अधिकारी म्हणून २७ वर्षे सेवा केली या कालावधीत बी.डी.ओ. डेप्युटी सी.ई.ओ. म्हणून कार्य केले. प्रतिष्ठान संचालित श्री. साई इंग्लिश मिडीयम स्कूल, अहमदनगर व इतर तीन विद्यालये सुरू केली; अक्षरवेल ग्रंथालय, सावेडी, जिल्हा अहमदनगर सुरू केले. श्री. कानिफनाथ सह. पतसंस्थेची स्थापना आणि समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक सक्षमता देण्यासाठी मागील २० वर्षापासून प्रयत्न; लोकहक्क फाऊंडेशन या संस्थेद्वारे साक्षरता अभियान, समाजप्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन; आर्थिक दुर्बल घटकांना मदत; महाराष्ट्र राज्यातील

'हगणदारी मुक्त गाव' या संकल्पनेचे जनक, ग्रामपंचायत सुधारणेसाठी स्वप्नातले गाव या पुस्तकाचे लेखन; हगणदारी मुक्त गावांच्या गोष्टी या पुस्तकाचे संपादन; ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी व लोकजागृती कार्यक्रमांचे आयोजन, 'क्रांतिपर्व' 'टाचाटिका', 'तळ ढवळतांना' हे काव्यसंग्रह प्रकाशित; 'आम्ही हिंदुस्तानी', 'स्वप्नातील गाव' 'कल्याण कथा', 'बहुजन साहित्य लहू कानडेंचे स्कुट लेखन' आदि ग्रंथ प्रकाशित; विविध वृत्तपत्रामध्ये स्तंभलेखन, अनेक कवितांचा शालेय अभ्यासक्रमातील पाठयपुस्तकांमध्ये समावेश; समाजिक कार्याबद्दल बाळासाहेब भारदे, कॉ गोविंदराव पानसरे व आर. डी. पवार यांच्या नावे दिल्या जाणा-या पुरस्काराने सन्मानीत; साहित्य क्षेत्रातील कार्यासाठी दिल्ली येथील दलित साहित्य अकादमीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत; पद्मश्री डॉ. विखे पाटील साहित्य पुरस्कारसह बालकवी ठोंबरे, नारायण सुर्वे, इंदिरा संत यांच्या नावे पुरस्कार प्राप्त; दया पवार पुरस्काराचे प्रथम मानकरी. ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : लेखन व समाजसेवा.

परदेश प्रवास : जर्मनी , इटली , दुबई , लंडन , श्रीलंका , बांगलादेश इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : ९ पूर्णवादनगर, इंद्रप्रस्थ कॉलनी, मुळा - प्रवरा सोसायटी मागे, श्रीरामपुर, जिल्हा अहमदनगर .

दूरध्वनी : (०२४७) २२७७३२.
मोबाईल नं : ९८२२७७३६७३, ९८३४७१८३३४.
ई - मेल : kanadelahu@gmail.com

निवडणूक निकाल

(२२० - श्रीरामपुर, (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,८७,७००
एकूण वैध मतदान	१,८४,६०६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. लहु नाथा कानडे**	९३,९०६ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे	७४,९१२ (शिवसेना)
(३) डॉ. सुधीर क्षीरसागर	५,५३९ (अपक्ष)
(४) श्री. रामचंद्र जाधव	२,१४८ (अपक्ष)
(५) नोटा	२,१३३

कांबळे, श्री. रणजित प्रतापराव

जन्म : ३१ जुलै, १९६४.

जन्म ठिकाण : हैद्राबाद.

शिक्षण : एम.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पूर्णिमा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ४५-देवळी, जिल्हा-वर्धा.

इतर माहिती : १९९५-९९ सरपंच, ग्रामपंचायत, रोहणी; जिल्हास्तरिय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन, १९९८-२००२ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुलगाव; १९९९-२००४ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अनुसूचित जाती कल्याण समिती, सदस्य, आश्वासन समिती विधानसभा; नोव्हेंबर, २००४ ते डिसेंबर, २००८ ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००९ ते ऑक्टोबर,२०१४

ग्रामविकास, फलोत्पादन, पाणीपुरवठा व स्वच्छता (२०१०-२०१४ सार्वजनिक बांधकाम व पर्यटन) खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, नेपाळ, जपान, चीन, थायलँड, सिंगापूर, साऊथ आफ्रिका व हाँगकाँग इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, जलतरण, ज्युडो व घोडेस्वारी.

पत्ता : (१) व्ही.आय.पी. रोड, जिल्हाधिकारी निवास स्थानाच्या मागे, वर्धा, जिल्हा-वर्धा- ४४२००१.

दुरध्वनी निवास (०७१५२) २५१२५१.
मोबाईल - ९७६५५५१५५५.
ई मेल : rpkamble@yahoo.com

निवडणूक निकाल

(४५-देवळी)

एकूण मतदार	२,७५,४६०
एकूण वैध मतदान	१,७५,०३३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रणजित प्रतापराव कांबळे**	७५,३४५ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. राजेश बकाने	३९,५४१ (अपक्ष)
(३) श्री. समीर देशमुख	३०,९७८ (शिवसेना)
(४) श्री. सिद्धार्थ डोईफोडे	८,३२४ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. दिलीप अग्रवाल	८,०१६ (अपक्ष)

कांबळे, श्री. सुनिल ज्ञानदेव

जन्म : १० सप्टेंबर, १९६८.

जन्म ठिकाण : भावी, तालुका माढा, जिल्हा सोलापुर.

शिक्षण : एस.एस.सी.पर्यंत.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती प्रिती.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २१४-पुणे कॅन्टोन्मेंट (अनूसचित जाती), जिल्हा-पुणे.

इतर माहिती : सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेमार्फत शिरुर, पंढरपुर व शहापूर जिल्हा ठाणे या ठिकाणी अनाथ मुलांसाठी मोफत शिक्षणाची सोय करून वस्तीगृह सुरू केले; स्वामी विवेकानंद बेरोजगार संस्थेमार्फत गरीब व गरजूंना मदत कार्य; चारवेळा अध्यक्ष, पुणे शहर झोपडपट्टी आघाडी; अध्यक्ष, पुणे शहर अनुसूचित जाती मोर्चा; चिटणीस, पुणे शहर, उपाध्यक्ष, पुणे शहर, भारतीय जनता पक्ष; सन १९९७, २००७, २०१२ व २०१७ चारवेळा नगरसेवक, दोन वेळा सभापती,

महिला व बालकल्याण समिती; सदस्य, विधी सल्लागार समिती; सदस्य, क्रीडासमिती. महानगरपालिका, पुणे; आदर्श नगरसेवक पुरस्काराने सन्मानीत; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

परदेश प्रवास : स्पेन, इंग्लंड व अमेरिका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन.

पत्ता : (१) ए-२/२० सूर्यप्रभा गार्डन, बिबवेवाडी, कोंडवा रोड, पुणे ४०००३५.
(२) ५४ एच.पी.लोहिया नगर, गंजपेठ, पुणे.
दूरध्वनी : निवास (०२०) २४२६५०४५.
मोबाईल : ९८२२४१३९९३.
ई-मेल : kamblesunil118@gmail.com.

निवडणूक निकाल

(२१४-पुणे कॅन्टोन्मेंट (अनूसचित जाती))

एकूण मतदार	२,९१,४५४
एकूण वैध मतदान	१,२६,५७४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल ज्ञानदेव कांबळे**	५२,१६० [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. रमेश बागवे	४७,१४८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. लक्ष्मण अर्डे	१०,०२६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्रीमती हिना मोमीन	६,१४२ (ऑल इंडिया मजलिस ए-इत्तेहादुल मुस्लिमीन)
(५) श्रीमती मनीषा सरोदे	३,०७५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

कारेमोरे, श्री. राजू माणिकराव

जन्म : ५ मार्च, १९७१.

जन्म ठिकाण : नेरी ,तालुका मोहाडी , जिल्हा भंडारा.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रंजीता.

अपत्ये : एकूण- २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष .

मतदारसंघ : ६० - तुमसर, जिल्हा - भंडारा .

इतर माहिती : २००५-२०१० सदस्य, जिल्हा परिषद, भंडारा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : (१) नेहरू वार्ड, तुमसर बायपास रोड , वरठी ,
तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा .
(२) एस. डी. ओ. कार्यालयासमोर, तुमसर,
जिल्हा- भंडारा - ४४१९१२.

मोबाईल : ७७६८९१०५१०
ई-मेल : mlarajukaremore@gmail.com

निवडणूक निकाल (६० - तुमसर)	
एकूण मतदार	३,०३,६५२
एकूण वैध मतदान	२,१५,०१०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजू माणिकराव कारेमोरे**	८७,१९० [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. चरण वाघमारे	७९,४९० (अपक्ष)
(३) श्री. प्रदिप पडोळे	३३,४५७ (भारतीय जनता पक्ष)
(४) डॉ. छाया गभाने	३,५१५ (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री. पंकज कारेमोरे	३,१५८ (अपक्ष)

काळे, श्री. आशुतोष अशोकराव

जन्म : ४ ऑगस्ट, १९८५.

जन्म ठिकाण : धुळे

शिक्षण : बी.ई. (आय.टी.), एम.एस. (आय.एस.) बोस्टन युनिव्हर्सिटी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती चैताली.

अपत्ये : एकूण- १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २१९ - कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

इतर माहिती : जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा. अध्यक्ष, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर; चेअरमन, कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी , गौतमनगर; विश्वस्त, श्री. संत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज श्री अमृतेश्वर महादेव मंदिर संस्थान, माहेगाव देशमुख; अध्यक्ष, श्री. हनुमान देवस्थान; अध्यक्ष, श्री. देवराम बाबा काळे संस्थान, माहेगाव देशमुख, कोपरगाव; अध्यक्ष, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन व चॅरिटेबल ट्रस्ट, कोपरगाव; विश्वस्त. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना, लि., गौतमनगर; चेअरमन. वसंतदादा शुगर इन्स्टियुट,

मांजरी बु. पुणे; गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, दि डिस्टीलर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य; उपाध्यक्ष, गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर; मुख्य मार्गदर्शक, पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सह. पतसंस्था मर्या, गौतमनगर; मुख्य मार्गदर्शक, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कं. प्रा. लि, गौतमनगर; चेअरमन, कोपरगाव तालुका सह. जिनिंग ॲण्ड प्रेसिंग संस्था, मर्या, कोपरगाव; संचालक. कर्मवीर शंकरराव काळे सह. साखर कारखाना पगारदार नोकरांची सह. पतपेढी, लि., गौतमनगर; मुख्य मार्गदर्शक, माहेगाव देशमुख विविध कार्यकारी सह. सोसायटी, लि.; मुख्य मार्गदर्शक, कर्मवीर शंकराव काळे मित्र मंडळ, गौतमनगर; जानेवारी २०२२ अध्यक्ष, साईबाबा संस्थान, शिर्डी; सचिव, मार्गदर्शक व संघटक, अहमदनगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; आयकॉन ऑफ अहमदनगर - दैनिक लोकमत, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम एक्सलंस ॲवार्ड - इंटीग्रेशन पीस इन्स्टिटयूट, नवी दिल्लीने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : वाचन व समाजसेवा.

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड ,युके , सिंगापुर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) राधासदन मु. पो. माहेगाव देशमुख , तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

(२) कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि., गौतमनगर पो. कोळपेवाडी , तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर -४२३६०२.

दूरध्वनी :- निवास - (०२४२३) २६१२२८/ २६१९९९.

कार्यालय - (०२४२३) २६१२१० ते २६१२१५.

मोबाईल : ९८२२९१३०६६/ ७७४४०६६६६६.

ई-मेल : ashutosh.kale89@gmail.com

निवडणूक निकाल

(२१९ - कोपरगाव)

एकूण मतदार	२,६५,१८४
एकूण वैध मतदान	२,०२,५४०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. आशुतोष अशोकराव काळे**	८७,५६६ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्रीमती स्नेहलता कोल्हे	८६,७४४ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. राजेश परजाणे	१५,४४६ (अपक्ष)
(४) श्री. विजय वहाडणे	४,०४७ (अपक्ष)
(५) श्री. अशोक गायकवाड	३,९१४ (अपक्ष)

किणीकर, डॉ. बालाजी प्रल्हाद

जन्म : २५ मार्च, १९७२.

जन्म ठिकाण : नवरे किणी, तालुका औसा, जिल्हा लातुर.

शिक्षण : बी.डी.एस्. (मुंबई).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शिल्पा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : वैद्यकीय.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १४०- अंबरनाथ (अनुसूचित जाती), जिल्हा ठाणे.

इतर माहिती : तालुका संघटक, ठाणे ग्रामीण (अंबरनाथ विभाग), भारतीय विद्यार्थी सेना; १९९० पासून शिवसेना पक्षाचे सदस्य, पक्षाच्या माध्यमातून महागाई विरोधी आंदोलन; शिवशाही जागर आंदोलनात सक्रीय सहभाग; विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे मोफत वाटप; किणीकर विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून आरोग्य तपासणी, नेत्रचिकित्सा, रक्तदान शिबिरांचे आयोजन; सिंधुदुर्ग रहिवाशी संघटना, अंबरनाथच्या माध्यमातून २००९ मध्ये १८ व्या मालवणी संमेलनाचे आयोजन; पतंग महोत्सव, कौटुंबिक मेळावे, नववर्ष स्वागत समारंभ, शिवजयंती, अखंड हरिनाम

सप्ताहाचे आयोजन; कलावंताना प्रोत्साहन; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : ३०२, जैन प्लाझा, शिवसेना शाखेजवळ, अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे.

दूरध्वनी : कार्यालय- (०२५१) २६०७७७०.
मोबाईल : ९८२३१९५२००.
ई-मेल : drbalajikinikar@gmail.com

निवडणूक निकाल

(१४०- अंबरनाथ (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	३,१५,५८१
एकूण वैध मतदान	१,३३,९१९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. बालाजी प्रल्हाद किणीकर**	६०,०८३ [शिवसेना]
(२) श्री. रोहित साळवे	३०,७८९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. धनंजय सुर्वे	१६,२७४ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. सुमेध भवर	१३,६३५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	४,३२२

कुचे, श्री. नारायण तिलकचंद

जन्म : ५ मार्च, १९७४.

जन्म ठिकाण : मुकूंदवाडी, जिल्हा औरंगाबाद.

शिक्षण : बी .ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शितल.

अपत्ये : एकूण- २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : समाजकार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १०२ - बदनापूर, (अनुसूचित जाती), जिल्हा जालना.

इतर माहिती : २००५-२०१० व २०१०-२०१५ नगरसेवक, महानगर पालिका, औरंगाबाद; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; २०१६-२०१७ सदस्य, अनुसूचित जाती कल्याण समिती; २०१७-२०१८ सदस्य, रोजगार हमी योजना समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व लेखन.

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड, युके व सिंगापुर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) कुचे निवास , लक्ष्मी देवी मंदिराजवळ, जूनी मुकूंदवाडी , औरंगाबाद.
(२) संर्पक कार्यालय कृषी विद्यालय समोर, बदनापूर, जिल्हा जालना.
(३) रूम क्र. ४२४ अ आकाशवाणीसमोर आमदार निवास, मुंबई.
दूरध्वनी :- कार्यालय- ०२४८२- २६१७९९.
मोबाईल :- ९४२२२०१७०७ / ९५२७७९९६००.
ई-मेल :- ntkuche@gmail.com.

निवडणूक निकाल

[१०२ - बदनापूर, (अनुसचित जाती)]

एकूण मतदार	३,०७,९७३
एकूण वैध मतदान	२,११,५७७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नारायण तिलकचंद कुचे**	१,०५,३१२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री.बबलु चौधरी	८६,७०० (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. राजेंद्र मगरे	९,८६९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) डॉ. अश्विनी गायकवाड	१,८८१ (अपक्ष)
(५) नोटा	१,७५३

कुटे, डॉ. संजय श्रीराम

जन्म : ९ मार्च, १९६९.

जन्म ठिकाण : जळगाव (जामोद), बुलढाणा.

शिक्षण : बी.ए.एम.एस., सी.सी.एच.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी व इंग्रजी .

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अपर्णा .

अपत्ये : एकूण- २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २७ - जळगांव -जामोद, जिल्हा- बुलढाणा.

इतर माहिती : संचालक, खरेदी - विक्री सहकारी संघ, जळगांव (जामोद); सन २०११-२०१३ संचालक, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि.; भारतीय जनता पक्षाचा पूर्ण वेळ कार्यकर्ता; २००३-२००६ अध्यक्ष, जळगांव (जामोद) तालुका, २०१०-२०१५ बुलढाणा जिल्हा अध्यक्ष, २०१७-२०१९ सरचिटणीस व कोअर कमिटी सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००४-२००९,२००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; २०१५-२०१७ समिती प्रमुख, इतर मागासवर्गीय कल्याण समिती; सदस्य, पंचायत राज समिती; सदस्य, आश्वासन समिती; सदस्य, धर्मादाय रूग्णालय तदर्थ समिती; जून, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ कामगार, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग,

विमुक्त जाती- भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग कल्याण खात्याचे मंत्री व बुलढाणा जिल्ह्याचे पालक मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

छंद : वाचन , संगीत , व्यायम करणे, आदिवासी भागात सेवा कार्य व मदत करणे , विद्यार्थी व गरीब रूग्णांना मदत करणे.

परदेश प्रवास : युरोप , युके , इटली , स्वित्झर्लँड, अमेरीका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) 'तृप्ती व्हिला' नविन न्यायालयाजवळ , सिध्दिविनायक नगर जळगाव (जामोद), जिल्हा बुलढाणा ४४३४०२.

(२) रूम नं १०९, विस्तारीत आमदार निवास , मुंबई .

दूरध्वनी :- निवास-(०७२६६) २२१४६७.

मोबाईल :- ७३८७६५९९९९.

ई-मेल :- nbsg2009@gmail.com

निवडणूक निकाल

(२७ - जळगांव-जामोद)

एकूण मतदार	२,८९,७३६
एकूण वैध मतदान	२,०३,७३७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. संजय श्रीराम कुटे**	१,०२,७३५ [भारतीय जनता पक्ष]
(२) डॉ. स्वाती वाकेकर	६७,५०४ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. संगितराव भोंगळ	२९,९८५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	२,२३२
(५) श्री. रमेश नवथाळे	१,२८१ (बहुजन समाज पार्टी)

कुडाळकर, श्री. मंगेश अनंत

जन्म : १८ जून, १९७१.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : दहावी पास.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रजनी.

अपत्ये : एकूण- २ (दोन मुलगे).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १७४ - कुर्ला, (अनुसूचित जाती), जिल्हा मुंबई उपनगर .

इतर माहिती : २०१७ पासून अध्यक्ष, नेहरू नगर हौसिंग फेड्रेशन; २००० पासून सल्लागार , नेहरू नगर गणेशोत्सव मंडळ; २००० पासून प्रमुख सल्लागार नेहरूनगर श्री. सेवामंडळ; २००० अध्यक्ष, गणेश मित्र मंडळ, कुर्ला; १९८७-२००० गट प्रमुख, २०००-२००६ शाखा प्रमुख, २००६-२०१४ उप विभाग प्रमुख, शिवसेना, शिवप्रतिष्ठान कुर्ला या संस्थेतर्फे "समाज भूषण" पुरस्काराने सन्मानित; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

छंद : वाचन.

पत्ता : इ. क्र. १२ / ४०८ डिग्नीटी को ऑप. हौ. सो., नेहरू नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४.

दूरध्वनी :- कार्यालय - (०२२) २५२७८९२५.
मोबाईल : ९३२२२७८९२५.
ई-मेल : makudalkar@gmail.com

निवडणूक निकाल

(१७४ - कुर्ला (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,७४,८१३
एकूण वैध मतदान	१,२३,४३४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. मंगेश अनंत कुडाळकर**	५५,०४९ [शिवसेना]
(२) श्री मिलिंद कांबळे	३४,०३६ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) ॲड, रत्नाकर डावरे	१७,३४९ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(४) श्री. अप्पासाहेब अवचारे	९,७७१ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	४,५२१

कुणावार, श्री. समीर त्र्यंबकराव

जन्म : १ जानेवारी, १९६८.

जन्म ठिकाण : हिंगणघाट, जिल्हा-वर्धा.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी व हिंदी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती श्रध्दा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ४६-हिंगणघाट, जिल्हा-वर्धा.

इतर माहिती : समुद्रपूर तालुक्यातील कोरा सर्कल येथे गो पालन केंद्र सुरु केले; ५१ वेळा स्वतः रक्तदान करुन १२ रक्तदान शिबिरांचे आयोजन; १९९६ संचालक व १९९८ चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समिती, हिंगणघाट; २००० नगरसेवक व २००१ नगराध्यक्ष, नगरपालिका हिंगणघाट; उल्लेखनीय कार्याबद्दल "उत्कृष्ट नगराध्यक्ष" पुरस्काराने सन्मानीत; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन.

परदेश प्रवास : हाँगकाँग व सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : कृष्णाई, महावीर वॉर्ड, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

दूरध्वनी : निवास - (०७१५३) २४४१०४.
मोबाईल - ९८२२२०४०४२.
ई-मेल - ntnsorate@gmail.com

निवडणूक निकाल

(४६-हिंगणघाट)

एकूण मतदार	२,९६,१३०
एकूण वैध मतदान	१,९२,४१२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. समीर त्र्यंबकराव कुणावार**	१,०३,५८५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. राजू ऊर्फ मोहन तिमांडे	५३,१३० (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. अशोक शिंदे	१२,६२३ (अपक्ष)
(४) डॉ. उमेश वावरे	६,८१० (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. विलास टेमरे	४,२८५ (बहुजन समाज पार्टी)

कुंभारे, श्री. विकास शंकरराव

जन्म : ९ मार्च, १९६२.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : डी.सी.ई. (ॲपिअर).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व हलबी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती ललीता.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे)

व्यवसाय : उद्योग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ५५-नागपूर मध्य, जिल्हा नागपूर.

इतर माहिती : संचालक, सदानंद सहकारी पतसंस्था, नागपूर; १९९७-२००२ व २००२-२००७ सदस्य, महानगरपालिका, नागपूर; २००६ पासून अध्यक्ष, मध्य नागपूर, भारतीय जनता पक्ष; गणेशोत्सव मंडळातर्फे अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच, रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; बेरोजगार युवकांना मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन; २००९-२०१४, २०१४-२०१९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन.

पत्ता : कुंभारे भवन, गोळीबार चौक, पाचपावली रोड, नागपूर ४४० ०१८.

दूरध्वनी : कार्यालय- (०७१२) २७७०२९९.
मोबाईल- ९२२५२ १३१५६, ८८८८८ ८५४३३.
ई-मेल- mla.vikaskumbhare@gmail.com

निवडणूक निकाल

(५५-नागपूर-मध्य)

एकूण मतदार	३,२४,२३३
एकूण वैध मतदान	१,६३,२३८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. विकास शंकरराव कुंभारे**	७५,६९२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. बंटी बाबा शेळके	७१,६८४ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. अब्दुल पटेल	८,५६५ (ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन)
(४) नोटा	२,१४९
(५) श्री. धरमेंद्र मंडलिक	१,९७१ (बहुजन समाज पार्टी)

कुल, ॲड. राहुल सुभाषराव

जन्म : ३० ऑक्टोबर, १९७७.

जन्म ठिकाण : पुणे.

शिक्षण : बी.ए., एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कांचन.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १९९-दौंड, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : अध्यक्ष, भीमा एज्युकेशन ट्रस्ट मधुकरनगर-पाटस, या संस्थेद्वारे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, डी.एड., बी.एड., एम.एड. महाविद्यालये सुरु केली; अध्यक्ष, कैलास शिक्षण मंडळ, राहु, तालूका दौंड या संस्थेद्वारे माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज सुरु केले; सचिव, सुभाष अण्णा कुल शिक्षण प्रसारक मंडळ, कडेगाव, तालुका दौंड, या संस्थेमार्फत इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली; चेअरमन, भीमा सहकारी साखर कारखाना लि. मधुकरनगर-पाटस, या कारखान्यामार्फत डिस्टलरी प्लँट व बायोकंपोस्ट खत प्रकल्प सुरू केला; संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; संस्थापक-

संचालक, सुभाषआण्णा कुल सहकारी दुध उत्पादक व प्रक्रिया संघ लि. गलाडवाडी, तालुका दौंड, जिल्हा-पुणे; राज्यातील अष्टविनायक परिक्रमा मार्ग मंजूरीसाठी विशेष प्रयत्न; तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धांचे आयोजन; आरोग्य शिबीराचे आयोजन; बेरोजगारांसाठी रोजगार मेळावांचे आयोजन; दौड तालुक्यात एम.आय.डी.सी. उभारणीसाठी प्रयत्न; मुळशीतील टाटा धरणाचे पाणी दुष्काळी भागाला मिळावे यासाठी प्रयत्न; राज्यातील खाजगी व राखीव वनांचे निर्वाणी करण्यासाठी प्रयत्न; लाभधारक गावांना समा आरखेडचे पाणी मिळावे यासाठी प्रयत्न; सन २०१७-२०१८ चा राष्ट्रकुल मंडळ महाराष्ट्र शाखेचा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्राप्त; भारतीय ध्वज संसदेचा आदर्श युवा विधायक पुरस्कार प्राप्त, ब्रम्ह केशरी उत्कृष्ट विधायक पुरस्कार २०१९ ने सन्मानित; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

परदेश दौरे : दुबई व ब्राझिल अभ्यास दौरा.

छंद : क्रिकेट.

पत्ता : मु.पो. राहू, तालुका दौंड, जिल्हा पुणे - ४१२२०७.

दूरध्वनी : निवास - (०२११९) २७२३४१, २७२५२५.
कार्यालय - (०२११७) २२२१२९; २२२१३०; २२२१३२.
मोबाईल - ९८२२६६७७९९.
ई-मेल - rahulskool@gmail.com

निवडणूक निकाल (१९९-दौंड)	
एकूण मतदार	३,०९,४८६
एकूण वैध मतदान	२,१४,०४८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. राहुल सुभाषराव कुल**	१,०३,६६४ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. रमेश थोरात	१,०२,९१८ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. दत्तात्रय ताम्हाणे	२,६३३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. किसन हंडाल	९३९ (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	९१७



केचे, श्री. दादाराव यादवराव

जन्म : ५ एप्रिल, १९५४.

जन्म ठिकाण : अंबिकापुर,तालुका- आष्टी, जिल्हा - वर्धा.

शिक्षण : बी. ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मालाबाई.

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष .

मतदारसंघ : ४४ - आर्वी, जिल्हा वर्धा.

इतर माहिती : १९९४ पासून अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण सेवा मंडळ; १९९४ सचिव, जय भवानी शिक्षण संस्था; २००१ अध्यक्ष, स्व यादवरावजी केचे शेतमाल प्रकीया संस्था; १९९४ अध्यक्ष, वर्धा जिल्हा, भाजपा; २०१४ ते २०१९ सदस्य, महाराष्ट्र राज्य कार्यकारणी भारतीय जनता पक्ष; १९८५ ते १९९५ नगरसेवक, नगरपरिषद, आर्वी; २००९-२०१४ सदस्य, विधानसभा; सदस्य, पंचायत राज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : भजन व क्रिडा.

पत्ता : (१)साईनगर, आर्वी, तालुका आर्वी, जिल्हा वर्धा.

(२)आकाशवाणीसमोर आमदार निवास मुंबई.

दूरध्वनी :- निवास- (०७१५२) २२२५२०.

मोबाईल : ९८८१०२२०६०.

निवडणूक निकाल

(४४-आर्वी)

एकूण मतदार	२,६२,५९४
एकूण वैध मतदान	१,७६,९२९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दादाराव यादवराव केचे**	८७,३१८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अमर शरदराव काळे	७४,८५१ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. दिपक मडवी	६,०३१ (अपक्ष)
(४) श्री. रुपचंद टोपले	२,८४८ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. चंद्रशेखर डोंगरे	२,३८६ (बहुजन समाज पक्ष)

केदार, श्री. सुनिल छत्रपाल

जन्म : ७ एप्रिल, १९६१.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : बी.एस्सी.(कृषी), एम.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अनुजा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती व लघु उद्योग.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ४९-सावनेर, जिल्हा-नागपूर.

इतर माहिती : अध्यक्ष, गणेश प्रासादिक शिक्षण संस्था; या संस्थेद्वारे चार माध्यमिक शाळा व महाविद्यालय सुरु केले; दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्न; १९९२ सदस्य, जिल्हा परिषद, नागपूर; संचालक, दि विदर्भ को.ऑप मार्केटिंग सोसायटी, नागपूर; संचालक, श्री. बाबासाहेब केदार जिनिंग प्रेसिंग सोसायटी, सावनेर; संचालक, बॅरिस्टर शेषराव वानखेडे ट्रस्ट, नागपूर; नागपूर जिल्हा दूध संघाची स्थापना केली; नागपूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या मेळांव्याचे आयोजन; दुर्गम भागातील

वीज समस्या, शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी प्रयत्न; युवकांना संघटीत करुन कला, क्रिडा व सांस्कृतिक मंडळे स्थापन केली; ग्रामीण भागातील जनतेसाठी पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य इत्यादी सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न; गरीब रुग्णांना मदत; अध्यक्ष, नागपूर जिल्हा कापूस उत्पादक सहकारी सूत गिरणी, पाटण-सावंगी; १९९३ अध्यक्ष, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९५-९९, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च, १९९५ ते जून, १९९५ ऊर्जा आणि परिवहन खात्याचेराज्यमंत्री, जून, १९९५ ते १९९६ ऊर्जा, परिवहन आणि बंदरे खात्याचेराज्यमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. जानेवारी, २०२० पशुसंवर्धन, दुग्धविकास, क्रिडा व युवक खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : ऑस्ट्रेलियाचा अभ्यास दौरा.

छंद : क्रिकेट व संगीत.

पत्ता : १) वॉर्ड क्रमांक २, किल्लापुरा, पाटण-सावंगी, तालुका-सावनेर, जिल्हा- नागपूर.

२) बंगला नं.ब-७, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय समोर, मुंबई ४०० ०३२.
दुरध्वनी : कार्यालय - (०७१२) २७२०६११.
मोबाईल - ९४२२१०८३६०.
ई-मेल - sunil.kedar08@gmail.com

निवडणूक निकाल

(४९-सावनेर)

एकूण मतदार	३,११,०१८
एकूण वैध मतदान	२,११,६७२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल छत्रपाल केदार**	१,१३,१८४ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. राजू भास्करराव पोतदार	८६,८९३ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्रीमती संचयता सुदेश पाटील	४,३८१ (बहुजन समाज पार्टी)
(४) श्री. प्रमोद बागडे	३,५३९ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,८१९

केराम, श्री. भीमराव रामजी

जन्म : १५ ऑगस्ट, १९६६.

जन्म ठिकाण : दहेगाव (चि.) तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

शिक्षण : बी. एस्सी.

ज्ञात भाषा : मराठी , हिंदी , इंग्रजी व गोंडी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मनोरमा.

अपत्ये : एकूण- ६ (तीन मुलगे व तीन मुली).

व्यवसाय : शेती, व समाजकार्य .

पक्ष : भारतीय जनता पक्ष .

मतदारसंघ : ८३- किनवट- माहुर , जिल्हा नांदेड.

इतर माहिती : संस्थापक-अध्यक्ष, आदिवासी महासंघ, महाराष्ट्र राज्य; २००५ ते २०१० संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवट, जिल्हा नांदेड; १९९६ सदस्य, दुरसंचार सल्लागार समिती, नांदेड; २००७ ते २००९ तालुका अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; २००७ ते २००९ प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष (आदिवासी आघाडी), महाराष्ट्र प्रदेश; प्रदेश कार्यकारणी सदस्य, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्य; १९९०-१९९३ सदस्य, जिल्हा परिषद, नांदेड; १९९३-९५ (पो.नि) सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; सदस्य, वेतन व भत्ते विधी समिती; १९९३-९५ सदस्य, कारागृह

सुधार समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

प्रकाशन : "कोया पुंगार" (गोंडी), आदिम गितांजली (गोडी गीत संग्रह), (कविता संग्रह) प्रकाशित.

छंद : वाचन, कबड्डी व खो-खो.

पत्ता : 'राजगृह' , राजेंद्र नगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा. नांदेड ४३१८०४.
दूरध्वनी :- निवास- (०२४६९) २२२२३३.
मोबाईल : ९४२१८७१७४४.
ई-मेल : bhimrao.keram@gamil.com

निवडणूक निकाल

(८३- किनवट- माहुर)

एकूण मतदार	२,५९,५७९
एकूण वैध मतदान	१,८४,५५६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. भीमराव रामजी केराम**	८९,६२८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. प्रदिप जाधव-नाईक	७६,३५६ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. हमराज उईके	११,७६४ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,०४१
(५) श्री. विनोद राठोड	१,००२ (बहुजन समाज पार्टी)

केसरकर, श्री. दिपक वसंतराव

जन्म : १८ जुलै, १९५५.

जन्म ठिकाण : सावंतवाडी, जिल्हा-सिंधुदुर्ग.

शिक्षण : बी.कॉम., डिप्लोमा इन एक्सपोर्ट मॅनेजमेंट.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पल्लवी.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : बांधकाम व्यावसायिक व शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २७०-सावंतवाडी, जिल्हा-सिंधुदुर्ग.

इतर माहिती : कार्यकारी सदस्य, जवाहर नवोदय विद्यालय, सांगेली (भारत सरकार उपक्रम); उपाध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, सावंतवाडी; सदस्य, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद; अध्यक्ष, जिल्हा साक्षरता अभियान, सिंधुदुर्ग; गरीब, गरजू विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप, तसेच दरमहा शिष्यवृत्ती योजना सुरु केली; सुसज्ज ग्रंथालय व समाज मंदिरांची निर्मिती केली; सतत ५ वर्षे भव्य सांस्कृतिक व पर्यटन महोत्सवाचे आयोजन; क्रिडा संकुलाची निर्मिती केली; महिलांसाठी बांबू प्रशिक्षण केंद्र, फळ प्रक्रिया केंद्र सुरु केले; बेरोजगारांसाठी हॉटेल मॅनेजमेंट प्रशिक्षण केंद्र सुरु केले; विविध कला व वस्तुसंग्रहालयाची निर्मिती केली; रक्तदान, योग शिबीर, आरोग्य

तपासणी शिबिरांचे आयोजन; गरीब जनतेला योग्य भावात स्वस्त धान्य वितरण कार्यक्रम राबविला; आयुर्वेदातील पंचकर्मावर आधारित रोजगार निर्मिती प्रकल्प तरुणांसाठी कार्यान्वित केला; भजनी मंडळांना सर्वतोपरी सहकार्य, मच्छिमार, आपदग्रस्त, छोटे उद्योजक, झोपडपट्टीवासीय, छोटे व्यापारी, शेतकरी व पुरग्रस्तांना मदत; अध्यक्ष, बाळासाहेब सावंत नागरी सहकारी पतसंस्था; उपाध्यक्ष, आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना; संचालक, सावंतवाडी अर्बन को-ऑप बँक; अध्यक्ष, सिंधुदुर्ग जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळ; संचालक, इंडियन प्लायवूड रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (भारत सरकार) बेंगलोर; संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ; अध्यक्ष, रोटरी क्लब, सावंतवाडी; चेअरमन, रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट; संस्थापक-सदस्य, नॅशनल असोशिएशन फॉर ब्लाईंड (Nab); जिल्हा समादेशक, भारत स्काऊट आणि गाईड संस्था, सिंधुदुर्ग; काँग्रेस पक्षाचे १० वर्षे तालुकाध्यक्ष; राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ९ वर्षे जिल्हाध्यक्ष; ४ वर्षे प्रदेश कार्यकारणी सदस्य; सप्टेंबर, २०१४ पासून शिवसेनेचे कार्य; १५ वर्षे सदस्य आणि ८ वर्षे नगराध्यक्ष, नगरपरिषद, सावंतवाडी; शहरातील जनतेच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या; ५ वर्षे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद महासंघ, मुंबई; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर, २०१४ ते ८ जुलै, २०१६ वित्त व ग्रामविकास खात्याचे राज्य मंत्री; ८ जुलै, २०१६ ते ९ ऑक्टोबर,२०१९ वित्त, नियोजन व गृह (ग्रामीण) खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; २०२० पासून समिती प्रमुख, विशेष हक्क समिती, विधानसभा;

परदेश प्रवास : अमेरिका, युरोप व इंडोनेशिया इत्यादीं देशांचा दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट, लॉन टेनिस व टेबल टेनिस.

पत्ता : (१) श्रीधर अपार्टमेंट, एस.टी. स्टँडसमोर, सावंतवाडी,

जिल्हा-सिंधुदुर्ग - ४१६ ५१०.
दूरध्वनी - (०२३६३) २७३७१२, २७३७१६.
मोबाईल - ९४२२०९६८८७.
(२) बी-१०३, बाफना अपार्टमेंट, मोगललेन, माटूंगा, मुंबई ४०० ०१६.
दूरध्वनी - (०२२) २४३७५६१९.

निवडणूक निकाल (२७०-सावंतवाडी)	
एकूण मतदार	२,२५,३०२
एकूण वैध मतदान	१,४३,८३३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दिपक वसंतराव केसरकर**	६९,७८४ [शिवसेना]
(२) श्री.राजन तेली	५६,५५६ (अपक्ष)
(३) श्री.बबन साळगांवकर	५,३९६ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) नोटा	३,५२४
(५) श्री.प्रकाश रेडकर	३,४०९ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

केळकर, श्री. संजय मुकूंद

जन्म : ९ जुलै, १९५६.

जन्म ठिकाण : ठाणे.

शिक्षण : बी.कॉम., एलएल.बी.(जनरल)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कमल.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : कर सल्लागार

पक्ष : भारतीय जनता पक्ष

मतदारसंघ : १४८-ठाणे शहर, जिल्हा - ठाणे.

बिझनेस इनिशिएटिव्ह डायरेक्शनचे आंतरराष्ट्रीय दर्जासाठी क्राऊन ॲवॉर्ड प्राप्त; १९८६-१९९२ सरचिटणीस व उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटी; १९८७-१९८९ सदस्य, लोकसभा; १९९२-१९९८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च, १९९३ ते सप्टेंबर, १९९४ सार्वजनिक बांधकाम, नगरविकास आणि संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री; सप्टेंबर, १९९४ ते मार्च, १९९५ गृह व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर, १९९९ ते जानेवारी, २००३ महसूल व राजशिष्टाचार खात्याचे मंत्री व परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री; जानेवारी, २००३ ते ऑक्टोबर, २००४ परिवहन, बंदरे, सांस्कृतिक कार्य आणि राजशिष्टाचार मंत्री, (नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री); नोव्हेंबर, २००४ ते ४ डिसेंबर, २००८ मंत्री, उद्योग, खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार (नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री); ८ डिसेंबर,२००८ ते २६ ऑक्टोबर,२००९ व ७ नोव्हेंबर,२००९ ते ९ नोव्हेंबर,२०१० महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री,या कालावधीत कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी ५,२३२ कोटी रुपयांचे पॅकेज; उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी ६,५०९ कोटी रुपयांचे पॅकेज; विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी १० हजार कोटी रुपयांचे पॅकेज; केंद्र शासनाच्या कर्ज माफी योजनेचा लाभ न मिळालेल्या व नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ६२०८ कोटी रुपयांचे पॅकेज घोषित, याचा फायदा ४० लाख शेतकऱ्यांना झाला; सामान्य नागरिकांना महागाईपासून दिलासा देण्यासाठी एपीएल व बीपीएल लाभार्थ्यांसाठी स्वस्त धान्य दुकानातून गहू, तांदूळ, तूरडाळ, साखर व पामतेल या पाच वस्तू उपलब्ध; मराठी भाषेसाठी स्वतंत्र प्रशासकीय विभागाची निर्मिती; राज्याचे सांस्कृतिक धोरण जाहीर; शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज; झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार झोपडपट्टीधारकांना मोफत मिळणाऱ्या सदनिकेच्या क्षेत्रात २२५ चौ. फुटांवरून २६९ चौ. फुटांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय; मुंबई व ठाणे येथील म्हाडाच्या जमिनीवर सध्याच्या चटईक्षेत्र निर्देशांकत १.२ वरून २.५ इतकी वाढ केली; त्यामुळे मध्यमवर्गाला परवडणारी घरे मोठया प्रमाणावर उपलब्ध; पंतप्रधानांनी घोषित केलेल्या अल्पसंख्यांकांच्या १५ कलमी कार्यक्रमाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी; २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी २१०

कोटी रुपयांची तरतूद; दर्जेदार आरोग्यसेवेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात २००९-२०१० या आर्थिक वर्षासाठी २,६९७ कोटी रुपयांची भरीव तरतूद; राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या धर्तीवर राज्य सुरक्षा दल म्हणजेच फोर्स वनची स्थापना, त्यासाठी १२७ कोटी रुपये उपलब्ध करून दिले; सुरक्षा परिषदेची स्थापना; पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे उपलब्ध करून दिली; राष्ट्रीय सुरक्षा दलाचे केंद्र मुंबईत सुरू; पुण्यात राज्य गुप्तचर प्रशिक्षण केंद्राची स्थापना; नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी १३८६ कोटी रुपयांचा विशेष कृती कार्यक्रम; सागरी सुरक्षेसाठी ५५ पोलीस ठाण्यांची निर्मिती; शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ६ वा वेतन आयोग लागू, त्यासाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद; पंढरपूर, तुळजापूर आणि शिर्डी या तीर्थक्षेत्रांच्या नियोजनबध्द विकासासाठी प्राधिकरण स्थापना करण्याचा निर्णय; राज्याचे वैशिष्ट्यपूर्ण माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा धोरण २९ ऑगस्ट, २००९ पासून लागू केले; राज्यात ग्रामीण भागात १० हजार ४८३ तर शहरी भागात १ हजार ३३६ नागरी महा ई-सेवा केंद्र उभारली; सक्षम दळणवळण व्यवस्था व शहर विकासाला प्राधान्य; वीज निर्मितीच्या क्षेत्रात स्वयंपूर्णतेच्या दिशेने वाटचाल; मुंबईतील दळण-वळण व इतर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ५० हजार कोटींची कामे मंजूर केली; राज्याला उद्योगात आघाडी मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील; उद्योगमंत्री असताना विशाल प्रकल्प धोरण व नवीन औद्योगिक धोरण आखले; देशात सर्वाधिक विशेष आर्थिक क्षेत्रांना केंद्र सरकारकडून मान्यता; ऑक्टोबर,२०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० पासून सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, नेपाळ, सिंगापूर, चीन, मलेशिया, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया व इजिप्त इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, टेबल टेनिस, प्रवास आणि नाटक पाहणे.

पत्ता : (१) शिवाजीनगर,नांदेड- ४३१ ६०२.

दूरध्वनी : (०२४६२) २३४०८१.

(२) ६-ए, भागीरथी भवन, दुसरा मजला, पहिली दादी शेठ क्रॉस रोड,

बाबुलनाथ, मुंबई- ४०० ००७.
दूरध्वनी : (०२२) २३६३ १३०२.
मोबाईल : ९८२१५२७५६१

निवडणूक निकाल (८५-भोकर)	
एकूण मतदार	२,७९,००४
एकूण वैध मतदान	२,०७,३८२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अशोक शंकरराव चव्हाण**	१,४०,५५९ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. श्रीनिवास ऊर्फ बापूसाहेब गोरटेकर	४३,११४ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. नामदेव आय्यलवाड	१७,८१३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. भगवान कदम	२,०६९ (संभाजी ब्रिगेड पाटील)
(५) नोटा	१,२७९

चव्हाण, श्री. दिपक प्रल्हाद

जन्म : १५ जुलै, १९७१.

जन्म ठिकाण : तरडगांव, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा.

शिक्षण : एम.ए., बी.एड.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वैशाली.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : नोकरी.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २५५-फलटण (अनुसूचित जाती), जिल्हा-सातारा.

इतर माहिती : सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांद्वारे विविध समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन; २००७-२०१२ संचालक, तरडगाव विकास सोसायटी; सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य; महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अनुसूचित जाती कल्याण समिती, रोजगार हमी योजना समिती व पंचायतराज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड;

छंद : वाचन, संगीत, नाटक पहाणे व क्रिकेट.

प्रदेश प्रवास : इटली, स्वित्झर्लँड, बेल्झियम, फ्रान्स, इंग्लंड व नेदरलँड इत्यादी युरोपीयन देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : मु. पो. तरडगाव, तालुका फलटण,
जिल्हा - सातारा ४१५५२८.
मोबाईल :- ९९२१४५३२०१/९७६६०७५५०
दुरध्वनी :- निवास - (०२१६६) २४३४४३.
ई-मेल - chavandeep77@gmail.com

निवडणूक निकाल

[२५५-फलटण (अनुसूचित जाती)]

एकूण मतदार	३,३२,६७३
एकूण वैध मतदान	२,१५,६०४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दिपक प्रल्हाद चव्हाण**	१,१७,६१७ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री.दिगंबर आगवणे	८६,६३६ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. अरविंद आढाव	५,४६० (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,७१७
(५) श्री.प्रदिप ऊर्फ प्रेम मोरे	९३४ (बहुजन समाज पार्टी)

चव्हाण, श्री. पृथ्वीराज दाजीसाहेब

जन्म : १७ मार्च, १९४६.

जन्म ठिकाण : इंदौर (मध्यप्रदेश).

शिक्षण : बी.ई.(ऑनर्स), एम्.एस्. (बी.आय.टी.एस., पिलानी) राजस्थान आणि युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कले (यु.एस.ए.).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सत्वशीला.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २६०- कराड दक्षिण, जिल्हा-सातारा

इतर माहिती : सन १९९१, १९९६ व १९९८ सदस्य, लोकसभा; विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाची इलेक्ट्रॉनिक, अणु उर्जा सल्लागार समिती; १९९२-९३ सदस्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि वन समिती; १९९४-९६ सदस्य, वित्त आणि नियोजन, ग्रामीण आणि नागरी विकास स्थायी समिती; १९९८-२००० सदस्य, सार्वजनिक उपक्रम समिती; १९९६-१९९९ सदस्य, संगणक तरतुद समिती; १९९८-१९९९ सदस्य, गृह मंत्रालय सल्लागार समिती; २०००-२००१ सदस्य, वित्त मंत्रालय सल्लागार समिती; २००४ सदस्य, संरक्षण मंत्रालय सल्लागार समिती; सदस्य, दुय्यम

विधिविधान, विशेष आमंत्रित, कामकाज सल्लागार समिती; १९९६-९७ सदस्य, अकराव्या लोकसभेचे उप मुख्य प्रतोद, लोकसभा काँग्रेस संसदीय पक्षाचे सदस्य; सदस्य, वित्त मंत्रालयाची सल्लागार समिती; १९९६-९८ काँग्रेस संसदीय पक्षाचे सचिव; १९९६-१९९७ व १९९८-२००० सदस्य, लोक लेखा समिती; २०००-२००१ प्रवक्ता, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष; १९९६ सदस्य, आत्मचिंतन अँन्थनी समिती; २००७ ते २०१० सदस्य, २००७ ते २०१० सरचिटणीस, अखिल भारतीय काँग्रेस पक्ष (आय); गुजरात, कर्नाटक, जम्मु-काश्मिर, हरियाणा, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, मणीपूर व सिक्कीम इत्यादी राज्यांचे प्रभारी; १९९१-१९९६, १९९६-१९९८ व १९९८-१९९९, २००२-२००८, २००८-२०१० सदस्य, राज्यसभा; पर्सोनेल, पब्लिक ग्रेव्हिएन्स आणि पेन्शन (अतिरिक्त कार्यभार); २००४-२००९ व २८ मे, २००९ ते नोव्हेंबर २०१० पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री, तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान (स्वतंत्र कार्यभार), भू-विज्ञान, पर्सोनेल, पब्लिक ग्रेव्हिएन्स आणि पेन्शन तसेच संसदीय कार्य मंत्रालयाचे राज्यमंत्री; हरियाणा आणि जम्मू काश्मिर राज्याचे प्रभारी; २०११-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; ११ नोव्हेंबर, २०१० ते २६ सप्टेंबर, २०१४ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, फ्रान्स, जपान, इंग्लंड, अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश, तैवान, जर्मनी, ऑस्ट्रीया, इजिप्त, बहर्रीन, टर्की, श्रीलंका, नेपाळ, ओमान, चीन, हाँगकाँग, आयर्लंड, इंडोनेशिया, इटली, मलेशिया, नेदरलँड, नॉर्वे, पनामा, पोर्तुगाल, सिंगापूर, दक्षिण-अफ्रिका, स्वित्झर्लँड, ताजिकिस्तान, थायलंड व कोलंबिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन,क्रिकेट, टेनिस, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दिबळ व गोल्फ.

पत्ता : २४३-डी-७, पाटण कॉलनी, शनिवार पेठ,

कराड, जिल्हा सातारा - ४१५११०.
मोबाईल - ९००४६९९९९९.
दूरध्वनी - निवास - (०२१६४) २२०२२२, २२०२२४.
ई-मेल - pcofficemumbai@gmail.com

निवडणूक निकाल	
(२६०- कराड-दक्षिण)	
एकूण मतदार	२,९२,५२५
एकूण वैध मतदान	२,१०,२२४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण**	९२,२९६ [भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस]
(२) डॉ.अतुलबाबा सुरेश भोसले	८३,१६६ (भारतीय जनता पक्ष)
(३) ॲड उदयसिंह पाटील(उंडाळकर)	२९,४०१ (अपक्ष)
(४) श्री.आनंद रमेश थोरावडे	१,०५५ (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री.आनंदराव लांडे	९३४ (अपक्ष)

चव्हाण, श्री.मंगेश रमेश

जन्म : २३ ऑगस्ट, १९८३.

जन्म ठिकाण : वाकडी, तालुका-चाळीसगांव, जिल्हा-जळगांव.

शिक्षण : एच.एस.सी. (सायन्स).

ज्ञात भाषा : मराठी,हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती प्रतिभा.

अपत्ये : एकुण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १७-चाळीसगांव, जिल्हा-जळगांव.

इतर माहिती : ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : शिवनेरी, ग्रामपंचायत शेजारी,खरजई रोड, टाकळी प्र.चा. चाळीसगांव, जिल्हा जळगांव ४२४१०१.
दूरध्वनी :- निवास- (०२५८९) २२५५४४, २२४४४४.
कार्यालय :- (०२५८९) २२५५५५.
मोबाईल :- ९६२३५५५५४४ / ७७६८८८८८८८.
ई-मेल :- mangeshrameshchava777@gmail.com

निवडणूक निकाल (१७ - चाळीसगांव)	
एकूण मतदार	३,४५,६६०
एकूण वैध मतदान	२,१७,९५३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. मंगेश रमेश चव्हाण**	८६,५१५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. राजीव देशमुख	८२,२२८ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. मोरसिंग राठोड	३८,४२९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) डॉ. विनोद कोटकर	४,६१७ (अपक्ष)
(५) नोटा	१,६७७

चव्हाण, श्री. रविंद्र दत्तात्रय

जन्म : २० सप्टेंबर, १९७०.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : एस.वाय.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुहासी.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : बांधकाम.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १४३-डोंबिवली, जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : २००५ नगरसेवक, २००६ सदस्य व २००७ सभापती, स्थायी समिती, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका; २००५ अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, कल्याण; संस्थापक, डोंबिवली रिक्षा चालक-मालक संघटना, या संस्थेद्वारे ३६०० रिक्षा चालकांची विमा पॉलिसी काढली; बीएस्.यु.पी. या प्रकल्पांतर्गत ८२५० गरीब झोपडपट्टीधारकांना मोफत घरे योजना राबविली; शहरात एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून अनेक योजना कार्यक्षमपणे राबवून जनतेला लाभ मिळवून दिला; कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्या हितासाठी विविध योजना राबविल्या; गरीब विद्यार्थ्यांसाठी मोठी पुस्तक पेढी व शालोपयोगी वस्तूंचे वाटप; खेळाडूंना प्रोत्साहन, डोंबिवली परिसरातील अनेक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांना सर्वतोपरी

सहकार्य; कल्याण महानगरपालिकेत घरेलू कामगार संघटनेची स्थापना करुन त्यांचे न्याय हक्कासाठी लढा दिला; संस्थापक, कल्याण म.न.पा. भारतीय जनता मनपा जनरल कामगार युनियन; डोंबिवली एक सांस्कृतिक परिवार मासिकचे संपादक; आपुलकी हेल्पलाईन सुरु करुन अनेक स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न; "नवउदघोष" साप्ताहिकाचे संपादक म्हणून कार्य केले; ज्येष्ठ नागरिकांसाठी रुग्णवाहिका, रक्तदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन; टेबल टेनिस, बुध्दीबळ व कबड्डी स्पर्धांचे आयोजन; डोंबिवलीच्या सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्नरत; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ८ जुलै,२०१६ ते ९ नोव्हेंबर, २०१९ बंदरे, माहिती तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, वैद्यकीय शिक्षण खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : श्रीराम जलाराम, आशिष नेहरु रोड, गोल्फ, लिंक, पलावा, निलजे, डोंबिवली (पूर्व), जिल्हा-ठाणे.मोबाईल ९८१९५०३९९९.
ई- मेल : ravcindrachavan.mla@gmial.com

निवडणूक निकाल

(१४३-डोंबिवली)

एकूण मतदार	३,५६,०८२
एकूण वैध मतदान	१,४५,३३२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रविंद्र दत्तात्रय चव्हाण**	८६,२२७ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. मंदार हलबे	४४,९१६ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(३) श्रीमती राधिका गुप्ते (केतकर)	६,६१३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) नोटा	४,१३४
(५) श्री. दामोदर काकडे	२,३११ (बहुजन समाजवादी पक्ष)

चौघुले, श्री. महेश प्रभाकर

जन्म : १७ मार्च, १९७४.

जन्म ठिकाण : भिवंडी, जिल्हा-ठाणे.

शिक्षण : अकरावी. (कला).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मेघना.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : उद्योग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १३६-भिवंडी (पश्चिम), जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : सदस्य, नागरिक सहकारी बँक, भिवंडी; अध्यक्ष, स्वाभीमान नागरी सहकारी पतसंस्था, भिवंडी; अध्यक्ष, भिवंडी शहर भारतीय जनता पक्ष; नगरसेवक, भिवंडी - निजामपुर महानगरपालिका; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : बँकॉकचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन.

पत्ता : २८५, गौरीपाडा, भिवंडी, जिल्हा ठाणे.

मोबाईल - ९८२३५०५०००, ९०२९९३५०००.

ई-मेल - mlamaheshchaughule@gmail.com

निवडणूक निकाल

(१३६-भिवंडी-पश्चिम)

एकूण मतदार	२,७५,८५५
एकूण वैध मतदान	१,३८,८६६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. महेश प्रभाकर चौघुले**	५८,८५७ [भारतीय जनता पक्ष]
(२) खालिद (गुड्डु)	४३,९४५ (अपक्ष)
(३) सोहेब खान	२८,३५९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. नागेश मुकादम	२,६०० (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) श्री. सुहास बोंडे	२,१७१ (वंचित बहुजन आघाडी)

चौगुले, श्री. ज्ञानराज धोंडीराम

जन्म : ५ जानेवारी, १९७०.

जन्म ठिकाण : उमरगा, जिल्हा-उस्मानाबाद.

शिक्षण : एम.ए.(हिंदी).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती ज्योती.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : नोकरी.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २४०-उमरगा, (अनुसूचित जाती), जिल्हा-उस्मानाबाद.

इतर माहिती : २००९ पासून अध्यक्ष, ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, उमरगा; १९९९-२००४ सदस्य, श्री. छत्रपती शिवाजी सेवकांची सहकारी पत संस्था; २०१४ सिनेट सदस्य, डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; विभागीय सदस्य, महाराष्ट्र राज्य महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना; मराठवाडा विभाग; १९९६ - २००१ व २००१ ते २००६ नगरसेवक, नगरपरिषद, उमरगा; २००२-२००३ सभापती, पाणी पुरवठा समिती; उमरगा येथील शिवसेना पक्षाचे, कार्यालय प्रमुख व निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून कार्य; भूकंपग्रस्तांना मदत कार्य; शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व; जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्न; रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीरांचे

आयोजन, गणेशोत्सव शिवजयंती निमित्त समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, विधिमंडळाच्या अनुसूचित जाती समितीचे सदस्य, विधानसभेतील तसेच मतदार संघातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन २०१३ च्या "प्रथम प्रेरणा" "उत्कृष्ट लोकप्रतिनिधी" पुरस्काराने सन्मानीत; सन २०१८ मराठवाडा मित्रमंडळ, पुणे यांच्या वतीने "मराठवाडा भूषण" पुरस्काराने सन्मानीत; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेर निवड.

परदेश प्रवास : चीन, श्रीलंका व दुबई इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, संगीत व प्रवास.

पत्ता : (१) घर क्र. १०१/१, गिरीजा निवास, गौतम नगर, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मनाबाद ४१३६०६.
दूरध्वनी :- निवास - (०२४७५) २५२७१६.
कार्यालय - (०२४७५) २५०४४४.
मोबाईल - ९४२२०६९९४३, ७०२०२५९९३३.
ई-मेल - dnyanrajchougule@gmail.com

निवडणूक निकाल

(२४०-उमरगा (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,९७,८२९
एकूण वैध मतदान	१,६९,२६२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. ज्ञानराज धोंडीराम चौगुले**	८६,७७३ [शिवसेना]
(२) श्री. दत्तू भालेराव	६१,१८७ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. जालिंदर कोकणे	७,८३५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. रमाकांत गायकवाड	७,४७६ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,४२५

चौधरी, श्री. अजय विनायक

जन्म : ५ जुलै, १९५३.

जन्म ठिकाण : परळ, जिल्हा-मुंबई.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नयना.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : उद्योग.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १८३-शिवडी, जिल्हा-मुंबई.

इतर माहिती : अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, मुंबई; मुख्य विश्वस्त, स्व.नयना अजय चौधरी स्तनकर्क संभवता निवारण संस्था; अध्यक्ष, ज्येष्ठ शिवसैनिक आरोग्य सेवा संस्था; २०११-२०१५ अध्यक्ष, स्व.विनायक चौधरी स्मृती मोफत संगणक प्रशिक्षण केंद्र; २५ वर्षे अध्यक्ष, परळगाव नागरिक सेवा समिती; सात वर्षे विश्वस्त, क्षात्रैक्य वनमाळी सभागृह; २५ वर्षे अध्यक्ष, शिवजयंती उत्सव मंडळ, परळ; १९७२-९२ परळ उपशाखा प्रमुख, १९९५-१९९९ उपविभाग प्रमुख, २००० ते २०१४ शिवसेना दक्षिण-मध्य मुंबई विभाग प्रमुख; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य,

लोकलेखा समिती; सदस्य, धर्मादाय रुग्णालय तदर्थ समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, भ्रमंती, क्रिकेट व कबड्डी.

पत्ता : ६४/अ, विनायक बंगला, ना.ल. परळकर मार्ग, परळगांव, मुंबई - ४०००१२.
दूरध्वनी : निवास - (०२२) २४१२२३५४.
कार्यालय - (०२२) २४१६९५५४.
मोबाईल - ९८२०५१०१७१.
ई-मेल - ajaychoudhari.shivsena@gmail.com

निवडणूक निकाल

(१८३-शिवडी)

एकूण मतदार	२,७४,९८९
एकूण वैध मतदान	१,३५,६६१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अजय विनायक चौधरी**	७७,६८७ [शिवसेना]
(२) श्री. संतोष नलावडे	३८,३५० (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(३) श्री. उदय फणसेकर	१३,३६८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) नोटा	४,३०८
(५) श्री. मदन खळे	१,९४८ (बहुजन समाज पार्टी)

चौधरी, श्रीमती मनिषा अशोक

जन्म : १८ जून, १९६१.

जन्म ठिकाण : घोलवड, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर.

शिक्षण : बी.एस्सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती अशोक पुरुषोत्तम चौधरी.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : उद्योग व शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १५३-दहिसर, जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : अध्यक्षा, वनवासी कल्याण केंद्र, तलासरी ; सन २००२-२००६ संचालिका, ठाणे ग्रामीण बँक लि.; विश्वस्त, सावित्रीबाई फुले प्रबोधिनी; सन १९८७ सदस्या, सन १९९१ उपाध्यक्षा, सन १९९४ अध्यक्षा, डहाणू शहर भारतीय जनता पक्ष; १९९७ सेक्रेटरी, ठाणे विभाग, भाजप; २००२-२००५ अध्यक्षा, ठाणे जिल्हा, भारतीय जनता पक्ष, २००६-२००९ अध्यक्षा, महिला मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००९-२०१३ उपाध्यक्षा, महाराष्ट्र प्रदेश भाजपा; २००९ पासून सदस्या, राष्ट्रीय कार्यकारिणी, भारतीय जनता पक्ष; १९९७-२००७ नगरसेविका,

१९९८-२००१ नगराध्यक्षा, नगरपालिका, डहाणू; २००९-२०१४ नगरसेविका व २०१३-२०१४ अध्यक्षा, आर विभाग प्रभाग समिती, मुंबई महानगरपालिका; सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल २००२ मध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचा "आदर्श उद्योजक महिला पुरस्कार", सन २००३ "राष्ट्रीय एकता पुरस्कार", २००४ रोटरी क्लबतर्फे डहाणू शहर विकासाबद्दल आदर्श समाजसेविका पुरस्कार, सखी फिटनेस महिला विकास ट्रस्टतर्फे उत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार, मागासवर्गीय समाज सेवा संघातर्फे अण्णाभाऊ साठे पुरस्कार; मशाल विकलीतर्फे "ठाणे जिल्हा भूषण पुरस्कार" भारती निर्माण लोक माहिती संस्थेच्या तर्फे "उत्कृष्ट राजकीय नेता" पुरस्कार, शिवमुद्रा प्रतिष्ठान, मुंबई तर्फे "उत्कृष्ट महिला उद्योजक" पुरस्काराने सन्मानित, २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१७ समिती प्रमुख, महिला व बालहक्क विकास समिती; सदस्या, शक्ती कायदा संयुक्त समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : जपान, चीन, हाँगकाँग व दुबई इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन.

पत्ता : (१) अ-२३, रुस्तमबाग, इराणी रोड, डहाणू रोड, तालुका डहाणू, जिल्हा पालघर- ४०१६०२.

(२) ६०२, गुरुविहार, सेंट रॉक ज्युनिअर कॉलेज जवळ,
डि.ए. म्हात्रे रोड, एक्सर,
बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०००९२.
दूरध्वनी : कार्यालय - (०२२) २८९००६०२.
मोबाईल : ९३२०१२३४१३.
ई-मेल : mlamanisha18@gmail.com

निवडणूक निकाल

(१५३-दहिसर)

एकूण मतदार	२,५५,२९७
एकूण वैध मतदान	१,३५,०५४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती मनिषा अशोक चौधरी**	८७,६०७ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अरुण सावंत	२३,६९० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. राजेश येरुणकर	१७,०५२ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) नोटा	४,२२२
(५) ॲड हर्षदाताई चौकेकर	१,०१५ (बहुजन समाज पार्टी)

चौधरी, श्री. शिरीष मधुकरराव

जन्म : २३ मे,१९५९.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : एम.एस्सी. (ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अरुणा.

अपत्ये : एकण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ११, रावेर, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : आजोबा थोर स्वातंत्र्य सेनानी धनाजी नाना चौधरी व वडिल महाराष्ट्राचे माजी मंत्री व विधानसभेचे माजी अध्यक्ष मधुकरारव चौधरी यांच्याकडून सामाजिक व राजकीय वारसा लाभल्यामुळे राजकारण व सामाजिक कार्यात सक्रीय सहभाग; संचालक व कार्यकारी मंडळाचे सचिव, धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी, जळगाव; संस्थापक- चेअरमन, धनंजय ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, खिरोदा; सदस्य, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्यवस्थापन परिषद; महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या स्पंदन या युवा महोत्सवाचे जळगाव येथे आयोजन; आदिवासी गोरगरीब

गरजु रूग्णांना मदत; सामाजिक कार्याबद्दल "माधवराव शिंदे" पुरस्काराने सन्मानित; सन २००३-२००८ संचालक, मधुकर सहकारी साखर कारखाना लि. फैजपुर; सन १९९०-९५ सदस्य, महाराष्ट्र राज्य पर्यटन सल्लागार समिती; १९९६-१९९९ उपाध्यक्ष, जळगाव जिल्हा युवक काँग्रेस; १९९३-१९९५ रावेर तालुका प्रतिनिधी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस; १९९९-२००६ प्रदेश प्रतिनिधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००८-२०१९ प्रदेश प्रतिनिधी, रावेर तालुका, २०१७-२०१९ प्रदेश सरचिटणीस, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस; २०१८-२०१९ सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी; २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व लेखन

परदेश प्रवास : इस्त्राईल, नेदरलँड, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रीया, इंग्लंड, अमेरिका ग्रीस, व स्विर्त्झलँड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : कायमचा पत्ताः- (१) "सरस्वती" मु.पो.खिरोदा यावल. तालुका - रावेर, जिल्हा – जळगाव - ४२५५०४.

(२) शेल्टन को.ऑप.हौ.सो.लि., प्लॅट नं २०२, नेहरु नगर, वाकोला ब्रीज, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ४०००५५.
मोबाईल : ९३७११९३३१९.
दूरध्वनी :- निवास- (०२५८४)२८४२३०.
कार्यालय- (०२५८४) २८४३००.
ई-मेल :- shirishdadachaudhari59@gmail.com.

निवडणूक निकाल

(११- रावेर)

एकूण मतदार	२,९३,३८२
एकूण वैध मतदान	२,०३,३९६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. शिरीष मधुकरराव चौधरी**	७७,९४१ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. हरिभाऊ जावळे	६२,३३२ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. अनिल चौधरी	४४,८४१ (अपक्ष)
(४) श्री. हाजी सय्यद कमरुद्दीन	६,७०७ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. विवेक ठाकरे	३,५४५ (ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन)

जगताप, श्री. लक्ष्मण पांडुरंग

जन्म : १५ फेब्रुवारी, १९६३.

जन्म ठिकाण : पिंपळे-गुरव, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अश्विनी.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व बांधकाम व्यवसायिक.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २०५-चिंचवड, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : संस्थापक-अध्यक्ष, प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च; संस्थापक-अध्यक्ष, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स; संस्थापक-अध्यक्ष, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स; संस्थापक-अध्यक्ष, दि न्यू मिलिनियम इंग्लिश स्कुल, नवी सांगवी; सदस्य, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ; संस्थापक, पुणे व वेणुताई शिशु मंदिर, पिंपळे गुरव, पुणे; कार्याध्यक्ष, पिंपरी चिंचवड सोशल क्लब; सदस्य, गणेश फेस्टिव्हल पिंपरी-चिंचवड; संस्थापक-अध्यक्ष, भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्था, चंद्रभागा नागरी सहकारी पतसंस्था व विनायक नागरी सहकारी पतसंस्था, पिंपळे गुरव; अध्यक्ष, गणेश सहकारी बँक, नवी सांगवी; २००२ अध्यक्ष, शहर राष्ट्रवादी

काँग्रेस पक्ष; २०१५-२०२० अध्यक्ष, पिंपरी चिंचवड, भारतीय जनता पक्ष; १९८६-२००६ नगरसेवक व अध्यक्ष, स्थायी समिती, सन २००० मध्ये महापौर, महानगरपालिका पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध प्रकारची विकास कामे तसेच एक खिडकी योजनेमार्फत नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न; सदस्य, महाराष्ट्र महिला परिषद, पुणे; सांगवी येथे पवनाथडी यात्रेचे आयोजन; किर्तन व प्रवचन यासारख्या समाज प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन; प्रतिवर्षी दिवाळी पहाट कार्यक्रमांचे आयोजन; सन २०१२ मध्ये वामनराव पै यांचा लहानपण देगा कार्यक्रमाचे आयोजन; श्री. श्री. रविशंकर यांचे प्राणायम व ध्यानधारना शिबीराचे आयोजन; सामुहिक विवाह, रोजगार मेळाव्याचे आयोजन; कुस्ती स्पर्धेचे आयोजन; आदर्श शिक्षक पुरस्कारांचे आयोजन; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अनुसूचित जाती कल्याण समिती, आश्वासन समिती, लोकलेखा समिती व भटक्या विमुक्त जाती कल्याण समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड, दुबई, चीन, मलेशिया, जपान, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, न्युझिलँड इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : शेती, वाचन व खेळ.

पत्ता : (१) "चंद्ररंग" पिंपळे गुरव, बस स्टॉप समोर, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१.

(२) जगताप पाटील कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१.

दूरध्वनी : निवास - (०२०) २७२८५२००.

कार्यालय - (०२०) २७२८१९९२.

मोबाईल - ९८२२०५९४५९.

ई-मेल - jagtaplaxman1@gmail.com.

संकेत स्थळ - www.laxmanjagtap.co.in/ com.

निवडणूक निकाल

(२०५-चिंचवड)

एकूण मतदार	५,१८,४८०
एकूण वैध मतदान	२,८७,२३१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. लक्ष्मण पांडुरंग जगताप**	१,५०,७२३ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. राहुल कलाटे	१,१२,२२५ (अपक्ष)
(३) नोटा	५,८७४
(४) श्री. राजेंद्र लोंढे	३,९५४ (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री. रविंद्र पारधे	१,४७५ (अपक्ष)

जगताप, श्री. संग्राम अरुणकाका

जन्म : १२ जून, १९८५.

जन्म ठिकाण : अहमदनगर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व मारवाडी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शितल

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २२५-अहमदनगर शहर, जिल्हा-अहमदनगर.

इतर माहिती : प्रेरणा प्रतिष्ठानच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबीर, वृक्षारोपण, दहिहंडी, गणेशोत्सव कार्यक्रमांचे आयोजन; गरीब व गरजू विद्यार्थांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप; विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन; राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अहमदनगर शहर-जिल्हाध्यक्ष; अहमदनगर छावणी परिषदेचे उपाध्यक्ष; (२००९-२०१५) सदस्य, तसेच २००९-२०११ व २०१४-२०१५, महापौर, महानगरपालिका, अहमदनगर; या काळात अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ पूर्ण केली; अद्ययावत सोयींनीयुक्त नाट्यगृह उभे केले; अहमदनगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष

प्रयत्न; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, उपविधान समिती; ऑक्टोबर, २०१९ महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व लेखन

पत्ता : (१) 'बलवात्सल्स' भवानीनगर, मार्केट यार्ड मार्ग, अहमदनगर.

(२) गुणे आयुर्वेद, महाविद्यालय, विश्रामबाग,टिळक रोड, अहमदनगर.
दूरध्वनी : निवास- (०२४१) २४१९५०१.
कार्यालय - (०२४१) ६४५२२२२.
मोबाईल - ९७३००३२२२२.
ई-मेल - sangramjagtap1515@gmail.com

निवडणूक निकाल

(२२५-अहमदनगर शहर)

एकूण मतदार	२,८९,६२९
एकूण वैध मतदान	१,७०,१५१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. संग्राम अरुणकाका जगताप**	८१,२१७ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. अनिल राठोड	७०,०७८ (शिवसेना)
(३) श्री. आसिफ सुल्तान	६,८६९ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(४) श्री. श्रीपाद छिंदम	२,९२३ (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री. किरण काळे	२,८८१ (वंचित बहुजन आघाडी)

जगताप, श्री. संजय चंदूकाका

जन्म : १५ जानेवारी, १९७६

जन्म ठिकाण : सासवड, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे.

शिक्षण : बी.कॉम, एम.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती राजवर्धिनी .

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २०२-पुरंदर, जिल्हा पुणे.

इतर माहिती : अध्यक्ष, शिवस्मृती प्रतिष्ठान, सासवड; अध्यक्ष, सासवड सांस्कृतिक मंडळ; सचिव, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ; १९९७ पासून चेअरमन, संत सोपान काका सहकारी बँक लि. सासवड; मार्च, २०२० पासून संचालक, पुणे जिल्हा माध्यवर्ती सहकारी बँक लि.; व्यवस्थापकीय संचालक, पुरंदर मिल्क ॲन्ड ॲग्रो. लि.; सन २०१६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी; ऑक्टेबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : लेखन, वाचन, क्रिकेट, बुध्दिबळ व पोहणे.

परदेश प्रवास : नेदरलॅन्ड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लॅंड, इंग्लंड, सिंगापूर, मलेशिया, अमेरिका, अरब अमिराती, थायलंड, हाँगकाँग, चायना, माचु, स्पेन, हेंगती इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : साईकृपा हौसिगं सोसायटी, सोपाननगर, सासवड, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे ४१२३०९.

दूरध्वनी :- निवास- (०२११५) २२४४५६.
कार्यालय :- (०२११५) २२२५०३.
मोबाईल :- ९८२२९७७७७७.
ई-मेल :-officesanjayjagtap@gmail.com

निवडणूक निकाल

(२०२ - पुरंदर)

एकूण मतदार	३,६२,१५०
एकूण वैध मतदान	२,३८,०६१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. संजय चंदूकाका जगताप**	१,३०,७१० [भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस]
(२) श्री. विजयबापू शिवतारे	९९,३०६ (शिवसेना)
(३) श्री. अतुल नागरे	२,९४३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,८०८
(५) श्री. किरण सोनावणे	९९७ (बहुजन समाज पार्टी)

जाधव, श्री. भास्कर भाऊराव

जन्म : १ ऑगस्ट, १९५७.

जन्म ठिकाण : तोंडली-पिलवली, तालुका-चिपळूण, जिल्हा-रत्नागिरी.

शिक्षण : अकरावी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुवर्णा.

अपत्ये : एकूण ४ (दोन मुलगे व दोन मुली).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २६४-गुहागर, जिल्हा-रत्नागिरी.

इतर माहिती : अध्यक्ष, शिवाई प्रतिष्ठान; सदस्य, रोटरी क्लब; १९८६ पासून विद्यार्थ्यांसाठी "प्रबोधनकार ठाकरे शालांत परीक्षा मार्गदर्शन व्याख्यानमाला" व व्यवसाय मार्गदर्शन शिबींराचे आयोजन; विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा व अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी सतत प्रयत्नशील; गोरगरीबांना, दुर्बलांना सहाय्य; चिपळूण येथे इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली, रोजगार मेळाव्यांचे आयोजन; सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त विविध स्पर्धाचे आयोजन; १९९३ राष्ट्रीय महामार्गाच्या (क्रमांक १७) दुरुस्तीसाठी आंदोलनाचे नेतृत्व; कोकणातील पर्यटन

विकासासाठी प्रयत्न, मच्छिमारांसाठी कल्याणकारी बोर्ड स्थापन केले, कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य व विज्ञान विद्यापीठ व्हावे तसेच स्वतंत्र शैक्षणिक विद्यापीठ व्हावे यासाठी सतत प्रयत्नरत; सदस्य, पंचायत समिती चिपळूण; १९९२-९५ सदस्य व विरोधी पक्ष नेते, जिल्हा परिषद, रत्नागिरी; सदस्य, ग्राहक वस्तू भांडार, चिपळूण; सल्लागार, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था; चिपळूण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न; चिपळुणमधील पूरग्रस्तांना मदत कार्य; १९८२ पासून शिवसेनेचे कार्य; १९८६ शिवसेना विभाग प्रमुख, सावर्डे; १९८८ शिवसेना चिपळूण तालुका प्रमुख; १९८९ अध्यक्ष, एस. टी. कामगार सेना, चिपळूण; १९९० चिटणीस, भारतीय कामगार सेना, कोकण विभाग; २००५-२०१९ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २००५-२०१३ सरचिटणीस व २०१३ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१५ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गोवा राज्याचे प्रभारी; सप्टेंबर, २०१९ पासून शिवसेना पक्षाचे कार्य; २००६-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९७-९८ समिती प्रमुख, सार्वजनिक उपक्रम समिती; सन १९९९-२००० या वर्षाचा राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेचा "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; नोव्हेंबर, २००९ ते जून, २०१३ नगरविकास, वने, बंदरे, खारजमिनी, संसदीय कार्य, क्रीडा व युवक कल्याण आणि माजी सैनिकांचे कल्याण, विधी व न्याय, मत्स्यव्यवसाय खात्याचे राज्यमंत्री तसेच रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री; २७ जून, २०१४ ते २६ सप्टेंबर, २०१४ कामगार व विशेष सहाय्य खात्याचे मंत्री. ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, रशिया, युरोप, दुबई, स्वित्झर्लॅंड, ऑस्ट्रीया, जर्मनी, बेल्जियम, नेदरलॅण्ड, इटली व बँकॉक इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, प्रवास, शेती, भजन, कबड्डी व भाषणे ऐकणे व ऐतिहासिक कथा वाचन.

पत्ता : "सुवर्ण भास्कर", पाग- जोशी आळी, चिपळूण, जिल्हा- रत्नागिरी-४१५६०५.

दूरध्वनी : निवास - (०२३५५) २५३२७१.
कार्यालय - (०२३५५) २५२७२९.
मोबाईल - ९४२२४२९९११.
ई-मेल - bhaskarjadhav07@gmail.com

निवडणूक निकाल (२६४-गुहागर)	
एकूण मतदार	२,४०,३८६
एकूण वैध मतदान	१,४२,७०८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. भास्कर भाऊराव जाधव**	७८,७४८ [शिवसेना]
(२) श्री.सहदेव बेटकर	५२,२९७ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री.विकास जाधव	५,०६९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री.गणेश कदम	२,५२४ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	२,०६१

जाधव (पाटील), श्री. मकरंद लक्ष्मणराव

जन्म : २९ ऑक्टोबर, १९६६.

जन्म ठिकाण : करंदी, तालुका-भोर, जिल्हा-पुणे.

शिक्षण : डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरिंग.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अर्चना.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २५६-वाई, जिल्हा-सातारा.

इतर माहिती : सरपंच, ग्रामपंचायत, बोपेगाव; संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये सहभाग; संत तुकडोजी ग्राम स्वच्छता स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळवून दिले; सदस्य, सातारा जिल्हा परिषद; समाज मंदिर, नळ पाणी पुरवठा, रस्ते, व्यायामशाळा, पाझर तलाव, वाईनगर पालिका क्षेत्रासाठी तिर्थक्षेत्र योजनेंतर्गत प्रशासकीय इमारत, नाट्यगृह व यात्री निवास तसेच जलतरण तलाव यासारखी पायाभूत सुविधांची कामे केली; सन २००३ मधील वाई दंगलीत जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न; मांढरदेवी यात्रा दुर्घटनेतील व्यक्तींना

मदत कार्य; पंढरपूर येथे वाई भागातील वारकऱ्यांसाठी स्वखर्चातून सुसज्ज भक्ती निवास बांधले; प्रतिक थियटर्स, वाईच्या माध्यमातून राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन; अध्यक्ष, वाई तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

पत्ता : विकासनगर, संगम नगर, सातारा, जिल्हा सातारा.

दूरध्वनी :- निवास - (०२१६२) २४४१२५.
कार्यालय - (०२१६२) २४४२४५.
मोबाईल - ९८२२०७७००७.
ई-मेल - makrand.jadhavpatil@rediffmail.com

निवडणूक निकाल

(२५६-वाई)

एकूण मतदार		३,३२,४९८
एकूण वैध मतदान		२,२७,८८३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. मकरंद लक्ष्मणराव जाधव(पाटील)**	१,३०,४८६ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२)	श्री.मदन भोसले	८६,८३९ (भारतीय जनता पक्ष)
(३)	श्री.रामदास महनवर	३,५०० (वंचित बहुजन आघाडी)
(४)	श्री.दिपक काकडे	१,७६१ (बहुजन समाज पार्टी)
(५)	श्री.धनराज कांबळे	१,६८५ (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष)

जाधव, श्रीमती यामिनी यशवंत

जन्म : २१ जुलै, १९६७.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी,हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. यशवंत कमलाकर जाधव.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १८४ - भायखळा, जिल्हा-मुंबई शहर.

इतर माहिती : विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन; गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे वाटप; रुग्णांना मदत; आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन; रक्तदान शिबीराचे आयोजन; मोफत वाहन चालविणे प्रशिक्षण केंद्र सुरू केले, महिलांसाठी लघुउद्योग सुरु केले; सार्वजनिक ठिकाणी बाल संगोपन केंद्र सुरु केले; शिवसेना भायखळा उपविभाग संघटक; शिवसेना रत्नागिरी जिल्हा संपर्क प्रमुख; सन २०१२ ते २०१७ बृहन्मुंबई नगरसेविका, २०१२ ते २०१७ अध्यक्षा, बाजार व कल्याण समिती; २०१२-२०१७ सदस्या, शिक्षण समिती, मुंबई महानगरपालिका; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरीका, युरोप व दुबई इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, महिला समस्या निराकरण व त्यांच्या प्रगतीसाठी उपक्रम राबविणे, युवकांसाठी विविध खेळांचे आयोजन करणे.

पत्ता : ७१/ ७४ बिलाखडी चेंबर, सेंट मेरी मार्ग, माझगांव, मुंबई - ४०००१०.

दूरध्वनी :- निवास- (०२२) २३७१७८७८.
मोबाईल :- ९७६९९९४७४५.
ई-मेल :-yaminiyjadhav@gmail.com.

निवडणूक निकाल

(१८४ - भायखळा)

एकूण मतदार	२,४५,९२३
एकूण वैध मतदान	१,२४,७२३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती यामिनी यशवंत जाधव**	५१,३८० [शिवसेना]
(२) श्री. वारीस पठाण	३१,१५७ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(३) श्री. मधु चव्हाण	२४,१३९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्रीमती गीता गवळी	१०,४९३ (अखिल भारतीय सेना)
(५) नोटा	२,७९१

जैन, श्रीमती गीता भरत

जन्म : ५ जुलै, १९६४.

जन्म ठिकाण : अंधेरी, जिल्हा- मुंबई उपनगर.

शिक्षण : डी.एम.एल.टी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व मारवाडी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. भरत मिठालाल जैन.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : १४५ -मिरा-भाईंदर, जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : १५ वर्षे नगरसेविका, सन २०१५-२०१७ महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका; लोकमत समूह तर्फे "उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ती" पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : शांती निवास (मिठालाल जैन बंगला), नवीन गोल्डन नेस्ट,

फेज-१५, १०० फुट रोड, भाईदर-(पूर्व), जिल्हा- ठाणे-४०११०५.

दूरध्वनी :- कार्यालय :- (०२२)-२८१९८८८८.
मोबाईल :- ९८२०५०२२९९.
ई-मेल :- geetajainoffice@gmail.com.

निवडणूक निकाल (१४५ -मिरा-भाईदर)	
एकूण मतदार	४,३७,१७८
एकूण वैध मतदान	२,११,६३६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती गीता भरत जैन**	७९,५७५ [अपक्ष]
(२) श्री. नरेंद्र मेहता	६४,०४९ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. मुझफ्फर हुसैन	५५,९३९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. हरेश सुतार	३,९३६ (महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष)
(५) नोटा	२,६२३



जैस्वाल, ॲड. आशिष नंदकिशोर

जन्म : ३ एप्रिल, १९७१.

जन्म ठिकाण : काचुरवाडी, तालुका रामटेक, जिल्हा-नागपूर.

शिक्षण : एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पल्लवी.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : वकिली, शेती व लघुउद्योग.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : ५९- रामटेक, जिल्हा-नागपूर.

इतर माहिती : शालेय जीवनापासून सामाजिक कार्यास सुरूवात; काचुरवाडी येथे माध्यमिक शाळा सुरू केली; रामटेक येथे कला महाविद्यालय सुरू केले; अनेक शैक्षणिक संस्थांना मान्यतेसाठी सहकार्य; विविध सांस्कृतिक कार्याचे आयोजन; पर्यटन स्थळांच्या विकासासाठी सतत प्रयत्नरत; उप जिल्हा प्रमुख, शिवसेना नागपूर जिल्हा; पूर्व विदर्भ प्रमुख, कायदा विभाग, शिवसेना; पक्षाच्या विविध आंदोलनात सक्रिय सहभाग; शेतकऱ्यांचे सिंचनाचे प्रश्न व सामन्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न; १९९७ सदस्य, जिल्हा परिषद, नागपूर; १९९९-२००४, २००४-२००९,

२००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; प्रतोद, शिवसेना, विधिमंडळ पक्ष; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : नेपाळचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, गायन, तीर्थक्षेत्रांना व पर्यटन-स्थळांना भेटी देणे व वृक्षारोपण.

पत्ता : (१) मु. पो. रामटेक, जिल्हा-नागपूर- ४४११०६.

दूरध्वनी (०७११४) २५५३३८.
(२) पत्रव्यवहाराचा पत्ता- राजाजी वार्ड,
रामटेक, जिल्हा-नागपूर.
(३) क-१३४, मनोरा आमदार निवास, मुंबई.
मोबाईल :- ९८८१७१३१३८.

निवडणूक निकाल

(५९- रामटेक)

एकूण मतदार	२,७८,६५४
एकूण वैध मतदान	१,८४,५३१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड आशिष नंदकिशोर जैस्वाल**	६७,४१९ [अपक्ष]
(२) श्री. द्वारम मल्लिकार्जुन रेड्डी	४३,००६ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. उदयसिंग यादव	३२,४९७ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. रमेश कारेमोरे	२४,७३५ (प्रहार जनशक्ती पार्टी)
(५) श्री. संजय साटयेकर	९,४६४ (बहुजन समाज पार्टी)

जैस्वाल, श्री. प्रदिप शिवनारायण

जन्म : ८ ऑक्टोबर, १९६०.

जन्म ठिकाण : औरंगाबाद.

शिक्षण : नववी.

ज्ञात भाषा : मराठी व हिंदी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सरोज.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १०७- औरंगाबाद मध्य, जिल्हा- औरंगाबाद.

इतर माहिती : औरंगाबाद शहरातील श्रीमंत छत्रपती पुरातन वस्तु संग्रहालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र व मौलाना आझाद रिसर्च सेंटर उभारणीत सहभाग; १९९८ व १९९५ सदस्य, १९८९ विरोधी पक्षनेता, १९९० महापौर व १९९५ स्थायी समिती अध्यक्ष, महानगरपालिका, औरंगाबाद; १९९६ सदस्य, (अकरावी) लोकसभा; २००९-२०१४, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अर्जेंटिना येथील महापौर परिषदेत उपस्थित.

छंद : वाचन व क्रिकेट पहाणे.

पत्ता : (१) ४१, शाकुंतल, न्यु समर्थनगर, औरंगाबाद, जिल्हा- औरंगाबाद.

(२) संपर्क कार्यालय, पावन गणेश मंदिरसमोर, नारळीबाग, औरंगाबाद, जिल्हा- औरंगाबाद.
दूरध्वनी : (०२४०) २३२१२५५, २३५६६९७ .
मोबाईल :- ९८२३००६३५७.

निवडणूक निकाल

(१०७ - औरंगाबाद - मध्य)

एकूण मतदार	३,२५,८३५
एकूण वैध मतदान	१,९४,५२०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल**	८२,२१७ [शिवसेना]
(२) श्री. नसिरुद्दीन सिध्दिकी	६८,३२५ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(३) श्री. अमित भुईगल	२७,३०२ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. अब्दुल सय्यद	७,२९० (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(५) श्रीमती किर्ती शिंदे	२,९८७ (अपक्ष)

जोरगेवार, श्री. किशोर गजानन

जन्म : १७ डिसेंबर, १९६८.

जन्म ठिकाण : चंद्रपुर.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिन्दी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कल्याणी.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : ७१-चंद्रपुर (अनुसुचित जाती), जिल्हा - चंद्रपुर.

इतर माहिती : सन २०१२ पासून अध्यक्ष, स्व.प्रभाताई जोरगेवार चॅरिटेबल ट्रस्ट; सन २०१९ अध्यक्ष, यंग चांदा ब्रिगेड सामाजिक संस्था; संचालक, कन्यका नागरी सहकारी बॅक लि.; महामंत्री, भारतीय जनता पक्ष; उपजिल्हा प्रमुख, शिवसेना; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : सामाजिक कार्य, नाट्य, चित्रपट व संगीत.

परदेश प्रवास : नेपाळ व भूतान देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : रामदेवबाबा मंदीरजवळ, कोतवाली वॉर्ड, चंद्रपुर, जिल्हा चंद्रपुर-४४२४०१.

दूरध्वनी :- निवास- ०७१७२-२५९०००.
कार्यालय :- ०७१७२-२५०८८८.
मोबाईल :- ९८२३१३४११८.
ई-मेल :-kishorjorgewar@gmail.com

निवडणूक निकाल

(७१ - चंद्रपुर (अनुसुचित जाती))

एकूण मतदार	३,९६,११७
एकूण वैध मतदान	२,०२,८४९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. किशोर गजानन जोरगेवार**	१,१७,५७० [अपक्ष]
(२) श्री. नानाजी शमकुळे	४४,९०९ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री.अनिरुद्ध बनकर	१५,४०३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. महेश मेंधे	१४,२८४ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(५) श्री. नामदेव गेडाम	३,९५६ (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक))

झनक, श्री. अमित सुभाषराव

जन्म : १९ मार्च, १९८५.

जन्म ठिकाण : मांगुळ-झनक, तालुका-रिसोड, जिल्हा-वाशिम.

शिक्षण : बी.ई. (इलेक्ट्रानिक्स ॲड पॉवर).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती प्रिती.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ३३-रिसोड, जिल्हा-वाशिम.

इतर माहिती : २०१३ पासून अध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, केनवड; सदस्य, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला; उपाध्यक्ष, वाशिम सुपरव्हिजन सहकारी संस्था; २०१४-२०१९ संचालक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; २०११-२०१३ उपाध्यक्ष, अकोला जिल्हा युवक काँग्रेस कमिटी; २०१३ पासून सरचिटणीस, अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी; २०१४ - २०१९ सदस्य, (पोट निवडणूक) महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायत राज समिती व सार्वजनिक उपक्रम समिती, ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व क्रिकेट.

पत्ता : (१) मु.पो. मांगुळ झनक, तालुका - रिसोड, जिल्हा - वाशिम.

मोबाईल - ९७६७२७८००७.

ई-मेल - ameetzanak@gmail.com

निवडणूक निकाल

(३३-रिसोड)

एकूण मतदार	३,०८,८७८
एकूण वैध मतदान	२,०५,४१७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अमित सुभाषराव झनक**	६९,८७५ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. अनंतराव देशमुख	६७,७३४ (अपक्ष)
(३) श्री. दिलीप जाधव	३४,४७५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. विश्वनाथ सानप	२३,०७५ (शिवसेना)
(५) नोटा	१,५३४

टिंगरे, श्री. सुनिल विजय

जन्म : ८ मे, १९७२.

जन्म ठिकाण : कासारवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे.

शिक्षण : डी.सी.ई. (डिप्लोमा इन सिव्हिल इंजिनिअरिंग)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मनीषा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : बांधकाम व्यावसायिक.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २०८-वडगाव-शेरी, जिल्हा पुणे.

इतर माहिती : सरस्वती प्राथमिक विद्यालय सुरू केले; इंदिरानगर येथील महानगरपालिकेच्या शाळांची इमारत बांधली; सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; बस डेपो, खेळांची मैदाने, सिनीयर सिटीझन पार्क, अभयारण्य सुरू केले; सन २००७-२०१२ व २०१२-२०१७ नगरसेवक व सदस्य, स्थायी समिती, पुणे महानगर पालिका; सन २०१९ मध्ये "मी पदवीधर" पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : समाजसेवा, संघटन,व आधुनिक तंत्राची माहिती घेणे.

परदेश प्रवास : चीन, स्कॉटलंड, इंग्लड व श्रीलंका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : स. नं ३३/२, प्लॉट नं. ८३ "विजय मंगल" बंगला, रोड नं.१४, टिगरे नगर, पुणे- ४११०३२.

दूरध्वनी :- निवास- (०२०) २७१७२२०२, २९५२११११.
मोबाईल :- ९८९०००६९९२, ९१५५७७७७७७, ९८९०००६९९१.
ई-मेल :- mlasuniltingre@gmail.com.

निवडणूक निकाल

(२०८-वडगाव-शेरी)

एकूण मतदार	४,५६,९९८
एकूण वैध मतदान	२,१४,६४२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल विजय टिंगरे**	९७,७०८ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. जगदीश मुळीक	९२,७५२ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. प्रविण गायकवाड	१०,३०० (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. डॅनियल लांडगे	७,७०२ (ऑल इंडिया मजलिस ए-इत्तेहादुल मुस्लिमीन)
(५) नोटा	२,४१८

टिळक, श्रीमती मुक्ता शैलेश

जन्म : १७ ऑगस्ट, १९६५.

जन्म ठिकाण : ग्वाल्हेर (मध्यप्रदेश).

शिक्षण : एम.ए.(मानसशास्त्र), डी.बी.एम.,डी.एम.एम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. शैलेश श्रीकांत टिळक.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २१५- कसबा पेठ, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : सन २०१२ पासून अध्यक्षा, आनंदवन मित्र मंडळ; सन २००७ पासून विश्वस्त, लोकमान्य टिळक विचार मंच; सन २०१५ पासून उपाध्यक्षा, इंटरनॅशनल लेप्रसी युनियन; कार्यकारिणी सदस्या, दृष्टी महिला विचारमंच; संस्थापिका, प्रेरणा महिला मंडळ; अध्यक्षा, पुणे शहर महिला आघाडी; कार्यकारिणी सदस्या, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा व कोषाध्यक्षा, महिला मोर्चा, भारतीय जनता पक्ष; लोकमान्य दैनंदिनीच्या संपादिका; सन २००२-२०१९ नगरसेविका, सन २००९ - २०१२, गटनेता; २००२-२००७ सदस्या, वृक्ष प्राधिकरण समिती; २०१५-२०१७ सदस्या, स्थायी समिती,

२०१७-२०१९ महापौर, महानगरपालिका, पुणे; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरिका, जपान, इंग्लंड, जर्मनी, स्पेन, सिंगापूर व श्रीलंका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व बागकाम.

पत्ता : ५६८, नारायण पेठ. टिळक वाडा, पुणे- ४११०३०.

दूरध्वनी :- निवास (०२०) २९८०५६५६.
मोबाईल :- ९४२२०२९६५६, ९६८९९३५६२०.
ई-मेल :- mukta.tilak@yahoo.co.in

निवडणूक निकाल

(२१५- कसबा पेठ)

एकूण मतदार	२,९०,७२४
एकूण वैध मतदान	१,५०,०६९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती मुक्ता शैलेश टिळक**	७५,४९२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अरविंद शिंदे	४७,२९६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. विशाल धनावडे	१३,९८९ (अपक्ष)
(४) श्री. अजय शिंदे	८,२८४ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	२,५३२

टोपे, श्री. राजेश अंकुशराव

जन्म : ११ जानेवारी, १९६९.

जन्म ठिकाण : औरंगाबाद.

शिक्षण : बी.ई. (मेकॅनिकल).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मनिषा.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १००-घनसावंगी, जिल्हा-जालना.

इतर माहिती : सन १९९१-९५ कार्यकारिणी सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; सचिव, मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना; अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जालना, अध्यक्ष, खोलेश्वर बहुउद्देशीय संस्था, अंकुशनगर, जालना, या संस्थेतर्फे सामुदायिक विवाहाचे आयोजन; १९९७ पासून अध्यक्ष, समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अंकुशनगर; १९९४ पासून संस्थापक-अध्यक्ष, यशवंत सहकारी सूत गिरणी लि. अंबड; १९९५ पासून संचालक, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन, मुंबई; अध्यक्ष, समर्थ

सहकारी बॅंक, जालना; तज्ञ संचालक, कर्मयोगी अंकुशराव टोपे सहकारी साखर कारखाना लि; सदस्य, वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, पुणे; सदस्य, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, सदस्य व १९९६ ते ऑक्टोबर, १९९९ विरोधी पक्ष नेता, जिल्हा परिषद, जालना; १९९६ राष्ट्रीय युवक कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली जेल भरो आंदोलनात सक्रीय सहभाग; १९९७ बेरोजगार युवकांच्या आंदोलनात अटक; १९९२-९६ अध्यक्ष, जालना जिल्हा युवक कॉंग्रेस; १९९६-९९ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस (आय); मे, १९९९ पासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्य; १९९९-२००० उपाध्यक्ष, गोदावरी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, लोकलेखा समिती; सदस्य; रोजगार हमी योजना समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेचा, सन २०१७ चा "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; मार्च, २००१ ते जानेवारी, २००३ जलसंधारण, व्यापार, वाणिज्य आणि पर्यावरण खात्याचे राज्यमंत्री; जानेवारी, २००३ ते जुलै, २००४ पर्यावरण व उद्योग खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००४ ते डिसेंबर, २००८ नगरविकास, सामान्य प्रशासन, नागरी जमीन कमालधारणा, जलसंधारण व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री; डिसेंबर, २००८ ते ऑक्टोबर, २००९ उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री; नोंव्हेबर, २००९ ते सप्टेंबर, २०१४ उच्च व तंत्र शिक्षण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ७ जानेवारी, २०२० पासून सार्वजनिक अरोग्य खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : १९९४ लंडनचा व २०१० ऑस्ट्रेलियाचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन.

पत्ता : (१) अजिंक्य बंगला, भाग्यनगर, जुना जालना, तालुका जालना, जिल्हा जालना - ४३१२०३.
दूरध्वनी : निवास – (०२४८२) २२५७७७, २२५३३१.
कार्यालय (०२४८२) २२५४४८ फॅक्स.
मोबाईल - ९४२२२१६१११, ९६१९१११७७७.

(२) "जेतवन" मलबार हिल मुंबई.
दूरध्वनी : निवास – (०२२) २३६३४६६९.
कार्यालय (०२२) २२०२५०५९, २२०२३८५८.
ई- मेल :- rajeshtope11@gmail.com.

निवडणूक निकाल (१००-घनसावंगी)	
एकूण मतदार	३,१२,८५९
एकूण वैध मतदान	२,२९,०४९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजेश अंकुशराव टोपे**	१,०७,८४९ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. उढाण हिकमत बळीराम	१,०४,४४० (शिवसेना)
(३) श्री. विष्णु शेळके	९,२९३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,८४२
(५) श्री. हस्नोद्दीन मोहिद्दीन	१,०७४ (बहुजन समाज पार्टी)

ठाकरे, श्री. आदित्य उध्दव

जन्म : १३ जून, १९९०.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.ए.,एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

कौटुंबिक माहिती : अविवाहित.

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १८२– वरळी, जिल्हा-मुंबई.

इतर माहिती : सन २०१० पासून युवा सेनेचे प्रमुख; २०१८ पासून शिवसेनेचे नेते; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड. जानेवारी, २०२० पासून पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार खात्याचे मंत्री.

छंद : वाचन.

पत्ता : २५ "मातोश्री" कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी : निवास (०२२) २६५९००११.
कार्यालय (०२२) २४३९८२२२.
मोबाईल :- ९८१९९४००१०.
ई – मेल :-adityathackeray@me.com

निवडणूक निकाल

(१८२-वरळी)

एकूण मतदार	२,६९,००३
एकूण वैध मतदान	१,२९,०७४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. आदित्य उध्दव ठाकरे**	८९,२४८ [शिवसेना]
(२) ॲड. सुरेश माने	२१,८२१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. गौतम गायकवाड	६,५७२ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	६,३०५
(५) श्री. विश्राम पडम	१,९३२ (बहुजन समाज पार्टी)

ठाकरे, श्री. विकास पांडुरंग

जन्म : २३ ऑगस्ट, १९६६.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती वृंदा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे)

व्यवसाय : शेती व ट्रॅव्हल्स.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ५६-नागपूर (पश्चिम), जिल्हा नागपूर.

इतर माहिती : सन २००७ सदस्य, महाराष्ट्र राज्य आंबेडकर वाल्मिकी योजना; सन १९९८ महासचिव, नॅशनल स्टुडंट युनियन ऑफ इंडीया; सन १९९०- महासचिव, नागपूर शहर युथ काँग्रेस कमिटी; सन १९९८ अध्यक्ष, विदर्भ युथ काँग्रेस; सन २००१ महासचिव, नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटी; सन २०१४ अध्यक्ष, नागपूर शहर काँग्रेस कमिटी; सन २००२-२००७, २००७-२०१२, २०१२ - २०१७ नगरसेवक, २००२-२००५ महापौर, २०१०-२०१७ विरोधी पक्ष नेता, महानगरपालिका, नागपूर; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : क्रिकेट.

पत्ता : ५० शास्त्री ले-आऊट, सुभाषनगर हिंगणा रोड, नागपूर ४४००२२.

दूरध्वनी : कार्यालय -(०७१२)- २२२३३९७.
ई-मेल :- vikasthakre23@gmail.com

निवडणूक निकाल

(५६-नागपूर - पश्चिम)

एकूण मतदार	३,६२,५३९
एकूण वैध मतदान	१,७८,४६९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. विकास पांडुरंग ठाकरे**	८३,२५२ [भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस]
(२) श्री. सुधाकर शामराव देशमुख	७६,८८५ (भारतीय जनता पक्ष)
(३) अफजल फारुक	८,४२७ (बहुजन समाज पार्टी)
(४) नोटा	३,७१७
(५) श्री. मनोज सिंग	२,२०१ (अपक्ष)

ठाकूर, श्री. प्रशांत रामशेठ

जन्म : ५ ऑगस्ट, १९७४.

जन्म ठिकाण : पनवेल, जिल्हा-रायगड.

शिक्षण : सिव्हिल इंजिनिअरिंग (द्वितीय वर्ष)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वर्षा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : व्यापार व उद्योग

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १८८-पनवेल, जिल्हा-रायगड.

इतर माहिती : विश्वस्त, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था; अध्यक्ष; शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी या संस्थांमार्फत संगणक क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम, मॅनेजमेंट व विधी महाविद्यालय सुरू केले; या संस्थेच्या सी.के.टी. महाविद्यालयाला नॅक 'ए प्लस' व मुंबई विद्यापीठातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून लौकिक प्राप्त; १४ वर्षे अध्यक्ष, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ; अध्यक्ष, आदर्श मल्हार नागरी सहकारी पतसंस्था, या संस्थांच्या माध्यमातून अनेकांना उद्योग व्यवसायासाठी सहाय्य; गरीब, गरजू, विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे

(२) श्री. सत्यजित पाटणकर	९२,०९१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) नोटा	१,५४७
(४) श्री.शिवाजी कांबळे	१,४७३ (बहुजन समाज पार्टी)
(५) श्री.अशोकराव तातोबा देवकांत	१,३९२ (वंचित बहुजन आघाडी)

धानोरकर, श्रीमती प्रतिभा सुरेश

जन्म : ९ जानेवारी, १९८६.

जन्म ठिकाण : वणी, जिल्हा यवतमाळ.

शिक्षण : बी.ए. (भाग १).

ज्ञात भाषा : मराठी व हिंदी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. सुरेश नारायण धानोरकर.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ७५- वरोरा, जिल्हा-चंद्रपूर.

इतर माहिती : प्रतिवर्षी महिला मेळाव्यांचे आयोजन; उप-जिल्हा रुग्णालय, वरोरा, येथे रुग्णांच्या नातेवाईकांना मोफत भोजन व्यवस्था सुरू केली; काँग्रेस पक्षाचे कार्य; सामान्य गोरगरीबांना मदत; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : संगीत ऐकणे.

पत्ता : घर.क्र. ७४८, लक्ष्मीनगर, अभ्यंकर वार्ड, वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

दूरध्वनी : निवास : (०७१७६)२८०५८६.
मोबाईल: ९४०३३२१६२८.
ई-मेल : pratibhadhanorkar0006@gmail.com.

निवडणूक निकाल

(७५- वरोरा)

एकूण मतदार	२,९६,५८८
एकूण वैध मतदान	१,८५,६२३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर**	६३,८६२ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. संजय देवतळे	५३,६६५ (शिवसेना)
(३) श्री. रमेश राजूरकर	३४,८४८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. अमोल बावणे	११,३४२ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. रमेश मेश्राम	६,३८८ (गोंडवाना गणतंत्र पार्टी)

धुर्वे, डॉ. संदीप प्रभाकर

जन्म : २५ ऑक्टोबर, १९६६.

जन्म ठिकाण : दिग्रस, जिल्हा-यवतमाळ.

शिक्षण : एम.बी.बी.एस.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी डॉ. (श्रीमती) विजयासिंह.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : वैद्यकीय.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ८० - अर्णी (अनुसूचित जमाती), जिल्हा-यवतमाळ.

इतर माहिती : सन १९८६ सहसचिव, विद्यार्थी संघटना वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर; १९८७ संस्थापक, डॉक्टर पॅनल, नागपूर; १९९१ अध्यक्ष, इंटर्नशिप डॉक्टर असोशिएशन; १९९२ वैद्यकीय शुल्क वाढी विरोधी आंदोलन नेतृत्व; १९९२ वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थाना सोई सवलती मिळाव्यात यासाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व; १९९२-१९९८ अधिव्याख्याता, वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय, नागपूर; १९९३-१९९८ मेळघाट, पांढरकवडा व राळेगाव मधील आदिवासी कुपोषित बालकांची तपासणी व वैद्यकीय उपचार व मार्गदर्शन; १९९८-१९९९ वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय, नागपूर येथे पदव्युत्तर अभ्यास सुरू करण्यासाठी प्रयत्न; २००२ स्वागताध्यक्ष, तिसरे बहुजन साहित्य संमेलन, पांढरकवडा; २००१-२००३ विदर्भातील निम्न पैनगंगा

प्रस्तावित धारणविरोधी आंदोलनाचे नेतृत्व; आदिवासी गोंड व कोलाम समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न; २००३ आदिवासी व कुपोषित ग्रस्त वैद्यकीय कार्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील "गोल्ड मेडल" पुरस्काराने सन्मानित; २००३ अध्यक्ष,अपंग नारायण सेवा संस्थान, उदयपुर, शाखा यवतमाळ; २००४-२००९ व २०१३-२०१४ महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य, भारतीय जनता पक्ष ; २०१८ प्रवक्ता, अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : (१) कर्मवीर सुधाकररावजी धुर्वे नगर,

दिग्रस, जिल्हा यवतमाळ-४४५२०३.

(२) २४, " सुधा प्रभा " गुरूनानक नगर, गोधनी रोड, यवतमाळ,
मोबाईल : ९४२२१६८५२९.

ई-मेल : drsandeepdhurve11@gmail.com.

निवडणूक निकाल

(८० - अर्णी (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	३,१२,२६८
एकूण वैध मतदान	२,११,२९४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. संदीप प्रभाकर धुर्वे**	८१,५९९ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. शिवाजीराव मोघे	७८,४४६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. राजू तोडसाम	२६,९४९ (अपक्ष)
(४) श्री. निरंजन मेश्राम	१२,३०७ (वंचित बहुजन आघाडी)
(५) ॲड. अनिल किनाके	२,७९१ (बहुजन मुक्ती पार्टी)

धोटे, श्री. सुभाष रामचंद्रराव

जन्म : १० ऑक्टोबर, १९५०.

जन्म ठिकाण : राजुरा, जिल्हा-चंद्रपूर.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शुभांगी.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ७० - राजुरा, जिल्हा-चंद्रपूर.

इतर माहिती : १९७१-७३ अध्यक्ष, विद्यार्थी संघ; १९७५ अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा एन.एस.यु.आय.; १९७८-७९ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; १९७९-८४ सदस्य, कॉटन फेडरेशन, यवतमाळ; २००७ पासून प्रदेश प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; संचालक, राजुरा नागरी सहकारी पतसंस्था; इन्फर जिजस सोसायटीद्वारे इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली; सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती व अध्यक्ष, जिल्हा परिषद, चंद्रपूर; १९८६-२००४ संचालक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९८६-२००४ संचालक, १९९५-९८ उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक), मुंबई; १९९१-२००३ अध्यक्ष, विभागीय मंडळ शिखर

बँक, नागपूर; रक्तदान व नेत्र चिकित्सा शिबिरांचे आयोजन; स्व. रामचंद्र धोटे अध्यापक विद्यालय, डी.एड. कॉलेज, कला, वाणिज्य महाविद्यालय व कल्याण स्कूल ऑफ नर्सिंग, राजुरा, जिल्हा चंद्रपूर येथे सुरू केले; २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

प्रदेश प्रवास : १९९७ मध्ये युरोप, २००२ मध्ये ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड देशाचा अभ्यास दौरा.

छंद : टेबल टेनिस व क्रिकेट खेळ.

पत्ता : मु.पो. तालुका राजुरा, जिल्हा-चंद्रपूर.

दूरध्वनी : (०७१७३)२२२५०१.
मोबाईलः ९४२२१३६९९९/९८५०३५६९९९.
ई - मेल : subhashrdhote@gmail.Com

निवडणूक निकाल

(७० - राजुरा)

एकूण मतदार	३,१६,०१८
एकूण वैध मतदान	२,२४,८५७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे**	६०,३२८ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) ॲड. वामनराव चटप	५७,७२७ (स्वतंत्र भारत पक्ष)
(३) श्री.संजय धोटे	५१,०५१ (भारतीय जनता पक्ष)
(४) श्री. गोदरु पाटील जुमनाके	४३,३०६ (गोंडवाना गणतंत्र पार्टी)
(५) श्री.महालिंग कानथळे	१,९४८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

नवघरे, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या रमाकांत

जन्म : ८ ऑक्टोबर, १९८१.

जन्म ठिकाण : बाभुळगाव, तालुका वसमत, जिल्हा- हिंगोली

शिक्षण : बी.ए.(भाग-१)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वर्षा

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : ९२-बसमत, जिल्हा- हिंगोली.

इतर माहिती : सन २००५- २०१९ सदस्य, २००५-२००९ सरपंच, ग्रामपंचायत, बाभुळगांव; २००८ पासून सदस्य, विविध सेवा सहकारी सोसायटी, बाभूळगांव; २००५-२००७ संचालक, रोकडेश्वर सहकारी सुत गिरणी लि.; २०१०-२०१४ व २०१६-२०१९ सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, वसमत; २०१७ पासून संचालक, पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमत; गरीब गरजू विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत; आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन; विविध सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे समाज प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन; २०००- २००३ तालुका अध्यक्ष; राष्ट्रवादी विद्यार्थी

काँग्रेस; २००४-२००८ तालुका उपाध्यक्ष, २००९-२०१३ सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस; २०१४ - २०१९ तालुका अध्यक्ष, २०१८ पासून जिल्हा कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व प्रवास.

पत्ता : मु.पो. बाभूळगांव, तालुका वसमत , जिल्हा - हिंगोली ४३१५१२.

दूरध्वनी - निवास ९७६५७१९९९९.
कार्यालय - ९८२२६२०८८२.
मोबाईल - ९८२२७४१५५४.
ई- मेल - rrnavghare54@gmail.com

निवडणूक निकाल

(९२-बसमत)

एकूण मतदार		२,९२,३०४
एकूण वैध मतदान		२,१७,७३३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या रमाकांत नवघरे**	७५,३२१ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२)	श्री. शिवाजी जाधव	६७,०७० (अपक्ष)
(३)	श्री. जयप्रकाश मुंदडा	४१,५५७ (शिवसेना)
(४)	श्री. शेख फरिद ऊर्फ मुनीर इसाक पटेल	२५,३९७ (वंचित बहुजन आघाडी)
(५)	नोटा	१,९५७

नाईक, श्री. इंद्रनिल मनोहर

जन्म : २८ जानेवारी,१९८२.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : बी.एस.एल,एलएल.बी

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मोहिनी.

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : ८१-पुसद, जिल्हा यवतमाळ.

इतर माहिती : सन २००४ पासून सदस्य, वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मुंबई; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरिका, यु.के., सिंगापूर, यु.ए.ई., मॉरिशस, इंडोनिशिया, थायलंड, हाँगकाँग व श्रीलंका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : प्रवास करणे.

पत्ता : "नाईक बंगला" कारलारोड, गांधीनगर, पूसद, जिल्हा यवतमाळ-४४५२०४.

दूरध्वनी निवासः- (०७२३३) २४६३१०,२४६८२२.
कार्यालय :- (०७२३३) २४६०१०.
मोबाईल :- ९५५२२२५५५५.
ई- मेल :- indranilnk@gmail.com

निवडणूक निकाल

(८१ - पुसद)

एकूण मतदार	२,९३,६३५
एकूण वैध मतदान	१,८९,४५६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. इंद्रनिल मनोहर नाईक**	८९,१४३ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. निलय नाईक	७९,४४२ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. ज्ञानेश्वर बेळे	११,२५५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. शालिग्राम तंबारे	२,१५३ (बहुजन महा पार्टी)
(५) नोटा	१,४४५

नाईक, श्री. गणेश रामचंद्र

जन्म : १५ सप्टेंबर, १९५०.

जन्म ठिकाण : खैरणे, बोनकोडे, जिल्हा-ठाणे.

शिक्षण : पदवीपर्यंत.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मंदाकिनी.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती आणि उद्योग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १५० – ऐरोली, जिल्हा ठाणे

इतर माहिती : संस्थापक, श्रमिक मंडळ या संस्थेमार्फत रा.फ. नाईक, फकीरजी नाईक शाळा व महाविद्यालय सुरू केले; जीवन आधार संस्था स्थापन करून या संस्थेमार्फत असंघटित कामगारांसाठी जनश्री विमा योजना सुरू केली; ग्रीन होम संस्थेच्या माध्यमातून भव्य प्रमाणात वृक्षारोपण, खारफूटीचे संवर्धन इत्यादी उपक्रम राबविले; नवी मुंबई क्रीडा संकुलाच्या माध्यमातून दरवर्षी ऑलिंपिक दर्जाच्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन; नवी मुंबई शिक्षण व कला संकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन व शालोपयोगी वस्तूंचे वाटप; संपूर्ण महाराष्ट्रात ५० पेक्षा अधिक मोफत रुग्णवाहिकांचे वाटप; आपदग्रस्तांना मदत; बेराजगारांना रोजगार

उपलब्ध करून दिला; भूमिपुत्र आणि स्थानिकांना न्याय देण्यासाठी सिडको आणि एमआयडीसीच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्याचा भूखंड मिळावा आणि एमआयडीसीच्या योजनेनुसार एक गुंठा जमीन मिळावी यासाठी यशस्वी प्रयत्न; नवी मुंबईला स्वयंपूर्ण पाणीपुरवठा व्हावा यासाठी जीवन प्राधिकरणाकडून मोरवे धरण नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तातंरण करून घेतले; ठाणे, बेलापूर महामार्गाचे काँक्रिटीकरण, टोलरहित प्रवासाची सोय; एका विशेष योजनेंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेसाठी २० वर्षांसाठी कोणतीही करवाढ नाही या योजनेची ४ वर्षे यशस्वीपणे अंमलबजावणी; सिडकोने बांधलेल्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतीसाठी २.५ एफ.एस.आय. शासनाकडून मंजूर करून घेतला; जागतिक तंत्रज्ञानांवर आधारित मलनिःसारण केंद्र सुरू केले; तुर्भे येथे डम्पिंग ग्राऊंड सुरू केले; नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत वातानुकूलीत व्हॉल्वो, सीएनजी बस सेवा सुरू केली, वन कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केला; तसेच वन कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणासाठी शस्त्रे मिळवून दिली. राज्यातील उद्योग प्रकल्पांना अनुमती देण्यासाठी त्यासंबंधीची प्रक्रिया सुलभ व गतीमान केली; प्रदूषण नियंत्रणासाठी राज्यभर प्रभावीपणे उपाययोजना केल्या; अविघटनशील घनकचरा विल्हेवाट कायदा संमत करण्याची कार्यवाही केली; १९९८ पर्यंत शिवसेना पक्षाचे कार्य; १९९९ ते २०१८ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी उल्लेखनीय कार्य केले; २०१८ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; १९९०-९५, १९९५-९९, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९३-९५ विधानसभेतील शिवसेना पक्षाचे गटनेते; जून, १९९५ ते मे, १९९८ वने आणि पर्यावरण खात्याचे मंत्री; या काळात "सरकार आपल्या अंगणात" या कायक्रर्माद्वारे जनतेशी प्रत्यक्ष संवाद, हाच कार्यक्रम पुढे जनता दरबार व नंतर लोकशाही दिन म्हणून सुरू झाला; नोव्हेंबर, २००४ ते मार्च, २००५ राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण खात्याचे मंत्री; मार्च, २००५ ते फेब्रुवारी, २००९ राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, २००९ ते ऑक्टोबर, २०१४ राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : रशिया, जपान, हाँगकाँग, बँकॉक, दुबई, मस्कत, अबुधाबी, चीन, मलेशिया, थायलंड, मक्का, नॉर्वे, स्वीडन, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, हॉलंड, ऑस्ट्रीया, इटली, इस्त्राईल इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : प्रगत शेतीसाठी वेगवेगळे प्रयोग करणे, बायोडिझेलसाठी प्रयत्न.

पत्ता : (१) डी-१०२, ए-बालाजी गार्डन को-ऑप. हौसिंग, सोसायटी, सेक्टर नं. ११, कोपरखैरणे, नवी मुंबई- ४०० ७०९.

(२) 'रामचंद्र निवास' बोनकोडे (खैरणे), नवी मुंबई, जिल्हा-ठाणे.

दूरध्वनी : २७७८४४७७, २७५५२८७१.

मोबाईल : ९९२०९६३२५५/८८७९८४१२९९.

निवडणूक निकाल

(१५० – ऐरोली)

एकूण मतदार	४,६१,४८९
एकूण वैध मतदान	१,९६,४२४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. गणेश रामचंद्र नाईक**	१,१४,६४५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. गणेश शिंदे	३६,१५४ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. निलेश बंनखेले	२२,८१८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) डॉ. प्रकाश ढोकणे	१३,४२४ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	५,२१३

नाईक, श्री. मानसिंग फत्तेसिंगराव

जन्म : २६ जून, १९५९.

जन्म ठिकाण : चिखली, तालुका शिराळा, जिल्हा- सांगली.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनिता.

अपत्ये : एकूण ४ (एक मुलगा व तीन मुली).

व्यवसाय : शेती, समाजकार्य व उद्योग.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २८४-शिराळा, जिल्हा-सांगली.

इतर माहिती : १९९५ संस्थापक, विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ, या संस्थेमार्फत बालवाडी ते महाविद्यालयीन शिक्षणाची सोय केली; सन २००० पासून अध्यक्ष, विश्वास उद्योग समूह; २००१ पासून चेअरमन, विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना लि.; १९९५ संस्थापक, आपला बझार; २००२ पासून चेअरमन व कार्यकारी संचालक, विराज अल्कोहोल्स अँड अलाईड इंडस्ट्रिज लि., शिराळा; चेअरमन, विराज बायो शुगर लि., शिराळा ; संस्थापक, विराज हायटेक पिव्हींग प्रा.लि.; संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; सहकार व उद्योगांच्या माध्यमातून शिराळा

परिसरात रोजगार निर्मिती व पूरक व्यवसाय सुरू करण्यास मदत केली; सर्वसामान्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी सतत प्रयत्नशील; २००१-२००९ प्रदेश प्रतिनिधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिराळा तालुका; २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, विनंती अर्ज समिती, उपविधान समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये, महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : २००८ मध्ये चीन व सिंगापूर व युरोप, हाँगकाँग, बँकॉक, युगांडा, इथिओपिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : सामाजिक कार्य, व्हॉलिबॉल, क्रिकेट व प्रवास करणे.

पत्ता : मु.पो. चिखली, तालुका शिराळा, जिल्हा सांगली- ४१५ ४०८.

दूरध्वनी :- निवास : (०२३४५) २७२१४३, ७५०७७७०१००.
मोबाईल :- ९८२२१७२२२२.
ई- मेल :- mla.naikmf@gmail.com

निवडणूक निकाल

(२८४ - शिराळा)

एकूण मतदार	२,९२,९६५
एकूण वैध मतदान	२,२९,२७८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. मानसिंग फत्तेसिंगराव नाईक**	१,०१,९३३ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. शिवाजी राव नाईक	७६,००२ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. सम्राट (बाबा) महाडिक	४६,२३९ (अपक्ष)
(४) नोटा	१,४१७
(५) श्री. सुरेश जाधव	१,०१९ (वंचित बहुजन आघाडी)

नाईक, श्री. वैभव विजय

जन्म : २९ मे, १९७५.

जन्म ठिकाण : कणकवली, जिल्हा-सिंधुदूर्ग.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती स्नेहा.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २६९-कुडाळ, जिल्हा-सिंधुदूर्ग.

इतर माहिती : संस्थापक-अध्यक्ष, युवक कल्याण संघ; संस्थापक-चेअरमन, युवक कल्याण सहकारी पतसंस्था; संस्थापक-चेअरमन, युवक कल्याण सहकारी बझार, कणकवली; २००६ पासून शिवसेना जिल्हा प्रमुख; २००२ सदस्य, पंचायत समिती, कणकवली; २००३-२०१३ नगरसेवक व २००३-२००८ उपनगराध्यक्ष, नगरपालिका, कणकवली; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन.

पत्ता : (१) 'नक्षत्र' अपार्टमेंट, कुडाळ एस.टी. स्टॅण्डच्या समोर, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदूर्ग.

(२) सुजाता बंगला, बिजलीनगर, कणकवली, जिल्हा सिंधुदूर्ग.

दूरध्वनी :- निवास - (०२३६७) २३१५३५.

कार्यालय :- (०२३६७) २३३१३५, (०२३६२) २२२४९४.

मोबाईल :- ९४२२४३४५३५.

ई-मेल :- vnaik95@gmail.com

निवडणूक निकाल

(२६९ - कुडाळ)

एकूण मतदार	२,१६,००८
एकूण वैध मतदान	१,३५,९००
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. वैभव विजय नाईक**	६९,१६८ [शिवसेना]
(२) श्री.रणजित देसाई	५४,८१९ (अपक्ष)
(३) श्री.अरविंद मोंडकर	३,५२७ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री.बाळकृष्ण जाधव	३,१२९ (अपक्ष)
(५) श्री. धिरज परब	२,३९९ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

नाईक, श्री. शिरिषकुमार सुरूपसिंग

जन्म : १८ जुलै, १९७२

जन्म ठिकाण : नवागांव, तालुका- नवापूर, जिल्हा नंदूरबार.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रजनी.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ४- नवापूर (अनुसूचित जमाती) जिल्हा - नंदूरबार.

इतर माहिती : कार्यकारी अध्यक्ष, आदिवासी शिक्षण प्रसारक संस्था, नवापूर; उपाध्यक्ष, तापी परिसर शिक्षण प्रसार संस्था; उमराण, तालुका नवापूर, जिल्हा-नंदूरबार; व्हाईस चेअरमन, धुळे - नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे; चेअरमन, सौ. धिमीबाई नागरी सहकारी पतसंस्था, मर्या. नवापूर; चेअरमन, आदिवासी सहकारी साखर कारखाना लि., डोकारे, तालुका नवापूर; सदस्य वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट, पुणे; सदस्य, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ, मुंबई; पाच वर्षे अध्यक्ष, जिल्हा युवक काँग्रेस कमिटी; पाच वर्षे अध्यक्ष, नवापूर तालुका काँग्रेस कमिटी; सदस्य, महाराष्ट्र

प्रदेश काँग्रेस कमिटी; सदस्य, जिल्हापरिषद, नंदूरबार; सभापती, बांधकाम व अर्थ समिती, जिल्हा परिषद, नंदूरबार; पाच वर्षे सदस्य, जिल्हापरिषद, धुळे; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : सिंगापूर, थायलंड, मलेशिया, दुबई व ईस्त्राईल इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : सामाजिक व राजकीय कार्य.

पत्ता : (१) मु.पो. नवागांव, तालुका नवापूर, जिल्हा नंदूरबार.

(२) ८०३, पूर्णा वरळीसागर को-ऑप. हौ. सोसायटी लि.,
सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई -४०००२५.
मोबईल नं. ९४२२७९१००९.
ई-मेल-Shirishkumar1234@gmail.com

निवडणूक निकाल

(४- नवापूर-अनुसूचित जमाती)

एकूण मतदार	२,८७,९७७
एकूण वैध मतदान	२,१७,६६३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. शिरीषकुमार सुरूपसिंग नाईक**	७४,६५२ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. शरद गावित	६३,३१७ (अपक्ष)
(३) श्री. भरत गावित	५८,५७९ (भारतीय जनता पक्ष)
(४) डॉ. उल्हास वसावे	६,००९ (भारतीय ट्रायबल पार्टी)
(५) श्री. जगन गावित	५,४६२ (वंचित बहुजन आघाडी)

नार्वेकर, ॲड. राहुल सुरेश

जन्म : ११ फेब्रुवारी, १९७७.

जन्म ठिकाण : मुंबई,

शिक्षण : बी.कॉम., एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सरोजनी.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : वकिली.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १८७ – कुलाबा, जिल्हा - मुंबई शहर.

इतर माहिती : अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध; अनेक संस्थांचे कायदेशीर सल्लागार म्हणून कार्य; राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते; सप्टेंबर, २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; २०१५-२०१६ चा राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेचा "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : मे, २०१६ मध्ये राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेद्वारे ऑस्ट्रेलिया, न्युझिलँड व सिंगापूरचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) ३०४,डॉली चेंबर्स, स्टॅन्ड सिनेमा कंपाऊंड कुलाबा,
मुंबई -४०० ००५.

(२) ८/७ ब्रॅडीज फ्लॅट, सोराब बरूचा रोड, कुलाबा,
मुंबई- ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) २२८७६३६९.
मोबाईल नं. ९८१९२१९१६६.
ई- मेल : narwekarl@hotmail.com.

निवडणूक निकाल

(१८७ - कुलाबा)

एकूण मतदार	२,६६,५८७
एकूण वैध मतदान	१,०६,६३०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. राहुल सुरेश नार्वेकर**	५७,४२० [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अशोक जगताप	४१,२२५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. जितेंद्र कांबळे	३,०११ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) नोटा	२,९२१
(५) श्री. संतोष चव्हाण	६६७ (अपक्ष)

निकम, श्री. शेखर गोविंदराव

जन्म : १ मार्च, १९६६.

जन्म ठिकाण : सावर्डे, तालुका - चिपळूण, जिल्हा – रत्नागिरी.

शिक्षण : एम.एस्सी. (ॲग्री).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पुजा.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २६५-चिपळूण- संगमेश्वर, जिल्हा - रत्नागिरी.

इतर माहिती : २००० पासून कार्याध्यक्ष, सह्याद्री शिक्षण संस्था; २००७ संचालक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; २०१० संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.; सदस्य, महाराष्ट्र जलसंपती नियमन प्रधिकरण; २०११- २०१८ रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोशिएशनचा "उदयोन्मुख" तरूण कार्यकर्ता पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा कोकण भूषण पुरस्कार व डॉ. बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचा फलोद्यान क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीबद्दल "आबासाहेब कुबल" पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये

महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व क्रिकेट.

पत्ता : (१) ४९२ "अनुबंध " मु.पो. सावर्डे, तालुका चिपळुण, जिल्हा रत्नागिरी ४१५६०६.

(२) सह्याद्री शिक्षण संस्था, सावर्डे, तालुका चिपळुण,
जिल्हा रत्नागिरी. ४१५६०६.

(३) रूम नं. ७०३ व ७०४ बिल्डिग नं. ४ (अ),
श्री गुरूदत्त को-ऑप. हौ. सोसायटी., देवरत्ननगर रचदेशी मिल रोड,
म्हाडा कॉलनी, चुनाभट्टी, मुंबई. ४०००२२.
दूरध्वनी कार्यालय (०२३५५) २६४२१५.
मोबईल ९४२२४२९५९५.
ई- मेल : shekhargnikam@gmail.com

निवडणूक निकाल

(२६५-चिपळूण- संगमेश्वर)

एकूण मतदार	२,७०,३६६
एकूण वैध मतदान	१,७७,९२१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. शेखर गोविंदराव निकम**	१,०१,५७८ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री.सदानंद चव्हाण	७१,६५४ (शिवसेना)
(३) श्री.सचिन मोहिते	२,३९२ (भारतीय समाजवादी पक्ष)
(४) नोटा	२,२९७

निकोले, कॉ. विनोद भिवा

जन्म : १५ सप्टेंबर, १९७५.

जन्म ठिकाण : उर्से, तालुका डहाणू, जिल्हा- पालघर.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती बबिता.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी).

मतदारसंघ : १२८ डहाणू (अनुसूचित जमाती), जिल्हा पालघर.

इतर माहिती : सचिव, ठाणे व पालघर जिल्हा व राज्य सहसचिव, सी.आय.टी.यु. सदस्य, भारतीय कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी), राज्य कमिटी; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड;

छंद : वाचन व कबड्डी.

पत्ता : (१) मु. पो. उर्से, तालुका डहाणू, जिल्हा पालघर ४०१६०२.

(२) मु. पो. वाकी, तालुका - डहाणू, जिल्हा पालघर ४०१६०२.
मोबाईल : ०८५५२०७५२५३.

निवडणूक निकाल

(१२८-डहाणू (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	२,७२,०८५
एकूण वैध मतदान	१,६५,९८१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **कॉ. विनोद भिवा निकोले**	७२,११४ [मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष]
(२) श्री. पास्कल धनारे	६७,४०७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. सुनिल इभाड	६,३३२ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) नोटा	४,८२४
(५) श्री. दामोदर रंधे	२,८२३ (अपक्ष)

पटेल, श्री. अमिन अमीर अली

जन्म : १३ जानेवारी, १९६३.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती यासमीन.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : १८६-मुंबादेवी, जिल्हा-मुंबई शहर.

इतर माहिती : १९८८ जनरल सेक्रेटरी, युथ काँग्रेस दक्षिण मध्य मुंबई, १९९० सेक्रेटरी, अल्पसंख्याक विभाग, १९९३ जनरल सेक्रेटरी, मुंबई प्रदेश युथ काँग्रेस कमिटी; १९९४ उपाध्यक्ष, अल्पसंख्याक विभाग, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; १९९६ सदस्य, झेड.आर.यु. सी.सी. वेस्टर्न रेल्वे; १९९७ उपाध्यक्ष, व २००० सेक्रेटरी, दक्षिण मध्य मुंबई काँग्रेस कमिटी; २००७ सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी; २००२ नामनिर्देशित व २००७ नगरसेवक, मुंबई महानगरपालिका; २००५ ते २००९ सदस्य, इम्प्रुव्हमेंट कमिटी; २००७ प्रतोद, काँग्रेस पक्ष, मुंबई महानगरपालिका; सदस्य,

सल्लागार समिती, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, मुंबई; विश्वस्त, केअर मेडिकल आणि संशोधन फांऊडेशन, या संस्थेमार्फत रक्तदान, नेत्र चिकित्सा, मोफत आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; शैक्षणिक मार्गदर्शन केंद्र सुरु केले; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, खेळ व प्रवास.

पत्ता : वॉलेस फोर्च्युन को-ऑप.हौ. सोसायटी लि., ओपस-१७०१, सतरावा मजला, सी.टी.एस.नं. १४८२ शिवदास चापसी मार्ग, फजलांजी शाळेसमोर, माझगांव, मुंबई ४००००९.

दूरध्वनी : निवास व कार्यालय - (०२२) २३७३५१००.
मोबाईल - ९८२०१०५७६१.
ई-मेल : aminpatel186@gmail.com

निवडणूक निकाल

(१८६-मुंबादेवी)

एकूण मतदार	२,४४,१४५
एकूण वैध मतदान	१,०७,४४७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अमिन अमीर अली पटेल**	५८,९५२ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. पांडूरंग सकपाळ	३५,२९७ (शिवसेना)
(३) श्री. बशीर पटेल	६,३७३ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(४) श्री. केशव मुळये	३,१८५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	१,५३९

पटेल, श्री. राजकुमार दयाराम

जन्म : ६ जून, १९६२.

जन्म ठिकाण : झिल्पी, तालुका-धारणी, जिल्हा-अमरावती.

शिक्षण : एम.ए., (राज्यशास्त्र), बी.एड.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, निमाडी व कोरकु.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनिता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : प्रहार जनशक्ती पक्ष

मतदारसंघ : ४१-मेळघाट (अनूसूचित जमाती), जिल्हा-अमरावती.

इतर माहिती : सन १९९५ अध्यक्ष, आदिवासी विकास सहकारी संस्था, साद्रावाडी तालुका धारणी जिल्हा अमरावती; गरीब, गरजू, दूर्बल, निराधार, वृध्द अपंग व्यक्तींना सर्वतोपरी मदत; १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अनुसूचित जमाती कल्याण समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, खेळ व शिकार करणे.

पत्ता : (१) मु.पो. झिल्पी, तालुका-धारणी, जिल्हा-अमरावती.

(२) जय स्तंभ चौक, धारणी, जिल्हा-अमरावती.
मोबाईल :- ९४२२९१७५०१, ९४०५९७७०३०.
(३) ड-४३, क-८६, मनोरा आमदार निवास, मुंबई.
दूरध्वनीः- २२८२४५४५.
ई - मेल :- rajkumarpatel0606@gmail.com

निवडणूक निकाल

(४१-मेळघाट (अनूसूचित जमाती))

एकूण मतदार	२,७७,५२३
एकूण वैध मतदान	१,८१,९४१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजकुमार दयाराम पटेल**	८४,५६९ [प्रहार जनशक्ती पक्ष]
(२) श्री. रमेश मावस्कर	४३,२०७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. केवलराम काळे	३५,८६३ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. दरसिंबे मन्नालाल खुबिलाल	८,९०८ (अपक्ष)
(५) नोटा	२,८३५

पटोले, श्री. नानाभाऊ फाल्गुनराव

जन्म : ५ जून, १९६३.

जन्म ठिकाण : गोंदिया.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मंगला.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय)

मतदारसंघ : ६२- साकोली, जिल्हा- भंडारा.

इतर माहिती : सदस्य, एन.एस.यु.आय.; विद्यार्थी चळवळीत सक्रिय सहभाग; सदस्य, विदर्भ मार्केटिंग फेडरेशन; सदस्य, विदर्भ वैधानिक विकास महामंडळ; धानाच्या प्रश्नांसाठी आंदोलन; युवक काँग्रेसचे सदस्य; ओ.बी.सी. संघटना बांधणीसाठी मेळव्यांचे आयोजन, या समाजासंबंधीचा काळा जी. आर. रद्द करण्यासाठी विशेष प्रयत्न; सामूहिक विवाह सोहळयांचे आयोजन; मंदिरांचा जिर्णोद्धार केला; नाट्य अकादमीच्या कलादर्पण संस्थेला शासकीय अनुदान मिळवून दिले; वृद्ध कलावंताना मानधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न; गरीब रुग्णांना व विद्यार्थ्यांना मदत; वन जमिनी

मुक्त करण्यासाठीच्या आंदोलनात आठ दिवस सेंट्रल जेलमध्ये कारावास; विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना २० कोटी रुपयांची शासकीय मदत मिळवून दिली; १९९४-२००१ संचालक, जिल्हा सहकारी बँक; १९९५-२००३ संचालक, विदर्भ को-ऑप. सोसायटी; १९९२-९७ सदस्य, जिल्हा परिषद, भंडारा; १९९९-२००४, २००४-२००८, २००९-२०१४, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; डिसेंबर, २००८ मध्ये धानउत्पादक शेतकऱ्यांच्या व विदर्भाच्या प्रश्नावर शासनाने न्याय दिला नाही म्हणून आमदारकीचा राजीनामा व पुढे भारतीय जनता पक्षात कार्यरत; २०१९ पासून काँग्रेस पक्षाचे कार्य; २१ फेब्रुवारी, २०२१ पासून प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; सन २०१४-२०१७ सदस्य, लोकसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ३ डिसेंबर, २०१९ ते १८ फेब्रुवारी, २०२१ अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा;

परदेश प्रवास : सप्टेंबर, २०१६ मध्ये लंडन (यु.के.) चा अभ्यास दौरा.

छंद : गरिबांची सेवा.

पत्ता : मु.सुकळी, पोस्ट-वडर, तालुका-साकोली, जिल्हा-भंडारा.

दूरध्वनीः (०७१८६) २२३६९४०.
मोबाईल : ९८२३७३३५५५.
ई - मेल : nanapatole@gmail.com

निवडणूक निकाल (६२-साकोली)	
एकूण मतदार	३,१८,८०४
एकूण वैध मतदान	२,२८,७००
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नानाभाऊ फाल्गुनराव पटोले**	९५,२०८ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) डॉ. परिणय रमेश फुके	८८,९६८ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. सेवकभाऊ वाघाये	३४,४३६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) डॉ. प्रकाश मालगवे	३,६५० (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	१,५४३

पवार, श्री. अजित अनंतराव

जन्म : २२ जुलै, १९५९.

जन्म ठिकाण : देवळाली-प्रवरा, तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनेत्रा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २०१-बारामती, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री. छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर; संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना, लि.; संचालक, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, लि. जिल्हा पुणे; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई; संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे; मार्च, १९९१ ते ऑगस्ट, १९९१ तसेच डिसेंबर, १९९४ ते डिसेंबर, १९९८ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; ११ डिसेंबर, १९९८ ते १७ ऑक्टोबर,

१९९९ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई; १९ डिसेंबर, २००५ पासून संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध उत्पादक संघ; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई; २८ सप्टेंबर, २००६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ; मार्च, २०१३ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन; सप्टेंबर, २००५ ते २३ मार्च, २०१३ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन; १३ ऑगस्ट, २००६ ते १९ ऑगस्ट, २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन; १७ जून, १९९१ ते १८ सप्टेंबर, १९९१ सदस्य, लोकसभा; १९९१-९५ (पो.नि.), १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २८ जून, १९९१ ते नोव्हेंबर, १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, १९९२ ते फेब्रुवारी, १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; २७ ऑक्टोबर, १९९९ ते २५ डिसेंबर, २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर, २००३ ते ३१ ऑक्टोबर, २००४ ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे कोकण पाटबंधारे महामंडळे) खात्याचे मंत्री; ९ नोव्हेंबर, २००४ ते ७ नोव्हेंबर, २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर, २००९ ते ९ नोव्हेंबर, २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर, २०१० ते सप्टेंबर, २०१४ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा); ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; २२ डिसेंबर, ते २७ डिसेंबर, २०१९ उप मुख्यमंत्री; ३० डिसेंबर, २०१९ पासून उप मुख्यमंत्री. (वित्त व नियोजन) ६ एप्रिल, २०२१ पासून राज्य उत्पादन शुल्क खात्याचा अतिरिक्त कार्यभार.

परदेश प्रवास : अमेरिका, बेल्जियम, हॉलंड, ऑस्ट्रिया, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड, स्वित्झर्लँड, ब्राझील, इस्त्रायल, मेक्सिको व अर्जेंटिना इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : क्रिकेट, टेनिस व समाजकार्य.

पत्ता : (१) मु. पो काटेवाडी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे.

दूरध्वनी :- (०२११२)२२६०००/२३४२२२.
मोबाईल :-९८५००५१२२२.
(२) फ्लॅट नं. ९, दुसरा मजला, प्रेमकोर्ट, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
(३) देवगिरी, मलबार हिल, मुंबई.
दूरध्वनी :- निवास (०२२)२३६३१६०६ / २३६३४८७७.
कार्यालय :- (०२२) २२०२०२६३ / २२०२५०१४ / २२०२२४०१.

निवडणूक निकाल

(२०१-बारामती)

एकूण मतदार	३,४२,२७०
एकूण वैध मतदान	२,३५,०४०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अजित अनंतराव पवार**	१,९५,६४१ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. गोपीचंद पडळकर	३०,३७६ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. अविनाश गोफणे	३,१११ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,५७९
(५) श्री. अशोक माने	१,४२१ (बहुजन समाज पार्टी)

पवार, श्री अभिमन्यु दत्तात्रय

जन्म : १ जुलै,१९७१

जन्म ठिकाण : उंबडगा (खू।।), तालुका-औसा, जिल्हा-लातूर.

शिक्षण : बी.कॉम; एम.पी.एम, डी.एल.एल.अँड एल.डब्ल्यु.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शोभा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २३९-औसा, जिल्हा लातूर.

इतर माहिती : सन २००० संस्थापक, कुलस्वामिनी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. लातूर; सन १९८९ पासून भारतीय जनता पक्षाचे सक्रीय कार्य; रामजन्मभूमी आंदोलनात सक्रीय सहभाग; वार्ड अध्यक्ष, युवा मोर्चा; जिल्हा सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष; महाराष्ट्र भाजपचे प्रभारी; श्री. ओमप्रकाश माथूर राष्ट्रीय उपाध्यक्ष, भाजप यांचे सहयोगी स्वीय सहायक म्हणून काम केले; सन २०१४ - २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहायक म्हणून काम केले; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : सन २०१७-२०१८ इंडोनिशीया (बाली) चा अभ्यास दौरा.

छंद : गाणे ऐकणे व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) संभाजी नगर, खाडगाव रोड, लातूर.

(२) C/O श्री. धनराज होळकुंदे, मु.पो. कासार-सिरसी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर .

दूरध्वनी : निवास ९४०३९५४४५५.

कार्यालय ९४२२०७२१११.

मोबाईल : ९४२२९६५४३८/ ७५०६७०३४५४.

ई - मेल : abhipawar@gmail.com

निवडणूक निकाल

(२३९-औसा)

एकूण मतदार	२,८३,९५८
एकूण वैध मतदान	१,८७,३३४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अभिमन्यु दत्तात्रय पवार**	९५,३४० [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. बसवराज पाटील	६८,६२६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. बजरंग जाधव	९,५८८ (अपक्ष)
(४) श्री. सुधीर पोतदार	८,१६८ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. अभिमन्यु पवार	१,१११ (संभाजी ब्रिगेड पार्टी)

पवार, ॲड. अशोक रावसाहेब

जन्म : ३० ऑगस्ट, १९५८.

जन्म ठिकाण : वडगाव-रासाई, तालुका शिरूर, जिल्हा-पुणे.

शिक्षण : बी.एस्सी. (ॲग्री.), एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुजाता.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १९८-शिरूर, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : १९९७-२००२ सदस्य, पंचायत समिती, शिरूर; १९९९ पासून चेअरमन, घोडगंगा सहकारी साखर कारखाना, लि., न्हावरे; शिरूर तालुक्यात रस्ते, वीज, पाणी, शिक्षण व आरोग्य सुविधांची कामे केली; सदस्य, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ; गरजू गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढीसाठी प्रयत्न; पाणी वाटप संस्था, क्रीडा संस्था, तरूण मंडळे, ग्रंथालये व युवा प्रतिष्ठान अशा अनेक संस्थांची स्थापना केली; २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र

विधानसभेवर फेरनिवड; २०२० पासून समिती प्रमुख, सार्वजनिक उपक्रम समिती;

परदेश प्रवास : अमेरिका, इंडोनेशिया व २००६ मध्ये आधुनिक शेतीसंबंधी इस्त्राईलचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, पर्यटन व खेळ.

पत्ता : (१) मु.पो. वडगाव-रासाई, तालुका शिरूर, जिल्हा-पुणे.

दूरध्वनी :- (०२१३७)२८३२३९, २६४७४७, २६४८५५.
मोबाईलाः- ९८०००७९७९/९५५२७७७९९९.
(२) जी-२, गुडवील एनक्लेव्ह, ५, कल्याणीनगर,
पुणे- ४११ ००६.
दूरध्वनी :- (०२०)-२६६५८९९९.
ई-मेल :- adv.ashokpawar@rediffmail.com

निवडणूक निकाल

(१९८-शिरूर)

एकूण मतदार	३,८४,३२३
एकूण वैध मतदान	२,५८,६८०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. अशोक रावसाहेब पवार**	१,४५,१३१ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. बाबुराव पाचर्णे	१,०३,६२७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. चंदन सोंडेकर	३,१४८ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. कैलास नरके	१,९३३ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	१,८२७

पवार, श्री. नितीन अर्जुन

जन्म : ७ ऑक्टोबर, १९६९.

जन्म ठिकाण : नाशिक.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती जयश्री.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : ११७-कळवण (अनुसूचित जमाती), जिल्हा नाशिक.

इतर माहिती : सन २००२ -२००७ सभापती, पंचायत समिती, कळवण; २००७-२०१२ व २०१२- २०१७ सदस्य; जिल्हा परिषद, नाशिक; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : मु. पो. दळवट, तालुका कळवण, जिल्हा नाशिक .

दुरध्वनी :- (०२५३) २५१४२७६.
मोबाईल :- ८८८८७८७४००/ ९४०४२४९९९९.
ई- मेल :- nitinpawar74@gmail.com

निवडणूक निकाल	
(११७ – कळवण (अनुसूचित जमाती))	
एकूण मतदार	२,६८,७५७
एकूण वैध मतदान	१,९४,९९४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नितीन अर्जुन पवार**	८६,८७७ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) कॉ. जीवा गावित	८०,२८१ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया - मार्क्सिसिस्ट)
(३) श्री. मोहन गांगुर्डे	२३,०५२ (शिवसेना)
(४) नोटा	२,०४८
(५) श्री. राजेंद्र ठाकरे	१,१५७ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

पवार, श्री. माधवराव निवृत्तीराव

जन्म : ९ ऑगस्ट, १९७२.

जन्म ठिकाण : जवळगाव, तालुका हिमायतनगर, जिल्हा-नांदेड.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अनिता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ८४- हदगाव, जिल्हा- नांदेड.

इतर माहिती : अध्यक्ष, कै. महादजी पाटील विद्यालय, कांडली (बु), तालुका हिमायतनगर; अध्यक्ष, कै. महादजी पाटील कला, वाणिज्य महाविद्यालय, तामसा; सरपंच, ग्रामपंचायत, जवळगाव; चेअरमन, वसंतराव नाईक, सहकारी साखर कारखाना, पुसद; २००१-२००५ तालुका अध्यक्ष, काँग्रेस कमिटी, पुसद; सन २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायतराज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, कबड्डी व सामाजिक कार्य.

पत्ता : मु.पो.जवळगाव, तालुका हिमायतनगर,
जिल्हा नांदेड- ४३१ ८०२.
दूरध्वनी : (०२४६८) २५८२०१.
मोबाईलः ९१३०१३९००७/ ९६७३३९९७९७.
ई - मेलः madhavrao0707@gmail.com

निवडणूक निकाल

(८४- हदगाव)

एकूण मतदार	२,७९,३७९
एकूण वैध मतदान	१,९५,७९९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. माधवराव निवृत्तीराव पवार**	७४,३२५ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. सभांराव ऊर्फ बाबूराव कदम	६०,९६२ (अपक्ष)
(३) श्री. नागेश आष्टीकर-पाटील	४४,१४३ (शिवसेना)
(४) श्रीमती भारती सुदर्शन रामभारती	१०,८५६ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. रामचंद्र राठोड	९०७ (बहुजन समाज पार्टी)

पवार, श्री. राजेश संभाजीराव

जन्म : १४ ऑगस्ट, १९७२.

जन्म ठिकाण : नांदेड.

शिक्षण : बी.ई (मेकॅनिकल).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती पूनम.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ८९-नायगाव, जिल्हा-नांदेड.

इतर माहिती : सचिव, न्यू जयभारत शिक्षण प्रसारक मंडळ, या संस्थेमार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या; महिलासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन; दोन वर्षे प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा; पाच वर्षे कार्यकारिणी सदस्य, भारतीय जनता पक्ष; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरिका, इटली, फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लॅंड, इंडोनिशिया, दुबई व सौदी अरेबिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : संगीत, प्रवास, फोटोग्राफी व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) भाग्यलक्ष्मी निवास, फुलेनगर, नांदेड ४३१६०२.

(२) कक्ष क्र. २१५ अ, आकाशवाणी, आमदार निवास, मुंबई ४०००३२.

दूरध्वनी :- निवास- ८६०५०५५५५५.

कार्यालय :- ७९७७९३८१८८.

मोबाईल क्र. ९८२३०६०००.

ई-मेल :- mlarajeshpawar@gmail.com

निवडणूक निकाल

(८९-नायगाव)

एकूण मतदार	२,८३,४१३
एकूण वैध मतदान	२,१०,०११
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजेश संभाजीराव पवार**	१,१७,७५० [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. वसंतराव चव्हाण	६३,३६६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. मारोतराव कावले	२३,००५ वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. अनिकेत शिंदे	१,२२१ (संभाजी ब्रिगेड पार्टी)
(५) नोटा	९६०

पवार, श्री. रोहित राजेंद्र

जन्म : २९ सप्टेंबर, १९८५

जन्म ठिकाण : बारामती, जिल्हा पुणे.

शिक्षण : बी.एम.एस.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कुंती.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २२७-कर्जत-जामखेड, जिल्हा-अहमदनगर.

इतर माहिती : उपाध्यक्ष, वेस्टर्न इंडियन शुगर आसोसिएशन; माजी अध्यक्ष; इंडियन शुगर मिल्स आसोसिएशन; कार्यकारी सदस्य, वसंतराव शुगर इन्स्टिट्युट; २०१७-२०१९ सदस्य, व स्थायी समिती सदस्य, जिल्हा परिषद, पुणे; सृजन संस्थेच्या माध्यमातून भजन स्पर्धांचे आयोजन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; युवक रोजगार मेळाव्यांचे आयोजन; झी "युवा गौरव" पुरस्काराने सन्मानीत. सदस्य, भटक्या जाती, विमुक्त जमाती कल्याण समिती; सदस्य, वातावरणीय बदलांसदर्भातील संयुक्त तदर्थ समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व ब्राझील इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व क्रिकेट.

पत्ता : (१) ६०१ सुभद्रा बाग, पिंपळी, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे-४१३१०२.

(२) सृजन हाऊस, भोसले गार्डन हॉटेल, टेरीटरी
शेजारी, हडपसार, पुणे.
मोबाईल :९८२२८२२१११.
ई-मेलः rrp@rohitpawar.org.

निवडणूक निकाल

(२२७-कर्जत-जामखेड)

एकूण मतदार	३,२०,८४३
एकूण वैध मतदान	२,३८,३६०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रोहित राजेंद्र पवार**	१,३५,८२४ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) प्रा. राम शिंदे	९२,४७७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. अरुण जाधव	३,८४९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. राम शिंदे	२,०७० (अपक्ष)
(५) नोटा	८६७

पवार, ॲड. लक्ष्मण माधवराव

जन्म : २७ जानेवारी, १९७४

जन्म ठिकाण : गेवराई, जिल्हा-बीड.

शिक्षण : एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती भाग्यश्री.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २२८- गेवराई, जिल्हा-बीड.

इतर माहिती : सन २०१३-२०१५ सरचिटणीस, बीड जिल्हा भारतीय जनता पक्ष; २००७-२०१४ नगरसेवक व उपनगराध्यक्ष तसेच १७ जून, २००९ ते १७ डिसेंबर, २०११ नगराध्यक्ष, नगरपालिका, गेवराई; शंकररावजी कवडे प्रतिष्ठान गेवराईतर्फे "आदर्श नगरसेवक" पुरस्काराने सन्मानीत; व्यापारी असोसिएशन गेवराईतर्फे 'आदर्श नगराध्यक्ष' पुरस्काराने सन्मानीत; जाधव फाऊंडेशन पुणेचा "आदर्श आमदार" पुरस्कार प्राप्त; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व क्रिकेट खेळणे व पाहणे.

पत्ता : भगवती निवास, कोल्हेर रोड, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

दूरध्वनी : निवास - (०२४४७)२६२०७३.
मोबाईल - ९७६३७२४४२४.
ई-मेल - pawarlaxman23@gmail.com

निवडणूक निकाल

(२२८-गेवराई)

एकूण मतदार	३,५२,३७५
एकूण वैध मतदान	२,६१,५५४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. लक्ष्मण माधवराव पवार**	९९,६२५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. विजयसिंह पंडित	९२,८३३ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. बदामराव पंडित	५०,८९४ (अपक्ष)
(४) श्री. विष्णु देवकाते	८,३०६ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. भाऊराव प्रभाळे	१,६६२ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया)

पाचपुते, श्री. बबनराव भिकाजी

जन्म : ९ सप्टेंबर, १९५४.

जन्म ठिकाण : काष्टी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा- अहमदनगर.

शिक्षण : बी.ए. (ऑनर्स).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी डॉ. श्रीमती प्रतिभा.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २२६- श्रीगोंदा, जिल्हा- अहमदनगर.

इतर माहिती : श्रीगोंदा ग्रामविकास शिक्षण संस्थेमार्फत १९८२ मध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय तसेच श्रीगोंदा तालुक्याच्या ग्रामीण भागात माध्यमिक विद्यालय सुरू केले, काष्टी गावात इंटिग्रेटेड कॅम्प उभा करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कमी खर्चात शिक्षणाची सोय केली; बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्टमार्फत इंजिनिअरिंग कॉलेज, फार्मसी कॉलेज, सीबीएसी व पॉलिटेक्निक कॉलेज सुरू केले; खाजगी दूध संघ व खाजगी साखर कारखाना सुरू केला; दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या छावण्या सुरू केल्या; सामूहिक विवाहांचे आयोजन; दारुबंदी तसेच आरोग्यविषयक

शिबिरांचे आयोजन; अनेक ठिकाणी प्रवचनाद्वारे जनजागृती केली; शेतकऱ्यांच्या सहलीचे आयोजन केले; २००४ व २००६ मध्ये आषाढी वारीच्या दिंडीत सहभागी; २२ जुलै, १९८२ रोजी घोडनदीच्या पुरात वाहून जाणाऱ्या व्यक्तींचे प्राण वाचविल्याबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते "जीवन रक्षा" पुरस्काराने गौरव; १९८२-९२ चेअरमन व १९९७ पासून संचालक, दि श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना, लि., १९८४-१९८८ प्रदेशाध्यक्ष, युवा जनता, राज्य शाखा; १४ नोव्हेंबर, १९९९ ते ३१ मार्च, २००३ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; सन २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य, १९७८-८० सदस्य, पंचायत समिती, श्रीगोंदा; १९८०-८५, १९८५-९०, १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९ २००९-२०१४; सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; नोव्हेंबर, १९९१ ते मार्च, १९९३ गृह, कामगार, विधी व न्याय, अर्थ व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००४ ते नोव्हेंबर, २००९ वन खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, २००९ ते ऑक्टोबर, २०१४ आदिवासी विकास खात्याचे मंत्री. ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : इस्त्राईल, स्विर्त्झलँड, चीन, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, सिंगापूर व दूबई इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : व्यायाम, योगासन, प्रवचन, कुस्ती, पोहणे व ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा यांसारख्या धार्मिक ग्रंथाचे नियमित वाचन.

पत्ता : (१) मु.पो. काष्टी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा-अहमदनगर- ४१३ ७०१.

दूरध्वनी : (०२४८७) २३१५५४.
२३१७५४, २२२३४६.
फॅक्सः (०२४८७)२२२२४६.
(२) माऊली निवास, श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर ४१३ ७०१.
मोबाईल :- ९४२२२२१५५४.
ई- मेल :- babanrao5pute@gmail.com

निवडणूक निकाल

(२२६- श्रीगोंदा)

एकूण मतदार	३,११,९९२
एकूण वैध मतदान	२,११,३११
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. बबनराव भिकाजी पाचपुते**	१,०३,२५८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. घनःश्याम शेलार	९८,५०८ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. मच्छिंद्र सुपेकर	३,१७५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,५७५
(५) श्री. गोपीनाथ टिळक	१,१९५ (संभाजी ब्रिगेड पार्टी)

पाटणी, श्री. राजेंद्र सुखानंद

जन्म : १९ जून, १९६४.

जन्म ठिकाण : वाशिम.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती बबिता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ३५-कांरजा, जिल्हा-वाशिम.

इतर माहिती : अध्यक्ष, लिओ क्लब, जैन संघटना, वाशिम; सदस्य, लायन्स क्लब; अध्यक्ष, जैन युवा संघटना; उपाध्यक्ष, व्यापारी असोसिएशन; अध्यक्ष, अकोला-बुलडाणा-वाशिम पेट्रोल डिलर्स असोसिएशन; संचालक, वाशिम अर्बन को-ऑप बँक लि.; सदस्य, नगरपालिका, वाशिम; २०१५-२०२० जिल्हाध्यक्ष, वाशिम जिल्हा, भारतीय जनता पक्ष; १९९८-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; २००४-२००९, २०१४-२०१९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधिमंडळाच्या रोजगार हमी योजना समिती, लोकलेखा समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, उपविधान समिती, आश्वासन समिती व सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा खात्याच्या

स्थायी समितीचे सदस्य; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : ऑस्ट्रेलिया, न्युझिलँड, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम, हाँगकाँग, चीन, ईस्त्रायल, तुर्की, इंग्लंड, फ्रान्स, नेदरलँड व स्विर्त्झलँड इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) १२,जवाहर कॉलोनी, वाशिम.

दूरध्वनी : निवास - (०७२५२)२३५१०७.
कार्यालय - (०७२५२) २३२२१३.
मोबाईल - ९४२३१२८२८६/ ९९२३०७९७६७.
ई-मेल - rspatni64@gmail.com.
(२) ब/१३०६, मुथालिया रेसिडेंसी, हकोबा सेंटरसमोर,
दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई - ४०००३३.

निवडणूक निकाल

(३५-कांरजा)

एकूण मतदार		३,०१,६५४
एकूण वैध मतदान		१,८६,३४२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. राजेंद्र सुखानंद पाटणी**	७३,२०५ [भारतीय जनता पक्ष]
(२)	श्री. प्रकाश डहाके	५०,४८१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३)	श्री. मोहमद युसुफ मोहमद शफी पुंजानी	४१,९०७ (बहुजन समाज पार्टी)
(४)	श्री. राम शेषराव चव्हाण	१२,४९३ (वंचित बहुजन आघाडी)
(५)	श्री. सुभाष राठोड	२,१६० (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

पाटील, श्री. अनिल भाईदास

जन्म : ७ जुलै, १९६८.

जन्म ठिकाण : जळगाव.

शिक्षण : एम.कॉम., डी.एलएल. अँड एल.डब्लू.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती जयश्री.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १५-अमळनेर, जिल्हा जळगाव.

इतर माहिती : सन २००२-२००७ व २००७-२०१२ सदस्य, जिल्हापरिषद, जळगाव; सन २००४ ते २०१४ सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; २०१० पासून संचालक, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; माजी जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; सन २०१९ पासून प्रदेश कार्यकारणी सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; प्रतोद, विधीमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : इटली, हॉलंड, इंग्लंड, फ्रान्स, सिंगापूर, जर्मनी, चीन, स्वित्झर्लँड व दुबई इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : पर्यटन, प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे, जुन्या वास्तूंची पाहणी करणे आणि निसर्ग सानिध्यात फिरणे.

पत्ता : (१) सिध्दिविनायक कॉलनी, धुळे रोड, अमळनेर, जिल्हा जळगांव.

(२) खोली क्र. ३०७ आकाशवाणी आमदार निवास,
मुंबई- ४०० ०२०.
मोबाईल :- ९४२२२९२०००/ ९८५०२९२०००.
ई-मेल :- abpatil2006@gmail.com

निवडणूक निकाल

(१५-अमळनेर)

एकूण मतदार	२,९३,६४८
एकूण वैध मतदान	१,८४,९०६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अनिल भाईदास पाटील**	९३,७५७ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२) श्री. शिरीष चौधरी	८५,१६३ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. श्रावण वंजारी	१,९०९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,५०३
(५) श्री. अनिल पाटील	१,०६१ (अपक्ष)

पाटील, श्री. किशोर (अप्पा) धनसिंग

जन्म : १ नाव्हेंबर, १९६९.

जन्म ठिकाण : अंतुर्ली, खु.।।.प्र. प्रा., तालुका-पाचोरा, जिल्हा-जळगाव.

शिक्षण : बी.एस्सी. (केमिस्ट्री).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व अहिराणी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनिता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १८ -पाचोरा, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : १९९३-२००० महाराष्ट्र पोलिस खात्यात पोलिस कॉन्स्टेबल म्हणून सेवा; शिवसेना जळगाव जिल्हाप्रमुख; एस.टी. कामगार सेना, जिल्हाप्रमुख; सुसज्ज ग्रंथालय सुरु केले; रुग्णवाहिका सुरु केली; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; गरीब रुग्णांना मदत; २००९-२०१४ संचालक, २०१५-२०२० उपाध्यक्ष, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; २०१५-२०२० संचालक, जळगाव जिल्हा दुध उत्पादक संघ; २००१ नगराध्यक्ष, नगरपालिका, पाचोरा; सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय "जाणिव" पुरस्काराने सन्मानीत; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१७ सदस्य, भटक्या विमुक्त जाती कल्याण

समिती; २०१७-२०१९ सदस्य, पंचायत राज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : सन २०१८ मध्ये युरोपचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, कुस्ती व कबड्डी.

पत्ता : (१) 'सिंहगड', चिंतामणी कॉलनी, भडगाव रोड, पाचोरा, जिल्हा जळगाव - ४२४२०१.

(२) रुम नं. ५०९, आकाशवाणी आमदार निवास, मुंबई.
दूरध्वनी : कार्यालय - (०२५९६)२४०३२९.
मोबाईल - ९८६०८९९०९१, ९४२२२८४५९९.
ई-मेल – kishorpatil069@gmail.com

निवडणूक निकाल

(१८ -पाचोरा)

एकूण मतदार	३,१५,४४४
एकूण वैध मतदान	२,०१,४१७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. किशोर (अप्पा) धनसिंग पाटील**	७५,६९९ (शिवसेना)
(२) श्री. अमोल शिंदे	७३,६१५ (अपक्ष)
(३) श्री. दिलीप वाघ	४४,९६१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. नरेश पाटील	३,२१४ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,७२४

पाटील, श्री. कुणाल (बाबा) रोहिदास

जन्म : १८ सप्टेंबर, १९७४.

जन्म ठिकाण : धुळे.

शिक्षण : बी.ई. (इन्स्ट्रुमेंटेशन).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व अहिराणी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अश्विनी.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : उद्योग.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ६-धुळे (ग्रामीण), जिल्हा-धुळे.

इतर माहिती : अध्यक्ष, श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्था, धुळे; उपाध्यक्ष, जवाहर मेडिकल फाऊंडेशन, धुळे; सचिव, जवाहर एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई; अध्यक्ष, जवाहर सामाजिक कृतज्ञता ट्रस्ट, धुळे; चेअरमन, जवाहर शेतकरी सहकारी सुतगिरणी, धुळे; सन २०१२-२०१६ संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ, लि. नागपूर; २००६-२००९ अध्यक्ष, धुळे जिल्हा युवक काँग्रेस; फेब्रुवारी, २०१८ पासून कार्याध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; भारतीय जलसंस्कृती मंडळाच्या जलतज्ञ डॉ. माधवराव चितळे यांच्या हस्ते "जलगौरव" पुरस्काराने सन्मानीत; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१७ सदस्य, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती, २०१७-२०१९ सदस्य, अंदाज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : जर्मनी, स्वित्झर्लॅंड, ऑस्ट्रेलिया, स्विडन, नेदरलॅन्ड, फ्रान्स, दुबई, सिंगापूर, चीन, हाँगकाँग, भुतान व थायलंड इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्ये.

पत्ता : (१) २३, नेहरु हौसिंग सोसायटी, देवपूर, धुळे - ४२४००२.

दूरध्वनी : निवास व कार्यालय (०२५६२)२७५९०१/०२/०३/०४/०५.
फॅक्स - ०२५६९-२७५९०४.
मोबाईल - ९७६९१११८८८.
ई-मेल - iamkunalpatil@gmail.com
(२) ३०३, पुर्णा वरळी सागर को-ऑप. हौ. सोसायटी,
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
दूरध्वनी : निवास - (०२२) २४९७१५१५/२४९७१५१६.
कार्यालय - (०२२) २४९८३६०७/२४९८३६०८.

निवडणूक निकाल

(६-धुळे- ग्रामीण)

एकूण मतदार	३,७२,९८९
एकूण वैध मतदान	२,४५,३४७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. कुणाल (बाबा) रोहिदास पाटील**	१,२५,५७५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(२) श्रीमती ज्ञानज्योती पाटील	१,११,०११ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. राजदीप आगळे	४,२१६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	२,२४८
(५) श्री. नंदु बैसाणे	१,४७१ (बहुजन समाज पार्टी)

पाटील (घाडगे), श्री. कैलास बाळासाहेब

जन्म : २५ फेब्रुवारी, १९८१.

जन्म ठिकाण : देव धानोरा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

शिक्षण : डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शुभांगी.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २४२-उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद.

इतर माहिती : चेअरमन, भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था, मर्या. उस्मानाबाद; संचालक, जिल्हा सहकारी बोर्ड; २०१८ पासून जिल्हाप्रमुख, शिवसेना, धाराशीव (उस्मानाबाद); २००७-२०१२ सरपंच व २०१२ ते २०१७ उपसरपंच; २०१७ ते २०१९ सदस्य, जिल्हा परिषद, उस्मानाबाद; जलयुक्त शिवार योजनेच्या अंमलबजावनीत पुढाकार घेवून सारोळा परिसरात १४ कोल्हापुरी बंधारे, ८ सिमेंट बंधाऱ्यांचे खोलीकरण व रूंदीकरण केले; ४ नवीन सिमेंट बंधारे बांधले एकूण ९ किलोमीटर रूंदीकरण व खोलीकरण केले; या कामाची पहाणी करून जलतज्ञांकडून तसेच शासनाकडून गौरव; २०१३ मध्ये २५० शेतकऱ्यांना सोबत घेवून व्ही. आर. डी. कंपनी स्थापन

केली; दरवर्षी ३००० शेतकऱ्यांना सदर कंपनीद्वारे विविध योजनेचा लाभ; कृषी यंत्रिकीकरण योजनेतून पेरणी ते काढणी यांत्रिक पध्दतीने ३०० एकरावर एकत्रित प्रयोग; कृषी क्षेत्रातील विविध कामाची दखल घेवून फेब्रुवारी, २०१६ मध्ये ए. बी.पी माझा तर्फे "शेती सन्मान" पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन, संगीत व पर्यटन.

पत्ता : (१) समर्थ नगर, करंजकर हॉस्पिटलच्या मागे, उस्मानाबाद ४१३५०१

(२) रूम नं. ६०३ आकाशवाणी आमदार निवास. मुंबई.
मोबाईल : ९९२२५५४१११/ ९४२३३९६३१
ई- मेलः Patil.kailas3@gmail.com

निवडणूक निकाल

(२४२-उस्मानाबाद)

एकूण मतदार		३,५३,६४७
एकूण वैध मतदान		२,१६,४१८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे)**	८७,४८८ (शिवसेना)
(२)	श्री. संजय निंबाळकर	७४,०२१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३)	श्री. अजित पिंगळे	२०,५७० (अपक्ष)
(४)	श्री. धनंजय शिंगाडे	१५,७५५ (वंचित बहुजन आघाडी)
(५)	श्री. सुरेश पाटील	१०,०१४ (अपक्ष)

पाटील, श्री. गुलाबराव रघुनाथ

जन्म : ५ जून, १९६७.

जन्म ठिकाण : बोरखेडा, तालुका-धरणगाव, जिल्हा-जळगाव.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व मारवाडी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मायाबाई.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १४-जळगाव-ग्रामीण, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : सन २००८ पासून संस्थापक - अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय माध्यमिक विद्यालय, पाळधी; सन २०१२ पासून अध्यक्ष, पद्मालय शिक्षण प्रसारक मंडळ, म्हसावद; गरीब व अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि उन्नतीसाठी विविध मदत कार्य; रक्तदान-शिबिरांचे आयोजन; सामाजिक अन्यायाविरुध्दच्या जनआंदोलनात सक्रिय सहभाग; १९९२-९७ सदस्य व १९९७-९८ सभापती, पंचायत समिती; एरंडोल; १९९७-९९ सदस्य व सभापती, कृषी समिती, जिल्हा परिषद, जळगाव; १९९२-९७ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, धरणगाव;

१९९६-९९ सदस्य, म्हाडा, नाशिक विभाग; १९८४-८९ शिवसेना पक्षाचे शाखाप्रमुख, उप तालुका प्रमुख व १९९६ जिल्हा प्रमुख; २००३ उपनेता म्हणून कार्य; शिवसेनेची मुलुख मैदानी तोफ म्हणून विशेष ओळख; १९९९-२००४, २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या पंचायत राज, रोजगार हमी, अंदाज समिती व आश्वासन समितीचे सदस्य; जुलै, २०१६ ते नोव्हेंबर, २०१९ सहकार खात्याचे राज्यमंत्री; परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० पासून पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री.

छंद : वाचन, गायन, क्रिकेट, नाटक बघणे, नाटकात अभिनय करण्याची आवड व विविध चांगले प्रेक्षणीय स्थळे पहाणे.

पत्ता : (१) मु. पो. पाळधी बु.।, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव-४२५१०३.

दूरध्वनी : कार्यालय - (०२५८८) २५५३९९.
मोबाईल - ९८८१७३०६२०.
ई-मेल : ministerwssd@gmail.com.
(२) महाराणा प्रताप चौक, पाळधी बु.।, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव.
(३) क-१ बंगला, मादाम कामा रोड, मुंबई.
दूरध्वनी : निवास - (०२२) २२०२२५४०, २२०४६११४.
कार्यालय - (०२२) २२०२५२४१, २२०२५२२५.

निवडणूक निकाल

(१४-जळगाव-ग्रामीण)

एकूण मतदार	३,१५,६७२
एकूण वैध मतदान	१,९८,३६३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील**	१,०५,७९५ (शिवसेना)
(२) श्री. चंद्रशेखर अत्तरदे	५९,०६६ (अपक्ष)
(३) श्रीमती पुष्पा महाजन	१७,९६२ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. जितेंद्र देशमुख	५,८३० (अपक्ष)
(५) श्री. मुकुंद रोटे	२,६३५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

पाटील, श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी

जन्म : १४ सप्टेंबर, १९७३.

जन्म ठिकाण : नशिराबाद, जिल्हा-जळगाव.

शिक्षण : बी.ए.(भाग ३).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती यामिनी.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : २०-मुक्ताईनगर, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : सन १९९८ शिवसेना तालुका प्रमुख; २००८-२०१९ शिवसेना जळगाव जिल्हा प्रमुख; २००७-२०१२ सदस्य, जिल्हा परिषद, जळगाव; सामाजिक कार्याबद्दल सन २०१९ मध्ये लोकमत समुहातर्फे "आय कॉन ऑफ द खानदेश" पुरस्काराने सन्मानीत; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : आय.सी.आय.सी. बँके जवळ, भुसावळ रोड, मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव.

मोबाईल : ९४२२९७६५५५/ ९९७०८११५५५.
दूरध्वनी : (०२५८३) २३५३५५.
ई- मेल : pchandrakant265@gmail.com

निवडणूक निकाल (२०-मुक्ताईनगर)	
एकूण मतदार	२,९०,१७५
एकूण वैध मतदान	१,९६,२२०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील**	९१,०९२ (अपक्ष)
(२) श्रीमती रोहिणी खडसे	८९,१३५ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. राहूल पाटील	९,७५१ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,८०६
(५) श्री. भगवान इंगळे	१,५८५ (बहुजन समाजवादी पार्टी)

पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू

जन्म : १० जून, १९५९.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अंजली.

व्यवसाय : टेलिकॉम मार्केटिंग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २१०-कोथरूड, जिल्हा पुणे.

इतर माहिती : सन १९७७ -१९८०विद्यार्थी कार्यकर्ता; १९८०-१९९३ पुर्णवेळ कार्यकर्ता व १९९०-१९९३ राष्ट्रीय सरचिटणीस, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद; सचिव, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई; १९९५-९९ सहकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कोल्हापूर; विभाग; २००४-२००७ चिटणीस व दक्षिण महाराष्ट्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००७-२०१० प्रदेश सरचिटणीस, २०१०-२०१५ प्रदेश उपाध्यक्ष, जुलै, २०१९ पासून प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; सन २००८-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; ऑक्टोबर, २०१४ ते ऑक्टोबर, २०१९ महसुल व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री; २०१४-२०१९ विधान परिषदेचे सभागृह नेते; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन, संगीत ऐकणे व मैत्री करणे.

पत्ता : ७५९/१/३, छत्रपती संभाजी पार्क, संभाजीनगर स्टँडसमोर, कोल्हापूर ४१६००७.

दूरध्वनी : (०२३१)- २३२३१८५.
मोबाईलः ९४२२३०४१५०.

निवडणूक निकाल

(२१० - कोथरूड)

एकूण मतदार	४,०४,८५८
एकूण वैध मतदान	१,९५,१५७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील**	१,०५,२४६ (भारतीय जनता पक्ष)
(२) ॲड. किशोर शिंदे	७९,७५१ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(३) नोटा	४,०२८
(४) ॲड. दिपक शामदिरे	२,४२८ (वंचित बहुजन आघाडी)
(५) डॉ. अभिजित मोरे	१,३८० (आम आदमी पार्टी)

पाटील, श्री. चिमणराव रुपचंद

जन्म : २० मार्च, १९५०.

जन्म ठिकाण : देवगाव, तालुका पारोळा, जिल्हा- जळगाव.

शिक्षण : एम्.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नलीनी.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १६- एरंडोल, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : सन १९८१-८७ संचालक, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्था; १९८९ सदस्य, राहुरी कृषी विद्यापीठ; अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडापद्धती, बालविवाह, भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात सहभाग; सामाजिक शांतता, जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्न; देवगाव व पारोळा येथे फलोत्पादन प्रकल्प निर्मिती; व्यक्तिमत्त्व विकास शिबिरांचे आयोजन; गरजू व गरीब रुग्णांसाठी रुग्णवाहिकेची सोय केली; महात्माफुले-शाहू आंबडेकर यांच्या विचारांच्या प्रसारासाठी प्रबोधन शिबिरांचे आयोजन; नागरीकांमध्ये वाचन संस्कृती वाढावी यासाठी सार्वजनिक वाचनालय सुरू केले;

१९८४ कै. तात्यासाहेब रु. फ. पाटील शिक्षण मंडळ, देवगांव स्थापन केले, या संस्थेमार्फत ८ माध्यमिक, २ प्राथमिक, १ उच्च माध्यमिक, २ किमान कौशल्य अभ्यासक्रम, २ आश्रमशाळा, १ मुकबधिर विद्यालय, १ आय.टी.आय. बालवाडया, अंगणवाड्या सुरू केल्या; नवनाथ मित्र मंडळ व श्रीराम मंदिर ट्रस्टतर्फे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; शेतीचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आंदोलन तसेच; मोर्चाचे आयोजन; मतदारसंघात सिंचनक्षमता वाढावी यासाठी प्रयत्न; नगराध्यक्ष, पारोळ नगरपरिषद; १९७८ पासून संचालक, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; २००१-२००४ संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक; चेअरमन, १९८७-९१ जळगाव जिल्हा दूध विकास महासंघ; १९८९-९८ संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण विकास बँक; १९९५-९८ संचालक व १९९८-९९ मुख्य प्रशासक, वसंत सहकारी साखर कारखाना, कासोदा, जिल्हा जळगाव; १९८१ पासून संचालक पारोळा कृषी उत्पन्न बाजार समिती; १९९१ पासून संचालक, पारोळा, तालुका देखरेख सहकारी संघ; सन २००८ मध्ये दिबेस्ट सिटिझन ऑफ इंडिया पुरस्काराने सन्मानित; सन २०१९ उपाध्यक्ष, तापी खोरे पाटंबधारे विकास महामंडळ; १९९९-२००४, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायतराज समिती, ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : १९८२ फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, इंग्लंड, अमेरिका, जपान, हाँगकाँग, थायलंड व १९९२ नेदरलँड व जर्मनी इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, योगाभ्यास, भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास, संगीत व पर्यटन.

पत्ता : १) साक्षी, गजानन गृहनिर्माण संस्था, चोरवडा रोड, पारोळा, तालुका पारोळा, जिल्हा- जळगाव- ४२५ १११.

२) ब-१३५, मनोरा आमदार निवास, मुंबई.

दूरध्वनी : (०२५९७) २९२३१०/२९३०००.

मोबाईल : ९८२२२६७१००/ ८७८८४०४४२४.

ई-मेलः chimanraopatilmla@gmail.com.

निवडणूक निकाल	
(१६- एरंडोल)	
एकूण मतदार	२,८०,४४१
एकूण वैध मतदान	१,७८,३७५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. चिमणराव रुपचंद पाटील**	८२,६५० (शिवसेना)
(२) डॉ. सतिश पाटील	६४,६४८ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. गोविंद शिरोळे	२४,५८७ (अपक्ष)
(४) श्री. गौतम पवार	२,३०३ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,९९५

पाटील, श्री. राणाजगजितसिंह पद्मसिंह

जन्म : ३० ऑक्टोबर, १९७१.

जन्म ठिकाण : सोलापूर.

शिक्षण : बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अर्चना.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती व उद्योग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २४१-तुळजापुर, जिल्हा-उस्मानाबाद.

इतर माहिती : अध्यक्ष, तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, या संस्थेमार्फत ग्रामीण भागातील मुलांसाठी शिक्षणाची सोय केली; अनेक शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन; उस्मानाबाद तालुक्यात ४२ गावांमध्ये पशु वैद्यकीय शिबिरांचे अयोजन; तसेच तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत गरीब-गरजू विद्यार्थ्यांना मदत; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; गरीब व गरजू रुग्णांना मदत; उजनी धरणातून १०८ कि.मी. अंतराची "पाणी पुरवठा योजना" उस्मानाबद शहरासाठी सुरु केली; उस्मानाबाद शहरालगत कौंडगाव येथे औद्योगिक वसाहतीची स्थापना केली; महाजनेकाच्या ५० मेगा वॅट सोलार ऊर्जा निर्मिती प्रकल्पास मंजूरी मिळविली; दुष्काळी परिस्थितीमध्ये नागरिकांच्या

सुविधेसाठी टँकरद्वारे टंचाई काळात विनामूल्य पाणीपुरवठा केला; २००४ उस्मानाबाद तालुक्यात ५२००० मोगली एरंड (जॅट्रोफा) रोपांची लागवड केली; ४५ गावांमध्ये ६००० महिलांसाठी शिवण क्लासेस सुरु केले; पुरवठा, रोजगार निर्मीती, कृषी सुधारणा, विविध सहकारी संस्था, साखर कारखाना, रेशीम उद्योग, पॉलिहाऊस विविध उपक्रमांत भरीव योगदान; उस्मानाबाद नगरपरिषद व राज्य शासनाच्यावतीने उस्मानाबाद महोत्सव २००८ चे आयोजन; २००७ मध्ये मराठवाडा साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष; सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन; राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याचे संपर्क प्रमुख व उस्मानाबाद जिल्ह्याचे नेते; सप्टेंबर, २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; २००५-२००८, २००८-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; नोव्हेंबर, २००४ ते डिसेंबर, २००८ कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, रोजगार व स्वयंरोजगार आणि रोजगार हमी योजना खात्याचे राज्यमंत्री; डिसेंबर, २००८ ते नोव्हेंबर, २००९ महसूल व पुनर्वसन, सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, उद्योग व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, युरोप, मारोक्को, थायलंड व मलेशिया इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु. पो. तेर, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

दूरध्वनी : कार्यालय (०२४७२) २२६१९१.
(२) बी-१, पहिला मजला, कॅनॉट मेन्शन, कुलाबा, पोस्ट ऑफिस समोर, कुलाबा, मुंबई - ४००००५.
दूरध्वनी :- निवास - ८८८८६२७७७७.
मोबाईल :- ९८२०२८९७३२.
ई-मेल :- ranapatil@yahoo.com

निवडणूक निकाल

(२४१- तुळजापूर)

एकूण मतदार		३,५२,४४९
एकूण वैध मतदान		२,२८,६४८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. राणा जगजितसिंग पद्मसिंह पाटील**	९९,०३४ (भारतीय जनता पक्ष)
(२)	श्री. मधुकरराव चव्हाण	७५,६८५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३)	श्री. अशोक जगदाळे	३५,३८३ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	श्री. महेंद्र धुरगुडे	७,४५८ (प्रहार जनशक्ती पार्टी)
(५)	श्रीमती महानंदा दुधभाटे	१,४६० (अपक्ष)

पाटील, श्री. जयंत राजाराम

जन्म : १६ फेब्रुवारी, १९६२.

जन्म ठिकाण : सांगली.

शिक्षण : बी.ई. (सिव्हील).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शैलजा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २८३-इस्लामपूर, जिल्हा-सांगली.

इतर माहिती : चेअरमन, राजारामबापू सहकारी साखर कारखाना, लि. साखराळे; चेअरमन, कासेगाव शिक्षण संस्था; चेअरमन, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन; अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ; संचालक, वसंतदादा शुगर इस्टिट्युट, पुणे; सदस्य, अखिल भारतीय साखर संघ; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक; सहकारी बँका, पतसंस्था, सहकारी सूतगिरणी, सहकारी ग्राहक भांडार, शेती पदवीधर संघ व कुक्कुटपालन सहकारी सोसायटी यासारख्या अनेक सहकारी संस्था स्थापना करुन जनसामान्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी व ग्रामीण भागाचा

सर्वांगीण विकास करण्यासाठी अथक परिश्रम घेतले; सदस्य, कार्यकारी मंडळ शिवाजी विद्यापीठ; सदस्य, सांगली जिल्हा व्यसनमुक्ती समिती; सदस्य, राजाराम बापू ज्ञान प्रबोधनी; कौन्सिल मेंबर, इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक कॉलेज, राजाराम नगर; सर्व संस्थाचे काम संगणकाच्या माध्यमातून करण्यामध्ये अग्रेसर; मे, १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; एप्रिल, २०१८ पासून प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९९०-९५, १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; नोव्हेंबर, १९९९ ते डिसेंबर, २००८ अर्थ व नियोजन खात्याचे मंत्री; या काळात १९९९ पूर्वी विस्कटलेली राज्याची घडी योग्य मार्गावर आणण्यासाठी अर्थमंत्री म्हणून प्रदीर्घकाळ योगदान दिले; डिसेंबर, २००८ ते ऑक्टोबर, २०१४ गृह खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, २००९ ते ऑक्टोबर, २०१४ ग्रामविकास खात्याचे मंत्री; या काळात इको विव्हिलेज व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ५०% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ३० डिसेंबर, २०१९ पासून जलसंपदा व लाभक्षेत्र विकास खात्याचे मंत्री व सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री.

परदेश प्रवास : रशिया, युरोपीय देश, इस्त्राईल, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, मॉरिशस व दक्षिण आफ्रिका इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे व प्रवास.

पत्ता : (१) मु. पो. कासेगाव, तालुका वाळवा, जिल्हा सांगली.

(२) राजारामनगर, पो.साखराळे, तालुका वाळवा, जिल्हा सांगली.
दूरध्वनी : कार्यालय - (०२३४२) २२०८६४.
(३) "सेवासदन"मलबारहिल, मुंबई - ४०००३६.
दूरध्वनी :- निवास (०२२) २३६३३६७६/२३६३७०७५.
कार्यालय (०२२) २२०२४८३२ / २२०२६६५८.
मोबाईल :- ९८२१२२२२२८.
ई-मेल :- jayantrp@gmail.com

निवडणूक निकाल (२८३- इस्लामपूर)	
एकूण मतदार	२,७१,२७८
एकूण वैध मतदान	२,००,०१५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. जयंत राजाराम पाटील**	१,१५,५६३ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२) श्री. निशिकांत भोसले पाटील (दादा)	४३,३९४ (अपक्ष)
(३) श्री. गौरव नायकवडी	३५,६६८ (शिवसेना)
(४) श्री. सखीर इस्लाल तांबोली	२,२९५ (वंचित बहूजन आघाडी)
(५) नोटा	१,१९६

पाटील (सडोलीकर), श्री.पी.एन.

जन्म : ६ जानेवारी, १९५३.

जन्म ठिकाण : सडोली- खालसा, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर.

शिक्षण : पदवीपर्यंत.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी कै.जयादेवी.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व उद्योग.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २७५-करवीर, जिल्हा-कोल्हापूर.

इतर माहिती : भोगावती सहकारी साखर कारखान्यामार्फत 'न्यु इंग्लिश मिडीयम स्कूल' ही शाळा सुरु केली; कोल्हापूर शहरात स्व. राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा उभा केला; राजीव गांधी जयंतीनिमित्त भव्य रॅलीचे आयोजन; केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकार विरोधात तसेच, वीज दरवाढी विरोधात मोर्चाचे नेतृत्व; ऊसावरील मावा रोगाची नुकसान भरपाई मिळावी यासाठी मोर्चाचे नेतृत्व; वीस वर्षे संचालक, १९९०-९५ चेअरमन, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; संस्थापक, निवृत्ती खरेदी-विक्री संघ, तालुका करवीर; चेअरमन, राजीवजी सहकारी सूतगिरणी; संस्थापक-चेअरमन, श्रीपतरावदादा सहकारी बँक; १९८५-

९० उपाध्यक्ष व १९९९ अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटी; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : सामाजिक कार्य.

परदेश प्रवास : सिंगापूर व बँकॉक देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : मु.पो. सडाली, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर.

दूरध्वनी :- निवास :- (०२३१) २५३०३३३.
कार्यालय :- (०२३१)२६३१७९७ / २६३१३७३.
फॅक्स :-(०२३१) २६६१६६२.
मोबाईल :- ९८२२४२९२९२.
ई-मेल :- pnpatilsadolikar@ymail.com

निवडणूक निकाल

(२७५ - करवीर)

एकूण मतदार	३,०४,०४४
एकूण वैध मतदान	२,५६,४१३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. पी.एन. पाटील (सडोलीकर),**	१,३५,६७५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(२) श्री. चंद्रदीप नरके	१,१३,०१४ (शिवसेना)
(३) डॉ. आनंद गुरव	४,४१२ (वंचित बहूजन आघाडी)
(४) नोटा	१,२८४
(५) श्री. बजरंग कृष्ण पाटील	७५२ (बहुजन समाज पार्टी)

पाटील, श्री. प्रमोद (राजू) रतन

जन्म : १ जून, १९७४.

जन्म ठिकाण : कल्याण, जिल्हा ठाणे.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी,हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित पत्नी श्रीमती योगिता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : महाराष्ट्र नवनिर्माण सेना.

मतदारसंघ : १४४-कल्याण-ग्रामीण, जिल्हा ठाणे.

इतर माहिती : खाजिनदार, शेतकरी जागृती मंडळ; २००९-२०१३ ठाणे जिल्हा चिटणीस, कामगारसेना; २०१३-२०१६ जिल्हा अध्यक्ष, २०१६-२०१८ सरचिटणीस, सन २०१८ पासून उपनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना; २०१०-२०१२ सदस्य, जिल्हापरिषद, ठाणे; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन, क्रिकेट व पर्यटन.

पत्ता : (१) शांती व्हिला क्र.०६, कासाबेला गोल्फ लिंक, पलावा, कल्याण-शीळ रोड ,डोंबिवली (पूर्व)- ४२१२०४.

(२) योगीराज, व्हिला क्र.०४, कासाबेला गोल्फ लिंक, पलावा,
कल्याण-शीळ रोड, डोंबिवली (पूर्व)- ४२१२०४.
दूरध्वनी :- कार्यालय - ९७०२२२२२८८.
मोबाईल :- ९९८७०००७७.
ई-मेल :- mla@rajupatilmns.com

निवडणूक निकाल

(१४४-कल्याण - ग्रामीण)

एकूण मतदार	४,२४,९७६
एकूण वैध मतदान	१,९७,९१४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील**	९३,९२७ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(२) श्री. रमेश म्हात्रे	८६,७७३ (शिवसेना)
(३) श्री. अमोल केंद्रे	६,१९९ (वंचित बहूजन आघाडी)
(४) नोटा	६,०९२
(५) श्री. शिवा अय्यर	१,१५६ (अपक्ष)

पाटील, श्री.बाबासाहेब मोहनराव

जन्म : ५ डिसेंबर,१९५८.

जन्म ठिकाण : शिरुर- ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा-लातूर.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती चंदा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

मतदारसंघ : २३६-अहमदपूर, जिल्हा-लातूर.

इतर माहिती : सचिव, बाळ भगवान शिक्षण संस्था, या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी के.जी. ते पी.जी. पर्यंतच्या शिक्षणाची सोय केली; शिरूर ताजबंद येथे महिलांसाठी अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र सुरू केले; मुंबई, नांदेडसह अनेक ठिकाणी शाळा महाविद्यालये सुरू केली; मुस्लीम विद्यार्थांसाठी उर्दू शाळा सुरू केल्या; अध्यक्ष, महेश मंदिर ट्रस्ट, शिरूर ताजबंद; सिनेट, सदस्य, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ; सदस्य, शिरूर ताजबंद विविध कार्यकारी सेवा सोसायटी, शिरूर; ताजबंद येथे २० व्या मराठवाडा साहित्य समेलनाचे आयोजन; शिरूर, ताजबंद येथे पुरूष महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन; किणगाव येथे ३० व्या कुमार कबड्डी

स्पर्धेचे आयोजन; शिरूर ताजबंद येथे महावीर केंद्र सुरू केले; पत्रकार व शिक्षक गौरव सन्मान कार्यक्रमाचे आयोजन; वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन; शेतकऱ्यांना पीक विमा मिळावा यासाठी प्रयत्न, शेतकऱ्यांना ६३ कोटी विमा मिळवून दिला; आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत; विद्यार्थांसाठी करिअर मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन; उजना मिल्क प्राडक्टची निर्मिती केली; दुग्ध व्यवसायाला चालना दिली; सिध्दी शुगर कारखाना सुरू केला; महेश बँकेची स्थापना केली; महेश सहकारी पत संस्था सुरू केली; शिरूर येथे वस्त्रउद्योग सुरू केला; अहमदपुर-चाकूर तालुक्यात १०७ बहुउद्देशीत सभागृहे उभारली; शिरूर-ताजबंद येथे १४ कोटीची पाणीपुरवठा योजना सुरू केली; अहमदपूर - चाकूर तालुक्यात विविध विकास कामांना भरीव निधी मंजूर करून आणला; दोन्ही तालुक्यात विकास कामे केली; अहमदपूर शहरात म्हाडा अंतर्गत २०० घराची उभारणी केली; ट्रामा केअर सेंटर मंजूर केले ; लिंबोटी धरणावरील उर्ध्व प्रकल्प अंतर्गत पंधरा वर्षापासून रखडलेली उपसा जलसिंचन योजना सुरू करून अहमदपूर तालुक्यातील सहा हजार हेक्टर जमीन ओलीता खाली आणली; १५ वर्षे सदस्य व ५ वर्षे उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, लातूर; पाचवेळा संचालक व एकवेळ अध्यक्ष, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि.; कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या "वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी" पुरस्काराने सन्मानीत; २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : इंग्लंड, अमेरिका व हॉलंड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रीडा, सामाजिक कार्य व आधुनिक शेती.

पत्ता : मु.पो.शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर-४१३५१४.

दूरध्वनी :- निवास (०२३८१) २२००३१.
मोबाईल :- ९१५८१७५१५१.
ई-मेल :- bmpatil51@gmail.com

निवडणूक निकाल

(२३६-अहमदपूर)

एकूण मतदार	३,२१,३२९
एकूण वैध मतदान	२,१४,९८१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. बाबासाहेब मोहनराव पाटील**	८४,६३६ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२) श्री. विनायकराव जाधव-पाटील	५५,४४५ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. दिलीप देशमुख	४५,८४६ (अपक्ष)
(४) श्रीमती अयोध्या अशोक केंद्रे	२२,१४१ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. हुसेन ताहिर सय्यद	१,९९६ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)

पाटील, श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग

जन्म : २९ जुलै, १९६१.

जन्म ठिकाण : कराड, जिल्हा-सातारा.

शिक्षण : एस.वाय.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती जयमाला.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २५९-कराड-उत्तर, जिल्हा-सातारा.

इतर माहिती : २००८ पासून अध्यक्ष, सह्याद्री शिक्षण संस्था, यशवंतनगर; २००२ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र एज्युकेशन संस्था, कराड; १९९४ पासून गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, शिक्षण मंडळ कराड; २००५ पासून कार्यकारी विश्वस्त, वेणुताई चव्हाण चॅरिटेबल पब्लिक ट्रस्ट, कराड; २०१३ पासून अध्यक्ष, श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी, कराड; २०१४ पासून अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, कराड; १९९२ पासून संचालक व १९९६ पासून चेअरमन, सह्याद्री सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगर; या कारखान्यास राष्ट्रीय साखर संघाकडून १९९८-१९९९ चा केन डेव्हलमेंट द्वितीय क्रमांक ॲवार्ड प्राप्त २०११-२०१२

उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन प्रथम पुरस्कार प्राप्त; २०१२-२०१३ चा तिसरा तसेच केन डेव्हलमेंटचा तृतिय पुरस्कार मिळविला; १९९४-९६ चेअरमन, सह्याद्री ऊस उत्पादक व तोडणी वाहतूक संस्था; अध्यक्ष, पी.डी.पाटील सहकारी बँक लि. कराड; चेअरमन, संजीवनी नागरी सहकारी पतसंस्था, कराड; चेअरमन, कृष्णाई सहकारी दुध उत्पादक संस्था, कराड; सन २०१७ पासून चेअरमन, कराड विकास सेवा सोसायटी; सन २००९ पासून संचालक, नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑप लि., पुणे; सन १९९४ पासून गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु.; २०१६ पासून संचालक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; २०१० पासून संचालक, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ, नवी दिल्ली; डिसेंबर, २००३ पासून उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई; १९९२-१९९९ काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; सन २०१४ पासून प्रदेश प्रतिनिधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१२-२०१४ समिती प्रमुख, अंदाज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० पासून सहकार व पणन खात्याचे मंत्री.

छंद : वाचन, प्रवास व लोकसंग्रह.

परदेश प्रवास : मॉरिशस, स्वित्झर्लंड, ब्राझील, इंग्लंड, इटली, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर व थायलंड इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) फायनल प्लॉट नं. २६०, मंगळवार पेठ, कराड, तालुका कराड, जिल्हा सातारा - ४१५११०.

दूरध्वनी :- निवास- (०२१६४) २२०४४४.
कार्यालय :- (०२१६४) २२२१२२.
(२) क-६, मादाम कामा मार्ग, मंत्रालय समोर, मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी : निवास (०२२) २२८२८२१४, २२८५४६३१.
कार्यालय (०२२) २२८८६०९०, २२८४३७४१.
मोबाईल :- ९८२२०५०४४४.
ई-मेल :- amdbalasahebpatil@gmail.com

निवडणूक निकाल (२५९-कराड-उत्तर)		
एकूण मतदार		२,९४,४७०
एकूण वैध मतदान		१,९९,४४७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील**	१,००,५०९ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२)	श्री.मनोज घोरपडे	५१,२९४ (अपक्ष)
(३)	श्री.धैर्यशिल कदम	३९,७९१ (शिवसेना)
(४)	श्री.सुभाष पिसाळ	३,९८३ (वंचित बहुजन आघाडी)
(५)	श्री.जगन्नाथ लक्ष्मण वाघमारे	१,८२७ (बहुजन समाज पार्टी)

पाटील, श्री. ऋतुराज संजय

जन्म : ३१ मे, १९९०.

जन्म ठिकाण : कोल्हापूर.

शिक्षण : एम.बी.ए. (अमेरिका).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पूजा.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती व उद्योजक.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २७४-कोल्हापूर-दक्षिण, जिल्हा कोल्हापूर.

इतर माहिती : विश्वस्त, डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर; संचालक, डॉ. डी.वाय.पाटील हॉस्पीटॅलिटी, कोल्हापूर; डॉ.डी.वाय.पाटील ट्रस्टच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; गरीब गरजू रूग्णांना मदत; वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन; पन्हाळगड व श्री. क्षेत्र ज्योतिबा स्वच्छता मोहिमेचे आयोजन; गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी दत्तक योजना सुरू केली, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत; विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम व व्यक्तीमत्व विकास शिबीराचे आयोजन; खेळाडुंना सर्वतोपरी मदत; राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन; महिला बचत गटासाठी गृहिणी महोत्सवाचे

आयोजन; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, युरोप, सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट व संगीत.

पत्ता : (१) ५४८ ई वॉर्ड, ज्ञानशांती, मेन रोड, कसबा बावडा, कोल्हापूर-४१६००६.

दूरध्वनी क्र. (०२३१) २६००१९९.
(२) २१२६, ई वॉर्ड, अजिंक्यतारा, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३.
दूरध्वनी :- (०२३१) २६५३२८९०.
मोबाईल:- ९७६४४९५९९९ / ८६००१०५९९९.
ई- मेल :- ruturajpatiloffice.@gmail.com

निवडणूक निकाल

(२७४ - कोल्हापूर-दक्षिण)

एकूण मतदार	३,२४,९८१
एकूण वैध मतदान	२,४३,६४५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. ऋतुराज संजय पाटील**	१,४०,१०३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(२) श्री. अमल महाडिक	९७,३९४ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. बबनराव उर्फ दिलीप कवडे	२,२१९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,९३९
(५) श्री. सचिन कांबळे	८६७ (बहुजन समाज पार्टी)

पाटील, श्री. रविंद्र दगडू

जन्म : १५ ऑगस्ट, १९५०.

जन्म ठिकाण : रावे, तालुका पेण, जिल्हा रायगड.

शिक्षण : एस.वाय.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कौसल्या.

अपत्ये : एकूण ४ (चार मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भातीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १९१-पेण, जिल्हा रायगड.

इतर माहिती : सन १९७६ सदस्य, पेण खरेदी विक्री संघ; १९९० संस्थापक, पेण-पाटणेश्वर को-ऑप. बँक लि.; २००० संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ; १९७० सदस्य, काँग्रेस पक्ष; १९९६ सरचिटणीस व १९९९-२००४ अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी; २०१४-२०१९ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; सप्टेंबर, २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; १९९७ सदस्य, जिल्हा परिषद रायगड; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; नोव्हेंबर, २००४- नोव्हेंबर २००८ सार्वजनिक बांधकाम, वने, पर्यावरण व आदिवासी विकास खात्याचे राज्यमंत्री; डिसेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ पशुसंवर्धन, दुग्धविकास

व मत्स्य व्यवसाय विभागाचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु.पो.रावे, तालुका पेण, जिल्हा रायगड.

(२) वैकुंठ निवास, शिक्षक सोसायटी, अंतोरे रोड, पेण, जिल्हा रायगड ४०२१०७.
दूरध्वनी :- ९४२२०९५७५७.
मोबाईल :- ९८२०००० ३६४.
ई-मेल :- ravishethpatil158@gmail.com

निवडणूक निकाल	
(१९१ - पेण)	
एकूण मतदार	३,०२,०३६
एकूण वैध मतदान	२,१५,९२६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रविंद्र दगडू पाटील**	१,१२,३८० (भारतीय जनता पक्ष)
(२) श्री. धैर्यशील पाटील	८८,३२९ (शेतकरी कामगार पक्ष)
(३) नोटा	२,४७३
(४) श्रीमती नंदा म्हात्रे	२,३३० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(५) श्री. रवि पाटील	१,५६१ (अपक्ष)

पाटील (यड्रावकर), श्री.राजेंद्र शामगोंडा

जन्म : ५ मे, १९७०.

जन्म ठिकाण : सांगली.

शिक्षण : डिप्लोमा (सिव्हिल) इंजिनिअरिंग.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती स्वरुपा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती, व्यापार व उद्योग.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : २८०-शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर.

इतर माहिती : दि ओपन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी फॉर कॉम्प्लेमेंटरी मेडिसीन कोलंबो (श्रीलंका) ची डॉक्टरेट पदवी प्राप्त; अध्यक्ष, शामराव पाटील (यड्रावकर) एज्युकेशनल अँड चॅरिटेबल ट्रस्ट, जयसिंगपूर, या संस्थेमार्फत शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलाजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिग, यड्राव; शरद इन्सिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक, यड्राव; शरद कृषी महाविद्यालय, जैनापूर; शामराव पाटील (यड्रावकर) औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, जयसिंगपूर; दानलिंग विद्यालय, उमळवाड; शरद इंग्लिश मेडिकल स्कुल, यड्राव; शरद प्ले-ग्रुप अँड नर्सरी, यड्राव; शरद कॉम्यूटर इन्स्टिट्युट, यड्राव, तालुका शिरोळ; सुरू करून शिरोळ

तालुक्यातील पाच हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय केली; सल्लागार, राजेंद्र पाटील (यड्रावकर) सोशल फौऊंडेशन, जमसिंगपूर; सल्लागार, राजेंद्र पाटील (यड्रावकर) महाराष्ट्र राज्य मोबाईल टॉवर सुरक्षा रक्षक संघटना; सल्लागार, अपंग कल्याण पुनर्वसन संस्था, जयसिंगपूर; अध्यक्ष, पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट, जमसिंगपूर; अध्यक्ष, श्री. ओंकारेश्वर मंदिर ट्रस्ट, यड्राव; संपादक, दैनिक जागृत लोकनेता, जयसिंगपूर; अध्यक्ष, शरद सहकारी साखर कारखाना, लि.; नरंदे; तालुका हातकणंगले; अध्यक्ष, पार्वती को. ऑफ इंडस्ट्रीयल इस्टेट लि.; यड्राव; अध्यक्ष, पार्वती सहकारी सुतगिरणी लि.; कुरूंदवाड; अध्यक्ष, दि ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को ऑप. स्पिंनिग मिल्स, लि., मुंबई; अध्यक्ष, पद्मावती यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था, मर्या. यड्राव; अध्यक्ष, पार्वती को. ऑप हौसिंग सोसा. लि.; यड्राव, तालुका शिरोळ; अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी औद्योगिक वसाहती फेडरेशन; लि.; अध्यक्ष, यड्राव को. ऑप.बँक लि.; यड्राव, तालुका शिरोळ; संचालक; कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सुतगिरणी लि. यड्राव तालुका शिरोळ; संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर; सदस्य, राष्ट्रीय सहकारी विकास निगम (NCDC), नवी दिल्ली; १९९५-९९ सदस्य, नगरपरिषद, जयसिंगपूर; सामाजिक कार्याबद्दल स्व. मोतिलाल चोरडिया चॅरिटेबल ट्रस्ट, या संस्थेतर्फे जयसिंगपूर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित; आचार्य आदिसागर अंकलिकर ट्रस्ट, उदगाव या संस्थेतर्फे "समाजरत्न" पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड; जानेवारी, २०२० पासून सार्वजनिक आरोग्य व कुटुबंकल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग व सांस्कृतिक खात्याचे राज्य मंत्री;

परदेश प्रवास : चीन, ब्राझील, मॉरीशस, सिंगापूर मलेशीया, थायलंड, दुबई, उजबेकीस्तान इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : कॅरम व सायकलिंग.

पत्ता : (१) निवासः- शामसावि गल्ली नं. ६. नेहरु रोड, जयसिंगपूर, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर - ४१६१०१.

(२) कायमचा पत्ताः- यड्रावकर चेंबर्स, गल्ली न.६. नेहरु रोड,
जयसिंगपूर, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर ४१६१०१.
(३) मुंबईतील पत्ताः- सी.प्लॅट नं.१०६.
मुक्तांगण को.ऑप हौ.सोसा; अप्पर गोविंदनगर,
मालाड (पूर्व), मुंबई.
दूरध्वनी :- ०२३२२-२२८७०८ .
मोबाईल :- ९८२२२६५५५५.
ई-मेल :- rajayadravkar@gmail.com

निवडणूक निकाल

(२८०-शिरोळ)

एकूण मतदार		३,१३,३३०
एकूण वैध मतदान		२,३४,०९८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर)**	९०,०३८ (अपक्ष)
(२)	श्री. उल्हास पाटील	६२,२१४ (शिवसेना)
(३)	श्री. अनिल उर्फ सावकर बाळू मादनाईक	५१,८०४ (स्वाभिमानी पक्ष)
(४)	श्री. अनिल कुमार यादव	१४,७७६ (जनसुराज्य शक्ती)
(५)	श्री. सुनिल खोत	९,५८९ (वंचित बहूजन आघाडी)

पाटील, ॲड. राजेश नरसिंगराव

जन्म : १४ जून, १९६७

जन्म ठिकाण : कोल्हापूर.

शिक्षण : बी.कॉम; एल.एल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुस्मिता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २७१-चंदगड, जिल्हा कोल्हापूर.

इतर माहिती : सन १९९७ पासून सचिव, नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळ, माणगाव; १९९६ पासून संचालक, यशवंत ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था; १९९५ पासून चेअरमन, गुरुवर्य नरसिंगराव पाटील दुध उत्पादक सहकारी संस्था, म्हाळेवाडी; २०१० चेअरमन, दत्तगुरु विकास सेवा संस्था, म्हाळेवाडी; २००६ पासून संचालक, दिपक गुळ उत्पादक सहकारी सोसायटी लि.; कोल्हापूर; २००७ पासून संचालक, चंदगड तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि., तुर्केवाडी; २००४-२००९ अध्यक्ष, चंदगड तालुका संजय गांधी निराधार योजना समिती; २००४-२००९ तालुका कार्यकारणी सदस्य, भारतीय संचार निगम; २०१६-२०१७ महाराष्ट्र राज्य शासनाच्या

"सहकार भूषण" पूरस्कारने सन्मानित; २०१६-२०१७ महाराष्ट्र राज्याचा "अटल महापणन" पुरस्कार प्राप्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : सामजिक कार्य व वाचन.

पत्ता : (१) मु.पो.म्हाळेवाडी, तालुका चंदगड, जिल्हा - कोल्हापूर ४१५६०८.

(२) गुरुकृपा प्लॉट नं, ७६१,बुडास्कीम/४० कूवेंपू नगर, बेळगांव-५९००१०.

(३) खोली क्र. ४१५ आकाशवाणी आमदार निवास, मुंबई.

दूरध्वनी :- (०८३१) २४२३१०/(०२३२०)२३३०३०/२३३३३३.

मोबाईल :- ९४२२४१६४६४ .

ई-मेल :- rajeshpatil1967@gmail.com

निवडणूक निकाल

(२७१ - चंदगड)

एकूण मतदार		३,२१,३०१
एकूण वैध मतदान		२,२०,५४७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**ॲड. राजेश नरसिंगराव पाटील**	५५,५५८ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२)	श्री. शिवाजी पाटील	५१,१७३ (अपक्ष)
(३)	श्री. विनायक उर्फ अप्पी विरगुंडा पाटील	४३,९७३ (वंचित बहूजन आघाडी पक्ष)
(४)	श्री. संग्राम सिंग देसाई कुपेकर	३३,२१५ (शिवसेना)
(५)	श्री. अशोक चराटी	१२,०७८ (जनसुराज्य शक्ती)

पाटील, श्री. राजेश रघुनाथ

जन्म : १ जून, १९७५.

जन्म ठिकाण : मु. वेलवाडी, पो. खानिवडे, तालुका वसई, जिल्हा पालघर.

शिक्षण : एस.वाय.बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती राजश्री.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती व बांधकाम व्यावसायिक.

पक्ष : बहुजन विकास आघाडी.

मतदारसंघ : १३१-बोईसर (अनुसूचित जमाती), जिल्हा-पालघर.

इतर माहिती : सन १९९०-९५ सचिव, मेढे भाताणे आदिवासी विद्यार्थी वसतीगृह, प्रतिष्ठान ट्रस्ट, वसई; सन १९९१ ते १९९४ चिटणीस, आदिवासी समाजोन्नती संघ, वसई; १९९५ सेक्रेटरी, ओम साई मित्र मंडळ; १९९७ सदस्य, शिक्षण सल्लागार समिती, जिल्हा परिषद ठाणे; विशेष कार्यकारी दंडाधिकारी; १९९७ सल्लागार, शासकीय प्राथमिक, माध्यमिक व आश्रमशाळा, भाताणे-बेलवाडी, तालुका वसई; २००३-२००८ अध्यक्ष, आदिवासी एकता परिषद; २००२ संचालक, मेढे-भाताणे, आदिवासी जंगल कामगार सहकारी सोसायटी; २००१ -२०१५ संचालक, ठाणे जिल्हा आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था संघ, जिल्हा ठाणे;

२००५-२००९ सदस्य, दक्षता समिती, वसई; सदस्य, शिक्षण बालक-पालक समिती (स्वयंसेवीसंस्था प्रतिनिधी); २००२ अध्यक्ष, बहुउद्देशीय आदिवासी व ग्रामीण विकास संस्था; २००५ पासून संचालक, ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड; अध्यक्ष आचार्य भिसे गुरुजी वसतीगृह, पालघर; २०१४ पासून सदस्य, प्रतिभा पाटील शिक्षण संस्था संचालित सरस्वती विद्यालय; तिल्हेर; २०१५-२०१६ सदस्य, जैविक विविधता व्यवस्थापन समिती, महानगरपालिका, वसई; संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था संघ (नागपूर); चेअरमन, नादब्रम्ह को.ऑप. हौउसिंग सोसायटी, वसई; संचालक, पालघर जिल्हा हौउसिंग सोसायटी संघ (फेडरेशन); २०१७ पासून अध्यक्ष, श्री बालाजी ॲम्यॅचुअर कल्चरल ॲड स्पोर्टस ॲकाडमी, वसई; सन २००२ - २००५ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, वसई; २००९ पासून संचालक, ठाणे जिल्हा सहकारी बँक लि.; २००२-२००७ सदस्य, २००२-२००५ सभापती, पंचायत समिती, वसई; २००३-२००५ सेक्रेटरी, सभापती संघटना महाराष्ट्र राज्य समिती; १९९७ -२००२ सदस्य, जिल्हा परिषद ठाणे; सदस्य, शिक्षण समिती २००२-२००५ सदस्य, समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद, ठाणे; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : लंडन, फ्रान्स, इटली, जर्मनी, बेल्जीअम, इंग्लंड, हॉलंड, ऑस्ट्रिया, थायलँड, इस्त्राईल, युएसी इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) निवास :- मु. वेलवाडी, पो.खानिवडे, तालुका वसई, जिल्हा पालघर ४०१३०३.

ई-मेल :- rajeshsabhapati@gmail.com
मोबाईल :- ९४२२६८३४२५/९८६०६३०२२२.
दूरध्वनी :- (०२५०) २५०२५४२/२५०२३८०.
(२) कार्यालय : ठाकूर निवास, राजा छत्रपती शिवाजी मार्ग विरार (प), तालुका वसई, जिल्हा पालघर ४०१३०३.

निवडणूक निकाल	
(१३१ - बोईसर (अनुसूचित जमाती))	
एकूण मतदार	३,१५,४३४
एकूण वैध मतदान	२,१२,८५२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजेश रघुनाथ पाटील**	७८,७०३ (बहुजन विकास आघाडी)
(२) श्री. विलास तरे	७५,९५१ (शिवसेना)
(३) श्री. संतोष जनाथे	३०,९५२ (अपक्ष)
(४) श्री. दिनकर वाधन	१४,७८० (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	४,६२२

पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश

जन्म : १७ सप्टेंबर, १९७५.

जन्म ठिकाण : परभणी.

शिक्षण : एम्.बी.बी.एस्.,एम.डी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती डॉ. संप्रिया

अपत्ये : एकूण २ (दोन मुली)

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : ९६-परभणी, जिल्हा-परभणी.

इतर माहिती : सदस्य, युवासेना कोअर कमिटी; अध्यक्ष, दहिहंडी व गणेशोत्सव समिती; अध्यक्ष, परभणी शिक्षण संस्था, या संस्थेमार्फत परभणी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आयुर्वेद महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज व आय-टी-आय. प्रशिक्षण संस्था सुरु केली; छत्तीसगड, मध्यप्रदेश व गोवा या राज्यात शैक्षणिक संस्था सुरु केल्या; परभणी येथे शासकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न; २००३ पासून अध्यक्ष, शंकर सहकारी संस्था मर्या. अनगर; २०१० पासून अध्यक्ष, राज्यस्तरीय कृषी तंत्र व सलग्न संस्था

महासंघ, महाराष्ट्र राज्य; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; जिल्हा ग्रंथालयाची इमारत उभी केली; जलसिंचन वाढावे यासाठी पिंगळगड, नालाव, धामोडा नाल्याचे पुनरूज्जीवन; २००३ पासून कार्यकारी परिषद सदस्य, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर; संस्थापक, जय भवानी महिला सहकारी सुतगिरणी, परभणी; २०११-२०१४ शिवसेना संपर्क प्रमुख, परभणी, नांदेड व औरंगाबाद जिल्हा; २०१४ निरीक्षक, लोकसभा निवडणूक परभणी व औरंगाबाद शिवसेना पक्ष; महाराष्ट्र शासनाच्या 'वनश्री' पुरस्काराने सन्मानित; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१६ सदस्य, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा तदर्थ समिती; २०१५-२०१७ सदस्य, सार्वजनिक बांधकाम समिती, महाराष्ट्र शासन; २०१७-२०१९ सदस्य; उपविधान समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : (१) घर नं. १३८, "तोरणा" स्वामी समर्थ मंदिरासमोर, शिवाजीनगर,परभणी- ४३१४०१.

(२) कक्ष क्र. ६१३ (अ), आकाशवाणी आमदार निवास,
मुंबई- ४०००३२.
दूरध्वनी : निवास - (०२४५२) २२२७०१.
कार्यालय - (०२४५२) २२७५७६.
मोबाईल - ९१५८०१००४७ / ९७६६७१७१७१.
ई-मेल - drrahulpatil77@gmail.com

निवडणूक निकाल

(९६-परभणी)

एकूण मतदार	३,०६,४६०
एकूण वैध मतदान	१,९२,२६०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील**	१,०४,५८४ (शिवसेना)
(२) श्री. मोहम्मद झाईन	२२,७९४ (वंचित बहुजन आघाडी)
(३) श्री. अली खान मोईन खान	२२,७४१ (ऑल इंडिया मजलिस ए –इत्तेहादुल मुस्लिमीन)
(४) श्री. सुरेश नागरे	१८,४३१ (अपक्ष)
(५) श्री.रविराज देशमुख	१५,५८० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)

पाटील, ॲड. शहाजीबापू राजाराम

जन्म : २५ ऑक्टोबर, १९५५.

जन्म ठिकाण : चिकमहुद, तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर.

शिक्षण : बी.एस्सी., एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रेखाताई.

अपत्ये : एकून २ (एक मुलगा व एक मुलगी)

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २५३-सांगोला, जिल्हा सोलापूर.

इतर माहिती : संस्थापक - चेअरमन, राजर्षी शाहु शिक्षण प्रसारक मंडळ, चिकमहुद; अध्यक्ष, तुळजाभवानी महात्मा फुले सहकारी सुतगिरणी, नाझरे, तालुका सांगोला; सदस्य, यशवंत नागरी सहकारी पतसंस्था, सांगोला; चेअरमन, सांगोला तालुका शेतकरी सहकारी साखर कारखाना, वाकी-शिवणे; उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटी; सरचिटणीस, एन.एस. यु.आय. महाराष्ट्र प्रदेश; सप्टेंबर, २०१९ पासून शिवसेना पक्षाचे कार्य; १९७६-८० सदस्य, मॅपको; सदस्य, महाराष्ट्र राज्य कोरडवाहु अभियान समिती; १९९५-९९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, रोजगार हमी योजना समिती; सदस्य, आमदार निवास आहार व्यवस्था समिती;

ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : अध्यात्मिक वाचन

पत्ता : (१) मु.पो.चिकमहूद, तालुका सांगोला, जिल्हा.सोलापूर ४१३३०६.

(२) कक्ष क्र.३१२ अकाशवाणी आमदार निवास, मंत्रालय जवळ, मुंबई-३२.

मोबाईल :- ९०४९३०१०००/ ९०९६१३५८३७.

ई-मेल :- patil.shahajibapu@gmail.com.

निवडणूक निकाल

(२५३ - सांगोला)

एकूण मतदार	२,९४,८९५
एकूण वैध मतदान	२,१५,४६८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड शहाजीबापू राजाराम पाटील**	९९,४६४ (शिवसेना)
(२) डॉ.अनिकेत देशमुख	९८,६९६ (शेतकरी कामगार पक्ष)
(३) श्रीमती राजश्रीताई नागने-पाटील	४,४८४ (अपक्ष)
(४) श्री.राजाराम काळेबग	१,९२८ (अपक्ष)
(५) श्री. बापूसाहेब ठोकळे	१,५६८ (अपक्ष)

पाटील-निलंगेकर, श्री.संभाजीराव दिलीपराव

जन्म : २० जून, १९७७.

जन्म ठिकाण : सोलापूर.

शिक्षण : कमर्शिअल पायलट., डी.बी.एम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती प्रेरणा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २३८-निलंगा, जिल्हा लातूर.

इतर माहिती : विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; सामुहिक विवाहांचे आयोजन; गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे मोफत वाटप; लातूर जिल्हात इंद्रप्रस्थ जलभूमि अभियान सुरू केले; निलंगा येथे बेरोजगार मेळाव्यांचे आयोजन; सी.एम.चषक स्पर्धेचे आयोजन; सन २०१०-२०१३ प्रदेशाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा; २०१३ पासून सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २०१३ मध्ये एन.बी.सी.न्युज मेकर्स तर्फे बेस्ट "पब्लिक स्पीकर" पुरस्काराने सन्मानित; २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१६ समिती प्रमुख, पंचायत राज समिती; जुलै,

२०१६ ते नोव्हेंबर, २०१९ कौशल्य विकास व उद्योजकता खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, लेखन व मैदानी खेळ.

परदेश प्रवास : अमेरिका, ऑस्ट्रीया, फ्रान्स, ईस्त्राइल, साऊथ कोरिया, जर्मनी व सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) अजंठा टॉकीज, निलंगा, जिल्हा लातूर- ४१३ ५२१.

(२) रूप नं. "सुखदा"१००२, वरळीसागर को.ऑप. हौ. सोसायटी, वरळी सी फेस, वरळी, मुंबई.
दूरध्वनी निवास :- (०२३८४) २४३७८८.
कार्यालय :- (०२३८२) २२६९९९.
मोबाईल :- ९९२२०३६३३३, ७७१५८५८५७८.
ई-मेल :- sambhajipatil77@gmail.com

निवडणूक निकाल

(२३८-निलंगा)

एकूण मतदार		३,१६,६९०
एकूण वैध मतदान		१,९७,३१८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. संभाजीराव दिलीपराव पाटील-निलंगेकर**	९७,३२४ (भारतीय जनता पक्ष)
(२)	श्री. अशोकराव पाटील-निलंगेकर	६५,१९३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३)	श्री. अरविंद भाटमब्रे	२९,८१९ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	नोटा	१,२७२
(५)	श्री राजाराम कांबळे	९०७ (अपक्ष)

पाटील, श्रीमती सुमनताई रावसाहेब आर.आर. (आबा)

जन्म : १ जून, १९६७.

जन्म ठिकाण : दहिवडी, तालुका तासगांव, जिल्हा सांगली.

शिक्षण : सातवी.

ज्ञात भाषा : मराठी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती कै.रावसाहेब रामराव ऊर्फ आर.आर.(आबा) पाटील.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २८७-तासगाव-कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली.

इतर माहिती : सन २०१५ पासून लोकनेते आर. आर. (आबा) पाटील यांच्या कामाचा वारसा जपण्याचा प्रयत्न; सामुहिक विवाह सोहळयांचे आयोजन; गोरगरीब रूग्णांना मदत; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; तासगाव तालुक्याच्या दुष्काळी भागाला पाणी मिळावे यासाठी आग्रही भूमिका; तासगाव व कवठेमहाकाळ तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न; महिला सक्षमिकरणासाठी महिला बचत गटाना सर्वतोपरी मदत; जुलै, २०१५ पासून संचालिका, स्वामी रामानंद भारती सहकारी सूतगिरणी मर्या., तासगाव, जिल्हा सांगली; २०१५-२०१९ (पो.नि.) सदस्या,

महाराष्ट्र विधानसभा; २०१७-२०१९ सदस्या, विनंती अर्ज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व पाहुणचार.

पत्ता : मु.पो.अंजनी, तालुका तासगाव, जिल्हा-सांगली.

दुरध्वनी :- निवास :- (०२३४६) २६२०६६.
कार्यालय :- (०२३४६) २४०५००.
मोबाईल :- ८२७५०३१०५५.

निवडणूक निकाल

(२८७ -तासगाव-कवठेमहांकाळ)

एकूण मतदार		२,९५,०८३
एकूण वैध मतदान		२,०१,२७२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्रीमती सुमनताई रावसाहेब आर. आर. (आबा) पाटील**	१,२८,३७१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२)	श्री. अजितराव घोरपडे	६५,८३९ (शिवसेना)
(३)	श्री. शंकर (दादा) माने	२,३२० (अपक्ष)
(४)	श्रीमती सुमन रावसाहेब	१,८९५ (अपक्ष)
(५)	नोटा	१,७४४

पाडवी, ॲड. के.सी.

जन्म : ३ मार्च, १९५७.

जन्म ठिकाण : असली, तालुका-अक्राणीमहाल, जिल्हा-नंदुरबार.

शिक्षण : बी.ए., एलएल.एम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व आदिवासी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती हेमलता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व वकिली.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : १-अक्कलकुवा (अनूसूचित जमाती), जिल्हा-नंदुरबार.

इतर माहिती : संस्थापक-अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विद्यार्थी संघटना; अध्यक्ष, सातपुडा मानव मुक्ती केंद्र, असली-अस्तंबा; अध्यक्ष, माता मोगरा शिक्षण संस्था, असली या संस्थेमार्फत आदिवासी भागात दोन आश्रम शाळा, तीन माध्यमिक विद्यालये सुरु केली; आदिवासी समाज जागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन; संघटनात्मक कार्यावर भर; होळी, दिवाळी महोत्सवांचे आयोजन; चेअरमन, दि हिलव्हॅली फूड अँड फ्रुट प्रोसेसिंग को.ऑप.सोसायटी, लि. असली, तालुका अक्रणी, जिल्हा नंदुरबार; १९९० पर्यंत जनता दलाचे कार्य; १९९१ पासून काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९०-१९९५, १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर,

२०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड, जानेवारी, २०२० पासून आदिवासी विकास खात्याचे मंत्री.

छंद : पर्यावरणाचे संरक्षण करणे, जंगल लावणे, पर्यावरणाच्या सानिध्यात फिरणे आणि समाजसेवेची आवड.

पत्ता : (१) मु. असली, पो. तलाई, तालुका-अक्राणी महाल, जिल्हा नंदुरबार.

(२) २१, प्रिन्सटन, कोलगेट हाऊस शेजारी, हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई :- ४०००७६.
दूरध्वनी :- निवास :- (०२२) २५७००४९८.
कार्यालय :- (०२२) २५७०३०६०.
मोबाईल :- ९८६९२०३०६०, ७५०६२६३०६०.
ई-मेल :- padavi.kc@gmail.com

(३) अ-५, मादाम कामा मार्ग, मंत्रालय समोर, मुंबईः- ४०००३२.
दूरध्वनी :- निवास :- (०२२) २२८२९५३५, २२०२२२१९.
कार्यालय :- (०२२) २२८४३६६५, २२०२३१६५.

निवडणूक निकाल

(१-अक्कलकुवा (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	२,७८,८८८
एकूण वैध मतदान	२,००,६२८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. के. सी. पाडवी**	८२,७७० [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. आमशा पाडवी	८०,६७४ (शिवसेना)
(३) श्री. नागेश पाडवी	२१,६६४ (अपक्ष)
(४) ॲड. कैलास वसावे	४,०५५ (आम आदमी पार्टी)
(५) नोटा	४,८५७

पाडवी, श्री. राजेश उदेसिंग

जन्म : ५ मे, १९६९.

जन्म ठिकाण : सोमावल बुII, तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती प्रिया.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : नोकरी.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २-शहादा (अनुसूचित जमाती), जिल्हा नंदुरबार.

इतर माहिती : महाराष्ट्र पोलिस दलात पोलिस निरीक्षक म्हणून सेवा केली, ३ ऑक्टोबर, २०१९ रोजी स्वेच्छा सेवानिवृती ; स्व. आई कलावती फांऊडेशन मार्फत गरीब गरजू विद्यार्थ्यांना तसेच गरीब रुग्णांना सर्वोतोपरी मदत; आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु. सोमावल बु।।, पो. नळगव्हाण, तालुका तळोदा, जिल्हा नंदुरबार ४२५४१३.

(२) सी.६/२०;०,३,सेक्टर -१८, सिडको कॉलनी न्यु पनवेल ४१०२०६.
मोबाईल :- ७६६६१२२२२१ / ८८७९९४७३३०.
ई-मेल :- pipadvi@gmail.com.

निवडणूक निकाल

(२-शहादा (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	३,२०,५५०
एकूण वैध मतदान	२,१०,३९३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजेश उदेसिंग पाडवी**	९४,९३१ [भारतीय जनता पक्ष]
(२) ॲड.पद्माकर वळवी	८६,९४० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री.जेलसिंग पावरा	२१,०१३ (अपक्ष)
(४) श्री.जयसिंग माळी	४,०६० (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया-मार्क्सिसिस्ट)
(५) नोटा	३,४४९

पारवे, श्री. राजू देवनाथ

जन्म : २२ जानेवारी, १९७२.

जन्म ठिकाण : भिवापुर, जिल्हा-नागपूर.

शिक्षण : बी.ए.(भाग-२).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुषमा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ५१, उमरेड (अनुसूचित जाती), जिल्हा-नागपूर .

इतर माहिती : ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन.

पत्ता : (१) टिपले ले आऊट, उमरेड, तालुका-उमरेड, जिल्हा-नागपूर.

(२) रूम नं. ६१७ (अ), आकाशवाणी आमदार निवास,
मुंबई -४०००३२.
मोबाईल :- ९६०४०६४४५९.

निवडणूक निकाल

(५१-उमरेड (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,८४,७६८
एकूण वैध मतदान	१,९७,६५८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजू देवनाथ पारवे**	९१,९६८ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. सुधीर लक्ष्मण पारवे	७३,९३९ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. संदिप सहदेव मेश्राम	१८,५६७ (बहुजन समाज पार्टी)
(४) श्री. रुक्षदास बनसोड	५,९३१ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. मनोजकुमार बव्हनगडे	१,७९० (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

पावरा, श्री. काशीराम वेचान

जन्म : १५ एप्रिल, १९६६.

जन्म ठिकाण : सुळे, तालुका-शिरपूर, जिल्हा-धुळे.

शिक्षण : पाचवी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, आदिवासी, पावरा व अहिराणी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती गमताबाई.

अपत्ये : एकूण ४ (तीन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ९-शिरपूर (अनुसूचित जमाती), जिल्हा-धुळे.

इतर माहिती : सरपंच, ग्रामपंचायत, सुळे; सदस्य, कृषि उत्पन्न बाजार समिती, शिरपूर; सदस्य, जिल्हा परिषद, धुळे; संचालक, शिरपूर पिपल्स को. ऑप. बॅक. लि.; २००१ पासून उपाध्यक्ष, रुहानी सत्संग, मानव केंद्र, नवानगर-पिंपळनेर, शाखा दहिवद, तालुका शिरपूर; वीज, आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, रस्ते, आदिवासी, गरीब माणसांच्या उन्नतीचे कार्य केले; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, उपविधान समिती पंचायत राज समिती, अनुसूचित जमाती कल्याण समिती, आश्वासन समिती, विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन.

पत्ता : (१) मु. पो. सुळे, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे.

(२) जनक व्हिला, रामसिंग नगर, शिरपूर, जिल्हा धुळे - ४२५४०५.
दूरध्वनी :- कार्यालय (०२५६३) २५५४००/ २५५३००.
मोबाईल :- ९४२१५३४१००/ ९८२०५२७२६८.
ई-मेल :- kashirampawara.mla@gmail.com

निवडणूक निकाल

(९-शिरपूर (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	३,२०,८०२
एकूण वैध मतदान	२,१२,०९२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. काशीराम वेचान पावरा**	१,२०,४०३ [भारतीय जनता पक्ष]
(२) डॉ. जितेंद्र ठाकूर	७१,२२९ (अपक्ष)
(३) श्री. रणजितसिंग पावरा	७,७५४ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) नोटा	३,८२८
(५) प्रो. मोतीलाल सोनावणे	३,५३४ (वंचित बहुजन आघाडी)

पिंपळे, श्री. हरीष मारोतीआप्पा

जन्म : १२ नोव्हेंबर, १९७६.

जन्म ठिकाण : मुर्तिजापुर, जिल्हा-अकोला.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नुतन.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ३२-मुर्तिजापुर (अनुसूचित जाती), जिल्हा-अकोला.

इतर माहिती : मुर्तिजापूर तालुक्यातील "कमळगंगा" नदीचे स्वखर्चाने उत्खनन करुन तालुक्यातील २० मोठ्या गावांची पिण्याच्या पाण्याची कायम स्वरुपी सोय केली; जिल्हा परिषद शाळा, ब्रम्ही दत्तक घेवून पूर्ण डिजिटल केली; तालुक्यातील ३२ शाळांमध्ये संगणक दिले; संत गजानन महाराज बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून अपंगाना मदत; रुग्णवाहिका सेवा सुरु केली; आपतकालीन पथक स्थापन केले; २००५-२००८ शहर अध्यक्ष, अनुसूचित जाती आघाडी, २०१०-२०१३ अध्यक्ष, युवा मोर्चा, अकोला जिल्हा, भारतीय जनता पक्ष; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य,

महाराष्ट्र विधानसभा; २०१०-२०१२, सदस्य, अनुसूचित जाती कल्याण समिती; २०१२-२०१४ सदस्य, रोजगार हमी योजना समिती; २०१६-२०१९ समिती प्रमुख, अनुसूचित जाती कल्याण समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : कुस्ती, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन.

पत्ता : (१) पळसोळा, पो. हातगांव, तालुका मुर्तिजापूर, जिल्हा अकोला-४४४१०७

(२) आठवडी बाजार, लक्कडगंज,तालुका मुर्तिजापुर, जिल्हा अकोला.
दूरध्वनी :- निवास :- (०७२५६) २४२५५५.
कार्यालय :- (०७२५६) २४२५५५.
मोबाईल :- ९४२१८९४७६५.
ई-मेल :- mla.harishpimple@gmail.com

निवडणूक निकाल

(३२-मुर्तिजापुर (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	३,२१,८१७
एकूण वैध मतदान	१,७५,४६९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. हरीष मारोतीआप्पा पिंपळे**	५९,५२७ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्रीमती प्रतिभा अवचर	५७,६१७ (वंचित बहुजन आघाडी)
(३) श्री. रविकुमार राठी	४१,१५५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. राजकुमार नाचणे	८,७६४ (प्रहार जनशक्ती पार्टी)
(५) श्री. आशिष बरे	२,४४५ (अपक्ष)

पोतनीस, श्री. संजय गोविंद

जन्म : १९ जुलै, १९५५.

जन्म ठिकाण : बारदेश-गोवा.

शिक्षण : बारावी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व कोकणी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनयना.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १७५ - कलिना, जिल्हा-मुंबई उपनगर.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १२९-विक्रमगड (अनुसूचित जमाती), जिल्हा पालघर.

इतर माहिती : सन २०१६ पासून सदस्य, रयत शिक्षण संस्था, राज्य समन्वय समिती; २००७-२०१३ अध्यक्ष, विविध कार्यकारी आदिवासी सेवा सोसायटी, मोरांडा; २००९-२०१९ संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ; २००९-२०१४ सदस्य, अनुसूचित जाती व जमाती समिती, सामाजिक न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली; २०१०-२०१३ ठाणे ग्रामीण जिल्हा युवक अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१३-२०१५ प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१५-२०१९ जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : वाचन, गाणी ऐकणे व ड्रायव्हिंग करणे.

पत्ता : (१)मु. दिरवे,पो.बरेस्ते, तालुका मोखाडा, जिल्हा पालघर ४०१६०४.

दूरध्वनी :- ९९२२३३६४९४ / ९७६४१४४४४४.
मोबाईल :- ९७६४१४४४४४ / ९७६७६४४४४४.
ई-मेल :- sbhusara@gmail.com

निवडणूक निकाल

(१२९-विक्रमगड(अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	२,६६,५७६
एकूण वैध मतदान	१,८२,८४१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा**	८८,४२५ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) डॉ. हेमंत सावरा	६७,०२६ (भारतीय जनता पक्ष)
(३) नोटा	८,४९५
(४) श्रीमती कमा टबाले	४,०३२ (रिव्होलुशनरी मार्क्सिस्ट पार्टी ऑफ इंडिया)
(५) श्री. सुरेश भोईर	३,८८२ (गोंडवाणा गणतंत्र पार्टी)



भुसे, श्री. दादाजी दगडु

जन्म : ६ मार्च १९६४.

जन्म ठिकाण : मालेगांव, जिल्हा-नाशिक.

शिक्षण : डी.सी.ई.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अनिता.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती व बांधकाम.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : ११५-मालेगाव-बाह्य, जिल्हा-नाशिक.

इतर माहिती : शिवसेना तालुका प्रमुख, मालेगाव; पक्षाच्या सर्व उपक्रमांत सक्रीय सहभाग; जागर शिवशाहीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली; संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना व श्रावण बाळ योजनेचे अनुदान लाभार्थींना मिळवून दिले; रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा यासारखी सामाजिक कामे केली; महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या; शासकीय पडिक जागा व गावठाणातील सरकारी जमीन १५००० लाभार्थींना मिळवून दिली; वन हक्क समितीच्या माध्यमातून वन जमिनी नियमित

केल्या; दारिद्र्य रेषेखालील व्यक्तिंना मदत; मालेगाव येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरु करण्यासाठी प्रयत्न; आमआदमी विमा योजना, स्वर्णजयंती ग्रामीण रोजगार योजना राबविली; लोकसहभागातून ए.पी.जे. अब्दुल कलाम बंधारा तयार केला; गरीबांना अल्प किंमतीत घरे मिळवून दिली; भारतनिर्माण व राष्ट्रीय पेय जल अंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली; सामुहिक विवाहांचे आयोजन; गोरगरीब रुग्णांना मदत, रक्तदान शिबीरांचे आयोजन; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली; शालोपयोगी वस्तुंचे वाटप; संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु केले; जिमखाना सुरु केला; व्यसनमुक्ती व स्वच्छता अभियान राबविले; जागर शिवशाहीचा कार्यक्रमाच्या माध्यमातून जातीचे दाखले मिळवून दिले; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ सहकार खात्याचे राज्यमंत्री व धुळे जिल्ह्याचे पालक मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० पासून महाराष्ट्र राज्याचे कृषी व माजी सैनिकांचे कल्याण खात्याचे मंत्री.

छंद : वाचन व सामाजिक कार्य

पत्ता : (१) 'शिवा' व्यंकटेशनगर (सोयगांव), तालुका मालेगाव, जिल्हा-नाशिक.

दुरध्वनी : निवास - (०२५५४) २५५१८८.
कार्यालय - (०२५५४) २५१४०५.
मोबाईल - ९४२२२७०५९३.
(२) अ-४, मादाम कामा मार्ग, मंत्रालया समोर, मुंबई- ४०००३२.
दूरध्वनी : निवास - (०२२) २२०४६६२९ / २२०२४५७०.
कार्यालय : (०२२) २२८४३४४६ / २२८४३२६४.

निवडणूक निकाल

(११५-मालेगाव-बाह्य)

एकूण मतदार	३,४१,६१५
एकूण वैध मतदान	२,०३,४६८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दादाजी दगडु भुसे**	१,२१,२५२ [शिवसेना]
(२) डॉ. तुषार शेवाळे	७३,५६८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. आनंद आढाव	२,५६८ (बहुजन समाज पार्टी)
(४) नोटा	१,४८५
(५) श्री. अबु इस्माईल	१,११९ (अपक्ष)

भोईर, श्री. विश्वनाथ आत्माराम

जन्म : ४ एप्रिल, १९७०

जन्म ठिकाण : कोळीवली, तालुका कल्याण जिल्हा ठाणे.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती. वैशाली.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : बांधकाम व्यवसायिक.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १३८-कल्याण-पश्चिम, जिल्हा ठाणे.

इतर माहिती : कल्याण मधील गरीब व गरजू या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी दत्तक योजना राबविली; दहावी-बारावी विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे अयोजन; गरीब व गरजू विद्यार्थ्याना शालापयोगी वस्तूंचे वाटप; २०००-२००५ नगरसेवक, कल्याण-डोंबीवली महानगरपालिका.; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व लेखन.

पत्ता : "मातोश्री बंगला," कोळीवली (आधारवाडी), जेल रोड, कल्याण (पश्चिम), जिल्हा ठाणे.

दूरध्वनी :- मोबाईल :- ९८१९६२३१६०.

ई-मेल :- vishwanethbhoir1970@gmail.com

निवडणूक निकाल

(१३८ - कल्याण- पश्चिम)

एकूण मतदार	४,५२,९२४
एकूण वैध मतदान	१,८९,७९०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. विश्वनाथ आत्माराम भोईर**	६५,४८६ [शिवसेना]
(२) श्री. नरेंद्र पवार	४३,२०९ (अपक्ष)
(३) श्री. प्रकाश भोईर	३८,०७५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्रीमती कांचन कुलकर्णी	११,६४८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(५) श्री. अयाझ मौलवी	१०,११० (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)

भोंडेकर, श्री. नरेंद्र भोजराज

जन्म : २६ जून, १९७९

जन्म ठिकाण : तुमसर, जिल्हा भंडारा.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती डॉ. अश्विनी

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : ६१-भंडारा (अनुसूचित जाती), जिल्हा भंडारा.

इतर माहिती : सन २००२ संस्थापक, भोंडेकर सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक शिक्षण संस्था, या संस्थेमार्फत २०२० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर निवासी मतिमंद शाळा, भंडारा; २००६ मध्ये संत गाडगेबाबा निवासी मतिमंद शाळा सडक अर्जूनी, स्व. जमनाबाई निवासी मतिमंद शाळा मोरगाव-अर्जूनी, २००७ मध्ये मंजुळबाई भोंडेकर प्रशासकीय महाविद्यालय, भंडारा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर डी.एड. कॉलेज, भंडारा; २००९ मध्ये पुजा नर्सिग स्कूल, भंडारा, सुरु केले; भंडारा जिल्ह्यात युवक चळवळ सुरू केली; सहकारी संस्था स्थापन करुन विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी मदत; २००२ विदर्भ अध्यक्ष, २००५ महाराष्ट्र सचिव, चर्मकार सेवा संघटाना; २००६ कार्याध्यक्ष, भरतीय अपंग शिक्षण संस्था असोसिएशन; २००७

जिल्हा उपाध्यक्ष, ओ.बी.सी. संग्राम परिषद; १९९८ रिपब्लिकन पक्षाचे कार्य; २००८ मध्ये भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी रस्ता रोको आंदोलनाचे नेतृत्व; जिल्हा कोषाध्यक्ष, २००७ महाराष्ट्र प्रदेश सदस्य व २००८ गोंदिया जिल्हा निरिक्षक, राष्ट्रवादी युवक काँग्रेस; प्रदेश उपाध्यक्ष, ग्राहक संरक्षण समिती; २००९ पासून शिवसेनेचे कार्य; २०१७ पासून शिवसेनेचे भंडारा जिल्हाप्रमख; सन २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; सदस्य, भटक्या व विमुक्त जमाती कल्याण समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर फेरनिवड.

छंद : वाचन.

पत्ता : सहकार नगर, बँक कॉलनी, बालाजी मंदिर समोर, पांढराबोडी रोड, भंडारा, जिल्हा भंडारा.

दूरध्वनी : मोबाईल :- ९३२६९१०४६१.

ई-मेल :- narendra.bhondekar61@gmail.com

निवडणूक निकाल

[६१-भंडारा, (अनुसूचित जाती)]

एकूण मतदार	३,७१,०८८
एकूण वैध मतदान	२,३४,१४८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नरेंद्र भोजराज भोंडेकर**	१,०१,७१७ [अपक्ष]
(२) श्री. अरविंद मनोहर भालधरे	७८,०४० (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. जयदिप कवाडे	१९,१०५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. प्रशांत रामटेके	९,८७८ (अपक्ष)
(५) श्री. विसर्जन चौसरे	८,९६३ (वंचित बहुजन आघाडी)

भोयर, डॉ.पंकज राजेश

जन्म : ५ जानेवारी, १९७७.

जन्म ठिकाण : अमरावती.

शिक्षण : एम.ए. (अर्थशास्त्र), पीएच्.डी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शितल.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ४७-वर्धा, जिल्हा वर्धा.

इतर माहिती : अध्यक्ष, नागपूर विद्यापीठ अर्थशास्त्र स्टुडंट असोसिएशन; संयोजक, वर्धा कला महोत्सव; २००४-२०१० अध्यक्ष, २०१०-२०१२ कार्याध्यक्ष, वर्धा जिल्हा युवक काँग्रेस कमिटी; सन २०१४ पासून उपाध्यक्ष, वर्धा जिल्हा भारतीय जनता पक्ष; उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल "राष्ट्रीय सेवा योजना" पुरस्काराने सन्मानित; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१७ सदस्य, इतर मागासवर्ग कल्याण समिती; २०१७-२०१९ सदस्य, अनूसुचित जमाती कल्याण समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : सिंगापूर, मलेशिया, दुबई व मकाउ इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : थंड हवेच्या ठिकाणी फिरणे, जंगल सफारी, मित्र बनविणे व हँड बॉल खेळणे.

पत्ता : मु.पो.केळकरवाडी, सुदामपुरी,वर्धा- ४४२ ००१.

दुरध्वनी :- निवास - (०७१५२) २४०९६५.
कार्यालय :- (०७१५२) २५२२५५.
मोबाईल :- ८८०६५१११३३.
ई-मेल :- pankaj.youth@gmail.com

निवडणूक निकाल

(४७-वर्धा)

एकूण मतदार	३,१६,६४१
एकूण वैध मतदान	१,६९,३६३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. पंकज राजेश भोयर**	७९,७३९ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. शेखर प्रमोद शेंडे	७१,८०६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. अनंत उमाते	६,३८३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. मनिष पुसाटे	४,२७३ (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	२,७२९

भोसले, श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे

जन्म : ३० मार्च, १९७३.

जन्म ठिकाण : कोल्हापूर.

शिक्षण : बी.कॉम. (भाग २)

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वेदांतिकाराजे.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २६२-सातारा, जिल्हा सातारा.

इतर माहिती : सन १९९५ पासून संस्थापक-अध्यक्ष, अजिंक्यतारा माध्यमिक विद्यालय, सातारा; २००४ पासून अध्यक्ष, विशाल सह्याद्री माध्यमिक विद्यालय, गोडोली; शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक पद्धती व नवीन तंत्रज्ञानाची माहिती करुन देण्यासाठी सतत प्रयत्नरत; सातारा शहर व तालुक्यातील विविध सामाजिक कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न; गोरगरीबांना मदत; चेअरमन, अजिंक्यतारा सहकारी सूतगिरणी लि., वळसे; संस्थापक-अध्यक्ष, मावळा प्रतिष्ठान सातारा, या संस्थेमार्फत प्रतिवर्षी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; १९९४ पासून चेअरमन, अजिंक्यतारा सहकारी

साखर कारखाना लि., शाहूनगर, शेंद्रे, सातारा, या साखर कारखान्याच्या आधुनिकीकरणासह उत्कृष्ट कार्यक्षमता राखून राज्य व देशपातळीवरील २१ पारितोषिके मिळविली; १९९१ पासून डिस्टीलरी प्रकल्प सुरु केला; इथेनॉल प्रकल्प उभारणीसाठी प्रयत्न; अजिंक्यतारा उद्योगसमुहाच्या माध्यमातून कृषी, औद्योगिक व सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सतत प्रयत्न; तालुक्यामध्ये १८ उपसा जलसिंचन योजना यशस्वीरित्या पूर्ण केल्या; अजिंक्यतारा मध्यवर्ती सहकारी ग्राहक मंडळामार्फत अजिंक्य बझार सुरु केला; अजिंक्यतारा सहकारी कुक्कुटपालन संस्था लि., शेंद्रे, अजिंक्यतारा सहकारी कृषी, औद्योगिक, ऊस तोडणी वाहतूक संस्था लि., शेंद्रे तसेच अजिंक्यतारा महिला सहकारी बँक लि., सातारा या संस्थांच्या माध्यमातून सामान्य शेतकऱ्यांना मदत; चेअरमन व संस्थापक, अजिंक्यतारा सहकारी बँक, सातारा; २००४-२०१५ संचालक, २०१५ पासून चेअरमन, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; संचालक, अजिंक्यतारा फळे, फुले संस्था, सातारा; रक्तदान शिबीरांचे आयोजन; राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या मेळाव्याचे आयोजन; १९९९-२०१९ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटनात्मक कार्य; सप्टेंबर, २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : इटली, सिंगापूर, इंग्लंड व ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व शेती.

पत्ता : (१) सुरुची, ११८, शुक्रवार पेठ, सातारा- ४१५ ००२.

दूरध्वनी : निवास - (०२१६२) २८१२३४.
कार्यालय - (०२१६२) २८२२३४.
फॅक्स - (०२१६२) २८२२३४.
मोबाईल - ९८२२९१९२९३.
(२) 'पूर्णा', ८ वा मजला,वरळीसागर हौसिंग सोसायटी,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

निवडणूक निकाल (२६२-सातारा)		
एकूण मतदार		३,३७,८३१
एकूण वैध मतदान		१,९९,८४९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले**	१,१८,००५ [भारतीय जनता पक्ष]
(२)	श्री.दिपक साहेबराव पवार	७४,५८१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३)	श्री.अशोक दिक्षित	३,१५४ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	नोटा	१,९७८
(५)	श्री.शिवाजीराव भोसले	९४७ (अपक्ष)

भोळे, श्री. सुरेश दामु

जन्म : १३ जून, १९६५

जन्म ठिकाण : वाघळी, तालुका - चाळीसगाव, जिल्हा - जळगाव.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सीमा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १३-जळगाव शहर, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : सन २०१४-२०१९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, भ्रमंती व धार्मिक-कीर्तन-प्रवचन ऐकण्याची आवड.

पत्ता : चंद्रमाऊली, यशवंत कॉलनी, रिंगरोड, जळगाव, जिल्हा जळगाव - ४२५ ००१.

दुरध्वनी :- निवास – (०२५७) २२२६०१६/(०२५७) २२४२६२६/२२४२७२७.
कार्यालय :- ९४२२२७७२४२/७०८३००१११११.
ई-मेल :- mlasareshbhole@gmail.com.

निवडणूक निकाल	
(१३-जळगाव-शहर)	
एकूण मतदार	४,०१,३२८
एकूण वैध मतदान	१,८२,१२७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुरेश दामु भोळे**	१,१३,३१० [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अभिषेक पाटील	४८,४६४ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. शफी शेख	६,३३० (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	४,९९८
(५) ॲड. जमिल देशपांडे	३,४८१ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

मते, श्री. मोहन गोपाळराव

जन्म : २८ डिसेंबर, १९६८.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : आय.टी.आय (मशिनिस्ट).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कविता.

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ५३-नागपूर-दक्षिण, जिल्हा-नागपूर.

इतर माहिती : उपाध्यक्ष, स्व. गंगाधरराव फडणवीस शिक्षण संस्था; अध्यक्ष, संघर्ष सांस्कृतिक व क्रीडा मंडळ; संचालक, सेंट्रल इंडिया कंझ्युमर्स को.-ऑप. सोसायटी; अध्यक्ष, माध्यम लोकसेवा प्रतिष्ठान ; १९९७ सदस्य, महानगरपालिका नागपूर, १९९९अध्यक्ष, स्थायी समिती; महानगरपालिका नागपूर; अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, नागपूर शहर व जिल्हा; १९९९-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन, गायन व सामाजिक कार्य.

पत्ता : १०/११ राणी इंदिराबाई भोसले विहार तुळशीबाग, आप्पाजी मते चौक, महाल, नागपूर.

दूरध्वनीः- मोबाईल :- ९३७०९१०७७७ / ७६२०७६२७६२.
निवास :- ९८२२५६३७५६.
कार्यलय :- (०७१२) २७५२५५५.
ई-मेल :- mohanmate01@gmail.com

निवडणूक निकाल

(५३- नागपूर-दक्षिण)

एकूण मतदार	३,८२,४९३
एकूण वैध मतदान	१,९३,३६६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. मोहन गोपाळराव मते**	८४,३३९ [भारतीय जनता पार्टी]
(२) श्री. गिरीश पांडव	८०,३२६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. शंकर थुळ	५,६६८ (बहुजन समाज पार्टी)
(४) श्री. रमेश पिसे	५,५८३ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. सतिश होळे	४,६३१ (अपक्ष)

मलिक, श्री. नवाब मोहम्मद इस्लाम

जन्म : २० जून, १९५९.

जन्म ठिकाण : धुसवा (इटई)रामपूर, तालुका उतरौंला,जिल्हा-बलरामपूर (उत्तर प्रदेश).

शिक्षण : एफ.वाय.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मेहजबीन.

अपत्ये : एकूण ४ (दोन मुलगे व दोन मुली).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १७२- अणुशक्ती नगर, जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : अध्यक्ष, ह्युमन वेल्फेर ऑरगनायझेशन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; छात्र आंदोलन, विद्यापीठीय शिक्षण फी वाढ विरोधी आंदोलनाचे नेतृत्व; विद्यार्थी संसद आंदोलनात सक्रिय सहभाग; सामाजिक ऐक्य-अखंडता व धार्मिक सद्भावना व जातीय सलोखा वाढविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन; १९९८ मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावरील रेल रोको आंदोलनात सक्रीय सहभाग; कुर्ला (प.) कमानी जंक्शन अग्निशमन केंद्र सुरु केले; झोपडपट्टीधारकांना फोटोपाससाठी मदत; झोपडपट्टी रहिवाशांना मोफत घरे मिळवून देण्यासाठी प्रयत्न; रेल्वे लाईन झोपडपट्टी रहिवाशांचे पुर्नवसन

कार्यात मदत; राज्यातील तृतिय पंथियांना विशेष सहाय्य योजनेंतर्गत दरमहा मानधन देण्यासाठी विशेष प्रयत्न; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; मुंबई अध्यक्ष व प्रवक्ता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. १९९६-१९९९ (पो.नि.), १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, १९९९ ते ऑक्टोबर, २००४ गृहनिर्माण, झोपडपट्टी सुधारणा व गलिच्छवस्ती सुधारणा, विशेष सहाय्य व औकाफ खात्याचे राज्यमंत्री; जुलै, २००४ ते ऑक्टोबर, २००४ विशेष सहाय व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, २००४ ते मार्च, २००५ कामगार खात्याचे मंत्री व मुंबई (शहर) जिल्हयाचे पालकमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० अल्पसंख्यांक विकास औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता खात्याचे मंत्री.

प्रदेश प्रवास : बेल्जियम, थायलँड, इंग्लंड, सौदी अरेबिया, ऑस्ट्रेलिया,फ्रान्स व नेदालँड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, चिंतन-मनन, पत्रकारिता व सामाजिक कार्य.

पत्ता : २१८-सी २, नूरमंझील, लालबहादूर शास्त्री मार्ग,

कुर्ला (पश्चिम), मुंबई- ४०००७०.
दूरध्वनी :- निवास (०२२) २५०३१९२२.
मोबाईल :- ९८६७३५५०१४.
ई – मेल :- nawabmalikmla@gmail.com

निवडणूक निकाल (१७२- अणुशक्ती नगर)	
एकूण मतदार	२,५१,९१६
एकूण वैध मतदान	
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक**	६५,२१७ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. तुकाराम काते	५२,४६६ (शिवसेना)
(३) श्री. यसीन सय्यद	७,७०१ (अपक्ष)
(४) ॲड. विजय रावराणे	५,८७९ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	२,२९०

मलिक, श्री. लखन सहदेव

जन्म : १८ एप्रिल, १९५७.

जन्म ठिकाण : वाशिम.

शिक्षण : चौथी.

ज्ञात भाषा : मराठी व हिंदी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सरिता.

अपत्ये : एकूण ४ (तीन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ३४-वाशिम (अनुसूचित जाती), जिल्हा-वाशिम.

इतर माहिती : नगरपरिषद, वाशिममध्ये १९ वर्षे सफाई कामगार म्हणून नोकरी; अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य; तालीम, व्यायाम शाळा व कबड्डी संघातील खेळाडूंचे संघटन केले; १९९०-९५ प्रदेश कार्यकारिणी सदस्य, १९९५-२००१ व २००२-२००५ जिल्हा कार्यकारिणी सदस्य, २००५-२००७ भाजप शहर अध्यक्ष व २००७-२००९ उपाध्यक्ष, वाशिम जिल्हा, भारतीय जनता पक्ष; सदस्य, जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था; कामधेनू गोरक्षण संस्थेच्या कार्यात सहभाग; मेहतर समाजाचे जमादार म्हणून सामाजिक संघटनेचे कार्य केले; विविध संतांच्या पालखी

सोहळयांचे आयोजन; अध्यक्ष, सुदर्शन व्यायाम शाळा व सुदर्शन लेझीम मंडळ; १९९०-१९९५, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : जनतेची सेवा.

पत्ता : सुदर्शन नगर, नारायण बाबा रोड, वाशिम, जिल्हा वाशिम – ४४४ ५०५.

दूरध्वनी :- निवास (०७२५२) २३२२६४
मोबाईल :- ९८२२७०८५३१ ; ९९२१३१६९४७.
ई- मेल :- lakhanmalik14@gmail.com

निवडणूक निकाल

(३४-वाशिम (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	३,४९,२७९
एकूण वैध मतदान	२,०६,७३३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. लखन सहदेव मलिक**	६६,१५९ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. सिद्धार्थ देवळे	५२,४६४ (वंचित बहुजन आघाडी)
(३) श्री. शशिकांत पेंढारकर	४५,४०७ (अपक्ष)
(४) श्रीमती रजनी राठोड	३०,७१६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(५) श्री. भरत नांदुरे	१,६५५ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया)

महाजन, श्री. गिरीष दत्तात्रय

जन्म : १७ मे, १९६०.

जन्म ठिकाण : जामनेर, जिल्हा-जळगांव.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती साधना.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १९-जामनेर, जिल्हा-जळगाव.

इतर माहिती : सदस्य, जामनेर तालुका एज्युकेशन सोसायटी; संचालक, इंदिराबाई ललवाणी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, जामनेरपुरा; अध्यक्ष, छत्रपती व्यायामशाळा, जामनेर; अध्यक्ष, पंडित दिनदयाळ उपाध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ;अध्यक्ष, लोकहितवादी मंडळ; अध्यक्ष, वीर सावरकर क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, जामनेर; अध्यक्ष, दत्तगुरु शिक्षण बहुउद्देशीय संस्था; चेअरमन, महालक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, जामनेर; संचालक, श्रीकृष्ण दूध उत्पादक सहकारी संस्था; संचालक, तापी पूर्णा शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज, लि. जळगाव; कार्याध्यक्ष,

गोविंद महाराज संस्थान, जामनेर; जिल्हाध्यक्ष, व्हॉलीबॉल व बॅडमिंटन असोसिएशन; अध्यक्ष, जिल्हा शूटींग बॉल असोसिएशन; अध्यक्ष, सिध्दगड मंदिर देवस्थान, रामपुर जिल्हा जामनेर; अध्यक्ष, सोनेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट, जामनेर; विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे वाटप; विविध क्रीडा व वादविवाद स्पर्धांचे आयोजन; नेत्रचिकित्सा व रक्तदान शिबिरांचे आयोजन; लातूर व गुजरात भुकंपग्रस्तांना मदत कार्य; १९९२-९५ सरपंच, ग्रामपंचायत, जामनेर; कायम निमंत्रित सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; १९९०-९२ उपाध्यक्ष, जामनेर तालुका कार्यकारणी, भारतीय जनता पक्ष; १९९३-९५ सदस्य, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; १९९५-१९९९, १९९९-२००४; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; डिसेंबर, २०१४ ते नोव्हेंबर, २०१९ जलसंपदा खात्याचे मंत्री, नाशिक व नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : पॅरिस, स्वित्झर्लॅंड, व्हेनेझुएला, नेदरलॅंड, हॉलंड, जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली, इंग्लंड इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, बागकाम, व्यायाम, मैदानी खेळ, पोहणे व पर्यटन स्थळांना भेट देणे.

पत्ता : 'नंदादीप' बिल्डींग, बजरंगपुरा, जामनेर, जिल्हा-जळगांव- ४२४२०६.

दूरध्वनी :- निवास - (०२५८०) २३०२४४ / २३२४४४.
(०२२) २३६४५५५ / २३६७७००.
मोबाईल :- ९४२२२९२५२५.
ई – मेल :-min.wrd@mharashtra.gov.in

निवडणूक निकाल (१९-जामनेर)	
एकूण मतदार	३,०८,९५२
एकूण वैध मतदान	२,०८,७६५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. गिरीष दत्तात्रय महाजन**	१,१४,७१४ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. संजय गरुड	७९,७०० (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. भीमराव चव्हाण	६,४७१ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. विजय तंवर	२,११८ (अपक्ष)
(५) नोटा	२,१०५

महाले, श्रीमती श्वेता विद्याधर

जन्म : २७ मार्च, १९८३.

जन्म ठिकाण : लोणार, जिल्हा बुलढाणा.

शिक्षण : डी.फॉर्मसी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. विद्याधर दयासागर महाले.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २३- चिखली, जिल्हा-बुलढाणा.

इतर माहिती : अध्यक्षा, तोरणा महिला सहकारी संस्था मर्या.; अध्यक्ष,आधार बहुउद्देशीय सहकारी संस्था, मर्या. बुलढाणा, या संस्थेमार्फत गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप; महिला मेळाव्यांचे आयोजन; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; बचत गट मेळाव्यांचे आयोजन; विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन; कार्यकारणी सदस्या, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; सदस्या, जिल्हापरिषद बुलढाणा; सभापती, महिला व बाल कल्याण समिती, जिल्हापरिषद, बुलढाणा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व संगीत.

पत्ता : शासकीय विश्रामधाम शेजारी, आनंद नगर, चिखली, जिल्हा-बुलढाणा.

मोबाईल :- ७७४४०५८१०२ / ९३५६६२२४६६.
ई-मेलः- swetamahalepatil@gmail.com.

निवडणूक निकाल

(२३- चिखली)

एकूण मतदार	२,९५,०१८
एकूण वैध मतदान	१,९४,१८२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती श्वेता विद्याधर महाले**	९३,५१५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. राहुल बोंद्रे	८६,७०५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. अशोक सुराडकर	९,६६१ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. परवीन हरुन	१,१०९ (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	१,०३५

माने, श्री. यशवंत विठ्ठल

जन्म : १० नोव्हेंबर, १९७२.

जन्म ठिकाण : शेळगाव, तालुका इंदापुर, जिल्हा पुणे.

शिक्षण : बी. कॉम.

ज्ञात भाषा : मराठी ,हिंदी, व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नीता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २४७- मोहळ (अनुसूचित जाती), जिल्हा सोलापूर.

इतर माहिती : सदस्य, ग्रामपंचायत, शेळगाव; अध्यक्ष, शंभु महादेव ग्रामविकास प्रतिष्ठान; २०१६ पासून उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, इंदापूर; उपाध्यक्ष, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; खो-खो मधील अद्वितीय कामगिरीबद्दल; विविध संस्थांतर्फे पुरस्कार प्राप्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : खो – खो खेळणे.

पत्ता : मु. पो. शेळगाव, तालुका इंदापूर, जिल्हा पुणे.

दूरध्वनी :- निवास (०२१२२) २२०९२७.
मोबाईल :- ९७६३५६११११ / ९४२२३४१४१२.
ई – मेल :-YVmane1111@gmail.Com.

निवडणूक निकाल

(२४७- मोहळ-अनुसूचित जाती)

एकूण मतदार	३,०५,९०१
एकूण वैध मतदान	२,०१,८०८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. यशवंत विठ्ठल माने**	९०,५३२ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. नागनाथ क्षिरसागर	६८,८३३ (शिवसेना)
(३) श्री. रमेश कदम	२३,६४९ (अपक्ष)
(४) श्री. गौतम वडावे	६,४२९ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. मनोज शेजवाल	३,८२२ (अपक्ष)

मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश

जन्म : १९ एप्रिल, १९६४.

जन्म ठिकाण : पुणे.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती सतिश धोंडीबा मिसाळ.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : बांधकाम व्यवसायिक.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २१२-पर्वती, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : अध्यक्षा, ब्रिक कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, उंद्री, पुणे; विश्वस्त, शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे; संचालिका व अध्यक्षा, विद्या सहकारी बँक लि. पुणे; संचालिका, उद्यम सहकारी बँक लि. पुणे; अध्यक्षा, पुणे शहर भारतीय जनता पक्ष; चिटणीस, महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडी, भारतीय जनता पक्ष; २००७-२०१२, नगरसेविका, महानगरपालिका, पुणे; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सदस्या, सार्वजनिक उपक्रम समिती, लोकलेखा समिती, महिला व बाल विकास समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : श्रीलंका व अमेरिकेचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन.

पत्ता : (१) २, फेअर रोड, जगताप नर्सरी जवळ, पुणे कॅन्टोन्मेट, पुणे – ४११ ००१.

दूरध्वनी :- कार्यालय - (०२०) २४२३१८४४.
मोबाईल :- ९८२२०२०६१७.
ई-मेल :- madhurisatishmisal@gmail.com.
(२) स.नं. ५७४, स्वप्ननगरी सोसायटी, डी-३/६, बिबवेवाडी, पुणे.
(३) एम.आय.जी. को. ऑप. हौसिंग सोसायटी, कल्पतरु, गांधीनगर, बांद्रा. (पूर्व), मुंबई - ४०००५१.

निवडणूक निकाल

(२१२-पर्वती)

एकूण मतदार	३,५४,३३९
एकूण वैध मतदान	१,७३,७९२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती माधुरी सतिश मिसाळ**	९७,०१२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्रीमती अश्विनी कदम	६०,२४५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. ऋषिकेश नांगरे-पाटील	७,७३४ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	३,६३६
(५) श्री. रविंद्र क्षिरसागर	१,३९१ (बहुजन समाज पार्टी)

मुटकुळे, श्री. तानाजी सखारामजी

जन्म : २२ फेब्रुवारी, १९६१.

जन्म ठिकाण : आडगांव, जिल्हा-हिंगोली.

शिक्षण : अकरावी

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती जिजाबाई.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ९४-हिंगोली, जिल्हा-हिंगोली.

इतर माहिती : सदस्य, ग्रामपंचायत, आडगाव; सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, आडगाव; संचालक, परभणी-हिंगोली जिल्हामध्यवर्ती सहकारी बँक लि.; संचालक, कृषी-उत्पन्न बाजार समिती, हिंगोली ; १९९९-२००३, २००३-२००६ जिल्हाध्यक्ष, किसान मोर्चा ; २००६-२०१० हिंगोली जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; २०१०-२०१५ सदस्य, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी, भारतीय जनता पक्ष ; १९९६-२००७ सदस्य व १९९६-१९९९ सभापती, शिक्षण समिती, जिल्हा परिषद, परभणी ; २००७-२०१२ सदस्य, जिल्हा परिषद, हिंगोली; २०१४-२०१९ सदस्य,

महाराष्ट्र विधानसभा; हिंगोली जिल्ह्याचा स्वतंत्रपणे अनुशेष निश्चित करुन विकासासाठी विशेष निधी मिळविण्यात यशस्वी; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : समाजसेवा.

पत्ता : (१) मु.पो. आडगांव, तालुका जिल्हा हिंगोली ४३१ ५१३

(२) गाडीपुरा अंबिका टॉकिज रोड, हिंगोली.
मोबाईल- ९४२३४४४३०१, ९६६५३६८९९९.

निवडणूक निकाल

(९४-हिंगोली)

एकूण मतदार	३,१२,४३१
एकूण वैध मतदान	२,००,३१९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. तानाजी सखारामजी मुटकुळे**	९५,३१८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. भाऊराव पाटील	७१,२५३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. वसिम देशमुख	१९,८५६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. विजय राऊत	४,६४६ (प्रहार जनशक्ती पार्टी)
(५) श्री. असाराजी चव्हाण	१,७३३ (अपक्ष)

मुंडे, श्री. धनंजय पंडितराव

जन्म : १५ जुलै, १९७५.

जन्म ठिकाण : नाथ्रा, पो. कोठळी, तालुका परळी-वैजनाथ, जिल्हा बीड.

शिक्षण : बी.एस्.एल.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती राजश्री.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : शेती, व्यापार व समाजसेवा.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २३३-परळी, जिल्हा बीड.

इतर माहिती : अध्यक्ष, नाथ प्रतिष्ठान, परळी-वैजनाथ, या संस्थेमार्फत सामुहिक विवाहांचे आयोजन; वृक्ष लागवड, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; विविध क्रीडा स्पर्धांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे वाटप; २००३ मध्ये घाटनांदूर येथील रेल्वे अपघातात १२ जणांचे प्राण वाचविले; ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी अनेक गावात २०० पेक्षा अधिक विंधन विहिरी घेतल्या; २००१ मध्ये बेरोजगार व दहशतवाद विरोधी युवक मोर्चा; २००८ दिल्ली येथील युवाक्रांती रॅलीत महाराष्ट्रातील युवकांचे नेतृत्व;

२००९ मध्ये पुणे येथे युवा संकल्प रॅलीचे आयोजन केले; १९९७ -१९९८ भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी आघाडीचे प्रमुख; १९९८-२००१ उपाध्यक्ष व २००१-२००७ सरचिटणीस व २००७-२०१० अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; नोव्हेंबर, २०१४ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २००२- २००७ सदस्य, २००७-२०१० उपाध्यक्ष, जिल्हापरिषद, बीड; संचालक, संत जगमित्र सहकारी सुतगिरणी मर्यादित, टोकवाडी, परळी- वैजनाथ; २०१०-२०१६, २०१६-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद; डिसेंबर, २०१४ ते ऑक्टोबर, २०१९ विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड; जानेवारी, २०२० पासून सामाजिक न्याय, विशेष सहाय खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : युरोप, दुबई व लंडन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट व वक्तृत्व.

पत्ता : (१) मु. नाथ्रा, पो. कोठळी, तालुका परळी- वैजनाथ, जिल्हा बीड.

(२) 'जगमित्र', सिंचन भवनसमोर, अंबाजोगाई रोड, परळी- वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड ४३०५१५.
दूरध्वनी :- (०२४४६) २२३३७७ / २२५७७७.
मोबाईल :- ९८५०७७७७७७ / ९६०४०४१२१२.
निवास :- (०२२) २३५१५८८९ / २३५२४६६४.

निवडणूक निकाल	
(२३३-परळी)	
एकूण मतदार	३,०६,७१०
एकूण वैध मतदान	२,२४,२७२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. धनंजय पंडितराव मुंडे**	१,२२,११४ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्रीमती पंकजा मुंडे-पालवे	९१,४१३ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. भिमराव सातपुते	४,७१३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. रईसोद्दीन पठाण	१,३६५ (अपक्ष)
(५) श्री. बबनराव भागवत	९८० (विकास इंडिया पार्टी)

मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय

जन्म : ४ मार्च, १९८९.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : B. Arch (Bachelor of Architecture). M.S.(Advanced Master in Computational design, Building Technologies).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. अक्षय नंदकिशोर मुंदडा.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : उद्योग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २३२-केज (अनुसूचित जाती), जिल्हा-बीड.

इतर माहिती : सन २०१६ पासून उपाध्यक्षा, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई, जिल्हा बीड; २०१५ पासुन अध्यक्षा, वसुंधरा महिला सहकारी तालुका दुध उत्पादक व पुरवठा संघ लि., अंबाजोगाई; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरिका, युनायटेड किंग्डम, फिनलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, पोर्तुगाल, स्कॉटलँड, नेदरलँड, हाँगकाँग, थायलंड, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, दुबई, इंडोनेशिया, भूतान, चीन व जपान इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, टेनिस, बॅडमिंटन व डिझायनिंग.

पत्ता : (१) आई निवास, बीड रोड, अंबाजोगाई, जिल्हा बीड- ४३१५१७.

(२) अक्षय निवास, रिंग रोड, अंबाजोगाई, जिल्हा-बीड- ४३१५१७.

(३) ४०२, सी विंग, सुखदा सोसायटी, सर पोचखनवाला रोड, वरळी, मुंबई-४०००३०.

दूरध्वनी :- (०२४४६) – २४५९९९.

मोबाईल :- ९०१११४५६७८.

ई-मेल :- namita0489@gmail.com

निवडणूक निकाल

(२३२ - केज (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	३,६२,४३०
एकूण वैध मतदान	२,२९,६७३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती नमिता अक्षय मुंदडा**	१,२३,४ ३३ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. पृथ्वीराज साठे	९०,५२४ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. वैभव स्वामी	९,१५६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,५९८
(५) श्री. परमेश्वर उदार	१,३६३ (बहुजन समाज पार्टी)

मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद

जन्म : ३० जुलै, १९६२.

जन्म ठिकाण : चंद्रपूर.

शिक्षण : एम्.कॉम., एलएल.बी., बी.जे., डी.बी.एम., एम.फिल.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सपना.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ७२-बल्लारपूर, जिल्हा-चंद्रपूर.

इतर माहिती : अध्यक्ष, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी वाचनालय; अध्यक्ष, राष्ट्रचेतना लोक-कल्याणकारी संस्था; १९८९ बेरोजगारांच्या हक्कासाठी मोर्चाचे आयोजन; १९९४ बेरोजगारांसाठी युवाधिकार परिषदेचे आयोजन; १९९३ स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी व शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी मोर्चाचे आयोजन; नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व अमरावती विद्यापीठाला संत गाडगेबाबा यांचे नाव द्यावे यासाठी विशेष प्रयत्न विधानसभेच्या माध्यमातून केलेल्या संसदीय संघर्षाला यश प्राप्त; शासनाकडे सभागृहाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे १९९९ मध्ये बल्लारपूर

तालुक्याची निर्मिती; उपेक्षित मातंग समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग आयोग; १ जानेवारी, १९९८ रोजी राज्यात स्वतंत्र खनिज विकास मंत्रालय सुरु करण्यात यश; गडचिरोली जिल्ह्यातील श्रीक्षेत्र मार्कण्डेश्वर मंदिर परिसराचा शासन निधी प्राप्त करुन विकास केला; चंद्रपूर, गडचिरोली या दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठ निर्मितीसाठीच्या लढ्याचे नेतृत्व; जुलै, २०१० च्या अधिवेशनात याबाबत कार्यवाही पूर्ण; शासकीय विविध योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी यासाठी 'आधार अपंगांचा', 'आधारगाथा' व 'प्रकाश वंचितांसाठी' या पुस्तकांचे प्रकशन व मोफत वाटप; आरोग्य तपासणी, नेत्र चिकित्सा शिबिरांचे अयोजन; १९९९ मध्ये चंद्रपूर शहरात मोफत सार्वजनिक वृत्तपत्र वाचनालय उपक्रम सुरु केले; १९७९ व १९८१ सह सचिव व अध्यक्ष, छात्रसंघ सरदार पटेल महाविद्यालय; १९७९ सचिव, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, चंद्रपूर; १९८० सचिव, चंद्रपूर शहर भारतीय जनता पक्ष; १९८७ अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चा; १९९३ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता युवा मोर्चा; १९९६ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००२ उपाध्यक्ष, अखिल भारतीय युवा मोर्चा; एप्रिल, २०१०-२०१३ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; फेब्रुवारी, १९९९ ते ऑक्टोबर, १९९९ राज्याच्या पर्यटन व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री; चंद्रपूर जिल्ह्यातील झाडीपट्टी विभागाचे सांस्कृतिक वैभव संपूर्ण राज्याला माहिती व्हावे यासाठी मे ,१९९९ मध्ये चंद्रपूर झाडीपट्टी पर्यटन महोत्सवाचे आयोजन; संपूर्ण चंद्रपुर जिल्हा दारु बंदी करण्यात यश; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे विधानसभेतील सन १९९८ चा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्राप्त; २००९-२०१२ विधीमंडळ भारतीय जनता पक्षाचे प्रतोद; ३१ ऑक्टोबर, २०१४ ते नोव्हेंबर, २०१९ वित्त व नियोजन आणि वने खात्याचे मंत्री व चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; सन २०२० पासून समिती प्रमुख, लोकलेखा समिती.

परदेश प्रवास : सिंगापूर, थायलंड, नेपाळ, चीन, युरोप, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्युझीलँड, दुबई व मलेशिया इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, वक्तृत्व, नामवंत वक्त्यांची भाषणे ऐकणे व पर्यटन.

पत्ता : 'भाग्यश्री', गोल बाजार वॉर्ड, चंद्रपूर - ४४२४०२.

दूरध्वनी : निवास व कार्यालय -(०७१७२) २५२५८२.
फॅक्स - (०७१७२) २५६०६९.
मोबाईल - ९८२२२२३१०१.
ई-मेल - sudhirmungantiwar@yahoo.co.in

निवडणूक निकाल

(७२-बल्लारपूर)

एकूण मतदार	३,२१,०८३
एकूण वैध मतदान	२,००,४६०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार**	८६,००२ [भारतीय जनता पक्ष]
(२) डॉ. विश्वास झाडे	५२,७६२ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. राजू झोडे	३९,९५८ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. मनोज आत्राम	१३,९२५ (गोंडवाना गणतंत्री पार्टी)
(५) नोटा	१,८५३

मुश्रीफ, श्री. हसन मियालाल

जन्म : २४ मार्च, १९५४.

जन्म ठिकाण : कागल, जिल्हा-कोल्हापूर.

शिक्षण : बी.ए. (ऑनर्स).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती साहेरा.

अपत्ये : एकूण ४ (तीन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २७३-कागल, जिल्हा-कोल्हापूर.

इतर माहिती : विद्यार्थी चळवळीत सक्रीय सहभाग; अध्यक्ष, आदर्श शिक्षण संस्था, कागल; अध्यक्ष, भाई माधवराव बागल शिक्षण संस्था, कोल्हापूर; अध्यक्ष, नागनाथ शिक्षण संस्था, एकोंडी; संस्थापक-अध्यक्ष, छत्रपती शिवाजी सहकारी सोसायटी, कागल; शेतकरी, दुर्बल घटक व मागासवर्गीयांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील; महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नी शरदरावजी पवार यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सक्रीय सहभाग; शेतकरी संघटनेच्या तंबाखू व दूध दरवाढ आंदोलनात सहभाग; सदस्य व १९९७-९८ सभापती, पंचायत समिती, कागल; सदस्य, जिल्हा परिषद, कोल्हापूर; १९८६-२०१५ संचालक, काही काळ व्हाईस चेअरमन व चेअरमन, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, या बँकेच्या माध्यमातून अनेक नाविण्यपूर्ण योजना सभासदांच्या हितार्थ राबविल्या

त्यामुळे शासनाने या बँकेचा विशेष गौरव केला; अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना, कागल; संचालक व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या (महानंद), गोरेगाव, मुंबई; व्हाईस चेअरमन, खा. सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना, हमीदवाडा; सदस्य, कागल तालुका खरेदी विक्री संघ; संस्थापक - संचालक, छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि. कागल; व्हाईस चेअरमन, कागल तालुका सह. सूत गिरणी मर्या. चेअरमन, शरद सहकारी सूत गिरणी मर्या; सहकारी कागल; संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी कृषी उद्योग सहकारी संस्था; उपाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; प्रदेश उपाघ्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च, २००१ ते जुलै, २००४ पशुसंवर्धन व दुग्धविकास खात्याचे राज्यमंत्री; जुलै, २००४ ते ऑक्टोबर, २००८ पशुसंवर्धन, दुग्धविकास, शालेय शिक्षण, औकाफ खात्यांचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००८ ते नोव्हेंबर, २००९ नगरविकास, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, अल्पसंख्याक, औकाफ, विधी व न्याय खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००९ ते जून, २०१४, कामगार खात्याचे मंत्री; २७ जून, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ जलसंपदा (कृष्णाखोरे महामंडळ) खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०१९ पासून ग्रामविकास खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : युरोप, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, चीन व जिनेव्हा इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व क्रिकेट.

पत्ता : (१) ३११, ए-वॉर्ड, मुजावर गल्ली, कागल, तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर.
दूरध्वनी :- निवास - (०२३२५) २४४२४४.
कार्यालय :- (०२३२५) २४४३४४.
मोबाईल :-९८२१४१९४६२/ ९८२२०४४८४४.
ई-मेल - hasanmushriffoundation@gmail.com
(२) ब-५, मादाम कामा मार्ग, मंत्रालय समोर, मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी :- (०२२) २२०२००९७, २२८८००८३.

निवडणूक निकाल	
(२७३-कागल)	
एकूण मतदार	३,२४,६४७
एकूण वैध मतदान	२,६३,६३६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. हसन मियालाल मुश्रीफ**	१,१६,४३६ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. समरजित सिंग घाटगे	८८,३०३ (अपक्ष)
(३) श्री. संजय घाटगे	५५,६५७ (शिवसेना)
(४) नोटा	१,१६३
(५) श्री. श्रीपती कांबळे	८२५ (अपक्ष)

मेघे, श्री. समीर दत्तात्रय

जन्म : १२ फेब्रुवारी १९७८.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वृंदा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ५०-हिंगणा, जिल्हा-नागपूर.

इतर माहिती : कोषाध्यक्ष, नगर युवक शिक्षण संस्था, नागपूर; सचिव, दत्ता मेघे इस्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, नागपूर; २००४-२०१४ अध्यक्ष, तिरुपती अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., नागपूर; संचालक, बॅ. शेषराव वानखेडे शेतकरी सहकारी सरकारी सुतगिरणी, लि. नागपूर; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका व लंडन इत्यादीं देशांचा दौरा.

छंद : खेळ.

पत्ता : (१)१३५, पांडे ले आऊट, खामला, नागपूर – ४४००२५.

दूरध्वनी : निवास - (०७१२) २२८२९३९, २२८३६९९.
कार्यालय - (०७१२) २२४९४६२.
मोबाईल - ७५०७५२२२२२.
(२) अ-१००१, लोखंडवाला रेसिडेंसी, वरळी नाका,
वरळी, मुंबई - ४०० ०२५.

निवडणूक निकाल

(५०-हिंगणा)

एकूण मतदार	३,७६,९१५
एकूण वैध मतदान	२,२६,८६६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. समीर दत्तात्रय मेघे**	१,२१,३०५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. विजयबाबु घोडमारे	७५,१३८ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. नितेश जांगळे	१५,३७१ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. राहुल सोनटक्के	९,३२० (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	२,२५६

मोरे, श्री. शांताराम तुकाराम

जन्म : १ जुलै १९७०.

जन्म ठिकाण : खानिवली, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे.

शिक्षण : चौथी

ज्ञात भाषा : मराठी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती आशा.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १३४-भिवंडी ग्रामीण (अनुसूचित जमाती), जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : ग्रामीण व आदिवासी भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे वाटप; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; शिवसेना पक्ष बांधणीसाठी विशेष योगदान; २०१२-२०१४ सदस्य, जिल्हा परिषद, ठाणे; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; समिती प्रमुख, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.

परदेश प्रवास : नेपाळ व बांग्लादेश या देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व समाजसेवा.

पत्ता : माँसाहेब मिनाताई ठाकरे कॉम्पलेक्स, पडघा, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे.

मोबाईल – ७०५७९७३३४४ / ९५०३५९१५८१.

ई-मेल : babasahebgosavi1977@gmail.com

निवडणूक निकाल

(१३४- भिवंडी ग्रामीण (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	२,८९,३६१
एकूण वैध मतदान	१,७२,८१४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. शांताराम तुकाराम मोरे**	८३,५६७ [शिवसेना]
(२) श्रीमती शुभांगी गोवारी	३९,०५८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(३) श्रीमती माधुरी म्हात्रे	३३,५७१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. नितेश म्हसे	४,९५८ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया)
(५) श्री. स्वप्नील कोळी	४,४२६ (वंचित बहुजन आघाडी)

मोहिते-पाटील, श्री. दिलीप दत्तात्रय

जन्म : २९ मे १९५९.

जन्म ठिकाण : शेव-पिंपळगाव, तालुका खेड, जिल्हा-पुणे.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुरेखा.

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १९७- खेड-आळंदी, जिल्हा- पुणे.

इतर माहिती : अध्यक्ष, हुतात्मा राजगुरू शिक्षण मंडळ, खेड, या संस्थेमार्फत माध्यमिक विद्यालय व कॉलेज सुरू केले; संचालक, मुक्ताई शिक्षण प्रसारक मंडळ; १९८८-१९९२ सरपंच, ग्रामपंचायत, शेव पिंपळगाव; वीस वर्षे संचालक विविध कार्यकारी सेवा सोसायटी; सोळा वर्षे चेअरमन, राज्य सहकारी कृषी उत्पन्न बाजार समिती संघ; संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; संचालक, राज्य कृषी पणन मंडळ; १९९२-१९९७ सदस्य, जिल्हा परिषद, पुणे; सामुहिक विवाहांचे आयोजन; १९८५-१९९९ काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१०-२०१२ समिती प्रमुख, अंदाज समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये विधान सभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व गाणी ऐकणे.

पत्ता : (१) मु. पो. शेव पिंपळगाव, तालुका-खेड, जिल्हा-पुणे.

(२) "साई सहवास", राजगुरूनगर, खेड, जिल्हा-पुणे.
दूरध्वनी :- (निवास) (०२१३५) २२६७६.
(कार्यालय) (०२१३५) २२२००६.
मोबाईल :- ९८२१९६५२२.
ई-मेलः- mladilip@gmail.comm.

निवडणूक निकाल

(१९७- खेड-आळंदी)

एकूण मतदार	३,२७,६१८
एकूण वैध मतदान	२,२०,७४५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दिलीप दत्तात्रय मोहिते-पाटील**	९६,८६६ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. सुरेश गोरे	६३,६२४ (शिवसेना)
(३) श्री. अतुल देशमुख	५३,८७४ (अपक्ष)
(४) श्री. हिरामण कांबळे	१,७७० (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,७०७

म्हात्रे, श्रीमती मंदा विजय

जन्म : २० जानेवारी १९५६.

जन्म ठिकाण : बोरीवली, मुंबई.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. विजय नारायण म्हात्रे.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १५१-बेलापूर, जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : संस्थापिका, श्री गोवर्धीनी शिक्षण संस्था गौरव इंग्लिशस्कुल अँड ज्युनिअर कॉलेज नेरुळ नवी मुंबई; एम.व्ही.टी.व्ही. न्युज अँड इंटरटेंमेन्ट टिव्ही चॅनल; संस्थापिका-अध्यक्षा, गोवर्धीनी सहकारी पतसंस्था, नवी मुंबई; १९९१ महिलांसाठी प्रौढ शिक्षण वर्ग सुरू केले; बालवाडी प्रशिक्षण वर्ग सुरू केले; महिलांसाठी स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न; जनजागृती, कार्यक्रमांचे आयोजन; बालदिन कार्यक्रमाचे आयोजन; महिला मेळाव्यांचे आयोजन; व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन; रक्तचाचणी शिबीरे व चर्चा सत्रांचे आयोजन; महिलांच्या वैवाहिक समस्या, आरोग्य, कुटूंब नियोजन प्रचार, कॅन्सर व एड्स नियंत्रण शिबिरांचे आयोजन; १९९३ बेलापूर-नवी मुंबई विभागीय अध्यक्षा,

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस; १९९४-१९९५ सदस्या व १९९७ सभापती, बालकल्याण समिती, नवी मुंबई महानगरपालिका; प्रदेश प्रतिनिधी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) ; १९९९-२००० अध्यक्षा, महाराष्ट्र प्रदेश महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०००-२०१४ सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; २०१४ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; संस्थापिका-चेअरमन, गोवर्धनी महिला बचतगट पतसंस्था; महिलांचे तीनशे बचतगट स्थापन करून महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिला; महिलांनी उत्पादित केलेल्या मालास बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून वाशी, नवी मुंबई येथे महिला उद्योग मेळावा भरवून त्यातून हजारो महिलांना रोजगार मिळवून दिला; अध्यक्षा, गोवर्धनी सार्वजनिक संस्था (चॅरिटेबल ट्रस्ट), बेलापूर, नवी मुंबई; महिला उद्योग मेळाव्याचे आयोजन; २००४-२०१० सदस्या, महाराष्ट्र विधानपरिषद; समिती प्रमुख, महिला व बाल विकास समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे सन २००५-२००६ चा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार दिनांक २९ जून २००९ रोजी महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव कार्यक्रमात भारताच्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते प्राप्त; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) गौरव बंगला, सेक्टर २९, बेलापूर, नवी मुंबई, जिल्हा ठाणे.

मोबाईल - ९८२००७५७२७ / ८१०४०८११८२.
कार्यालय- (०२२) २७५७२७५८.
निवास- (०२२) २७५७१५७३.
ई-मेल - mandataimhatre@gmail.com.

निवडणूक निकाल (१५१-बेलापूर)	
एकूण मतदार	३,८५,९९३
एकूण वैध मतदान	१,७४,५२७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती मंदा विजय म्हात्रे**	८७,८५८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अशोक गावडे	४४,२६१ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. गजानन काळे	२७,६१८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) नोटा	३,८०४
(५) श्री. गौतम गायकवाड	३,०३१ (अपक्ष)

यादव – लोणीकर, श्री.बबनराव दत्तात्रय

जन्म : १ मार्च १९६१.

जन्म ठिकाण : लोणी खुर्द, तालुका-परतूर, जिल्हा-जालना.

शिक्षण : पाचवी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मंदाताई व श्रीमती वंदनाताई.

अपत्ये : एकूण ५ (दोन मुलगे व तीन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ९९-परतूर, जिल्हा-जालना

इतर माहिती : अध्यक्ष, केशव प्रेरणा शिक्षण संस्था; वरफळ, तालुका परतूर, येथे सन २००४ मध्ये जिल्हास्तरिय शिक्षण परिषदेचे आयोजन; अध्यक्ष, धर्मवीर संभाजी प्रतिष्ठान, या प्रतिष्ठानतर्फे १९९९-२०१५ पर्यंत ११०० सामुहिक विवाहांचे आयोजन; मुख्य प्रवर्तक, चतुर्वेदेश्वर सहकारी साखर कारखाना; मुख्यप्रवर्तक जय श्रीराम जिनिंग व प्रेसिंग संस्था; १९९५-९९ संचालक, महाराष्ट्र राज्य बी-बीयाणे महामंडळ; चारवेळा जालना जिल्हाध्यक्ष, युवा मोर्चा; जिल्हाध्यक्ष व किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; सरपंच, ग्रामपंचायत, लोणी; सदस्य व सभापती, पंचायत समिती, परतूर; सदस्य, जिल्हा परिषद,, जालना; १९९९-२००४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायत राज समिती; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री व

जालना जिल्ह्याचे पालक मंत्री; याकाळात स्वच्छ भारत सर्वेक्षण अभियान अंतर्गत २ ऑक्टोबर २०१८ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते सातारा ग्रामीण जिल्हा प्रथम पुरस्कार प्राप्त; स्वच्छता सर्वेक्षणात महाराष्ट्र राज्य देशात पहिले आणले; मुदतपूर्व साठ लक्ष शौचालये बांधून महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आणले; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड;

परदेश प्रवास : श्रीलंका, ईस्त्राईल, ऑस्ट्रेलिया व चीन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु.पो.लोणी तालुका परतूर, जिल्हा जालना.

(२) स्नेह निवास, स्वामी समर्थ मंदिराजवळ, परतूर, जिल्हा जालना.
दुरध्वनी : परतूर - (०२४८४) २२४६१०.
मोबाईल : ९२८४५४५७१०

निवडणूक निकाल

(९९-परतूर)

एकूण मतदार		२,९६,२९९
एकूण वैध मतदान		२,०३,६३३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. बबनराव दत्तात्रय यादव-लोणीकर**	१,०६,३२१ [भारतीय जनता पक्ष]
(२)	श्री. सुरेशकुमार जेथलीया	८०,३७९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३)	श्री. शिवाजी सावने	८,६१६ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	श्रीमती सरीता खंदारे	२,१८३ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया-मार्क्सिसिस्ट)
(५)	नोटा	१,१५१

येरावार, श्री. मदन मधुकरराव

जन्म : २६ जानेवारी १९६३.

जन्म ठिकाण : यवतमाळ.

शिक्षण : डी.फार्म.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मिनल.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ७८-यवतमाळ, जिल्हा-यवतमाळ.

इतर माहिती : अध्यक्ष, सोशल ग्रुप; रक्तदान शिबीर, वधु-वर सूचक मेळाव्यांचे आयोजन; सामुहिक विवांहाचे आयोजन; जातीय सलोखा मेळाव्यांचे आयोजन; यवतमाळ येथे ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या नावे अभ्यासिका सुरु केली; शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी प्रयत्न; अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु केले; अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह सुरु केले; इतर मागासवर्गीय मुलींसाठी वसतीगृह सुरु केले; सन २०१८ मध्ये यवतमाळ येथील ९० व्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष; यवतमाळ येथील नाट्यगृहाच्या निर्मितीसाठी प्रयत्न; यवतमाळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न; १९९१-९४ अध्यक्ष, भारतीय जनता

युवा मोर्चा; १९९५-१९९७ जिल्हा सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष; सन २००६ जिल्हाध्यक्ष, सदस्य, प्रदेश कार्यकारणी, भारतीय जनता पक्ष; १९९१-१९९६ नगरसेवक व १९९१-१९९२ सभापती, बांधकाम समिती, नगरपालिका, यवतमाळ; १९९६-१९९९ (पो.नि.), २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सन २००४-२००९ सदस्य, पंचायत राज समिती; सदस्य, विनंती अर्ज समिती; १९९५ सदस्य, म्हाडा; अमरावती विभाग; जुलै २०१६ ते जून २०१९ ऊर्जा, पर्यटन, अन्न व औषधी प्रशासन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सामान्य प्रशासन विभाग, अपारंपारिक ऊर्जा, भटक्या जाती विमुक्त जाती, इतर मागासवर्गीय विभाग खात्याचे राज्यमंत्री; सन २०१६-२०१९ यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : सिंगापूर, मलेशिया, थायलंड, युरोप, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, श्रीलंका, नेपाळ व चीन इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट व बॅडमिंटन.

पत्ता : अवधुत वाडी, दत्त चौक, यवतमाळ- ४४५००१.

दूरध्वनी : निवास - (०७२३२) २४४१५५.
कार्यालय - (०७२३२) २५५०५६.
मोबाईल - ९८२२२३५५५.
ई-मेल - 44madan@ymail.com.

निवडणूक निकाल	
(७८-यवतमाळ)	
एकूण मतदार	३,८४,९३५
एकूण वैध मतदान	२,१५,७१७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. मदन मधुकरराव येरावार**	८०,४२५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. अनिल ऊर्फ बाळासाहेब मंगुळकर	७८,१७२ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. योगेश पारवेकर	७,९३० (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. बिपीन चौधरी	३,७५७ (प्रहार जनशक्ती पार्टी)
(५) श्री. संदिप देवकाते	१,८४९ (बहुजन समाज पार्टी)

रहांगडाले, श्री. विजय भरतलाल

जन्म : ५ डिसेंबर १९६७.

जन्म ठिकाण : खमारी, तालुका-तिरोडा, जिल्हा-गोंदिया.

शिक्षण : बी.ए., डिप्लोमा इन मायनिंग इंजिनिअरिंग.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती विणा.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ६४-तिरोडा, जिल्हा-गोंदिया.

इतर माहिती : अध्यक्ष, पवार समाज संस्था, तिरोडा; चेअरमन, पवार जागृती प्रगतीशील शिक्षण, संस्था, तिरोडा; संचालक, विविध कार्यकारी सहकारी संस्था, खामरी; १९९५-९८ सचिव, युवामोर्चा, २००१-२००४ उपाध्यक्ष, युवा मोर्चा, २००५-२००९ अध्यक्ष, युवा मोर्चा गोंदिया; २०१३-२०१४ महामंत्री, गोंदिया जिल्हा भारतीय जनता पक्ष; २०००-२००५ सदस्य, २००३-२००५ सभापती, पंचायत समिती, तिरोडा; २००५-२०१४ सदस्य, २००६-२०१३ सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, २०१०-२०१३ सभापती, अर्थ व बांधकाम समिती, जिल्हा परिषद, गोंदिया;

२०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : नेपाळचा अभ्यास दौरा.

छंद : प्रवास व वाचन.

पत्ता : (१) मु. खमारी, पो. चिखली, तालुका-तिरोडा,
जिल्हा- गोंदिया-४४१९११.
ई-मेल - vijayrahangdaletiroda@gmail.com
(२) वीर सावरकर वॉर्ड, तिरोडा, तालुका-तिरोडा, जिल्हा-गोंदिया.
दूरध्वनी : निवास व कार्यालय - (०७१९८) २५४००८.
मोबाईल - ९७६४११०४८८.

निवडणूक निकाल

(६४-तिरोडा)

एकूण मतदार	२,५७,९१८
एकूण वैध मतदान	१,६९,३०१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. विजय भरतलाल रहांगडाले**	७६,४८२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. रविकांत बोपचे	५०,५१९ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. दिलीप बन्सोड	३३,१८३ (अपक्ष)
(४) श्री. कमल बाबुलाल हतवर	२,५२५ (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	१,८४१

राऊत, डॉ. नितीन काशिनाथ

जन्म : ९ ऑक्टोबर १९५१.

जन्म ठिकाण : नागपूर.

शिक्षण : एम.ए.,एफ.बी.एम.,सी.पी.एल.,एम.एफ.ए.(नाट्य), पीएच.डी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुमेधा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)

व्यवसाय : उद्योग व व्यापार.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ५७ – नागपूर- उत्तर, (अनुसूचित जाती), जिल्हा – नागपूर.

इतर माहिती : अध्यक्ष, पिपल्स प्रोग्रेसिव्ह सोसायटी, नागपूर; आजीव सदस्य, नागपूर फलाईंग क्लब लि.; सदस्य, डी.यु.डी.ए.; विश्वस्त, नागपूर सुधार प्रन्यास; सदस्य, गृह विभाग कामकाज स्थायी समिती; अध्यक्ष, राज्य परिवहन सल्लागार समिती; अध्यक्ष, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय सल्लागार समिती; अध्यक्ष, अखिल भारतीय अनुसूचित जाती / जमाती शिकाऊ विमानचालक संघटना; सल्लागार, महाराष्ट्र राज्य वनपाल व वनरक्षक संघटना व वेस्टर्न कोलफिल्डस् लि. अनुसूचित जाती / जमाती कर्मचारी कल्याण संघटना; पद-दलितांच्या उध्दारासाठी संकल्प संस्था सुरू केली. या संस्थेमार्फत समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणाचे कार्य; जातीय

दंगली, पूरग्रस्त व नैसर्गिक आपदग्रस्तांसाठी मदत, दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्यासाठी नागपूर येथे दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या लाखो भाविकांना मूलभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठी सक्रिय सहाय्य; १९८७ मोफत अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन; पिण्याच्या पाण्याची मोफत सोय, प्रसाधनगृह, स्नानगृहे उभी केली, २.५ लाख लोकांच्या विश्रांतीसाठी मंडपाची सोय केली; मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; पर्यावरण, दारूबंदी, व्यसनमुक्ती, व्यवसायिक शिक्षण, युवकांना मार्गदर्शन, महिला व बाल – कल्याण , विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी मोफत प्रदर्शन व जनजागृती शिबिरांचे आयोजन; १९८८ डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय एकता व एकात्मता यासाठी 'संकल्परथ' चे आयोजन; १९८९ राष्ट्रीय एकात्मतेसाठी नागपूर ते रायपूर भीमज्योत यात्रेचे आयोजन; १९९१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १०० व्या जयंतीनिमित्त नागपूर येथील कस्तूरचंद पार्क नागपूर येथे भव्य रॅलीचे आयोजन; मराठवाडा नामांतर आंदोलनात सक्रिय सहभाग; नागपूर विद्यापीठामधील अनुसूचित जाती व जमाती यांचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्न; महाराष्ट्र राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांसाठीच्या आंदोलनात सहभाग व सेवेतील सुरक्षितता व सुधारित वेतनश्रेणी मिळवून देण्यासाठी प्रयत्न; अनुसूचित जाती / जमातीच्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक व खाजगी विमानचालक अनुज्ञाप्ती तसेच शिष्यवृत्ती मिळावी यासाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व; १९८९ चंद्रपूर येथे दलित साहित्य संमेलनात सहभाग व विविध विषयांवर व्याख्याने दिली; १९९१ विदर्भ साहित्य संमेलनात सक्रीय सहभाग; २००२ नागपूर येथे अस्मितादर्श रजत महोत्सवाचे आयोजन; सहित्य संमेलनाचे आयोजन; १९९० नागपूर जिल्ह्यातील मकर – धोकडा येथील जातीय दंगलीतील दंगलग्रस्तांना सर्वतोपरी मदत; १९९१ मोवाड व नागपूर येथील पूरग्रस्तांना मदत कार्य व १५ दिवस अन्नदान केले; स्वतंत्र विदर्भाचे समर्थक; विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रयत्नशील; १९ एप्रिल २००० संविधान बचाओ रॅलीचे आयोजन; शासकीय व निमशासकीय कार्यालयातील मागासवर्गीय अनुशेष भरण्यासाठी प्रयत्न; भारत सरकारच्या राष्ट्रीय आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग स्थापन करण्यासाठी प्रयत्न; १९६२ मधील संसद व राज्य

विधानसभेत, अनुसूचित जातीसाठींच्या राखीव जागांच्या संख्येइतकी वाढ करण्याची राज्य शासनाची शिफारस मिळविण्यासाठी प्रयत्न; १९७० पासून राजकीय क्षेत्रात कार्य; २००१ सदस्य, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस; सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; सरचिटणीस, नागपूर जिल्हा (शहर) युवक काँग्रेस;स्व. इंदिरा गांधीच्या अटकेच्या वेळी त्यांच्या समर्थनार्थ जेल भरो आंदोलनात सक्रिय सहभाग; १९९१ पासून लोकसभा निवडणूकामध्ये उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्राचे प्रभारी; कोलकत्ता, बंगलोर व नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या खुल्या अधिवेशनात सहभाग; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे सदस्य; आरक्षण अधिनियमासाठी गठित केलेल्या समितीचे सदस्य; वनोत्पादनाच्या चोरी-संबंधीच्या संयुक्त समितीचे सदस्य; विधानमंडळाच्या रोजगार स्वयंरोजगार समितीचे सदस्य; मोरवाडा येथील पूरग्रस्त भागामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल वनराई संस्थेमार्फत पुरस्काराने सन्मानित; रत्नागिरी येथे आरक्षण विधेयकासाठी सन्मानीत; डिसेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ गृह, तुरूंग,राज्य उत्पादन शुल्क व कामगार खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००९ ते ऑक्टोबर २०१४ पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. डिसेंबर २०२० पासून ऊर्जा खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : अमेरिकन बायोग्राफिकल सोसायटीतर्फे २००२ च्या मॅन ऑफ द इयर सन्मानासाठी निवड; २००२ राष्ट्रसंघ संघटनेद्वारे जिनिव्हा व स्वित्झर्लॅंड येथे आयोजित केलेल्या मानवी हक्क आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग; २००३ व्हॅंकूव्हर (कॅनडा) येथे आयोजित केलेल्या सामाजिक न्याय व रूपांतर या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग; २००४ राष्ट्रसंघाद्वारे बँकॉक (थायलॅंड) येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय एड्स जागृती परिषदेमध्ये सहभाग.

प्रकाशने : (१) ट्रेंड ऑफ पॉलिटिक्स इन दलित कम्युनिटी ऑफ महाराष्ट्र.
(२) आंबेडकरी जनता आणि राजनीती.
(३) "संकल्प" वृत्तमासिकाचे प्रमुख संपादक.

छंद : वाचन, प्रवास व सामाजिक कार्य.

पत्ता : २४, गार्डन ले-आऊट, बेझनबाग, कामठी रोड, नागपूर – ४४० ००४.
दूरध्वनी :- (०७१२) २६३११११ / २६३३३२२.

निवडणूक निकाल

(५७ – नागपूर-उत्तर (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	३,८४,७४२
एकूण वैध मतदान	१,९५,७७१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. नितीन काशिनाथ राऊत**	८६,८२१ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) डॉ. मिलिंद माने	६६,१२७ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. सुरेश साखरे	२३,३३३ (बहुजन समाज पार्टी)
(४) श्रीमती किर्ती डोंगरे	९,३१८ (ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन)
(५) श्री. विनय भांगे	५,५९९ वंचित बहुजन आघाडी

राऊत, श्री. राजेंद्र विठ्ठल

जन्म : १ जून, १९६९.

जन्म ठिकाण : बार्शी, जिल्हा सोलापूर.

शिक्षण : एच.एच.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती कविता.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे)

व्यवसाय : शेती.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : २४६-बार्शी, जिल्हा-सोलापूर.

इतर माहिती : अध्यक्ष, भाग्यलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, मर्यादित, बार्शी; अध्यक्ष, राजाभाऊ राऊत चालक-मालक वाहतुक संघ, बार्शी; १९९६-२००९ नगरसेवक, १९९८-२००० नगराध्यक्ष, नगरसपालिका, बार्शी; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : ३८०९ राऊत चाळ, बार्शी, जिल्हा सोलापूर ४१३४०१.

दूरध्वनी :- (०२१८४) २२२४५८.
कार्यालयाः (०२१८४) २२१८११.
मोबाईल :- ९८५०३३३३८८.
ई-मेल :- rajendraraut@gmail.com.

निवडणूक निकाल

(२४६- बार्शी)

एकूण मतदार	३,०६,५०७
एकूण वैध मतदान	२,२४,३१६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. राजेंद्र विठ्ठल राऊत**	९५,४८२ (अपक्ष)
(२) ॲड दिलीप सोपल	९२,४०६ (शिवसेना)
(३) श्री. निरंजन भूमकर	१६,११९ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. विशाल काळस्कर	११,४२७ (अपक्ष)
(५) श्री. नागनाथ चव्हाण	२,७१८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

राऊत, श्री. सुनिल राजाराम

जन्म : २० जुलै १९६५.

जन्म ठिकाण : घाटकोपर, जिल्हा-मुंबई उपनगर.

शिक्षण : एफ.वाय.बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती प्रिती.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १५६-विक्रोळी, जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : अध्यक्ष, जय भवानी सहकारी पतपेढी मर्या. भांडुप; संचालक, दि.मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि.; अध्यक्ष, श्रीमान योगी प्रतिष्ठान; या संस्थेद्वारे विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; रक्तदान, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली; राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन; मतदारसंघातील भक्तजनांसाठी राज्यातील विविध ठिकाणच्या देवदर्शनासाठी मोफत बस सेवा उपलब्ध करुन दिली; गरीब गरजू विद्यार्थींच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप; गरीब रुग्णांना सर्वोतोपरी मदत; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : दुबई, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, अमेरिका व श्रीलंका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व संगीत.

पत्ता : मैत्री बंगला, फ्रेन्डस कॉलनी, भांडूंप (पूर्व), मुंबई - ४०००४२.

दूरध्वनी :- निवास - (०२२) २५६६६९१७.
कार्यालय - (०२२) २५६६५०२.
मोबाईल :- ९८२१२४५०५२.
ई-मेल :- sunilraut20@yahoo.com

निवडणूक निकाल

(१५६-विक्रोळी)

एकूण मतदार	२,३१,१०४
एकूण वैध मतदान	१,२७,९५१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल राजाराम राऊत**	६२,७९४ [शिवसेना]
(२) श्री. धनंजय पिसाळ	३४,९५३ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. विनोद शिंदे	१६,०४२ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. सिध्दार्थ मोकले	९,१५० (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	३,१८६

राजपूत, श्री. उदयसिंग सरदारसिंग

जन्म : १ जुलै १९७१.

जन्म ठिकाण : नागद, तालुका-कन्नड, जिल्हा-औरंगाबाद.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पुनमबाई.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १०५-कन्नड, जिल्हा औरंगाबाद

इतर माहिती : २००२-२००७ सदस्य, जिल्हा परिषद, औरंगाबाद; सामाजिक कार्याबद्दल सन २०१७ मध्ये "आप्पासाहेब नागदकर कन्नड भूषण पुरस्कार" प्राप्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : सामाजिक कार्य

पत्ता : मु. पो. नागद, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद ४३११०३.
मोबाईल : ९८२२२०६१३५, ९४२२२०९१९९.
ई-मेल :- udayrajput12@gmail.com

निवडणूक निकाल

(१०५-कन्नड)

एकूण मतदार	३,१४,६७९
एकूण वैध मतदान	२,१५,७५०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. उदयसिंग सरदारसिंग राजपूत**	७९,२२५ [शिवसेना]
(२) श्री. हर्षवर्धन जाधव	६०,५३५ (अपक्ष)
(३) श्री. संतोष कोल्हे	४३,६२५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) श्री. मारुती राठोड	१४,३४९ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. किशोर पवार	१०,६१४ (अपक्ष)

राजळे, श्रीमती मोनिका राजीव

जन्म : १९ फेब्रुवारी, १९७२.

जन्म ठिकाण : पोहेगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती कै. राजीव आप्पासाहेब राजळे.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २२२-शेवगाव, जिल्हा-अहमदनगर.

इतर माहिती : संस्थापिका-अध्यक्षा, यशोधरा महिला प्रतिष्ठान, पाथर्डी; विश्वस्त, आदि फाऊंडेशन, आदिनाथ नगर, पाथर्डी; सन २०१७ पासून संचालिका, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि.; संचालिका, श्री. वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना; २०१२-२०१४ सदस्या, उपाध्यक्षा व सभापती, आरोग्य व शिक्षण समिती, जिल्हापरिषद, अहमदनगर; सदस्या, भारतीय जनता पक्ष; २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सदस्या, ग्रंथालय समिती, आमदार निवास व्यवस्था समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : युरोप, दुबई, सिंगापूर व ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) 'सिध्दसावली ', मु.पो. कासार-पिंपळगाव, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर - ४१४५०५.

(२) अरुणाचला बंगला, श्रीकृष्ण नगर, आरवेगाव रोड, मु.पो.ता-शेवगाव, जिल्हा अहमदनगर - ४१४५०२.
दूरध्वनी : निवास - (०२४२८) २४५५०१/ २२२२५०.
कार्यालय - (०२४२९) २२२५५०.
मोबाईल : ९८९०३०५०००/ ९४०४०७६९७०/ ९४२३१६२०७५.
ई-मेल : rajale.monika@gmail.com.

निवडणूक निकाल

(२२२-शेवगांव)

एकूण मतदार	३,४१८७३
एकूण वैध मतदान	२,२६,२५८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्रीमती मोनिका राजीव राजळे**	१,१२,५०९ [भारतीय जनता पक्ष]
(२) ॲड. प्रतापराव ढाकणे	९८,२१५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. किसन चव्हाण	९,५९९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	२,१८६
(५) श्री. सुभाष साबळे	१,१२४ (बहुजन समाज पार्टी)

राठोड, डॉ. तुषार गोंविदराव

जन्म : २३ डिसेंबर १९७८.

जन्म ठिकाण : मुखेड, जिल्हा-नांदेड.

शिक्षण : एम.बी.बी.एस., डी.एम.आर.ई (रेडिओलॉजी).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व बंजारा.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी डॉ. ज्योत्स्ना.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : वैद्यकिय.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ९१-मुखेड, जिल्हा-नांदेड.

इतर माहिती : २०१४-२०१९ (पो.नि.) सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु.पो. वसंतनगर, तालुका मुखेड, जिल्हा-नांदेड.

दूरध्वनी : निवास - (०२४६१) २२२५५५.
मोबाईल - ९५०३३७२२२२.
ई-मेल - rtushar30@gmail.com.
(२) ३०२-ए, सुखदा अपार्टमेंट, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई.

निवडणूक निकाल	
(९१-मुखेड)	
एकूण मतदार	२,८३,१८३
एकूण वैध मतदान	१,८६,०१४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. तुषार गोविंदराव राठोड**	१,०२,५७३ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. भाऊसाहेब पाटील	७०,७१० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. जिवन दारेगवे	८,७५६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. बालाजी आगलागे	१,६८३ (संभाजी ब्रिगेड पार्टी)
(५) श्री. जितेंद्र वाघमारे	१,२१८ (बहुजन समाज पार्टी)

राठोड, श्री संजय दुलीचंद

जन्म : ३० जून १९७१.

जन्म ठिकाण : यवतमाळ.

शिक्षण : बी.कॉम., बी.पी.एड.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व बंजारा.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शितल.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : ७९-दिग्रस, जिल्हा-यवतमाळ.

इतर माहिती : सचिव, छत्रपती शिवाजी कला, शिक्षण क्रीडा, कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, शिवपुरी,तालुका कळंब, जिल्हा यवतमाळ; आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप; आदिवासींसाठी नृत्य व लोकनृत्य स्पर्धांचे आयोजन; २००३-२००४ प्लास्टिक मुक्ती अभिनयाचे आयोजन; २००२-२००४ मच्छरमुक्ती अभियानांचे आयोजन; कुपोषित बालकांना दूध पावडर व बिस्किटांचे वितरण; आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत; रुग्णांना सर्वोतोपरी मदत; सहकाराच्या माध्यमातून जनतेच्या विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न; ग्रामविकास सहकारी संस्था, आदिवासी सहकारी

संस्था, विविध कार्यकारी संस्था, जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था, तालुका देखरेख सहकारी संस्था, खरेदी-विक्री सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यात सक्रिय सहभाग; १९९१ पासून शिवसेनेचे कार्य; १९९७ जिल्हा प्रमुख, शिवसेना यवतमाळ जिल्हा; शिवसेनेच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग; विदर्भस्तरीय आदिवासी परिषद, बंजारा समाज मेळावा व सरपंच परिषदेचे आयोजन; निराधारांना अनुदानासाठी तसेच पाणी प्रश्न व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी धरणे तसेच अन्याय अत्याचारा विरोधी आंदोलनात सक्रीय सहभाग; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायत राज समिती; सदस्य, उपविधान समिती; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ महसूल खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०१९ ते २८ फेब्रुवारी २०२१ वने व भुकंप पुनर्वसन खात्याचे मंत्री.

छंद : लोकसंग्रह वाढविणे, सिनेमा पाहणे व ड्रायव्हींग करणे.

पत्ता : (१) एल-८, विदर्भ हौसिंग बोर्ड कॉलनी, भाईंदे चौक, यवतमाळ.

दूरध्वनी : निवास (०७२३२) २४३३३४, २४०४२८.
कार्यालय - (०२२) २२८७६०६९, २२८७७६४६३.
मोबाईल - ९७६५५९४१११, ९४२२१६६२२२, ९३२५०७७३००.
(२) स्वामी समर्थ नगर, नातूवाडी, दारव्हा, जिल्हा-यवतमाळ.

निवडणूक निकाल	
(७९-दिग्रस)	
एकूण मतदार	३,२२,९८०
एकूण वैध मतदान	२,२५,७७६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. संजय दुलीचंद राठोड**	१,३६,८२४ [शिवसेना]
(२) श्री. संजय देशमुख	७३,२१७ (अपक्ष)
(३) श्री. तारिक लोखंडवाला	६,२०५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(४) ॲड. शेहेजाद खान	३,०७७ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. देवराव मसाळ	१,८११ (बळीराजा पार्टी)

राणा, श्री. रवि गंगाधरराव

जन्म : २८ एप्रिल १९८०.

जन्म ठिकाण : अमरावती.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नवनीत.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व सामाजिक कार्य.

पक्ष : अपक्ष

मतदारसंघ : ३७-बडनेरा, जिल्हा-अमरावती.

इतर माहिती : सिनेट सदस्य, तुकडोजी महाराज विद्यापीठ; संस्थापक-अध्यक्ष, युवा स्वाभिमानी संघटना, या संघटनेमार्फत लोकसभा व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये मतदान जनजागृती मोहिमेचे आयोजन; अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान; गोरगरिबांच्या प्रश्नासाठी व विकासासाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न; व्यसनमुक्तीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन; गरीब, गरजू रुग्णांना सर्वोतोपरी मदत; बेरोजगारांना रिक्षा, हातगाडी, कटला देवून स्वयंरोजगार निर्माण करुन दिला; २०१३ मध्ये ३७७० सामुहिक विवाहांची एकाच दिवशी आयोजन करुन स्वतःचे लग्न केले या ऐतिहासिक कामाची नोंद गिनिज बुक ऑफ

वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. शेतीमालास योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न; नवदांपत्यांना संसारोपयोगी वस्तूंचे वाटप; अपंगाना सायकली मिळवून दिल्या; बेघरांना घरे मिळवून दिली; महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन; २००९-२०१४, २०१४-२०१९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, लोकलेखा समिती; सदस्य, रोजगार हमी योजना समिती; सदस्य, महिला व बाल कल्याण समिती; सदस्य, आहार व्यवस्था समिती; सदस्य, संसदीय समिती, सदस्य, सिंचन समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : लंडन व दुबईचा अभ्यास दौरा.

छंद : आदिवासी, गोरगरिब जनतेमध्ये राहुन त्यांचे दुःख कमी करण्यासाठी उपाययोजना आखणे, बहुउद्देशीय कार्यक्रम राबविणे, विविध विषयावर वाद-विवाद स्पर्धामध्ये भाग घेणे.

पत्ता : (१) 'गंगा-सावित्री' निवास, शंकरनगर, राजापेठ रोड, अमरावती.

दूरध्वनीः कार्यालय - (०७२१) २६७९३९८.
मोबाईल - ९९६९०१११११, ९५९४५०४५०४.
ई-मेल - rr_group@rediffmail.com,
rr.ravirana@gmail.com
(२) राजापेठ भोगांडे कॉम्पलेक्स, आ. रवि राणा जनसंपर्क कार्यालय, अमरावती, जिल्हा अमरावती.

निवडणूक निकाल

(३७-बडनेरा)

एकूण मतदार	३,५५,८८८
एकूण वैध मतदान	१,८६,६६५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रवि गंगाधरराव राणा**	९०,४६० [अपक्ष]
(२) श्रीमती प्रिती संजय बंड	७४,९१९ (शिवसेना)
(३) श्री. प्रमोद इंगळे	८,२०५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्रीमती शिला मेश्राम	३,७४० (अपक्ष)
(५) ॲड. विलास गावंडे	३,४१९ (बहुजन समाज पार्टी)

राणे, श्री. नितेश नारायण

जन्म : २३ जून, १९८२.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : एम.बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नंदिता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २६८-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग.

इतर माहिती : विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी एस.एस.पी.एम. कॉलेज सुरु केले; समर्थ कामगार संघटनेमार्फत कामगारांच्या न्याय हक्कासाठी भरीव कार्य; महिला बचत गट स्थापन करुन महिलांना रोजगार उपलब्ध करुन दिला; कलाकरांना मदत व प्रोत्साहन; बेरोजगारांसाठी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करुन एक दिवसात २५३०० बेरोजगारांसाठी नोकऱ्या मिळवून दिल्याची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली; सप्टेंबर, २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : लंडन व अमेरिका देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) ओम गणेश बंगलो, नाथ पै नगर, कणकवली रेल्वे स्टेशन जवळ, तालुका कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग.

दूरध्वनी - निवास - २६६०९७७७.
कार्यालय -२६०५३२६३.
मोबाईल - ९८३३३४४४४१.
ई-मेल - nranen@gmail.com.
(२) २०२, संत निवास, राजकुमार ज्वेलर्स शेजारी, लिंकींग रोड, खार (प), मुंबई - ४०० ०५२.
(३) आदिरा बंगलो, मानीकजी हायस्कुल जवळ,जुहू तारा रोड, सातांक्रुझ (पश्चिम) मुंबई - ४०००५४.

निवडणूक निकाल

(२६८-कणकवली)

एकूण मतदार	२,३०,०८१
एकूण वैध मतदान	१,५०,४६१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नितेश नारायण राणे**	८४,५०४ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री.सतिश सावंत	५६,३८८ (शिवसेना)
(३) श्री.सुशिल राणे	३,३५५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) ॲड मनाली वंजारे	२,०५४ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,९४५



राणे, श्री.सुनिल दत्तात्रय

जन्म : ३ सप्टेंबर, १९६३.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती वर्षा.

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनतापक्ष.

मतदारसंघ : १५२-बोरिवली, जिल्हा मुंबई उपनगर.

इतर माहिती : सन १९९८ पासून सचिव, अर्थव शिक्षण संस्था; या संस्थेस उल्लेखनीय कार्याबद्दल सन २०१६ मध्ये एशिया वन तसेच सन २०१८-२०१९ मध्ये टाईम्स इंडियाचा पुरस्कार प्राप्त, सन २०१६ पासून चेअरमन, अथर्व फाउंडेशन, या संस्थेद्वारे वन ऑल फॉर वन कार्यक्रमाने देशभरातील शहिदांच्या कुटुंबीयांना तसेच जखमी सैनिकांना मदत; मुंबईतील २६/११ च्या आतंकवादी हल्ल्यातील शहिद सैनिकांना व पोलिसांना मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन; शहिद कुटुबीयांना मदत कारगील, मधील शहिदांच्या कुटुंबीयांना मदत देशभरातील शहीदांच्या मुलींना १०० दिवसात १०० संगणक वाटप; १९९२ पासून आध्यक्ष, मुंबई रहिवाशी सेवा संघ; सन १९९४ पासून सल्लागर, समृध्दी सहकार्य पतसंस्था, मर्यादित; मार्च

२०१९ पासून कार्यकारी समिती अध्यक्ष, दि चिल्ड्रन एड सोसायटी, मुंबई; ऑगस्ट २०१९ पासून कार्यकारी अध्यक्ष, मुंबई विकास विभाग, बी.डी.डी पुर्नविकास प्रकल्प, उच्चस्तरिय समिती; सन १९९७-२००० उपाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र युवा मोर्चा; सन २०००-२००३ सरचिटणीस, सन २००३-२००६ अध्यक्ष, भाजपा दक्षिण-मध्य विभाग, मुंबई; सन २००६ पासुन सरचिटणीस, मुंबई प्रदेश भारतीय जनता पक्ष; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व क्रिकेट.

परदेश प्रवास : सिंगापूर, थायलंड, दुबई, जर्मनी, फ्रान्स, चीन व इंग्लंड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) १४ वसुधा अपार्टमेंट, बाबासाहेब वरळीकर चौक, सेन्चुरी बाजार जवळ, मुंबई ४०००२५.

(२) बी/२४०३, २४वा मजला, ॲक्वेरिया ग्रन्डे, देवीदास लेन, क्रिस कॉटेज समोर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०००१०३.
दुरध्वनी-निवास-(०२२) ८६६२७२९८० ८४५१८९९००४.
कार्यक्रम : ७४००४६९००८.
मोबाईल : ९८१९६०००००९.
ई-मेल : sunilrane13@gmail.com

निवडणूक निकाल (१५२ - बोरिवली)	
एकूण मतदार	३,०१,४४६
एकूण वैध मतदान	१,६५,९६४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल दत्तात्रय राणे**	१,२३,७१२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. कुमार खिलारे	२८,६९१ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) नोटा	१०,०९५
(४) श्री. राजेश मल्ला	२,२३२ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. घीरुभाई गोहील	१,२३४ (सरदार वल्लभभाई पटेल पार्टी)

रायमुलकर, डॉ. संजय भास्कर्राव

जन्म : ३ ऑगस्ट, १९६८.

जन्म ठिकाण : नांद्रा-धांडे, तालुका-मेहकर, जिल्हा-बुलढाणा.

शिक्षण : बी.ए., एल.एस.एस.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रंजना.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २५-मेहकर (अनुसूचित जाती), जिल्हा-बुलढाणा.

इतर माहिती : संचालक, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९८६-१९८७ शाखा प्रमुख, १९८७-१९९५ विभाग प्रमुख, १९९५-२००१ उप तालुका प्रमुख, २००१ पासून शिवसेना, मेहकर तालुका प्रमुख; २००३-२००५ उप सभापती व २००८ सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती; शेतकऱ्यांचा प्रश्न शासनाच्या विरोधी आंदोलन, कृषी उत्पन्न बाजार समिती व्यापाऱ्यांच्या विरोधी आंदोलन; वीज भारनियमन विरोधी आंदोलन; आदिवासी गावात स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य उपलब्ध करुन द्यावे यासाठी आंदोलन; शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेशा प्रमाणात बी-बियाणे

उपलब्ध करुन द्यावेत यासाठीचे आंदोलन; सफाई कामगारांच्या प्रश्नांसाठी आंदोलन; कर्जमुक्तीसाठी दे धक्का मोर्चा, शेतकरी, शेतमजूर, गरीब रुग्ण, आदिवासी, सर्वसामान्य माणसांच्या न्याय हक्कासाठी विविध आंदोलनांचे नेतृत्व केले; जातीय सलोखा राहावा यासाठी प्रयत्न; आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरांचे आयोजन; गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; सामुहिक विवाहांचे आयोजन; मेहकर येथे भागवत सप्ताहाचे दरवर्षी आयोजन; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : सामाजिक कार्य

पत्ता : स्वामी समर्थ केंद्राजवळ, मेहकर, तालुका-मेहकर, जिल्हा-बुलढाणा.

मोबाईल - ९१५८१९७७७७.

निवडणूक निकाल

(२५-मेहकर (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,९३,५४९
एकूण वैध मतदान	१,७४,८१६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. संजय भास्करराव रायमुलकर**	१,१२,०३८ [शिवसेना]
(२) ॲड. अनंत वानखेडे	४९,८३६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. आबाराव वाघ	८,०५० (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	२,२४१
(५) श्री. अनिल खडसे	१,४११ (बहुजन समाज पार्टी)

रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह

जन्म : १६ जानेवारी १९७५.

जन्म ठिकाण : दोंडाईचा, तालुका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे.

शिक्षण : बी.कॉम., एम.बी.ए.(यु.के.).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व अहिराणी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती कुंवरराणी सुभद्राकुमारी.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व उद्योग.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ८-शिंदखेडा, जिल्हा-धुळे.

इतर माहिती : यु.के. मधील कार्डीफ विद्यापीठातून विजयी होणारा ब्रिटीशेत्तर पहिला विद्यार्थी; सचिव, स्वोध्दारक विद्यार्थी संस्था, दोंडाईचा; संस्थापक-चेअरमन, राणीमाँसाहेब मनुबादेवी रावल सह. पतसंस्था लि. दोंडाईचा; संचालक, कृषि उत्पन्न बाजार समिती, शिंदखेडा, तालुका दोंडाईचा, जिल्हा धुळे; संचालक, धुळे जिल्हा सह. बँक लि. धुळे; संस्थापक-अध्यक्ष, जय श्रमशक्ती मिनीडोअर चालक-मालक संघटना; संचालक, युनिव्हर्सल स्टार्च प्रा. लि. दोंडाईचा, जिल्हा-धुळे; संचालक, युनिक शुगर्स प्रा. लि., दोंडाईचा, जिल्हा धुळे; संस्थापक-अध्यक्ष, जयहिंद मित्र

मंडळ, दोंडाईचा; या मंडळामार्फत सोनशेलू, तालुका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे या गावाला दत्तक घेऊन स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविले त्यामुळे या गावाला २००३ मध्ये विभागात आदर्शगाव पुरस्कार प्राप्त; पाणी अडवा, पाणी जिरवा, वृक्ष लागवड, व्यसनमुक्ती कार्यक्रमांचे आयोजन; जयहिंद मित्र मंडळामार्फत सार्वजनिक गणेश उत्सवाच्या काळात समाज प्रबोधनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; राष्ट्रीय सरचिटणीस भारतीय युवा मोर्चा, नवी दिल्ली प्रदेश सरचिटणीस व धुळे जिल्हा अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष; २००१ सदस्य व सभागृह नेता, वरवाडे नगरपरिषद दोंडाईचा; कृभकोचे नासिक, धुळे, जळगाव, नंदूरबार व ठाणे जिल्हा प्रतिनिधी म्हणून निवड; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २००४ मध्ये विधिमंडळ सदस्यांची युथ फोरम नावाने संघटना स्थापन केली; सदस्य, पंचायत राज समिती; सदस्य, अंदाज समिती, सार्वजनिक उपक्रम समिती; सदस्य, क्रीडा धोरण समिती; जून २०१५ ते जुलै २०१६ रोजगार हमी योजना समितीचे समिती प्रमुख; ८ जुलै २०१६ ते नोव्हेंबर २०१९ पर्यटन, रोजगार हमी, अन्न व औषध प्रशासन, राजशिष्टाचार खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड;

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड व युरोप इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, फुटबॉल व हॉर्स रायडींग.

पत्ता : जय पॅलेस, रावल गढी, महाराणा प्रतापसिंह मार्ग, दोंडाईचा,

तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे- ४२५५०.
दूरध्वनी : निवास - (०२५६६) २४४०२५.
कार्यालय - (०२५६६) २४६३२५.
मोबाईल - ९४२२२८५५०५, ९८६९७०१३७५.
ई-मेल - jaykumarrawal.16@gmail.com

निवडणूक निकाल	
(८-शिंदखेडा)	
एकूण मतदार	३,२७,०८२
एकूण वैध मतदान	२,००,५६८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. जयकुमार जितेंद्रसिंह रावल**	१,१३,८०९ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. संदिप बेडसे	७०,८९४ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) श्री. शानभाऊ सोनावणे	९,३५८ (अपक्ष)
(४) श्री. नामदेव येलवे	२,०२५ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,८१६

लंके, श्री. निलेश ज्ञानदेव

जन्म : १० मार्च, १९८०.

जन्म ठिकाण : हंगा, तालुका- पारनेर, जिल्हा-अहमदनगर.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती राणी.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २२४- पारनेर, जिल्हा-अहमदनगर

इतर माहिती : निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने शैक्षाणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; करोनाच्या कठीण काळात १००० बेडचे जंबो कोविड सेंटर उभे करून अनेकांचे प्राण वाचविण्याचे अतिशय उल्लेखनीय कार्य केले; पारनेर तालुका प्रमुख, शिवसेना; सन २०१९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : १) मु.पो. हंगा, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर.

२) न्यु आर्टस कॉलेज शेजारी, पारनेर, जिल्हा अहमदनगर.
३) रुम नं.१०९, आकाशवाणी, आमदार निवास, मुंबई.
दूरध्वनी :- (०२४८८) २९५३३३.
मोबाईल :- ९७०२९०३३३३ / ९८२२५१५२५८.
ई-मेल :- mlanileshlanke3333@gmail.com

निवडणूक निकाल

(२२४-पारनेर)

एकूण मतदार	३,२२,०५४
एकूण वैध मतदान	२,२६,८५६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. निलेश ज्ञानदेव लंके**	१,३९,६९३ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री.विजयराव औटी	८०,१२५ (शिवसेना)
(३) श्री. डी. आर. शेंडगे	२,४९९ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,४७९
(५) श्री. जितेंद्र साठे	१,०१९ (बहुजन समाज पार्टी)

लटके,श्री. रमेश कोंडीराम

जन्म : २१ एप्रिल, १९७०.

जन्म ठिकाण : अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती ऋतुजा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : उद्योग.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १६६-अंधेरी (पूर्व), जिल्हा मुंबई उपनगर.

इतर माहिती : सन २००० पासून अध्यक्ष, सिध्दिविनायक शिक्षण प्रसारक संस्था, अंधेरी; १९९३ पासून संस्थापक-अध्यक्ष, पूर्व मोगरा सार्वजनिक गणेशौत्सव मंडळ; १९८९-१९९३ गटप्रमुख, १९९३-१९९७ शाखा प्रमुख, शिवसेना; १९९७-२००२, २००२-२००७, २००७-२०१२ नगरसेवक, मुंबई महानगरपालिका; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, ग्रंथालय समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड;

पत्ता : (१) ४०१, सिध्दीविनायक अपार्टमेंट, वांच्छा सिध्दीविनायक गणेश मंदिर, सर.एम.व्ही.रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९.

(२) २०२, "वास्तु दर्शन" के/पूर्व विभाग, कार्यालया शेजारी, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९.
दूरध्वनी :- निवास - (०२२) २६८३४७७७.
कार्यालय - (०२५) ३२६२८७७७.
मोबाईल :- ९९३०४३८७७७.
ई-मेल - ramesh_8777@yahoo.com

निवडणूक निकाल

(१६६-अंधेरी पूर्व)

एकूण मतदार	२,७४,७१६
एकूण वैध मतदान	१,४७,११७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रमेश कोंडीराम लटके**	६२,७७३ [शिवसेना]
(२) श्री. मुरजी पटेल	४५,८०८ (अपक्ष)
(३) श्री. अमीन कुट्टी	२७,९५१ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. शरद येटम	४,३१५ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	४,३११

लहामटे, डॉ. किरण यमाजी

जन्म : २४ फेब्रुवारी, १९७४.

जन्म ठिकाण : वांजुळशेत, तालुका- अकोले, जिल्हा-अहमदनगर.

शिक्षण : बी.ए.एम.एस.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती पुष्पा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : वैद्यकीय.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २१६-अकोले, (अनुसूचित जमाती), जिल्हा-अहमदनगर.

इतर माहिती : सन २०१४-२०१७ व २०१७-२०१९ सदस्य, जिल्हा परिषद, अहमदनगर; सामुहिक विवाह सोहळयांचे आयोजन; वैद्यकीय तपासणी शिबीरांचे आयोजन; एक गाव एक गणपती कार्यक्रम तसेच समाज प्रबोधनासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; उल्लेखनीय सामाजिक कार्यबद्दल समाजभूषण पुरस्कार व सहयाद्री छावा पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : जनसंपर्क व गडकिल्ल्यावर भटकंती.

पत्ता : साई किरण हॉस्पिटल, सर्वोदय, राजूर, तालुका अकोले,जिल्हा अहमदनगर.

दूरध्वनी :- (०२४२४) २५१४५५.
मोबाईल :- ९४२१२२७६७७, ९९२२८४६५९२.
ई-मेल :- kiranlahamate@gmail.com

निवडणूक निकाल

(२१६- अकोले (अनुसूचित जमाती))

एकूण मतदार	२,५४,७४९
एकूण वैध मतदान	१,७४,२६८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. किरण यमाजी लहामटे**	१,१३,४१४ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(२) श्री. वैभव पिचड	५५,७२५ (भारतीय जनता पक्ष)
(३) नोटा	२,२९८
(४) श्री. दिपक पाठावे	१,८१७ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. भिवा घाणे	१,०१४ (अपक्ष)

लव्हेकर, डॉ. भारती हेमंत

जन्म : ६ जून, १९६६.

जन्म ठिकाण : वाशिम, जिल्हा-वाशिम.

शिक्षण : एम.ए., एम.फिल., बी.जे., पीएच.डी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती, श्री. हेमंत दत्तात्रय लव्हेकर.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १६४-वर्सोवा, जिल्हा मुंबई-उपनगर.

इतर माहिती : मुक्तांगण महाविद्यालय, गंगापूर व एस.एन.डी.टी. विद्यापीठ मुंबई तसेच अनेक वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य; जनरल सेक्रेटरी, मराठवाडा लोक विकास मंच; अध्यक्षा, "ती" फाऊंडेशन; संस्थापिका, अध्यक्षा, 'आपली मोलकरीण' घरेलु कामगार संघटना, 'ती' मासिकाच्या संपादिका; संस्थांपिका, 'ती' फाऊंडेशन डिजीटल सॅनीटरी पॅड बँक; सदस्या, गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा (PCPNDT) ॲक्ट समिती, महाराष्ट्र राज्य; सदस्या, कपार्ट समिती, भारत सरकार; नऊ वर्षे "राष्ट्रवादी" मासिकाच्या संपादिका; उपाध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, सन २०१४ पासून शिवसंग्राम संघटनेचे सक्रिय कार्य; 'ती' या महिला

सक्षमीकरण व महिलांच्या न्याय हक्कासाठी काम करणाऱ्या संघटनेच्या व मराठवाडा लोकविकास मंच या संघटनांच्या माध्यमातून बेटी बचाव कार्यक्रमाची अंमलबजावणी, बीड जिल्ह्यातील १२० गावे व शिरुर-कसार तालुका दत्तक घेऊन अजित बालिका सुरक्षा योजना सुरु केली; स्त्री-भृण हत्या रोखण्यासाठी उल्लेखनीय कार्य, समाज परिवर्तन चळवळ राबविली; ग्रामीण भागातील महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच महिलांना आर्थिक व सामाजिक दृष्टया सक्षम बनविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन, महिलांची आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; गरीब, गरजु रुग्णांना मदत; महिलांमधील उद्योजकता वाढावी यासाठी महिला बचत गटांची स्थापना; २८ मे, २०१७ या वर्ल्ड मेंस्ट्रुअल हायजिन च्या दिवशी 'ती' फाऊंडेशन डिजीटल सॅनिटरी बँक स्थापन करुन या योजनेतून एक लाखापेक्षा जास्त मुलींना सॅनीटरी पॅडचे दरमहा मोफत वाटप; सदर योजना मुंबईतील ११८ शाळा, आदिवासी पाडयांमध्ये कार्यक्षमपणे महिला व मुलींच्या मध्ये लोक जागृतीचे काम केले; शाळा, कॉलेज, झोपडपट्टी व आदिवासी पाडे या ठिकाणी जनजागृती मेळाव्याचे आयोजन, आफ्रिका, पाकिस्तान, अफगाणिस्तान, नेपाळ व बांगलादेश इत्यादी देशांतील महिला व बालिकांसाठी सहा महिने मोफत सॅनिटरी पॅड पाठविले; सन २००५ मध्ये मैत्रीण, सन २००६ मध्ये अमेरिका सरकारच्या वतीने लेजिस्लेचर इलेक्शनच्या अभ्यासासाठी निवड, सन २०१७ मध्ये कर्नाटक लेजिस्लेचर व फोरम फॉर चाईल्ड राईटस यांच्या संयुक्त विद्यमाने विकाससौदा, बँगलोर येथील कॉन्फरन्समध्ये महाराष्ट्र विधीमंडळाचे प्रतिनिधीत्व केले; महिला विकास व महिला सक्षमीकरण यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन २००१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित; सन २००५ मध्ये "मैत्रिण" मासिकाच्या "एशियन इन्स्टिंट्युट ऑफ ह्युमन रिसोर्सेस अँड डेव्हलपमेंट" संस्थेचा महाराष्ट्र रत्न पुरस्कार, मालतीबाई तेंडुलकर पुरस्कार, सन २०१६-२०१७ चा महिला सक्षमीकरणासाठी "मराठवाडा गौरव पुरस्कार", सन २०१८ मध्ये पीस किपर्स मोमेंट तर्फे वर्ल्ड पीस किपर्स ॲम्बेसिडर अवॉर्ड, Nine Moment २०१८ मध्ये पॅड हिरोज अवॉर्ड, "राष्ट्रपतींच्या हस्ते" फर्स्ट लेडि २०१८ राष्ट्रीय पुरस्कार, सन २०१९ मध्ये राजस्थान पत्रिकेचा 'सलाम नारी अवॉर्ड', सन २०१९ मध्ये

लोकमत समुहाचा पॉलिटिकल आयकॉन मुंबई २०१९ ॲवॉर्ड, "सन २०२० मध्ये फेम इंडिया मॅग्झिनच्यावतीने देश पातळीवरील 'उत्कृष्ट आमदार पुरस्कार,' सन २००१ च्या महात्मा गांधी रत्न ॲवार्डने सन्मानित; सन २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सन २०१५-२०१७ सदस्या व सन २०१७-२०१९ समिती प्रमुख, महिला व बालहक्क कल्याण समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : कॅनडा, अमेरिका, नेपाळ, श्रीलंका, दुबई, जर्मनी, स्वित्झर्लँड व फ्रान्स इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : लेखन, वाचन, पर्यटन व संगीत.

पत्ता : (१) १५०४, बिल्डींग नं. ७-अ, फॉरच्यून, ५९, न्यू म्हाडा कॉम्लेक्स, लोखंडवाला सर्कल जवळ, अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०००५३.

मोबाईल- ९८२०२८६१३७.
ई-मेल-bhartilavehkar@gmail.com.

निवडणूक निकाल

(१६४-वर्सोवा)

एकूण मतदार	२,८५,११६
एकूण वैध मतदान	१,२०,८२०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. भारती हेमंत लव्हेकर**	४१,०५७ (भारतीय जनता पक्ष)
(२) श्री. बलदेव खोसा	३५,८७१ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्रीमती राजुल पटेल	३२,७०६ (अपक्ष)
(४) श्री संदेश देसाई	५,०३७ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) श्री. अब्दुल्ल शेख	२,५७७ (वंचित बहुजन आघाडी)

लांडगे, श्री. महेश (दादा) किसनराव

जन्म : २७ नोव्हेंबर १९७५.

जन्म ठिकाण : भोसरी, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती पूजा.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २०७-भोसरी, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : कार्याध्यक्ष, पिंपरी-चिंचवड कुस्तीगीर संघ; संचालक, पवना शिक्षण संस्था; संस्थापक, आस्था व्यसनमुक्ती केंद्र; विश्वस्त, महेशदादा व्हिजन अकॅडेमी; उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड बॉडी बिल्डर असोसिएशन; अध्यक्ष, प्रभू रामचंद्र मंडळ; सदस्य, महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद या संस्थेतर्फे २०१३-२०१४ मध्ये "महाराष्ट्र केसरी" राज्य कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन; सन २०१० मध्ये "महाराष्ट्र श्री" राज्यस्तरीय बॉडीबिल्डर स्पर्धेचे आयोजन; नगरसेवक, सभापती स्थायी समिती; अध्यक्ष, 'क' प्रभाग समिती, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका; उल्लेखनिय सामाजिक कार्याबद्दल २०१२-२०१३ चा पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचा

"उत्कृष्ट समाज सेवक" पुरस्कार तसेच २०११-२०१२ मध्ये "भोसरी भूषण" पुरस्काराने सन्माननीत; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, फ्रान्स, युरोप व जपान इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : कुस्ती, कबड्डी व हिंदी सिनेमा पहाणे.

पत्ता : लांडगेआळी, महादेव मंदिरा समोर, भोसरी,

जिल्हा-पुणे - ४११०३९.
मोबाईल - ९९२२६०९६६६.
ई-मेल - landge.mahesh.k@gmail.com

निवडणूक निकाल

(२०७-भोसरी)

एकूण मतदार	४,४१,२६८
एकूण वैध मतदान	२,६३,४६३
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. महेश (दादा) किसनराव लांडगे**	१,५९,२९५ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. विलास लांडे	८१,७२८ (अपक्ष)
(३) श्री. शाहनवाज शेख	१३,१६५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	३,६३६
(५) श्री. राजेंद्र पवार	१,८६१ (बहुजन समाज पार्टी)

लांडे, श्री. दिलीप भाऊसाहेब

जन्म : २ जून,१९६१.

जन्म ठिकाण : तोभाड, तालुका भोर, जिल्हा पुणे.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शैला.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १६८-चांदिवली, जिल्हा मुंबई उपनगर.

इतर माहिती : संस्थापक अध्यक्ष, बाल विकास मित्र मंडळ; संस्थापक - अध्यक्ष, राजगड शिक्षण मंडळ; संस्थापक शिधनुष्य मित्र मंडळ; संस्थापक, शिवशक्ती महिला मंडळ; संस्थापक - अध्यक्ष, राजगड को-ऑप-क्रेडिट सोसायटी. लि.; संस्थापक, रायगड महिला औद्योगिक उत्पादक सेवा सोसायटी, मर्या; शिवाजी सुरक्षा रक्षक सेवा सहकारी संस्था, मर्या, प्रमाण मंजूर सहकारी संस्था, मर्या; संस्थापक, किसान मंजुर सहकारी संस्था मर्या; १९९२ - १९९७ शिवसेना शाखा प्रमुख; सन १९९७- २००२, २०१२-२०१७, २०१९ पासून नगरसेवक, मुंबई महानगर पालिका; संपादक,

"आमचा रायगड" (साप्ताहिक), लोकशाहिर आण्णाभाऊ साठे स्मृती राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्काराने सन्मानीत; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

परदेश प्रवास : जर्मनीच्या अभ्यास दौरा.

छंद : समाज सेवा.

पत्ता : आदेश-संदेश भवन, शिवजी मैदान, काजुपाडा, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०००७२.

दूरध्वनी :- निवास :- (०२२) २८५६७२७२.
कार्यालय :- (०२२) २८५१७२७२.
मोबाईल :- ९८३३२०१६४६.
ई- मेलः- rajgadnank g@gmail.com.

निवडणूक निकाल

(१६८-चांदिवली)

एकूण मतदार	३,७९,३४३
एकूण वैध मतदान	१,९६,३४१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दिलीप भाऊसाहेब लांडे**	८५,८७९ [शिवसेना]
(२) श्री. आरिफ (नसीम) खान	८५,४७० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. अबुल खान	८,८७६ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. सुमित बारस्कर	७,०९८ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	३,३६०

लोढा, श्री. मंगलप्रभात गुमानमल

जन्म : १८ डिसेंबर १९५५.

जन्म ठिकाण : जोधपूर (राजस्थान).

शिक्षण : बी.कॉम., एलएल.बी., सी.ए.(इंटर).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मंजुला.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : उद्योग व व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १८५-मलबार हिल, जिल्हा-मुंबई शहर.

इतर माहिती : सरचिटणीस, विद्यार्थी संघटना जोधपूर विद्यापीठ; १९७३-१९७५ जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील नवनिर्माण चळवळीमध्ये विद्यार्थ्यांचे नेतृत्व; स्वयंसेवक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ; आणीबाणीत स्थानबध्द; अध्यक्ष दक्षिण मुंबई कारसेवा समिती; रामजन्मभूमी चळवळीचे नेतृत्व; १९९०-१९९२ मध्ये चलो आयोध्या चळवळीत सहभाग; व्ही.टी. रेल्वे स्थानकाचे नामांतर व अंजूमन इस्लाममध्ये बहुसंख्यांक समाजासाठी आरक्षण मिळावे यासाठी मोर्चाचे आयोजन; सचिव, सिटीझन्स ऑर्गनायझेशन फॉर पब्लिक ओपिनियन; उपाध्यक्ष,

(दोन वेळा), मुंबई भाजप; जून २०१९ पासून अध्यक्ष, मुंबई शहर, भारतीय जनता पक्ष; अध्यक्ष, जैन कुशल मंडळ; अध्यक्ष, महावीर इंटरनॅशनल, मुंबई; सदस्य, लायन्स क्लब, मलबार हिल; ताडदेव परिसर विकासात सहभाग; नगरसेवक, मुंबई महानगरपालिका; पूरग्रस्तांसाठी मदत कार्य; गुटखा विरोधी आंदोलन व जनजागरण मोहिम सुरु केली; मलबार हिल ऑलिंपिक्सद्वारा विविध स्पर्धांचे आयोजन; सामूहिक दीपोत्सव, गणेशोत्सव व विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन; हळदीघाट, जालियनवाला बाग, झाशी यासारख्या धार्मिक, ऐतिहासिक स्थळांचे पावित्र्य रहावे यासाठी विविध प्रयत्न; बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी मोफत सेवायोजन विभागाची निर्मिती; ९ ऑगस्ट १९९७ रोजी क्रांतीदिनी भारत जोडोसाठी मानवी साखळीचे आयोजन; सामूहिक गोविंदा, आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी शिबिर, ज्येष्ठ नागरिक सहल, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप, विद्यार्थ्यांकडून माफक शैक्षणिक शुल्क घेण्यात यावे यासाठी प्रयत्न; दिवाळी सणानिमित्त ना नफा ना तोटा तत्त्वावर जीवनाश्यक वस्तूंचे वाटप इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन; १९९७ महाराष्ट्रात प्रथमच माहितीचा अधिकार हे अशासकीय विधेयक आणले व या विषयावर योग्य चर्चा घडविली. सन २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार कायदा पास केला केंद्र शासनाने तो स्वीकारला; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, युरोप, हाँगकाँग व सिंगापूर इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) १२, अनुपम, मानव मंदिर रोड, मलबार हिल, वाळकेश्वर, मुंबई - ४०० ०२६.

(२) लोढा कॉस्टेरीया, १९ वा मजला, बँक ऑफ बडोदा समोर, मुकेश चौक, नेपियन्स रोड, मुंबई - ४०० ०३६.
मोबाईल - ९८२००२१५९२.

निवडणूक निकाल

(१८५-मलबार हिल)

एकूण मतदार	२,६२,४००
एकूण वैध मतदान	१,२३,२८९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. मंगलप्रभात गुमानमल लोढा**	९३,५३८ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्रीमती हिरा देवसी	२१,६६६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) नोटा	५,३९२
(४) श्री. अर्जुन जाधव	६९० (बी.एम.एफ.पी.)
(५) श्री. शंकर सोनावणे	५५८ (अपक्ष)

वडेट्टीवार, श्री. विजय नामदेवराव

जन्म : १२ डिसेंबर १९६२.

जन्म ठिकाण : करंजी, तालुका-गोंडपिंपरी, जिल्हा-चंद्रपूर.

शिक्षण : एच.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व तेलगू.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती किरण.

अपत्ये : एकूण ४ (एक मुलगा व तीन मुली).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ७३-ब्रम्हपूरी, जिल्हा-चंद्रपूर.

इतर माहिती : संस्थापक-अध्यक्ष, सेमाना वन विकास शैक्षणिक संस्था; विदर्भस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन; कविसंमेलनांचे आयोजन; विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन; गरीब विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी मदत; शिवसेनेच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; रक्तदान, नेत्रदान, नेत्रचिकित्सा व मोफत चष्मेवाटप शिबीरांचे आयोजन; बेरोजगारांना मार्गदर्शन आणि शेतकरी, शेतमजूर, वन कामगारांच्या न्याय हक्कांसाठी मोर्चे, आंदोलने करुन न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न; गडचिरोली जिल्ह्यातील कारवाफा, तुलतुली, दिना या उपसा सिंचन प्रकल्पांसाठीच्या

आंदोलनाचे नेतृत्व; पुरग्रस्तांना मदत; शिवाणी दुध उत्पादन व प्रक्रिया केंद्र सुरु करुन गरीब, आदिवासी, शेतकरी यांना गाई-म्हैशी उपलब्ध करुन रोजगाराची साधने उपलब्ध करुन दिली; अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँक; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक; अध्यक्ष, स्वदेशी कुक्कुटपालन सहकारी संस्था, गडचिरोली; अध्यक्ष, सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण संस्था, गडचिरोली; चिमूर व सिंदेवाही येथे नगरपरिषद स्थापनेसाठी प्रयत्न; गडचिरोली, वडसा (दे), भद्रावती, वरोरा, चंद्रपूर, ब्रम्हपुरी नगरपरिषद निवडणूकीद्वारे शिवसेनेकडे घेण्यासाठी विशेष प्रयत्न; कुरखेडा, आरमोरी, वडसा, गडचिरोली, चार्मोशी, धानोरा व मुलचेरा पंचायत समित्यांमध्ये शिवसेनेची सत्ता संपादन केली; गडचिरोली जिल्हा निर्मिती आंदोलनात सहभाग, अटक व कारावास; १९८६ पासून गडचिरोली शिवसेना जिल्हाप्रमुख; १९९५-९८ अध्यक्ष, वनविकास महामंडळ, या काळात जंगल कामगार, वन मजूर सहकारी संस्थांच्या अडचणी सोडवून तोट्यातील महामंडळ नफ्यामध्ये आणले; शिवसेनेच्या ५५० गावात शाखा काढल्या; २००५ पासून काँग्रेस पक्षाचे कार्य; सदस्य, जिल्हा परिषद, गडचिरोली; १९९८-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; दिनांक २१ जुलै २००६ रोजी राजीनामा, दिनांक ८ डिसेंबर २००६ पो. नि. विजयी; विधीमंडळाच्या रोजगार हमी लोकलेखा व आश्वासन समितीचे सदस्य; नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर, २०१० जलसंपदा व संसदीय कार्य, वित्त व नियोजन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; जून २०१९ ते ऑक्टोबर २०१९ विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० पासून इतरमागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन खात्याचे मंत्री.

छंद : वाचन, खेळ व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) 'रानफुल' निवास, पोटेगाव रोड, मु.पो. तालुका-गडचिरोली, जिल्हा-गडचिरोली.

दूरध्वनी : निवास व कार्यालय - (७१३२) २३५५५६.
मोबाईल - ९६६५६९९९९९.
ई-मेल - wadettiwarvijay@gmail.com
(२) ब-१, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी : निवास (०२२) २२०२००९२.
(०२२) २२०२०६१५.
कार्यालय : (०२२) २२०२३०५९, २२०२२९२४.

निवडणूक निकाल

(७३-ब्रम्हपूरी)

एकूण मतदार	२,७०,६०१
एकूण वैध मतदान	१,९३,४६८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार**	९६,७२६ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. संदिप गड्डमवार	७८,१७७ (शिवसेना)
(३) श्री. चंद्रलाल मेश्राम	७,६०८ (वंचित बहुजन आघाडी)
(४) ॲड. परोमीता गोस्वामी	३,५९६ (आम आदमी पार्टी)
(५) श्री. विनोद झोडगे	१,९९३ (सी.पी.आय.)

वनगा, श्री. श्रीनिवास चिंतामण

जन्म : १२ फेब्रुवारी, १९८२.

जन्म ठिकाण : कवाडा, तालुका तलासरी, जिल्हा पालघर.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुमन.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १३०-पालघर, (अनुसूचित जमाती), जिल्हा पालघर.

इतर माहिती : सन २०१३-२०१९ सदस्य, ग्रामपंचायत,कवाडाच;२०१४-२०१८ शिवसेना तालुका युवा अध्यक्ष, २०१८-२०१९ पालघर जिल्हा शिवसेना लोकसभा संघटक; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

पत्ता : कवाडा, पनंगपाडा, तालुका तलासरी, जिल्हा - पालघर ४०१६०६.

मोबाईल :- ९८६०८६८९६८ / ९८६०३८३८६८.

ई- मेल :- Shreenivas.vanga1982@gmail.com.

निवडणूक निकाल	
(१३०-पालघर (अनुसूचित जमाती))	
एकूण मतदार	२,७४,०२६
एकूण वैध मतदान	१,२९,३९२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. श्रीनिवास चिंतामण वनगा**	६८,०४० [शिवसेना]
(२) श्री. योगेश नम	२७,७३५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री उमेश गोवारी	१२,८१९ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. विराज गडाग	११,४६९ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	७,१३५

वरपुडकर, श्री. सुरेश आंबादासराव

जन्म : १५ जुलै, १९५१.

जन्म ठिकाण : वरपुड, जिल्हा-परभणी.

शिक्षण : बी.एस्सी. (ॲग्रीकल्चर).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मीना.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ९८-पाथरी, जिल्हा-परभणी.

इतर माहिती : सन १९८९-२००० तसेच ६ एप्रिल, २०२१ पासून चेअरमन, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ; २००० चेअरमन, नृसिंह सहकारी साखर कारखाना लि.परभणी; २०००-२००४ परभणी जिल्हा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; सन २०१४ पासून काँग्रेस पक्षाचे कार्य; २०१६ पासून जिल्हाध्यक्ष, (ग्रामीण) परभणी जिल्हा काँग्रेस कमिटी; १९७४ सदस्य, जिल्हा परिषद, परभणी; १९८६-१९९० (पो.नि.), १९९०-१९९५, १९९५-१९९८, २००४-२००९, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १० डिसेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ कृषी, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार,

रोजगार व स्वयंरोजगार व माजी सैनिकांचे कल्याण खात्याचे राज्यमंत्री; १९९८-१९९९ सदस्य, लोकसभा; सन १९९८-१९९९ सदस्य, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण व वने समिती; सदस्य, गंगा ॲक्शन प्लॅन समिती; सदस्य, कृषी व कामगार सल्लागार समिती, लोकसभा, नवी दिल्ली; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; मार्च २०२० पासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे मुख्य प्रतोद.

परदेश प्रवास : ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड चा अभ्यास दौरा.

पत्ता : नक्षत्र, विष्णु नगर, वसमत रोड, परभणी, जिल्हा परभणी.

दूरध्वनी (कार्यालय) - ९४२१४५९६६६.
मोबाईल - ९७६९१४९९०/ ८९९६४४७६.
ई मेल - suresh.warpudkar@gmail.com.

निवडणूक निकाल

(९८- पाथरी)

एकूण मतदार	३,५३,८९५
एकूण वैध मतदान	२,३६,३३०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुरेश अंबादासराव वरपुडकर**	१,०५,६२५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(२) श्री. मोहन फड	९०,८५१ (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. विलास बाबर	२१,७४४ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. जगदिश शिंदे	८,५५१ (अपक्ष)
(५) श्री. अजय सोळंके	१,७७१ (ए.आर.पी.)

वळसे-पाटील, श्री. दिलीप दत्तात्रय

जन्म : ३० ऑक्टोबर, १९५६.

जन्म ठिकाण : निरगुडसर, तालुका-आंबेगांव, जिल्हा-पुणे.

शिक्षण : बी.ए. (ऑनर्स), डी.जे., एलएल.एम्.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती किरण.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : १९६-आंबेगाव, जिल्हा-पुणे.

इतर माहिती : महाविद्यालयीन जीवनापासूनच राजकारणात सक्रीय सहभाग; सहकारी चळवळीमध्ये राज्यातील अभ्यासु नेत्यासोबत राहुन सक्रीय सहभाग; संस्थापक-अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे, या संस्थेमार्फत ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील जनतेच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम राबविले; ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायास प्रोत्साहन देऊन संस्थांचे जाळे विकसित केले; ग्रामीण भागातील महिला वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न; विश्वस्त, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई; महाराष्ट्रातील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंध; संचालक, पुणे जिल्हा

मध्यवर्ती सहकारी बँक; संस्थापक-चेअरमन, भीमाशंकर सहकारी साखर कारखाना; १९९०-१९९५, १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९२-१९९३ समिती प्रमुख, विधिमंडळ अंदाज समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन १९९७-१९९८ मध्ये महाराष्ट्र विधान सभेतील "उत्कृष्ट संसदपटू" या पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर, २००२ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर, २००२ ते जानेवारी २००३ उच्च व तंत्रशिक्षण आणि ऊर्जा खात्याचे मंत्री; जानेवारी २००३ ते नोव्हेंबर २००४ ऊर्जा व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००४ ते मार्च २००५ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) व वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री; मार्च २००५ ते डिसेंबर २००८ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर, २००९ वित्त व नियोजन खात्याचे मंत्री; मंत्रीपदी कार्यरत असताना महत्वपूर्ण धोरणात्मक व उल्लेखनीय निर्णय घेतले, त्यामध्ये प्रामुख्याने 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ' या कंपनीची स्थापना करुन गतीने विकास केला, त्यामुळे राज्यात संगणक साक्षरता वाढीचे महत्वाचे कार्य होऊ शकले; विद्युत कायदा २००३ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी केली; ऊर्जा क्षेत्रात राज्याला योग्य दिशा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करुन सुत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या चार कंपन्यांची स्थापना केली व ऊर्जा विकासासाठी रोडमॅप केला, ६००० मेगावॅटचे प्रकल्प उभारण्याचे व विद्युत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केले; २००९-२०१४ अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा; या काळात विधान मंडळाचे कामकाज योग्य पध्दतीने चालावे यासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले; २०१२-२०१३ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाच्या अमृत महोत्सव समारंभाचे भारताच्या राष्ट्रपती महामाहिम प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन केले; तसेच यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी निमित्त अमरावती, नागपूर, औरंगाबाद व मुंबई येथे प्रदर्शन व चर्चा सत्रांचे आयोजन; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० ते ५ एप्रिल २०२१ कामगार व राज्य उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री. ६ एप्रिल २०२१ पासून गृह खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : १९८५ मास्को-रशिया, १९८९ उत्तर कोरिया-प्यॉगयाँग येथील आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात भारताचे प्रतिनिधीत्व तसेच, १९९७ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेमार्फत युनायटेड किंगड्म, बेल्जियम, नेदरलँड, स्वित्झर्लँड व फ्रान्स इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा, राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या राष्ट्रकुलातील देशांमधील पीठासीन अधिकारी परिषदांत सहभाग.

छंद : वाचन व प्रवास.

पत्ता : (१) मु.पो. मंचर, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे.

(२) १४, रिव्हर व्ह्यू अपार्टमेंट, पुणे नगर रोड, येरवडा, पुणे - ४११००६.

(३) 'शिवगिरी', मलबार हिल, मुंबई.

दूरध्वनी : निवास - २३६१०९७६ / २३६१०९२५.

कार्यालय : (०२२) २२०२४८५० / २२०२५२४७.

दूरध्वनी : निवास - पुणे - (०२०) २६६८४७७७.

मंचर - (०२१३३) २२३३५९.

कार्यालय - (०२२) २२०२७५४१ / २२०२७७८१.

मोबाईल - ९८२०२२३९२३.

ई-मेल - dilipwalsepatil@gmail.com

निवडणूक निकाल (१९६-आंबेगांव)	
एकूण मतदार	२,८४,१८२
एकूण वैध मतदान	१,९०,०३२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील**	१,२६,१२० [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. राजाराम बानखेले	५९,३४५ (शिवसेना)
(३) नोटा	१,६१६
(४) श्रीमती अनिता गबाले	१,२३४ (अपक्ष)
(५) श्री. रविंद्र चव्हाण	१,१३७ (बहुजन समाज पार्टी)

वानखडे, श्री. बळवंत बसवंत

जन्म : २ जुलै, १९६७.

जन्म ठिकाण : लेहगाव, तालुका दर्यापूर, जिल्हा अमरावती.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मंदा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे)

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : ४०-दर्यापूर (अनुसूचित जाती), जिल्हा अमरावती.

इतर माहिती : सन २००१-२००७ सदस्य, सन २००५-२००७ सरपंच, ग्रामपंचायत, लेहगाव; सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी थिलोरी; संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर, जिल्हा अमरावती; २००७-२०१२ सदस्य, जिल्हापरिषद; २०१७-२०१९ सभापती, आरोग्य व अर्थ समिती, जिल्हा परिषद, अमरावती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : "मामार्पण" निवास, ६४ जिनप्लॉट, सरकारी दवाखान्या जवळ,
दर्यापूर,जिल्हा अमरावती, ४४४८०३.
दूरध्वनी : (०७२२४) २९५०५५.
मोबाईल : ९८२२९४८४२७.
ई-मेल : 2019mla@daryapur.

निवडणूक निकाल

(४०-दर्यापूर (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,९७,५८३
एकूण वैध मतदान	१,९०,३४६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. बळवंत बसवंत वानखडे**	९५,८८९ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. रमेश गणपतराव बुंदीले	६५,३७० (भारतीय जनता पक्ष)
(३) श्रीमती सीमा सावळे	१८,४२९ (अपक्ष)
(४) श्रीमती रेखा वाक्पंजर	४,६१२ (वंचित बहुजन आघाडी)
(५) ॲड. संतोष कोल्हे	१,४८२ (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया)

वायकर, श्री. रविंद्र दत्ताराम

जन्म : १८ जानेवारी, १९५९.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.एस्सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मनिषा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुली).

व्यवसाय : उद्योग व व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १५८-जोगेश्वरी-पूर्व, जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : सन १९९४ पासून अध्यक्ष, शिवसमर्थ शिक्षण प्रसारक संस्था; शिवसेना पक्षाच्या स्थापनेपासून कार्य; शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य माणसांना मिळावा यासाठी प्रयत्न कुपोषण, दुष्काळग्रस्त, भूकंपग्रस्त, पूरग्रस्तांसाठी व आदिवासी बांधवांना सर्वोतोपरी मदत कार्य; बेरोजगार, महागाई विरोधी आंदोलनात सहभाग; १९९२-२००९ नगरसेवक व चार वेळा अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका, अध्यक्ष, मुंबई महानगरपालिका, शिक्षणसमिती; महानगरपालिकांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गणवेश, बूट, दप्तर, वह्या-पुस्तके, सकस आहार, सुगंधी दुध योजना सुरु केली; १९९५ पासून संस्थापक, मातोश्री

स्पोर्टस् ॲन्ड आर्टस् ट्रस्ट, २००१ पासून अध्यक्ष, महाकाली जोगर्स पार्क असोसिएशन; २००० पासून अध्यक्ष कै. दत्ताराम गोविंद वायकर स्मृती ट्रस्ट, या संस्थांच्या माध्यमातून बालवाडी, वृक्षारोपण, वृक्षदिंडी, साक्षरता अभियान, स्वच्छता मोहिम, आंतर शालेय क्रीडा व नृत्य स्पर्धा, मालवणी जत्रोत्सव, व्यावसायिक नाटके, स्वरमय मंगल पहाट, आदिवासी, अंध, अपंग व गरीबांना धान्य वाटप, शाब्बास वहिनी कार्यक्रमाचे आयोजन; शरिरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन; कबड्डी, कॅरम स्पर्धा व जिमनॅस्टिक; स्पर्धांचे आयोजन योग साधना शिबीरांचे आयोजन; गणेशोत्सव, नवरात्रोत्सव कार्यक्रमांचे आयेजन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; आरोग्य तपासणी व नेत्रचिकित्सा या शिबीरांचे आयोजन, दहावी-बारावी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन; झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी पुढाकार; झोपडपट्ट्यामध्ये स्वच्छतागृहे इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न; शिवसेना परभणी जिल्हा संपर्क प्रमुख; १९९५ अध्यक्ष, झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई; २००९ अध्यक्ष, दक्षता समिती; सदस्य, अंदाज समिती; सदस्य, धर्मदाय रुग्णालय समिती; २००९-२०१४ मुख्य प्रतोद, शिवसेना विधीमंडळ पक्ष; सचिव, मॉसाहेब मिनाताई ठाकरे स्मारक समिती; शिवसेनेच्या सर्व आंदोलनात सक्रीय सहभाग; लायन्स क्लबतर्फे "उत्कृष्ट नगरसेवक" व सर्वोत्कृष्ट क्लब मातोश्री क्रीडा संकूल निर्मितीसाठी लायन्स क्लबतर्फे पुरस्काराने सन्मानीत; नवशक्तीचा 'लक्षवेधी' लोकप्रतिनिधी पुरस्कार प्राप्त; आचार्य अत्रे प्रतिष्ठान, पुणे या संस्थेचा "सर्वोत्कृष्ट समाजसेवक", पुरस्कार प्राप्त; प्रजा फांऊडेशनचा "युनिटेड आमदार" पुरस्कार, राजहंस प्रकाशनचा "अरविंद भूषण" पुरस्कार प्राप्त; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ गृहनिर्माण खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

लेखन व प्रकाशन : विधीमंडळातील निवडक भाषणे, "वाजत-गाजत", रत्नागिरी जिल्ह्याच्या विकासाचा वेध घेणारे "रत्नागिरी कॉपी टेबल बुक", "वेध", "ज्वेलस ऑफ जोगेश्वरी", "दिशा-आशा", "माझ्या भक्ती भावना" व "शिवसेना प्रमुखांना समर्पित", माझे प्रेरणास्त्रोत इत्यादी पुस्तकांचे लेखव व प्रकाशन केले.

परदेश प्रवास : दुबई, थायलँड, इंग्लंड, मलेशिया, अमेरिका, सिंगापूर, स्वित्झर्लंड व जर्मनी इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, सामाजिक कार्य, चित्रकला व वृक्षसंवर्धन.

पत्ता : २ सी-१६१, कल्पतरु इस्टेट, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३.

दूरध्वनी :- निवास - (०२२) २८२६४७४७.
कार्यालय - (०२२) २८२५ ४४००, ४४११.
मोबाईल :- ९५९४०१११११.
ई-मेल :- waikarravindra@gmail.com.
संकेत स्थळ :- www.waikarravindra.com.

निवडणूक निकाल

(१५८-जोगेश्वरी-पूर्व)

एकूण मतदार	२,८१,९७६
एकूण वैध मतदान	१,४८,९६५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. रविंद्र दत्ताराम वायकर**	९०,६५४ [शिवसेना]
(२) श्री. सुनिल कुमरे	३१,८६७ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) नोटा	१२,०३१
(४) श्री. दिलबंग सिंग	५,०७५ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. विठ्ठल लाड	३,८५७ (आम आदमी पार्टी)

विखे-पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव

जन्म : १५ जून १९५९.

जन्म ठिकाण : श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर.

शिक्षण : बी.एस्सी. (ॲग्री).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती शालिनीताई.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २१८-शिर्डी, जिल्हा-अहमदनगर.

इतर माहिती : १९८७-९५ अध्यक्ष, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील सहकारी साखर कारखाना, लि., प्रवरानगर; संस्थापक-चेअरमन, प्रवरा फळे-भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था, मर्या. प्रवरानगर, तालुका राहता, जिल्हा अहमदनगर; १९९५-२००० चेअरमन, दि. मुळा प्रवरा इले. को. ऑप. सोसायटी, लि., श्रीरामपूर; जून, २००२ ऑगस्ट, २००३ व्हाईस चेअरमन, सप्टेंबर, २००५ ते डिसेंबर, २००७ चेअरमन, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; या काळात या बँकेद्वारे शेतकऱ्यांना ६ टक्के व्याज दराने कृषी कर्ज योजना राज्यात प्रथम सुरु

केली; २००६ पासून संचालक, प्रवरा सहकारी बँक लि. लोणी, तालुका राहता, जिल्हा अहमदनगर; संचालक, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, प्रवरानगर; सदस्य, कार्यकारी परिषद, पुणे विद्यापीठ; कार्यकारी अध्यक्ष, पद्मश्री डॉ. विखे पाटील फाऊंडेशन, विळदघाट, अहमदनगर; विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, प्रवरा ग्रामीण नैसर्गिक, सामाजिक, अध्ययन संस्था, प्रवरानगर, प्रवरा रुरल मेडिकल ट्रस्ट, लोणी बु।।; दि. ६ ते १० नोव्हेंबर, १९९८ मुंबई येथे "ॲग्रो ॲडव्हॉन्टेज"चे शासनाच्या वतीने आयोजन करुन राज्यातील सुमारे ५ लाख शेतकऱ्यांना शेतीविषयक प्रदर्शन भरवून आधुनिक शेतीबाबतची माहिती दिली; ८ फेब्रुवारी, २००८ भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते थोर अर्थतज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ टपाल तिकीटाचे विमोचन व अर्ध पुतळयाचे अनावरण करुन प्रवरानगरमध्ये भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले; १९ जून, २००८ रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्या उपस्थितीत प्रवरानगर येथे भव्य महिला मेळाव्याचे आयोजन व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या "जनजागरण विकास यात्रा", कार्यक्रमाचा शुभारंभ शिर्डी विधानसभा मतदारसंघापासून सुरु केला; एस्. एस्.सी. परिक्षेत दोन विषयात नापास विद्यार्थ्यांसाठी एटीकेटी योजना लागू केली; राज्यातील कायम विनानुदानित माध्यमिक शाळा मधील "कायम" शब्द वगळून सर्व शाळांना अनुदानित करण्याचा निर्णय घेतला; वेदांत फाऊंडेशन व महाराष्ट्र शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांने शालेय शिक्षण संगणकाच्या माध्यमातून द्यावयाच्या उपक्रमाची सुरुवात केली; शालेय शिक्षण विभागाची वेबसाईट सुरु केली; इंग्रजी व इतर माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याचा निर्णय घेतला; शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ केली; मुंबईत अकरावी प्रवेश ऑनलाईन पध्दतीने सुरु केला; उर्दू शिक्षणासाठी स्वतंत्र संचालनालयाची स्थापना केली; राज्यातील सर्व शाळांचे मुल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात तसेच शाळांच्या गुणात्मक वाढीसाठी कोअर ग्रुप व सल्लागार समितीचे गठण; राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाच्या कामकाजात सूत्रता आणून शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रम व महत्वपूर्ण निर्णय घेवून त्याची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न शिक्षणमंत्री म्हणून केला; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-

२००९,२००९-२०१४,२०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मे, १९९८ ते फेब्रुवारी, १९९९ कृषी व जलसंधारण खात्याचे मंत्री; फेब्रुवारी, १९९९ ते ऑक्टोबर, १९९९ कृषी, जलसंधारण, दुग्धविकास आणि पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री; डिसेंबर, २००८ ते ऑक्टोबर, २००९ पर्यंत शालेय शिक्षण, विधी व न्याय खात्याचे मंत्री व औरंगाबाद जिल्ह्याचे पालक मंत्री; नोव्हेंबर, २००९ ते नोव्हेंबर, २०१० परिवहन, बंदरे, विधी व न्याय खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, २०१० ते सप्टेंबर, २०१४ कृषी व पणन खात्याचे मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर, २०१४ ते जून, २०१९ विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य, जून, २०१९ ते नोव्हेंबर, २०१९ गृहनिर्माण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : रशिया, चीन, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, हाँगकाँग, नेपाळ, कॅनडा, स्वित्झर्लँड, स्वीडन, इस्त्राईल, बेल्जीयम, हॉलंड, सिंगापुर, जर्मनी क्युबा, जपान, न्युझीलंड, मलेशिया, मॉरिशस व कोलंबिया इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) मु.पो. लोणी बु.।, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर - ४१३७३६.

दूरध्वनी : निवास - (०२४२२) २७३४६६, २७३४७७.
कार्यालय - (०२४२२) २७३६५१, २७३९९९.
फॅक्स - (०२४२२) २७३२४८.
मोबाईल - ९८२१०१३८५३.
ई-मेल - revpatil@gmail.com.
(२) कामना को.ऑ. हौसिंग सोसायटी लि., बिल्डींग नं. १, फ्लॅट नं. २२, ८वा मजला, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८.

निवडणूक निकाल

(२१८-शिर्डी)

एकूण मतदार		२,६३,०५७
एकूण वैध मतदान		१,८६,७१८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या		
(१)	**श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील**	१,३२,३१६ [भारतीय जनता पक्ष]
(२)	श्री. सुरेश थोरात	४५,२९२ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३)	श्री. विशाल कोळगे	५,७८८ (वंचित बहुजन आघाडी)
(४)	नोटा	१,५९६
(५)	श्री. शिमॉन जगताप	१,०४३ (बहुजन समाज पार्टी)

शर्मा, श्री. गोवर्धन मांगीलालजी

जन्म : १ जानेवारी १९४९.

जन्म ठिकाण : पुसद, जिल्हा-यवतमाळ.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती गंगादेवी.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ३०-अकोला-पश्चिम, जिल्हा-अकोला.

इतर माहिती : संस्थापक-अध्यक्ष, अनंत महाराज क्रीडा व शिक्षण प्रसारक संस्था; संस्थापक, स्व. मांगीलालजी शर्मा सार्वजनिक वाचनालय, अकोला; संचालक, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला; सर्वसेवाधिकारी, विश्व जागृती मिशन व रामकृष्ण सेवा ट्रस्ट; सेवाधिकारी, राम नवमी शोभा यात्रा समिती, अकोला; अकोला शहरातील जुने व नवे शहर जोडण्याच्या दगडी पुलाची निमिर्ती; अकोला शहरासाठी पूर संरक्षण भिंत उभी केली; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक; अकोला शहरात कुपनलिका कार्यान्वीत केल्या; नेत्र तपासणी, रक्तगट तपासणी, रक्तदान शिबीर, चष्मा वाटप शिबीराचे आयोजन; वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन;

अकोला येथील दंगलग्रस्तांना व पुरग्रस्तांना मदत; गरीब गरजू रुग्णांना मदत; १९९५-२००१ अध्यक्ष, न्यु क्लॉथ मार्केट को. आप. हौसिंग सोसायटी; १९९२-१९९३ संचालक, दि अकोला अर्बन को-ऑप. बँक; १९८७-१९८८ अध्यक्ष, अकोला शहर, कोषाध्यक्ष, अकोला जिल्हा व अध्यक्ष, अकोला महानगर, भारतीय जनता पक्ष; कोषाध्यक्ष, अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी गौरव समिती; १९८५-१९९५ नगरसेवक व सभापती, पाणी पुरवठा समिती व नियोजन समिती, नगरपालिका, अकोला; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; जून १९९६ ते मे १९९८ दुग्ध विकास, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय खात्याचे राज्यमंत्री; सदस्य, अंदाज समिती, सदस्य, आश्वासन समिती, सदस्य, विनंती अर्ज समिती; समिती प्रमुख, विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : प्रवास, वाचन व गरीब रुग्णांची सेवा करणे.

पत्ता : आळशी प्लॉट, गौरक्षण रोड, खंडेलवाल भवन जवळ, अकोला जिल्हा-अकोला.

दूरध्वनी : निवास व कार्यालय - (०७२४) २४०२०५८.
मोबाईल - ९४२२८५९५८१, ९४०३११३५०४.
ई-मेल - anupgs29@gmail.com

निवडणूक निकाल (३०-अकोला-पश्चिम)	
एकूण मतदार	३,३२,२२०
एकूण वैध मतदान	१,६९,४५६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. गोवर्धन मांगीलालजी शर्मा**	७३,२६२ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. साजिद खान	७०,६६९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. मदन भारगड	२०,६८७ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	२,६१७
(५) श्री. रविंद्र मुंढे	५३१ (अपक्ष)

शाह, श्री. पराग किशोरचंद

जन्म : १६ ऑगस्ट, १९६९.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती मानसी.

अपत्ये : २ (दोन मुलगे).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १७०, घाटकोपर (पूर्व), जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : सन २०१७ पासून नगरसेवक, मुंबई महानगरपालिका; भारतीय जनता पक्षाचे कार्य; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

परदेश प्रवास : अमेरिका, कॅनडा, दुबई, सिंगापूर व युरोप इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : ७०१ सातवा मजला, आराध्या स्वास्तिक, प्लॉट नं. ३७३ सहावा रस्ता, एस.एस. स्कीम नं.३, चेंबुर (पूर्व), मुंबई - ४०००७१.

दुरध्वनी : निवासः- (०२२) २५२३९९००/ २५२३९८००
कार्यालय :- (०२२) २१०२१८३८
मोबाईल :- ९३२४९१११११
ई-मेल : १) parag@maninfra.com
२) paragshah1969@gmail.com
३) www.paragshah.com

निवडणूक निकाल

(१७० – घाटकोपर-पूर्व)

एकूण मतदार	२,३४,६५६
एकूण वैध मतदान	१,२६,६१६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. पराग किशोरचंद शाह**	७३,०५४ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. सतीश पवार	१९,७३५ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(३) श्रीमती मनिषा सुर्यवंशी	१५,७५३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. विकास पवार	१०,४७२ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	३,२९७

शाह, श्री. फारुख अन्वर

जन्म : ३ जून, १९७३.

जन्म ठिकाण : धुळे.

शिक्षण : बारावी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी इंग्रजी व उर्दु.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती. शाहीनबी.

अपत्ये : एकूण ४ (तीन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : अखिल भारतीय मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीन, (एम.आय.एम.).

मतदारसंघ : ७-धुळे-शहर, जिल्हा-धुळे.

इतर माहिती : नगरसेवक व उपमहापौर, महानगरपालिका, धुळे; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व प्रवास.

पत्ता : प्लॉट नं. ६ अरहंत भवन जवळ, गजानन कॉलनी, धुळे.

मोबाईल :- ७७७००४१८४६.

निवडणूक निकाल (७-धुळे-शहर)	
एकूण मतदार	३,२२,०२६
एकूण वैध मतदान	१,६१,३४२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. फारुक अन्वर शाह**	४६,६७९ (अखिल भारतीय मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीन)
(२) श्री. राजवर्धन कदमबांडे	४३,३७२ (अपक्ष)
(३) श्री. अनिल गोटे	४२,४३२ (लोकसंग्राम)
(४) श्री. हिलाल माळी	२२,४२७ (शिवसेना)
(५) नोटा	१,३७१

शिंगणे, डॉ. राजेंद्र भास्कर्राव

जन्म : ३० मार्च १९६१.

जन्म ठिकाण : डोंगर-शेवली, जिल्हा-बुलढाणा.

शिक्षण : बी.ए.एम.एस.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रजनीताई.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २४ - सिंदखेडराजा, जिल्हा-बुलढाणा.

इतर माहिती : अध्यक्ष, सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, साखरखेडा; अध्यक्ष, जिजामाता उत्पादक व प्रक्रिया सहकारी संस्था, मर्या. बुलढाणा; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पत संस्था, महासंघ, मुंबई; २००२ पासून अध्यक्ष, जिजाऊ मुलींची सैनिकी शाळा, चांधई, तालुका चिखली; १९९३ पासून अध्यक्ष, राष्ट्रमाता जिजाऊ विद्यालय, सिंदखेडराजा; २०००-२००१ मुख्य प्रशासक, महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ; १९९८-२००१ मुख्यप्रशासक, जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, तालुका सिंदखेडा; १९९०-२००५ अध्यक्ष, सहकार

महर्षी स्व.भास्करराव‌जी शिंगणे नगरी सहकारी पत संस्था, बुलढाणा; १९९३ पासून संचालक, पैनगंगा सहकारी सूतगिरणी,लि.; साखरखेडा, तालुका सिंदखेडा; १९९२-२००१, २०१०-२०१३ अध्यक्ष, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९३-२०१० संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक; २०१५ पासून अध्यक्ष, दि.विदर्भ को.ऑप. मार्केटिंग फेडरेशन, लि.नागपूर; १९९३-२०१५ संचालक, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन, मुंबई; १९८५ अध्यक्ष, जिल्हा युवक काँग्रेस कमिटी; २००४-२०१८ सरचिटणीस, २०१८ पासून उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९५-१९९६ सदस्य, लोकलेखा समिती; १९९७-१९९८ सदस्य, अंदाज समिती; १९९६-१९९८ सदस्य, सार्वजनिक उपक्रम समिती; मार्च २००१ ते जुलै २००२ शालेय शिक्षण, पणन, माहिती व जनसंपर्क खात्याचे राज्यमंत्री; १६ नोव्हेंबर २००४ ते डिसेंबर २००८ महसूल, पुनर्वसन, माहिती व जनसंपर्क, भूकंप पुनर्वसन, व मदत कार्य, क्रीडा व युवक कल्याण व माजी सैनिकांचे कल्याण खात्यांचे राज्यमंत्री; डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर २००९ सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी २०२० पासून अन्न व औषधे प्रशासन खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : चीन, जपान, मलेशिया, सिंगापूर व कॅनडा इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, क्रिकेट, कबड्डी व शेती.

पत्ता : चिखली रोड, मुक्ताईनगर, बुलढाणा, जिल्हा बुलढाणा ४४३००१.

दूरध्वनी : ०७२६२- २४२९८८.
मोबाईलः ९९२११२९६६९ / ९७६९२१३२९१.
ई-मेलः- rajendrashingne111@gmail.com.

निवडणूक निकाल	
(२४ - सिंदखेडराजा)	
एकूण मतदार	३,१२,५७१
एकूण वैध मतदान	२,०१,३१५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे**	८१,७०१ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) डॉ. शशिकांत खेडेकर	७२,७६३ (शिवसेना)
(३) श्रीमती सविता मुंढे	३९,८७५ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,६१६
(५) श्री. शिवशंकर वायळ	१,३१५ (बहुजन समाज पार्टी)

शिंदे, श्री. एकनाथ संभाजी

जन्म : ६ मार्च १९६४.

जन्म ठिकाण : अहिर, तालुका-महाबळेश्वर, जिल्हा-सातारा.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती लता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : उद्योग व सामाजिक कार्य.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १४७-कोपरी-पाचपाखाडी, जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष; सन १९८६ मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न आंदोलनात १०० कार्यकर्त्यांसह सक्रीय सहभाग; ४० दिवस बेल्लारी येथे तुरंगवास सहन केला; संपुर्ण ठाणे शहर व जिल्ह्यात सामाजिक कार्याचे जाळे निर्माण केले; ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडियम, इंटरनिंटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, शहिद हेंमत करकरे क्रीडा संकूल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरु केली; आदिवासी प्रभाग मोखाडा, तलासरी व जव्हार येथील आश्रमशाळेत व आरोग्य केंद्रात सकस आहार व आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करुन गरीब रुग्णांना विनामुल्य औषध वाटप केले; पालघर, बोईसर व सफाळे परिसरात शिवसेनेतर्फे

एस.एस.सी. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन; गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप; पुरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप; वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; बालनाट्य महोत्सवाचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; 'जाणता राजा' नाटकाचे अत्यल्पदरात आयोजन; अध्यक्ष, ठाणे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटना; पुरग्रस्तांना मदत; ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; एम एम आर डी सक्षम बनविण्यात यश; नागपूर - मुंबई समृध्दी महामार्ग, वांद्रे- वरळी सी लिंक, वाशी येथील तिसरा खाडीपुल, मुंबई- पुणे द्रुतगती मार्गची क्षमता वाढविण्यासाठी खालपूर- लोणावळा टेनल मार्ग, शिळ-कल्याण रस्त्याचे सहापदरीकरण, विदर्भात रेल्वेच्या २७ उड्डाणपूलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न; राज्यातील द्रुतगती मार्गावरील उपधान कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या; ओझर्डे येथे ट्रामा केअर सेंटर सुरू केले; आरोग्य मंत्री पदाच्या काळात आशा सेविकांची पगार वाढ केली; आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए, एम.एस. पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला; ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचा पुर्नविकास केला; ठाणे मेट्रोचा कामाला गती दिली; ठाणे- मुलुंड दरम्यान नव्या स्थानकाला मुंजूरी मिळविली; ठाणे जिल्ह्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काळू धरणाच्या अडचणी सोडविण्यात यश; बारवी धरणाची उंची वाढविण्यासाठी मंजूरी मिळविली; एम एम आस डी ला क्लस्टर योजना सुरू केली; ठाणे जिल्हा परिषद, तसेच कल्याण -डोंबिवली, उल्हासनगर, महानगर पालिकेत व अंबरनाथ, बदलापूर नगरपरिषदेत शिवसेनेची सत्ता आणण्यात यश; १९८४ शिवसेना शाखा प्रमुख, वागळे इस्टेट, किसननगर; शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख; पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग, १९९७ व २००२ दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, महानगरपालिका ठाणे; २००४-२००९,२००९-२०१४,२०१४-२०१९सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१४-२०१९ विधीमंडळ शिवसेना पक्षाचे गटनेते; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर ते नोव्हेंबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री; तसेच जानेवारी २०१९ सार्वजनिक आरोग्य खात्याचा कार्यभार व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये

महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; डिसेंबर २०१९ पासून शिवसेनेचे गटनेते; नोव्हेंबर २०१९ पासून नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री.

परदेश प्रवास : स्वित्झर्लँड चा अभ्यास दौरा.

छंद : कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमात विशेष आवड.

पत्ता : (१) शुभ-दिप बंगला, लॅन्डमार्क सोसायटी, लुईसवाडी सर्व्हिस रोड, नीतीन कंपनी जवळ, ठाणे (पश्चिम) जिल्हा ठाणे.
कार्यालय - २५३४६६५५.
(२) नंदनवन-अग्रदुत, मलबार हिल, वाळकेश्वर, मुंबई.
दूरवध्वनी : निवास (०२२) २३६३०६०९, २३६३०२८६.
कार्यालय (०२२) २२०२५३९८, २२०२४७५१.
मोबाईल - ९९३००५२७११.
ई-मेल - ministereknathshinde@gmail.com

निवडणूक निकाल

(१४७-कोपरी-पाचपाखाडी)

एकूण मतदार	३,५२,९९५
एकूण वैध मतदान	१,७३,६६२
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. एकनाथ संभाजी शिंदे**	१,१३,४९७ [शिवसेना]
(२) श्री. संजय घाडीगांवकर	२४,१९७ (भारतीय जनता पार्टी)
(३) श्री. महेश कदम	२१,५१३ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. उन्मेश बागवे	५,९२५ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा.	५,१४७

शिंदे, कुमारी प्रणिती सुशीलकुमार

जन्म : ९ डिसेंबर, १९८०.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.ए., एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : अविवाहित.

व्यवसाय : सामाजिक कार्य व विधी सल्लागार.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : २४९-सोलापूर शहर (मध्य), जिल्हा- सोलापूर.

इतर माहिती : संस्थापिका-अध्यक्षा, जाई-जुई प्रतिष्ठान, सोलापूर, या संस्थेद्वारे युवक, महिला, अपंग, वंचित यांच्या विकासासाठी विविध उपक्रमांतून सतत कार्यरत; युवकांसाठी उद्योग व व्यवसाय प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन; ग्रामीण भागातील गावे दत्तक घेवून त्या गावांचा सर्वांगीण विकास केला; बेरोजगारांना रोजगार मिळवून दिला तसेच, महिला बचत गट स्थापन करुन त्यांना रोजगारांच्या संधी मिळवून दिली; सामाजिक प्रबोधन,कार्यक्रमांचे आयोजन आरोग्य तपासणी, शिबीरांचे आयोजन; रक्तदान, नेत्रचिकित्सा शिबीरांचे आयोजन; गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेवून त्यांच्या शिक्षणाची सर्वोतोपरी सोय केली; अनेक सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल जाई-जूई या संस्थेस 'नेहरु युवा पुरस्कार' प्राप्त;

सदस्या, मल्हार आंतरमहाविद्यालयीन महोत्सव आयोजक समिती; सदस्या, एआयएसईसी, रिव्हाईन्ह बॉंबे अँड वल्ड वाईड फंड फॉर नेचर यासारख्या व्यासपीठामध्ये सक्रीय सहभाग; घरेलू कामगारांना शिक्षण देणाऱ्या सेतू संस्थेचे कार्य; मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी सहायक शिक्षिका म्हणून काम केले; सर्वसामान्य माणसांचे जीवनमान उंचवावे म्हणून विविध संस्था, संघटना व शासन यांच्या माध्यमातून अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; पर्यावरण संरक्षण व संवर्धन विषयक कार्यक्रमांचे आयोजन; सोलापूर जिल्हा युवक कॉंग्रेस व महिला कॉंग्रेसचे कार्य; कॉंग्रेस पक्षाच्या "आम आदमी का सिपाही" मोहिमेत सक्रीय सहभाग; २००९-२०१४,२०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; समिती प्रमुख, अनुसूचित जाती कल्याण समिती.

छंद : वाचन.

पत्ता : (१) जनवात्सल्य, विनायकनगर, सात रस्ता, सोलापूर- ४१३००३.

(२) ७२, गौतम अपार्टमेंट, फ्लॅट नं. १६, ६ वा मजला, नर्गिस दत्त रोड, पाली हिल, बांद्रा, मुंबई - ४०० ०५०.

(३) १९, जाई-जुई, अशोक नगर, विजापूर रोड, सोलापूर- ४१३००४.

दुरध्वनी : सोलापूर - (०२१७) २३११७५५.

फॅक्स : सोलापूर - (०२१७) २३११७५५, (०२२) २६०५४९८०.

मुंबई - (०२२) २६०५४९८०.

मोबाईल - ९८२०१८४५१४.

ई-मेल - pranitishinde@gmail.com.

निवडणूक निकाल

(२४९-सोलापूर-शहर-मध्य)

एकूण मतदार	३,०२,१६०
एकूण वैध मतदान	१,६८,२२१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **कु. प्रणिती सुशीलकुमार शिंदे**	५१,४४० [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. हाजी फारूख शाब्दी	३८,७२१ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(३) श्री. महेश कोठे	३०,०८१ (अपक्ष)
(४) श्री. दिलीप माने	२९,२४७ (शिवसेना)
(५) श्री. नरसय्या आडम	१०,५०५ (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया-मार्क्सिस्ट)

शिंदे, श्री. बबनराव विठ्ठलराव

जन्म : १ सप्टेंबर, १९५१.

जन्म ठिकाण : पंढरपूर, जिल्हा सोलापूर.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनंदा.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २४५-माढा, जिल्हा-सोलापूर.

इतर माहिती : १९७९ पासून चेअरमन, विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ; अध्यक्ष, विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशिय सभागृह, निमगाव; सामुहिक विवाहांचे आयोजन; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; ८००० ज्येष्ठ नागरिकांसाठी काशी यात्रेचे आयोजन केले; माऊंट आबू यात्रेचे आयोजन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; १९८५-९९ व २०१०-२०१४ संचालक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९०-१९९७ चेअरमन, सोलापूर जिल्हा दूध संघ; १९९०-१९९७ संचालक, महाराष्ट्र राज्य दुध महासंघ; १९९८ पासून चेअरमन, माढेश्वरी अर्बन डेव्हलपमेंट को.ऑप. बँक लि.; १९९९

पासून संस्थापक-चेअरमन, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., या कारखान्यास सन २००३-२००४, २००४-२००५, २००५-२००६, २०११-२०१२ व २०१२ २०१३ असे पाच वेळा वसंतदादा शुगर इंस्टिट्युट, पुणे यांचे कडून उत्तम कार्यक्षमता पुरस्काराने सन्मानित; सन २००४ मध्ये भिमा-सीना नदी जोड प्रकल्प पूर्ण करुन २० कि.मी. अंतरावरील ४०० फूट खोलीचा बोगदा पूर्ण करुन माढा तालुक्यातील ११८०० हेक्टर जमीन ओलिता खाली आणण्यासाठी विशेष प्रयत्न; २००५ मध्ये सीना-माढा उपसा सिंचन योजना पूर्ण केली; कारखान्याचा २० मेगावॅटचा सहवीज निर्मिती प्रकल्प सुरु केला; २००३ पासून संचालक, सोलापूर जिल्हा अर्बन बँक असोसिएशन; सप्टेंबर २००३ पासून चेअरमन, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, इंडिया; ऑक्टोबर २००३ पासून व्हाईस चेअरमन, शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, नवी दिल्ली; १९७२-१९८५ सरपंच, मौजे निमगाव (टें.), तालुका-माढा; १९७९-१९८५ सदस्य व १९८५-१९९० सभापती, पंचायत समिती, माढा; १९९२-१९९५ पक्षनेता, जिल्हा परिषद, सोलापूर; १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, रोजगार हमी योजना समिती; २००५-२००८ समिती प्रमुख, आश्वासन समिती; २०१०-२०१४ समिती प्रमुख, पंचायत राज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : युरोपचा अभ्यास दौरा.

छंद : सामाजिक कार्य, वाचन.

पत्ता : (१) मु.पो. निमगांव (टें), तालुका माढा, जिल्हा सोलापूर - ४१३२१०.

दूरध्वनी :- निवास :- (०२१८३) २३३०५१.
कार्यालय :- (०२१८३) २३३०७६.
फॅक्स :- (०२१८३) २३३००५.
मोबाईल :- ९९२२१२११५५, ९४२२४५७१५५.
ई-मेल :- shindebabandada@gmail.com,
vs.sugar@gmail.com

निवडणूक निकाल	
(२४५-माढा)	
एकूण मतदार	३,२६,५३७
एकूण वैध मतदान	२,२७,१०८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. बबनराव विठ्ठलराव शिंदे**	१,४२,५७३ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. संजय कोकाटे	७४,३२८ (शिवसेना)
(३) श्री. अशोक टकाटोडे	३,००० (बहुजन समाज पार्टी)
(४) नोटा	१,६२८
(५) श्री. दिनेश जगदाळे	१,४४९ (संभाजी ब्रिगेड पार्टी)

शिंदे, श्री.महेश संभाजीराजे

जन्म : २२ मे, १९७५.

जन्म ठिकाण : खटाव, जिल्हा सातारा.

शिक्षण : बी.फार्मसी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, पोर्तुगीज, स्पॅनिश व इटालियन.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती प्रिया.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : २५७-कोरेगाव, जिल्हा सातारा.

इतर माहिती : २००७ - २०१२ सदस्य, जिल्हा परिषद ,सातारा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

परदेश प्रवास : ब्राझील, युरोप, ब्रिटेन, इंडोनेशिया, सिंगापूर, यु.ए.ई, मॉरिशस, थायलँड व हाँगकाँग इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : शेती व व्यायाम.

पत्ता : मु.पो. खटाव, जिल्हा सातारा - ४१५५०५.

दुरध्वनी : निवास- ७७०९०३९९९३.

कार्यालय : ७७०९०३९९९५.
मोबाईल : ७७०९०३९९९३.
ई-मेल mahesshinde0003gmail.com

निवडणूक निकाल

(२५७ - कोरेगाव)

एकूण मतदार	३,०२,३००
एकूण वैध मतदान	२,०४,६८४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. महेश संभाजीराजे शिंदे**	१,०१,४८७ [शिवसेना]
(२) श्री.शशिकांत शिंदे	९५,२५५ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(३) डॉ.बाळासाहेब संतू चव्हाण	२,५८३ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री.किरण सावंत	२,०८८ (बहुजन समाज पार्टी)
(५) नोटा	१,२८४

शिंदे, श्री. श्यामसुंदर दगडुजी

जन्म : १५ जून,१९५५.

जन्म ठिकाण : हळदा, तालुका कांधार, जिल्हा-नांदेड.

शिक्षण : एम.एस्सी. (ॲग्री).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहीत, पत्नी श्रीमती आशा.

अपत्ये : एकूण ४ (एक मुलगा व तीन मुली).

व्यवसाय : नोकरी, (भारतीय प्रशासकीय सेवा) IAS (Retd).

पक्ष : शेतकरी कामगार पक्ष.

मतदारसंघ : ८८ -लोहा, जिल्हा-नांदेड.

इतर माहिती : सन १९७९-१९८५ उपजिल्हाधिकारी,रायगड; सन १९८५-१९८८ उप आयुक्त, ठाणे महानगरपालिका; सन १९८८-१९९३ उप नियत्रंक, शिधा वाटप कार्यालय, मुंबई ; सन १९९३-१९९७ अपर जिल्हाधिकारी, (अतिक्रमणे), ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई; सन १९९७-१९९८ उपसचिव, अन्न व नागरी पुरवठा, मंत्रालय; मुंबई; सन १९९८-२००३ जिल्हाधिकारी, रायगड जिल्हा; सन २००३-२००५ मुख्य अधिकारी, म्हाडा (मुंबई गृहनिर्माण मंडळ); सन २००५-२००८ परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई; सन २००८-२००९ सह व्यवस्थापक, सिडको,

नवी मुंबई; सन २००९-२०१०आयुक्त, महानगर पालिका, अमरावती; सन २०१०-२०१३ मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मरीटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई; सन २०१३-२०१५ आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई; सन २०१५-२०१५ आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई; दिनांक ३० जून २०१५ रोजी प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

छंद : वाचन व कबड्डी.

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड, स्वित्झर्लँड, फ्रान्स, साऊथ कोरिया, फिलीपाईन्स, थायलन्ड, मलेशिया, हाँगकाँग, सिंगापूर न्युझीलँड, श्रीलंका इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

पत्ता : (१) रमेश निवास सदभावना मार्ग, प्रजापती ब्रम्हकुमारी आश्रमाजवळ, वसंत नगर पोस्ट ऑफिस मागे, मगनपुरा, वसंत नगर, नांदेड- ४३१६०२.

(२) लोढा बेलिसिमो कॉ.हॉ.सो.३९०१, ऐ विंग, अपोलो मिल्स कंम्पाऊंड, महालक्ष्मी, मुंबई - ४०००११.
दूरध्वनी :- (०२४६२) २२४९९९.
मोबाईल :- ९८२०६५९९९९.
ई-मेल :- shindeshayam1@gmail.com

निवडणूक निकाल

(८८ - लोहा)

एकूण मतदार	२,७४,३२३
एकूण वैध मतदान	१,९२,६९५
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. श्यामसुंदर दगडुजी शिंदे**	१,०१,६६८ (शेतकरी कामगार पक्ष)
(२) श्री. शिवकुमार नारायणराव नारंगळे	३७,३०६ (वंचित बहुजन आघाडी)
(३) श्री. मुक्तेश्वर धोंडगे	३०,९६५ (शिवसेना)
(४) श्री. दिलीप धोंडगे	१४,५१७ (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)
(५) श्री. सुभाष कोल्हे	२,५५९ (संभाजी ब्रिगेड पाटी)

शिंदे, श्री. संजयमामा विठ्ठलराव

जन्म : ३१ जुलै, १९६८

जन्म ठिकाण : कुर्डूवाडी, तालुका-माढा, जिल्हा-सोलापूर

शिक्षण : बी.ए. (ऑनर्स).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सविता.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व व्यापार.

पक्ष : अपक्ष.

मतदारसंघ : २४४-करमाळा, जिल्हा सोलापुर.

इतर माहिती : सन १९९७ पासून संस्थापक - अध्यक्ष, सोजरताई बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था; अध्यक्ष, कै. विठ्ठलरावजी शिंदे माध्यमिक/उच्च माध्यमिक विद्यालय, अंबड; अध्यक्ष, बबनरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले खु.; १९८९-१९९९ सरपंच, ग्रामपंचायत, निमगांव (टें),; १९९९-२००२ सभापती, पंचायत समिती, माढा; याकाळात संपूर्ण तालुक्यात सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम राबविला, त्याची दखल राज्यपातळीवर घेतली गेली; २००९-२०११ उपाध्यक्ष, व २०१७ -२०१९ अध्यक्ष, व सभापती अर्थ समिती, जिल्हा परिषद; सोलापुर;

पुरग्रस्तांना मदत; सन १९९२ पासून संस्थापक - चेअरमन, बबनरावजी शिंदे बिगर शेती सहकारी पतसंस्था, निमगाव (टें); २०११-२०१२, चेअरमन, सोलापुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; २००३ पासून संचालक, सोलापुर जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघ; १९९८ पासून संचालक व २००८ पासून चेअरमन, माढा तालुका कृषी बाजार समिती; २००४-२००९ सदस्य, भारतीय दुरसंचार निगम लि., सोलापूर जिल्हा सल्लागार समिती; १९९५-२००० अध्यक्ष, माढा तालुका युवक काँग्रेस कमिटी; २००१-२०१०, जिल्हा अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस; सन २००२ मध्ये ब्रम्हदेवदादा माने प्रतिष्ठानच्या वतीने शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्नमानित; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

परदेश प्रवास : चीन, इंग्लंड, इस्त्राईल, ऑस्ट्रेलिया, इटली, फ्रान्स, ब्राझिल, न्युझीलँड, दक्षिण आफ्रिका, दुबई, थायलँड, नेपाळ. सिंगापूर व मलेशिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, व्हॉलिबॉल, क्रिकेट व कबड्डी .

पत्ता : मु.पो. निमगांव (टें), तालुका- माढा, जिल्हा-सोलापुर ४१३२१०.

दुरध्वनी : निवास (०२१८३) २३३१५५.
कार्यालय : ७७९६५५४०५५.
मोबाईल : ९४२२४६०६५५.
ई-मेल : sanjaymama-s@yahoo.com.

निवडणूक निकाल (२४४ - करमाळा)	
एकूण मतदार	३,०२,८१६
एकूण वैध मतदान	२,१५,०७१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. संजयमामा विठ्ठलराव शिंदे**	७८,८२२ (अपक्ष)
(२) श्री. नारायण पाटील	७३,३२८ (अपक्ष)
(३) श्रीमती रश्मी बागल	५३,२९५ (शिवसेना)
(४) श्री. अतुल खुपसे	४,४६८ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,५९७

शिरसाट, श्री संजय पांडुरंग

जन्म : २९ नोव्हेंबर, १९६१.

जन्म ठिकाण : औरंगाबाद.

शिक्षण : बी.कॉम.(प्रथम वर्ष).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती विजया.

अपत्ये : एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १०८-औरंगाबाद-पश्चिम (अनुसूचित जाती), जिल्हा-औरंगाबाद.

इतर माहिती : सदस्य, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ; १७ वर्षे संपर्क प्रमुख; शहर संघटक, शहर प्रमुख, उपजिल्हा संघटक, शिवसेना, औरंगाबाद; नगरसेवक (१०वर्षे), सभागृह नेता व सदस्य, स्थायी समिती, महानगरपालिका, औरंगाबाद; संस्थापक, संजय शिरसाट सेवाभावी प्रतिष्ठान; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) १०८, ग्रीन, ७ वा मजला, बीड बायपास रोड, औरंगाबाद.

(२) अ- ४, प्राईड प्लाझा, वेदांत नगर,
औरंगाबाद (संभाजीनगर), जिल्हा औरंगाबाद.
दूरध्वनी : निवास व कार्यालय (०२४०) २३२४०७७.
मोबाईल :- ९७६५३३७७७७.
ई- मेल :- sanjayshirsatmla@gmail.com

निवडणूक निकाल

(१०८-औरंगाबाद- पश्चिम (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	३,३६,०२४
एकूण वैध मतदान	१,९९,५२७
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. संजय पांडुरंग शिरसाट**	८३,७९२ [शिवसेना]
(२) श्री. राजू शिंदे	४३,३४७ (अपक्ष)
(३) श्री. अरुण बोर्डे	३९,३३६ (अखिल भारतीय मजलिस - ए - इत्तेहादूल मुस्लिमीन)
(४) श्री. संदीप शिरसाट	२५,६४९ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	३,१८७

शिरोळे, श्री. सिध्दार्थ अनिल

जन्म : ४ फेब्रुवारी, १९७९.

जन्म ठिकाण : पुणे.

शिक्षण : बी.ई. (मेकॅनिकल).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुजता.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : २०९-शिवाजीनगर, जिल्हा पुणे.

इतर माहिती : २०१४-२०१५ संस्थापक, स्वयंभू ट्रस्ट, पुणे, या संस्थेमार्फत कला क्रीडा क्षेत्रात भरीव कार्य; अनेक सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन; २०१७-२०१९ संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ ; प्रभारी, वित्त समिती, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय युवा मोर्चा; २०१७ पासून नगरसेवक, महानगर पालिका, पुणे; टाईम्स फूड पुरस्काराने सन्मानीत; सन २०१४ मध्ये आयव्हीएलपी अमेरिका येथील आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

लेखन व प्रकाशन : लेखन व प्रकाशन "व्हेन लोटस ब्लुम्स", "एस.एस.जामरीज", टूडे इज माय फेव्हरिट डे", "आजचा दिवस माझा" इत्यादी पुस्तकांचे लेखन.

परदेश प्रवास : अमेरिका, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, इंग्लंड, दुबई, श्रीलंका व चीन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : लेखन, गायन, व्यायाम व संगीत.

पत्ता : (१) १२०१/१ अ गुलाब-शशिकाला बंगला, घोलेरस्ता, पुणे ४११००४.

(२) ११९९/१ अ फर्ग्युसन कॉलेज रस्ता, हॉटेल परिचय, पुणे-४११००४.

दूरध्वनी : (०२०) २५५३१५११.

मोबाईल : ९८९००२३६००.

ई-मेल : shiroleshidarth@gmail.com.

निवडणूक निकाल

(२०९ - शिवाजीनगर)

एकूण मतदार	३,०५,७००
एकूण वैध मतदान	१,३४,०७०
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सिध्दार्थ अनिल शिरोळे**	५८,७२७ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. दत्ता बहिरट	५३,६०३ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. अनिल कुऱ्हाडे	१०,४५४ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. सुहास निम्हण	५,२७२ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(५) नोटा	२,३९०

शेख, श्री. अस्लम रमजान अली

जन्म : ५ नोव्हेंबर, १९६८.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : आठवी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी व उर्दू.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती रिजवाना.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

मतदारसंघ : १६२-मालाड-पश्चिम, जिल्हा-मुंबई-उपनगर.

इतर माहिती : अध्यक्ष, विजन फाऊंडेशन, मुंबई; सचिव, रमजानअली इंग्लिश स्कुल आणि कनिष्ठ महाविद्यालय; गोरगरीब रुग्णांना मदत, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; २००२ - २००७ व २००७ -२०१२ नगरसेवक, २००७-२००८ अध्यक्ष, पी उत्तर प्रभाग समिती, महानगरपालिका, मुंबई; सरचिटणीस व कोषाध्यक्ष, मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अंदाज समिती; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. जानेवारी, २०२० पासून वस्त्रोद्योग, मत्स्व्यवसाय व बंदरे खात्याचे मंत्री.

छंद : फुटबॉल व बॅडमिंटन.

पत्ता : (१) ८, ग्रीन फिल्ड, खारोडी मार्वे रोड, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००९५.

दूरध्वनी :- कार्यालय - (०२२) २८०८७७२१.
मोबाईल :- ९८९२९१५५५७.
ई-मेल :- aslamshaikhoffice@gmail.com
(२) शाहब रेसिडेन्सी, तळ मजला, खारोडी, तलाठी कार्यालयासमोर, मार्वे रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००९५.
(३) बेलहेवन, वाळकेश्वर , मुंबई.
दूरध्वनी :- (०२२) २२०२५२७०, २२०२६५८२.

निवडणूक निकाल

(१६२-मालाड-पश्चिम)

एकूण मतदार	२,९६,४९५
एकूण वैध मतदान	१,५६,३१८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अस्लम रमजानअली शेख**	७९,५१४ [भारतीय राष्ट्रीय काँग्रेस]
(२) श्री. रमेश ठाकूर	६९,१३१ (भारतीय जनता पक्ष)
(३) नोटा	३,४९०
(४) श्री. शकील पटनी	९२७ (अपक्ष)
(५) श्री. केशव जाधव	८६४ (बहुजन समाज पार्टी)

शेख, श्री. रईस कासम

जन्म : १ जून, १९७४.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती आतिया.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : उद्योजक.

पक्ष : समाजवादी पक्ष.

मतदारसंघ : १३७-भिवंडी (पूर्व), जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : सन २०१३ पासून अध्यक्ष, अहतेसाब फाऊंडेशन, मुंबई; या संस्थेमार्फत मदनपुरा येथे शाळा सुरु केली; भिवंडी-निजामपुर महानगरपालिकेत समाजवादी पक्षाचे प्रभारी; २००७ पासुन सचिव व प्रमुख प्रवक्ते, समाजवादी पक्ष, मुंबई; २०१२-२०१७ व २०१७ पासून नगरसेवक, समाजवादी पक्षाचे गटनेते, स्थायी समिती सदस्य, मुंबई महानगरपालिका; सन २०१३ व २०१७ मध्ये मुंबई मिररतर्फे उत्कृष्ट नगरसेवक पुरस्काराने सन्मानित; २०१९ मध्ये काविश संस्थेचा सर्वोत्तम लोकप्रतिनिधी पुरस्कार प्राप्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

परदेश प्रवास : अमेरिका, साऊथ कोरिया, ऑस्ट्रिया, युएई, चीन, इंडोनेशिया, सिंगापूर,सौदी अरेबिया, इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व परदेशी प्रवास

पत्ता : फलॅट नं २१०२, २१ वा मजला,ए विंग, ऑर्चीड एन्कलेव्ह, जहागीर बोमन मार्ग, मुंबई सेंट्रल बस डेपो समोर, मुंबई- ४०००० ८.

दूरध्वनी निवासः(०२२) ६६५७६२५०.
कार्यालय (०२२) २२७०५१५७, २२७०५१५८.
मोबाईल : ९८१९७९४७४७, ९८२००८३५४०.
ई-मेलः raissp132@gmail.com.

निवडणूक निकाल

(१३७-भिवंडी-पूर्व)

एकूण मतदार	२,६९,९३५
एकूण वैध मतदान	१,२९,२७१
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **रईस कासम शेख**	४५,५३७ [समाजवादी पक्ष]
(२) श्री. रुपेश म्हात्रे	४४,२२३ (शिवसेना)
(३) श्री. संतोष शेट्टी	३२,१९८ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) श्री. बुध्देश जाधव	२,०६५ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. मनोज गुलवी	१,४९२ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)

शेलार, ॲड. आशिष बाबाजी

जन्म : २७ ऑगस्ट, १९७२.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : बी.एस्सी., एलएल.बी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती ॲड. प्रतिमा.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : १७७-वांद्रे-पश्चिम, जिल्हा-मुंबई उपनगर.

इतर माहिती : सदस्य, महाराष्ट्र हायस्कूल, दादर, मुंबई; अध्यक्ष, स्पंदन कला संस्था; अध्यक्ष, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, वांद्रे; १९८८-१९९५ अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा पूर्णवेळ कार्यकर्ता; मुंबई शहर सचिव, अखिल भारतीय विद्यार्थी परषिद; मुंबई विद्यापीठाच्या स्टुडंट कौन्सिल वर निवड; जे.जी. अडवाणी विधी महाविद्यालयाचे विद्यापीठ प्रतिनिधी; अध्यक्ष, मुंबई क्रिकेट असोसिएशन; २००८ स्पंदन कलसंस्थेची स्थापना करुन या संस्थेच्या माध्यमातून २६ जुलै च्या मुंबईतील भीषण महापुरावर आधारित चित्रपटाची निर्मिती केली; माधव सदाशिव गोळवळकर ऊर्फ गुरुजी यांच्या जन्मशताब्दी निमित्त लघुपट तयार केला; स्वामी विवेकांनद

यांच्या १५० व्या जयंती निमित्त लघुपट निर्मिती केली; मुंबईतील गिरणी कामगारांच्या जीवनावर आधारित डेट चिमणी लघुपट तयार केला; "चांगभलं" व "काजळी" या चित्रपटांची निर्मीती; कलावंतासाठी महंमद रफी पुरस्कार सुरु केला; अध्यक्ष, क्षत्रिय गडकरी मराठा महासंघ; गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मदत; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; अध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, मुंबई; १९९५ मधील भाजपा महाअधिवेशनाचा कोअर कमिटीचे सदस्य; भाजप उत्तर पश्चिम, मुंबई भारतीय जनता पक्ष; २०१३ ते २०१९ अध्यक्ष, मुंबई प्रदेश भारतीय जनता पक्ष; २००२-२००७, २००७-२०१२ नगरसेवक, भाजप गटनेता, सदस्य, स्थायी समिती व बेस्ट समिती, अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगरपालिका; सदस्य, महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई; २०१२-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; जून, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ शालेय शिक्षण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, फ्रान्स व युनायटेड किंग्डम इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन आणि क्रिकेट.

पत्ता : (१) ६०२, हायलॅण्ड कोर्ट, सी विंग, बझार रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०००५०.

दूरध्वनी : निवास - (०२२) २६४१६८४८.
कार्यालय - (०२२) ६९९९४२४२.
मोबाईल - ९८२०१२०२०५.
ई-मेल - ashish.shelar@yahoo.com
bjpbandrawest@gmail.com
संकेत स्थळ : www.advashishshelar.in
(२) २, न्यू फ्रेंडस अपार्टमेंट, बझार रोड, वांद्रे (पश्चिम),
मुंबई- ४०००५०.

निवडणूक निकाल	
(१७७-वांद्रे-पश्चिम)	
एकूण मतदार	२,९७,७१६
एकूण वैध मतदान	१,३१,००४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **ॲड. आशिष बाबाजी शेलार**	७४,८१६ [भारतीय जनता पक्ष]
(२) असिफ झकेरिया	४८,३०९ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) नोटा	३,५३१
(४) श्री, क्षियाग जागिरदार	३,३१२ (वंचित बहुजन आघाडी)
(५) श्री. अरुण जाधव	१,०३६ (बहुजन समाज पार्टी)

शेळके, श्री. सुनिल शंकरराव

जन्म : ५ मे, १९८०.

जन्म ठिकाण : तळेगाव, तालुका मावळ, जिल्हा पुणे.

शिक्षण : दहावी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सारिका.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : उद्योजक.

पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २०४-मावळ, जिल्हा पुणे.

इतर माहिती : मावळ तालुक्यातील गावे दत्तक घेवून गावांचा सर्वांगीण विकास केला; तालुक्यातील सामान्यजनतेसाठी मोफत रुग्ण वाहिका उपलब्ध करून दिली. सन २०१६ मध्ये नगरसेवक, (बिनविरोध) उप-नगराध्यक्ष व सभापती पाणी पुरवठा समिती, नगरपरिषद, तळेगाव, जिल्हा पुणे; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

प्रदेश प्रवास : न्युझिलँड, दक्षिण अफ्रिका, मकाऊ, हाँग-काँग, ऑस्ट्रेलिया व इंडोनेशिया इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

छंद : सामाजिक कार्य.

पत्ता : १) प्लॉट नं ९१, कडोळकर कॉलनी, तळेगाव दाभाडे, तालुका मावळ, जिल्हा पुणे- ४१०५०६.

२) प्लॉट नं-७०, साई हाऊस, कडोळकर कॉलनी, मावळ, जिल्हा पुणे.
दूरध्वनीः निवासः (०२११४) २२३१३७.
कार्यालयः (०२११४) २२३४५६.
मोबाईलः ९८९००९९००९ / ९९३०८४३१३२.

निवडणूक निकाल

(२०४-मावळ)

एकूण मतदार	३,४८,५८१
एकूण वैध मतदान	२,४८,२२४
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सुनिल शंकरराव शेळके**	१,६७,७१२ [राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष]
(२) श्री. संजय उर्फ बाळा भेगडे	७३,७७० (भारतीय जनता पक्ष)
(३) श्री. रमेश ओव्हाळ	२,७२८ (वंचित बहुजन आघाडी)
(४) नोटा	१,४९०
(५) श्रीमती मंदाकिनी भोसले	८९१ (बहुजन समाज पार्टी)

सत्तार, श्री. अब्दुल नबी

जन्म : १ जानेवारी, १९६५.

जन्म ठिकाण : सिल्लोड, जिल्हा- औरंगाबाद.

शिक्षण : बी.ए.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती नफीजा बेगम.

अपत्ये : एकूण ७ (दोन मुलगे व पाच मुली).

व्यवसाय : व्यापार.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १०४ -सिल्लोड, जिल्हा- औरंगाबाद.

इतर माहिती : अध्यक्ष, नॅशनल एज्युकेशन संस्था; अध्यक्ष, प्रगती शिक्षण संस्था; अध्यक्ष, प्रियदर्शनी क्रीडा मंडळ, सिल्लोड; सार्वजनिक गणेशोत्सव कार्यक्रमांचे आयोजन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; आदिवासी व दलित समाजातील सामुहिक विवाहांचे आयोजन; किल्लारी, जिल्हा लातूर येथील व गुजरात राज्यातील भूज येथील भूकंपग्रस्तांना मदत कार्य; मोहाडी पूरग्रस्तांना मदत; १९८४ ते १९९० सदस्य, ग्रामपंचायत, सिल्लोड; ५ मार्च, १९९४ ते ९ जानेवारी, १९९६, २९ ऑगस्ट, १९९८ ते ४ मार्च, १९९९ व १५ फेब्रुवारी, २००० ते ६ सप्टेंबर, २००१, अध्यक्ष, नगरपरिषद, सिल्लोड;

चेअरमन, विविध कार्य सेवा सोसायटी, सिल्लोड; संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सिल्लोड; संचालक, म्हसोबा महाराज तेलबिया उत्पादक सहकारी संस्था; संचालक, दुध उत्पादक सहकारी संस्था, सिल्लोड; संचालक, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; २००१-२००६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद ; २००९-२०१४, २०१४- २०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २ नोव्हेंबर, २००९ ते डिसेंबर, २०१० अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण आणि सार्वजनिक बांधकाम खात्याचे राज्यमंत्री; २ जून, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय खात्याचे मंत्री; मे, २०१९ पासून शिवसेना पक्षाचे कार्य; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; जानेवारी, २०२० पासून महसूल, ग्रामविकास, बंदरे, खारजमिनी विकास व विशेष सहाय खात्याचे राज्य मंत्री.

छंद : क्रिकेट खेळणे.

पत्ता : (१) घर क्र. ७८६, स्नेहनगर, सिल्लोड, तालुका- सिल्लोड, जिल्हा- औरंगाबाद.

(२) गांधीभवन, प्रियदर्शनी चौक, मेन रोड, सिल्लोड,
तालुका- सिल्लोड, जिल्हा- औरंगाबाद, पिन - ४३१११२.
दूरध्वनी : निवास - (०२४३०) २२४१९९.
कार्यालय - (०२४३०) २२२९५१.
मोबाईल- ९४२२२०४३६७.
ई-मेल - abdulsattarsillod@gmail.com
(३) सुरुची-१५ जगन्नाथ भोसले मार्ग, मंत्रालय समोर,
मुंबई ४०००३२.
दूरध्वनी : निवास - (०२२) २२०२०२९०, २२०२०२९१.
कार्यालय - (०२२) २२८७६०६९, २२८७६४६३.

निवडणूक निकाल (१०४-सिल्लोड)	
एकूण मतदार	३,१६,९१८
एकूण वैध मतदान	२,३८,४२८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. अब्दुल नबी सत्तार**	१,२३,३८३ [शिवसेना]
(२) श्री. प्रभाकर पलोडकर	९९,००२ (अपक्ष)
(३) श्री. दादाराव वानखेडे	७,८१७ (वंचित बहुजन आघाडी)
(४) श्री. कैसर, शेख	२,९६२ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(५) नोटा	२,८४४

सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव

जन्म : २५ एप्रिल, १९६४.

जन्म ठिकाण : वर्धा.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती परिषा.

अपत्ये : एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : बांधकाम व्यवसायिक.

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १४६-ओवळा-माजिवडा, जिल्हा-ठाणे.

इतर माहिती : सदस्य, कोकण गृहनिर्माण विकास मंडळ; सदस्य, मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण; सहसंपर्क प्रमुख, मिरा-भाईंदर शिवसेना; १९९७-२०१२ नगरसेवक, ठाणे महानगरपालिका; महाराष्ट्रातील पहिले बचतगट भवन उभे केले; ग्रंथालय, जेष्ठ नागरिकांचे वेल्फेअर सेंटर, इको-गार्डन, बॅडमिंटन, लॉग टेनिस कोर्ट, मुलांकरिता बाल विज्ञान केंद्र सुरू केले; शासनाच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, येऊर पर्यटन स्थळ, घोडबंदर रोडवर भीम पार्क, भायंदर खाडी मध्ये जेटी सुरु केली; ठाणे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारण्यासाठी विशेष प्रयत्न केले;

तरण तलाव, खुला रंगमंच, प्रभाग समिती कार्यालय इत्यादी महत्वाकांक्षी प्रकल्प महानगरपालिकेच्या माध्यमातून पूर्ण केले; चेअरमन, सिध्देश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ठाणे; अध्यक्ष, संस्कृती युवा प्रतिष्ठान ठाणे; चेअरमन, विहंग एज्युकेशन ट्रस्ट; आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन; रक्तदान शिबीरांचे आयोजन; रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी खड्ड्यांमध्ये झाडे लावणे, नाल्यामध्ये सायकल चालविणे यासारखी अनेक अनोखी आंदोलने केली; नवोदित कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन; विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन मेळावे तसेच व्याख्यानमालांचे आयोजन; "या तरुणांनो या चला लाईफ घडवू या" व 'शिवगौरव पुरस्कार' यासारखे उपक्रम सुरु केले; सार्वजनिक गणोशोत्सव, नवरात्रोत्सव, दहिहंडी उत्सवांचे आयोजन व नऊ थरांच्या हंडीचा जागतिक विक्रम घडविण्याचे कार्य; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महराष्ट्र विधानसभा; विधी मंडळाच्या नियम समिती, विशेष हक्क समिती व सार्वजनिक उपक्रम समितीचे सदस्य; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जपान, चीन, थायलंड व युनायटेड किंग्डम इत्यादीं देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन, सामाजिक कार्य व व्यायाम.

पत्ता : (१) ८०३/८०४, स्टेप्स बिल्डींग क्रमांक. ०७, वसंत लॉन्स, माजिवडा, ठाणे (पश्चिम), ठाणे - ४०० ६०६.

दूरध्वनी : निवास - २१७१७५७८.
कार्यालय - २५४२७२१७, २५४२३१००.
मोबाईल - ९८२१५०५०००.
ई-मेल - pratapsarnaik@gmail.com
(२) बी-१/बी-२, विहंग गार्डन, रेमंड कंपनीसमोर, पोखरण रोड-०१, वर्तकनगर, ठाणे - ४०० ६०६.

निवडणूक निकाल

(१४६-ओवळा-माजिवडा)

एकूण मतदार	४,४९,७१७
एकूण वैध मतदान	१,९३,६६९
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. प्रताप बाबुराव सरनाईक**	१,१७,५९३ [शिवसेना]
(२) श्री. विक्रांत चव्हाण	३३,५८५ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) श्री. संदिप पाचांगे	२१,१३२ (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(४) श्री. किशोर दिवेकर	६,४९२ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	६,०५४

सरवणकर, श्री. सदानंद शंकर

जन्म : १ जून, १९५४.

जन्म ठिकाण : मुंबई.

शिक्षण : एस.एस.सी.

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती राजनंदा.

अपत्ये : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली).

पक्ष : शिवसेना.

मतदारसंघ : १८१-माहीम, जिल्हा-मुंबई.

इतर माहिती : विश्वस्त, प्रभादेवीचा राजा गणेशोत्सव मंडळ; १७ वर्षे उपाध्यक्ष व २ वर्षे अध्यक्ष, स्वामी समर्थ क्रीडा मंडळ, प्रभादेवी; २००३-२००५ व २०१३ पासून, शिवसेना विभाग प्रमुख; तीन वेळा नगरसेवक व दोन वेळा स्थायी समिती अध्यक्ष, मुंबई महानगरपालिका; २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

परदेश प्रवास : युरोपीय देशांचा अभ्यास दौरा.

छंद : वाचन व सामाजिक कार्य.

पत्ता : (१) निवासः- ८२, देवकुंज, २ रा मजला, केळुसकर मार्ग (दक्षिण), शिवाजी पार्क, दादर (प),मुंबई- ४०००२८.

(२) कार्यालयः- हेरंब, हेंद्रे कॅसल बिल्डींग, तळमजला, द.स. बाबरेकर मार्ग ऑफ गोखले रोड (उत्तर),पेट्रोल पंपाजवळ, दादर (प) मुंबई- ४०००२८.

ई-मेल :- sadasarvankar181@gmail.com

निवडणूक निकाल

(१८१-माहीम)

एकूण मतदार	२,३५,४७९
एकूण वैध मतदान	१,२४,०२८
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. सदानंद शंकर सरवणकर**	६१,३३७ [शिवसेना]
(२) श्री. संदीप देशपांडे	४२,६९० (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)
(३) श्री. प्रविण नाईक	१५,२४६ (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(४) नोटा	३,९१२
(५) श्री. मोहनीश राऊळ	८४३ (अपक्ष)

ससाणे, श्री. नामदेव जयराम

जन्म : १ जानेवारी, १९७२.

जन्म ठिकाण : उमरखेड, जिल्हा यवतमाळ.

शिक्षण : एम.ए.(इतिहास).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अनुजा.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : शेती.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदारसंघ : ८२-उमरखेड (अनुसूचित जाती), जिल्हा यवतमाळ.

इतर माहिती : नगराध्यक्ष, नगरपरिषद, उमरखेड; उत्कृष्ट नगरपरिषद अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधान सभेवर निवड.

छंद : फुटबॉल खेळणे, गाणी ऐकणे व लोकसंग्रह वाढविणे.

पत्ता : नाथ नगर तालुका उमरखेड, जिल्हा यवतमाळ.

मोबाईल-७०८३७०००८४.
ई-मेल- namdeosasane@gmail.com

निवडणूक निकाल

(८२-उमरखेड (अनुसूचित जाती))

एकूण मतदार	२,९३,४८०
एकूण वैध मतदान	१,९६,७१६
पहिल्या पाच उमेदवारांची मतसंख्या	
(१) **श्री. नामदेव जयराम ससाणे**	८७,३३७ [भारतीय जनता पक्ष]
(२) श्री. विजयराव खडसे	७८,०५० (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस)
(३) डॉ. उमाजी विंकारे	१८,२४८ (अपक्ष)
(४) श्री. प्रमोद दुथडे	६,४३३ (वंचित बहुजन आघाडी)
(५) नोटा	१,४९७

साकोरे-बोर्डीकर, श्रीमती मेघना दिपक

जन्म : १० एप्रिल, १९८०.

जन्म ठिकाण : परभणी.

शिक्षण : बी.एस्सी.(कॉम्प्युटर).

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पती श्री. दिपक कृष्णाजी साकोरे.

अपत्ये : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी).

व्यवसाय : शेती व औषध निर्मिती उद्योग.

